सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)

अल्पकालीन चर्चा

पृ.शी.: रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील फळबागायतदारांना विविध नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागणे

मु.शी.: रायगड,रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यातील फळबागायतदारांना विविध नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागणे या विषयावर श्री.राजन तेली वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

तालिका सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही.या चर्चेसाठी मी दीड तासाचा वेळ दिलेला आहे.सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय,मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :--

"रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील आंबा,काजू व इतर फळबागायतदारांना हंगाम सुरु झाल्यापासून विविध नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागणे, चालू हंगामात अपेक्षेपेक्षा आंबा पीक 30 टक्के इतके कमी येणे, तसेच सध्या तापमानात झालेली वाढ व कमी झालेली आर्द्रता यामुळे आंबा व काजू पिकांची फार मोठया प्रमाणात गळती होणे, झाडावर राहिलेला आंबा तापमानात वाढ झाल्यामुळे झाडावरच खराब होणे, आंबा कमी असून सुध्दा बाजारपेठेत आंब्याचे भाव 50 टक्क्यांपेक्षा कमी होणे, त्यामुळे बागायतदार अडचणीत येणे, तसेच यापूर्वी फयान वादळामुळे झालेले नुकसान व शासनाकडून नुकसान भरपाई मिळण्यास होणारा विलंब तसेच काजूवरील मूल्यवर्धित कर (व्हॅट) 4 टक्क्यावरुन साडेबारा टक्के केल्यामुळे हजारो टन काजू बी पडून राहणे, नैसर्गिक आपत्तीमुळे व शासनाच्या उदासिन धोरणामुळे कोकणातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. कोकणातील शेतकऱ्यांच्या .....

श्री.राजन तेली . . ..

दृष्टीकोनातून ही अतिशय महत्वाची चर्चा असून,सभागृहातील जवळपास सर्व सन्माननीय सदस्यांनी या कोकणातील बागायतदारांना विविध नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे, त्यासंदर्भात चर्चा करण्याच्या बाबतीत मागणी केली होती.

सभापती महोदय, आज कोकणातील उद्योजक, आंबा बागायतदार मोठया प्रमाणात अडचणी मध्ये आहेत.रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आंबा आणि काजूचा हंगाम सुरु झाला असला तरी सुध्दा तेथील शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. यावर्षी मुळातच अपेक्षेपेक्षा आंब्याच्या पिकाचे उत्पादन 30 टक्यापेक्षा कमी होते. सुरुवातीला फळ आल्यानंतर ते पिकविल्यानंतर त्यावर कुलकिडी नावाचा रोग आला. तसेच 2010 मध्ये अति उष्मा झाला आणि त्या मुळे हवेतील आद्रता किमान 43.6 आणि ह्युमिडिटी 12 टक्के वाढल्यामुळे अगोदर आंबा, काजू, करवंद, जांभूळ इ.पिकांचे 30 टक्के उत्पादन अपेक्षित होते, परंतु ते कमी झाल्यामुळे तेथील शेतकरी मोठया प्रमाणात अडचणीमध्ये आलेला आहे. आंब्याच्या पिकासाठी 32 ते 33 टक्के तापमान पाहिजे, पण मध्यंतरीच्या काळामध्ये ते अचानक वाढल्यामुळे आणि तापमानातील आद्रता कमी झाल्यामुळे आंबा, काजूच्या उत्पादनामध्ये फार मोठया प्रमाणात घट झालेली आहे. आज अशी स्थिती आहे की, आंबा झाडावरुन आपोआप तुटून पडतो. काही भागात 60 ते 70 टक्के तर काही भागामध्ये 20 ते 30 टक्के या पिकांवर परिणात झालेला आहे आणि हा परिणाम अजून काही दिवस सुरु रहाणार आहे. आंब्याच्या देठाजवळ कॅरटीन असते आणि ते सेन्सेटीव्ह असते. परंतु तापमान वाढल्यामुळे देठाजवळ असलेले कॅरटीन जळून जाते आणि आंबा खाली पडतो. त्यामुळे आंब्यामध्ये मऊपणा किंवा पांढरेपणा येतो. अशा वेळी हा आंबा लोक घेत नाहीत अशी स्थिती निर्माण झालेली आहे. या आंब्याचा दर 3 तारखेला 1800 पेटी इतका होता. पण या अडचणींमुळे आंब्याचे रेट कमी झाले. त्यातच 16 एप्रिल रोजी अवेळी पाऊस आला आणि त्यामुळे देखील आंबा गळून पडला. त्याचाही परिणाम झाला आहे. यामध्ये दुसरी अडचण अशी आहे की, मुंबई महानगरपालिकेने आंब्याच्या व्यापाऱ्यांवर कारवाई सुरु केली आहे. कारण काही जणांनी कॅल्शिअम कार्बाईडचा वापर करुन आंबे पिकविण्याचा प्रयत्न केला आणि याबाबतीत इलेक्ट्रॉनिक मिडियाने देखील कॅल्शिअम कार्बाईडचा वापर करुन आंबा पिकविण्यात येत असल्याने, तो कसा विषारी आहे आणि त्यामुळे शरीरावर कसा परिणाम होणार आहे याबाबत अर्धा-अर्धा तास टी.व्ही...

. . . .अे-3

श्री.राजन तेली . . . .

वर माहिती दाखविली. त्यामुळे लोकांमध्ये अफवा पसरल्याने अगोदरच आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे कंबरडे मोडले होते आणि दुसरीकडे आंब्याच्या बाबतीत अफवा पसरल्याने हा शेतकरी अजूनच अडचणीमध्ये आला आहे.आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, शेतकऱ्याच्या मालाला उठाव राहिलेला नाही. आंबा-काजू इ.कोकणातील पिके गेल्या पाच-सहा वर्षापासून अडचणीमध्ये आहेत, तसेच कृषी सेवा केंद्र देखील अडचणीमध्ये आली आहेत म्हणून त्यांच्या बाबतीत विचार करावयास पाहिजे. हापूस आंब्याचे सर्वात जास्त क्षेत्र हे रत्नागिरी व सिंधुदूर्ग मध्ये आहे. परंतु आज कोकणामध्ये या पिकांच्या बाबतीत साधारणपणे किमान 300 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

श्री. राजन तेली.....

एक लाख हेक्टर्समधील हापूस आंबा तापमानाच्या चढऊतारामुळे अत्यंत प्रभावित झालेला आहे. त्यामुळे शेतकरी फार मोठया प्रमाणात चिंतेत आहे. राज्यात एकूण आंब्याच्या लागवडीचे क्षेत्र 4,35,000 हेक्टर आहे. त्यापैकी कोकणात 1,64,000 हेक्टर इतके क्षेत्र आहे. सभापती महोदय, कोकणातील आंब्यावर केवळ हवामानाच्या बदलाचाच परिणाम झालेला नाही तर कोकणात फयान वादळ आले तसेच आणि इतर गोष्टीही झालेल्या आहेत. त्याचाही परिणाम यावर झालेला आहे. पण याबाबतीत जे संशोधन व्हावयास पाहिजे होते ते संशोधन दापोली कृषि विद्यापीठाने केलेले नाही, असे मला वाटते. फयान वादळ आल्यानंतर किंवा अशा प्रकारचे प्रसंग आल्यानंतर काय करावयस पाहिजे याबाबतचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करावयास पाहिजे होते परंतु तशा प्रकारचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात आलेले नाही. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या संदर्भात नियोजन झालेले नाही. त्यामुळे कोकणातील हापूस आंबा उत्पादक तसेच सर्वसामान्य शेतकरी अडचणीत आलेले आहेत. कोकणात रत्नागिरी जिल्हयात आंब्याचे 65,000 हेक्टर तर काजूचे 80,000 हेक्टर इतके बागायती क्षेत्र आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात 28,000 हेक्टर आंब्याचे तर 90,000 हेक्टर काजूचे बागायती क्षेत्र आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण बागायती क्षेत्र 2,63,000 हेक्टर आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयाप्रमाणेच आता रायगड जिल्हयात देखील आंबा लावावयाला सुरुवात केलेली आहे. फयानच्या तडाख्यात मागच्यावेळी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा अडकला होता. त्यावेळी शासनाने काही प्रमाणात शेतकऱ्यांना मदत केली पण ती मदत चेष्टा करणारी होती. साधारणत: एका आंब्याच्या झाडाला 100 रुपये ते 150 रुपये इतकी मदत देण्यात येते होती. एकंदरित विचार केला तर आंब्याचे एक झाड दहा पेटया आणि जातीतजास्त 40 पेटया पर्यंत आबा देते. या आंब्यांच्या संदर्भात जी नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे ती चेष्टा करणारी आहे. म्हणून याचा देखील शासनाने विचार करावा, अशी मी याठिकाणी विनंती करतो. मागच्यावेळी किमान 2 कोटी 52 लाख रुपयापेक्षा अधिक आंब्याचे नुकसान झालेले होते. आंबा गळून पडणे, फयानसारख्या वदळामुळे आणि वारंवार पडणाऱ्या रोगामुळे वर्षानुवर्षे आंब्याची किंवा काजूची परिस्थिती फारच बिकट होत चाललेली आहे. म्हणून याबाबतीत नेमका काय चांगला विचार करता येईल, विद्यापीठ काय संशोधन करील याचा याठिकाणी विचार करणे आवश्यक आहे.

...2..

श्री. राजन तेली...

सभापती महोदय, खरे म्हणजे हा आंबा राज्याच्या उत्पन्नात भर टाकणारा आहे. पण दुर्दैवाने असे म्हणावे लागेल की, हापूस आंब्याचा महाराष्ट्र राज्याच्या अर्थकारणात अद्यापही समावेश केलेला नाही. सन 2009-2010 च्या आर्थिक पहाणीच्या अहवालात आंब्याचा कुठेही उल्लेख दिसत नाही. म्हणून भविष्यात आंब्याची आणि काजूची आर्थिक उन्नती करायची असेल, कोकणातील आर्थिक नाडी पूर्णपणे बदलायची असेल तर कोकणातील ही जी फळफळावळ आहे. मग तो आंबा असेल, काजू असेल, जांभूळ असेल, करवंद असतील यासंदर्भात प्रक्रिया उद्योग निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शासनाने यासंदर्भात एक निश्चित धोरण जाहीर करावे, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, काजूवरील व्हॅटचा विषय आहे. गोव्यात चार टक्के व्हॅट आहे. कर्नाटकात 5 टक्के व्हॅट आहे. केरळमध्ये 5 टक्के व्हॅट आहे आणि महाराष्ट्र राज्यात तो साडेबारा टक्के लावण्यात येणार आहे. शेतकरी अगोदरच अडचणीत आलेले आहेत. काजू बी चा दर 60 रुपये होता तो आता 48 रुपये झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात 250 कोटी रुपयाचा काजू होतो. या 250 कोटी रुपयाच्या काजू पैकी आपल्या राज्यात किती काजूवर प्रक्रिया करतो याचा विचार करावयास पाहिजे. व्हॅट वाढविल्यामुळे लोक चोरी करतात. माझ्याकडे अशी माहिती आहे की, काजूची साधारणत: 2100 युनिट्स आहेत. त्यातील किती उद्योग आपला व्यवसाय दाखवतात किती उद्योग रोजगार निर्माण करतात? हा देखील संशोधनाचा विषय आहे म्हणून काजूवरील व्हॅटचा दर झिरो टक्के करावयास पाहिजे. तरच यामधून या ठिकाणी रोजगाराची निर्मिती होईल आणि कोणी चोरी करणार नाही. काजू व्यापारी किंवा काजू युनिट आहेत ते कोणी चोरी करणार नाहीत. काजूवर याचठिकाणी प्रोसेसिंग झाले तर येथे मोठया प्रमाणात रोजगार उपलबध होईल.

सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून काही गोष्टी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. शासनाचे अधिकारी चुकीचे काम करतात. आमच्या जिल्हयाचे कृषि अधिकारी काहीच काम करीत नाहीत. ते असे सांगतात की, 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले नाही त्यामुळे आम्ही सर्व्हे करणार नाही. आम्हाला याबाबतीत शासनाचे आदेश आलेले

...3..

श्री. राजन तेली....

नाहीत. ते अगदी मस्त फिरत असतात तसेच शासनाने काही नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न केला तर ती शेतकऱ्यापर्यंत कसे पोहचणार नाही याची हमी मात्र हे अधिकारी घेतात. 2006 मध्ये कोकणात अवेळी पाऊस पडला, त्यासाठी शासनाने 6 कोटी 28 लाख रुपयाची नुकसान भरपाई दिली पण शेतकऱ्यांपर्यंत ती अद्याप पोहचलेली नाही. देण्यात आलेली ही नुकसान भरपाई दोन वेळा परत गेली. तेव्हा याबाबतीत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. जे अधिकारी मस्ती करीत असतील, शेतकऱ्यांना अडचणीत आणीत असतील,त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. बरवड...

श्री. राजन तेली .....

2006 नंतर आता चार वर्षे झाली तरी शेतकऱ्यांना भाताचे पैसे मिळालेले नाहीत. 2008 मध्ये केंद्र शासनाने आमच्या एका जिल्ह्याकरिता औषधे आणि बी-बियाणांसाठी 27 कोटी रुपये देण्याचे मान्य केले. आता 2010 साल चालू आहे. दोन वर्षे झाली तरी शेतकरी आज एवढे अडचणीत असताना त्या वस्तूंचे वाटप करण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही. यामागे कोण आहे ? त्याबाबतीत कारवाई का करत नाही ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगावे. एक तर कोकणातील शेतकरी आपल्याला कधी काही मागत नाही. महाराष्ट्रामध्ये द्राक्षे असतील, ऊस असेल, कापूस असेल त्यासाठी उत्पन्न वाढले तरी पैसे देतो, उत्पन्न कमी झाले तरी पैसे देतो. तेही शेतकरी आहेत आणि त्यांना देण्याबद्दल दुमत नाही पण कोकणातील शेतकऱ्यांवर अन्याय करु नका असे माझे प्रामाणिक मत आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगेन की, कोकणात शासनाने हेक्टरी 6 हजार रुपये प्रमाणे पैसे दिले. तेथील शेतकऱ्यांची चेष्टा कशाला करता ? ते कधी काही मागत नाहीत. त्या ठिकाणी हेक्टरी 50 हजार रुपये द्यावेत. किमान त्या ठिकाणी सर्व्हे करण्याचे आदेश तरी द्यावेत. एवढे नुकसान होऊनही अजून त्या ठिकाणी आदेश गेलेले नाहीत. तसे आदेश शासनाने द्यावेत. बागायतदारांचे जे कर्ज आहे ते माफ करावे आणि त्यांना कमी दराने कर्जपुरवठा करावा. आज आंब्याची अशी परिस्थिती आहे की, लोक लोणच्यासाठी सुध्दा आंबे घेत नाहीत. आंब्याच्या कॅनिंगचा दर 10 ते 12 रुपये प्रती किलो आहे. आंब्याला हमी भाव दिला तर आंब्याचे दर स्थिर राहतील. माझी अशी मागणी आहे की, कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रोसेसिंग युनिट चालू करावेत. आंबा, काजू, करवंद, जांभळे असतील त्यासंदर्भात त्या ठिकाणी प्रोसेसिंग युनिट चालू करावेत. आज त्या ठिकाणी काही प्रोसेसिंग युनिट आहेत. आणखी प्रोसेसिंग युनिट येण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करावे. वाईनच्या बाबतीत टीका करण्यात येते. धान्यापासून दारु हा विषय वेगळा आहे. कोकणातील शेतकरी अडचणीत आहेत. गेली सहा वर्षे कोकणातील शेतकरी सातत्याने अडचणीत येत आहे. आज कृषी विद्यापीठाला कोणता रोग कसा आला हे माहीत नाही. आमचे बरेच सहकारी आंबे मागतात पण त्यांना आंबे द्यावयाचे झाले तर आंबा चांगला असेलच याची गॅरंटी नाही. आंब्याची पेटी दिली आणि आंबे चांगले निघाले नाही म्हणून पेटी टाकून देतील की काय अशी भीती वाटते. त्या ठिकाणी वाईन तयार करण्याच्या यादृष्टीने संशोधन व्हावयास

RDB/ KTG/ D/

श्री. राजन तेली .....

पाहिजे. आपल्या विद्यापीठाने निर्णय घेतलेला आहे. वाईनच्या दृष्टीकोनातून आंब्याच्या बाबतीत, काजूच्या बाबतीत, करवंदाच्या बाबतीत, जांभळाच्या बाबतीत संशोधन व्हावयास पाहिजे. कोकणाचा आर्थिक विकास करावयाचा असेल तर याबाबतीत संशोधन करावे. त्यासंदर्भात प्रोसेसिंग करावे. वाईनबाबत वेगवेगळी टीका होत असेल पण ही सर्व फळे नाशिवंत असल्यामुळे फुकट जाणार आहेत. कृषी विद्यापीठाने सर्व गोष्टींचा अभ्यास केलेला आहे. 30 तारखेला सगळ्या विद्यापीठांची बैठक दापोलीला आहे. त्यामध्ये हा विषय आहे. त्याला शासनाने तातडीने मान्यता द्यावी.

सभापती महोदय, दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्राच्या तलुनेत कोकण पुढे यावयास लागला आहे. अजूनही महाराष्ट्राच्या तिजोरीमध्ये भर पाडावयाची असेल तर आणि 1 लाखापेक्षा जास्त दरडोई उत्पन्न येत्या तीन वर्षात वाढवावयाचे असेल तर शासनाने त्या ठिकाणी अशा प्रकारचे प्रोसेसिंग युनिट काढण्याचा प्रयत्न करावा. त्या ठिकाणी आंबा, काजू, करवंद, जांभळे याबाबतीत काय काय करता येईल त्यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे. काजूवरील व्हॅट शून्य टक्के करावा. केंद्राने तसे केले आहे. अनुदान द्यावयाचे असेल तर 100 टक्के अनुदान द्यावे आणि कोकणातील शेतकऱ्यांना यातून वाचवावे अशी मी विनंती करतो. यामध्ये काजू बागायतदारांचा, आंबा बागायतदारांचा विचार करीत असताना त्यावर जे इतर व्यवसाय अवलंबून आहेत, मग औषधवाले असतील, बी-बियाणांचा व्यापार करणारे व्यापारी असतील ते सुध्दा अडचणीत आलेले आहेत. त्यांनाही सावरण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा. या सगळ्यांना जास्तीत जास्त सहकार्य कसे करता येईल यादृष्टीने प्रयत्न करावा. शासनाकडून तसा प्रयत्न होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. काजूवरील व्हॅटच्या बाबतीत हे अधिवेशन संपण्याच्या आधी निर्णय जाहीर करावा तसेच त्या ठिकाणी हेक्टरी 50 हजार रुपये द्यावेत अशी मी या निमित्ताने मागणी करतो. या सर्व बाबतीत राज्य शासनाने आपली भूमिका विशद करावी. सभापती महोदय, मला या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आंब्याच्या नुकसानीबद्दल मी अनेक वेळा बोललो आहे, अनेक वेळा मुद्दा मांडलेला आहे. आंब्याला फळांचा राजा म्हटले होते. पण या राजाकडे पाहण्याचा शासनाचा दृष्टीकोन वेगळा आहे. कोकणातील आंबा बागायतदार आहेत ते काजूचे उत्पादन घेतात, मच्छिमारीवर आपली उपजीविका करतात. एखाद्या वेळी आंब्याची बाग फुलली नाही तर या बागायतदारांना त्रास होत असतो. अशावेळी आंबा उत्पादकांना शासनाकडून हेक्टरी 15 हजार रुपये मदत देण्याची घोषणा केली जाते. परंतु आंब्याचे उत्पादन 60 टक्के आले असेल तर ही मदत 9 हजारापर्यंत दिली जाते. सभापती महोदय, आतापर्यंत संत्रा उत्पादकांना नुकसानीसाठी मदत दिली जात होती. परंतु 1997 साली युतीच्या काळात प्रथम शासनाने आंबा उत्पादकांना हेक्टरी 10 हजार रुपये मदत दिली होती. सभापती महोदय, आंब्याच्या वाहतुकीसाठी प्रति पेटी 30 रुपये खर्च येत होता. आता 50 रुपये खर्च येतो. मजुरीचा दर 75 प्रति दिन असा होता, आता 150 रुपये मजुरी द्यावी लागते. त्याचप्रमाणे आंब्याच्या फळावर कीटकनाशके मारावी लागतात, त्याचे दर 30 ते 40 टक्क्यांनी वाढले आहेत. आंब्याची बाग फुलावी म्हणून शेतकरी महागडी औषधे मारतो. परंतु हवामानातील बदलामुळे त्याच्या पदरी निराशा येते. सभापती महोदय, यावेळी आंब्याला 30 टक्के मोहोर कमी आला. या मोहोरापासून आंब्याचे फळ धरले त्यापैकी 40 टक्के फळाला गळ लागली. फयानमुळे आंबा गळून पडला. त्यामुळे झाडावर 30 टक्के आंबा राहिला. पण प्रत्यक्षात 10 टक्के सुध्दा आंबा हाती लागलेला नाही. जो आंबा आहे त्याच्या आतमध्ये लासा निघण्याची शक्यता आहे किंवा वेगळा गर असण्याची शक्यता अधिक निर्माण झाली आहे. त्यामुळे आंब्याच्या प्रति झाडासाठी शासनाने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे शेतकरी एक हेक्टरमध्ये 100 झाडे लावत असे. परंतु आता प्रगत शेतीच्या माध्यमातून एक हेक्टरमध्ये 150 आंब्याची झाडे लावली जातात. प्रचलित नियमानुसार 5 वर्षाचे झाड असेल तर 150 रुपये नुकसान भरपाई दिली जाते आणि 25 वर्षाचे झाड असले तरीही 150 रुपये दिले जातात. यामध्ये शासनाने बदल करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आज सभागृहात चर्चा सुरु होण्यापूर्वी मला एका शेतक-याचा फोन आला होता.

2...

NTK/ D/ KTG/

श्री.परशुराम उपरकर....

त्याने मला अशी माहिती दिली की, 5 वर्षापूर्वी प्रति झाडापासून 5 हजार रुपये उत्पन्न मिळत होते, आता ते 70 हजार रुपयांवर आले आहे. सभापती महोदय, आंबा बागायतदार विविध कामांसाठी कर्ज घेत असतो. त्यांना ख-या अर्थाने दिलासा द्यावयाचा असेल तर जसे अनेक भागांसाठी शासन पॅकेज जाहीर करते त्याप्रमाणे त्यांचे कर्ज माफ करण्यासाठी पॅकेज जाहीर केले पाहिजे. यादृष्टीकोनातून आंबा बागायतदार शासनाकडे आशेने पहात आहे. आंब्याचे पीक मागील 5 वर्षांपासून कमी येत असल्यामुळे शासनाने या शेतक-यांचे कर्ज माफ करावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, कॅनिंगसाठी आंबा वापरला जातो त्यासाठी कधी प्रति किलो 40 रुपये दर मिळतो तर कधी 5 रुपये, तर कधी 10 रुपये दर मिळतो. माझी अशी मागणी आहे की, आंब्याच्या पिकाला शासनाकडून हमी भाव मिळाला पाहिजे. ऊसावर प्रक्रिया केली जाते, कापसावर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे ऊसाला आणि कापसाला हमी भाव मिळतो. त्याप्रमाणे आंब्यासाठी हमी भाव मिळाला पाहिजे. आंब्याच्या प्रक्रिया युनिटसाठी हमी भाव निश्चित करुन तो प्रति किलो 40 रुपये करावा अशी मी याठिकाणी शासनाकडे मागणी करतो.

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. परशुराम उपरकर...

तसेच थेट गुजरात पर्यंत कोकणातील आंबा कॅनिंगसाठी जातो. परंतु हा आंबा कॅनिंगसाठी जात असताना आंबा बागायतदारांना त्याठिकाणी किलो मागे 5 रुपये भाव मिळेल की 40 रुपये भाव मिळेल याची शाश्वती नसते. या बाबतीत त्याला शाश्वती मिळण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी कोकणातील फळ बागायतदारांना आणि विशेष: ज्यांनी शासनाच्या योजनेतून फळपिकांची लागवड केलेली आहे त्यांना ख-या अर्थाने दिलासा देण्याच्या दृष्टीने या फळपिकांना हमी भाव देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये काजू खूप मोठ्या प्रमाणावर पिकतो. मात्र त्यातील 70 टक्के काजू हा प्रोसेसिंगसाठी बाहेर जातो. काजूची बोंडे गोव्याला जातात. ठराविक मापाच्या डब्यातून ही बोंडे घेतली जातात आणि ती डब्यामागे 3 रुपये किंवा 5 रुपये याप्रमाणे घेतली जातात. काजूवर प्रक्रिया करणारे, मद्यार्काचे कारखाने निर्माण होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, मला या निमित्ताने शासनाला सूचना करावयाची आहे. केरळ राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर काजू बी खरेदी केले जाते आणि प्रोसेसिंग करणा-या कारखान्यांना ते बी टप्प्याटप्प्याने पुरविले जाते. काजू प्रोसिसिंग करणा-या युनिटधारकांकडे मोठ्या प्रमाणावर काजू बी संकलन करुन ठेवण्याइतकी आर्थिक क्षमता नसते. केरळ राज्यामध्ये काजू बीचे मोठया प्रमाणावर संकलन करुन ते टप्प्याटप्प्याने प्रोसिसिंग युनिटला पुरविण्याची योजना आहे. या केरळ राज्यातील योजनेच्या धर्तीवर आपल्या राज्य सरकारने देखील काजू बी संकलन करण्याचा धाडसी निर्णय घ्यावा. यामुळे कोकणामध्ये प्रोसेसिंग युनिटस वाढतील आणि बेरोजगारांना रोजगारही उपलब्ध होईल. कोकणामध्ये उत्पादन होण्या-या काजूचा दर्जा चवीच्या बाबतीत अतिशय उत्तम आहे. ही काजू बी आज प्रोसेसिंगसाठी कर्नाटक आणि केरळ राज्यामध्ये जाते. म्हणून ही काजू बी कोकणामध्येच संकलित होऊन येथेच प्रोसेसिंग युनिटस होण्यासाठी आणि रोजगार निर्मिती होण्यासाठी शासनाने आवश्यकती उपययोजना करावी आणि त्यासाठी निधीचीही तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, माझी शासनाला अशीही विनंती आहे की, या काजूवर सरसकट व्हॅट लावला जावू नये. परदेशातून येणा-या काजूवर व्हॅट लावू नका असे मी म्हणणार नाही. परंतु कोकणातील विशेषत: रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये प्रक्रिया झालेल्या काजूला व्हॅटमधून

..2..

(श्री. परशुराम उपरकर...

सूट मिळाली तरच या काजूवर प्रक्रिया करणारे लहान लहान उद्योजक आहेत ते आजच्या स्पर्धेच्या मार्केटमध्ये टीकू शकतील. म्हणून कोकणातील काजूवरील व्हॅट हा शून्य टक्के करावा.

सभापती महोदय, जांभळामध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. मधुमेहाच्या उपचारासाठी जांभळापासून बनविलेल्या औषधाचा उपयोग होतो. आज जवळ जवळ 70 टक्के लोक मधुमेहग्रस्त आहेत. या जांभळावर प्रक्रिया करणारे कारखाने कोकणामध्ये व्हावयास पाहिजेत. हे जांभूळ परदेशात निर्यात केले जाते. या जांभळाचे पीक बदलत्या हवामानामुळे फार कमी आलेले आहे. तेव्हा ज्या प्रमाणे आंबा आणि काजूच्या बाबतीत नुकसान भरपाई दिली जाते त्याप्रमाणे जांभळाला देखील नुकसान भरपाई द्यावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. माननीय मंत्री महोदयांनी ठोस निर्णय घेऊन कोकणाला न्याय द्यावा. त्याच प्रमाणे जी काही मदत शासन जाहीर करील ती मदत त्याच वर्षामध्ये फळ उत्पादकांना मिळेल याची काळजी घ्यावी. 2008मध्ये 27 कोटीची मदत जाहीर केली होती. त्या मदतीचे अद्याप वाटप झाले नाही. आलेली मदत कृषी आणि महसूल विभागाच्या समन्वयाच्या अभावामुळे परत गेली. तेव्हा कोकणातील शेतक-यांना मदत आणि ती देखील वेळेवर देण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी ठोस अशा प्रकारचा निर्णय घ्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. भोगले....

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 97 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा, काजू व इतर फळ बागायतदारांचे हंगाम सुरु झाल्यापासून विविध नैसर्गिक आपत्तींमुळे जे नुकसान झाले त्याबाबत जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गेली चार-पाच वर्षे कोकण प्रदेश सातत्याने अडचणीत सापडलेला आहे. निरनिराळ्या नैसर्गिक संकटांमुळे, आपत्तीमुळे त्या भागातील शेतकरी त्रस्त झालेले आहेत. या शेतकऱ्यांना वाटते की, आपले शासन आहे, शासन आपल्याला वेळेवर मदतीचा हात पुढे करणार आहे. त्यामुळे शासनाच्या निर्णयाकडे त्यांचे लक्ष लागलेले आहे. यावर्षी कोकणतील परिस्थिती फार गंभीर बनलेली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली व परशुराम उपरकर यांनी त्या भागातील शेतकऱ्यांची व्यथा याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध आहे. त्या अहवालामध्ये म्हटले आहे की, दिनांक 16 एप्रिल, 2010 रोजी सायंकाळपासून वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. त्या संदर्भात तालुकानिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :- देवगड-0, मालवण 19 मि.मि., कणकवली 4 मि.मि., वैभववाडी 4 मि.मि., कुडाळ 12 मि.मि., वेंगुर्ला 28 मि.मि., सावंतवाडी 7 मि.मि., दोडामार्ग-0, कृषि संशोधन केंद्र, मुळदे, ता.कुडाळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या संदेशानुसार वाऱ्याचा वेग प्रती तास 64 कि.मी.पर्यंत आणि समुद्रकिनारी वाऱ्याचा वेग यापेक्षा जास्त असून, काही भागात झाडांच्या फांद्या तुटल्या आणि फळ बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

सभापती महोदय, शासकीय विभागाने दिलेला हा अहवाल आहे. अवेळी पावसामुळे आंबा फळ जे तयार झाले होते त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आंब्याच्या झाडाला पालवी आल्यामुळे फळधारणेचे प्रमाण फार अत्यल्प होते. ज्या झाडांना फळधारणा झाली होती, त्या फळांवर उष्म हवेचा आणि वातावरणातील बदलाचा परिणाम होऊन फळे झाडावरुन गळून पडली. शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक नैसर्गिक आपत्तीमुळे निघून गेले. अवकाळी पाऊस आणि वादळी हवामानामुळे झाडावरील आंबा फळे देठापासून गळून पडली. आज त्या फळाला काहीही किंमत मिळणार नाही. ही आंबा फळे कॅनिंगसाठी किंवा लोणचे तयार करण्यासाठी देखील उपयोगी

..2..

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

पडणार नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा फळाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सन्माननीय मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, 2008 साली कोकणामध्ये भात शेतीचे जे नुकसान झाले होते, महाराष्ट्रातील भात पिकविणाऱ्या अनेक जिल्हयांमध्ये भात शेतीचे नुकसान झाले होते, त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची भूमिका शासनाने घेतली होती. भात पिकाचे नुकसान झाले त्याबाबत आर्थिक अनुदान देण्याचा प्रयत्न केला. परंतु ही आर्थिक मदत कोकणातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली का? मागच्या वेळी आंबा पिकाचे नुकसान झाले तेव्हा देखील शासनाने कोकणातील आंबा बागायतदारांना आर्थिक मदत देण्याची भूमिका घेतली. जी आर्थिक मदत दिली जाते, तो निधी शासनाकडे परत येण्यासाठी खटाटोप केला जातो का अशी आमच्या मनामध्ये शंका निर्माण झाली आहे. ज्यांचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांपर्यंत आर्थिक मदत पोहोचलेली नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयाचा विचार करावयाचा झाला तर, इतर जिल्हयामध्ये ज्याप्रमाणे 7/12 उताऱ्यावर कुटुंबातील एक किंवा दोन माणसांची नावे असतात, परंतु सिंधुदुर्ग जिल्हयातील एका 7/12 उताऱ्यावर कुटुंबातील 8-8, 10-10, 15-15 माणसांची नावे असतात. गावातील वडिलोपार्जित घराची देखभाल आणि शेती व बागायतीची मशागत करण्यासाठी एखादी व्यक्ती तिथे राहते आणि कुटुंबातील इतर व्यक्ती चाकरमानी म्हणून मुंबईत स्थायिक झालेल्या असतात. त्यामुळे शासकीय मदतीचे वाटप करताना ती मदत नक्की कोणाला द्यायची असा प्रश्न निर्माण होतो. या कारणामुळे शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. गावामध्ये राहणा-या व्यक्तीकडून त्याठिकाणी शेती व फळ पिकाची देखभाल केली जात असते, त्या व्यक्तीला आर्थिक मदत देण्याची भूमिका स्वीकारली जात नाही. त्यामुळे शासनाकडून पाठविण्यात आलेली आर्थिक मदत शासनाकडे परत पाठविण्यात येते अशी परिस्थिती आहे. या माध्यमातून कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतकऱ्यांची थट्टामस्करी केली जाते की काय? अशी आम्हाला शंका वाटते.

नंतर जी.1...

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

कोकणात काजूचे पीक मोठ्या प्रमाणात होते. मी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदरावजी पवार यांना मनापासून धन्यवाद देतो. कारण त्यांनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कोकणसारख्या प्रदेशात फलोद्यानाच्या विकासासाठी भरपूर निधी उपलब्ध करुन दिला होता व त्याचा परिणाम आज कोकणात फलोत्पादन मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यांना बाजारपेठ मिळाली पाहिजे तसेच शेतकऱ्यांना हे पीक घेण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे म्हणून रोजगार हमी योजनेतून मुबलक निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आज सिंधुदूर्ग सारख्या एकाच जिल्ह्यात 28 हजार हेक्टर जमीन आंब्याच्या लागवडीखाली आहे तर 90 हजार हेक्टर जमीन काजूच्या लागवडीखाली आहे. अशा प्रकारे फळांचे उत्पादन कोकणात वाढत आहे पण त्यावर प्रोसेसिंग युनिट मात्र येथे उपलब्ध नाही, त्याचा शासनाने विचार करावा. या राज्यात ज्यावेळेस व्हॅट लागू करण्यात आला होता त्यावेळेस तत्कालीन अर्थमंत्र्यांबरोबर आम्ही बैठक आयोजित केली होती व कोकणातील व्हॅटचे प्रमाण जे 12.5 टक्के आहे ते कमी करण्याची विनंती सुध्दा केली होती. अशा प्रकारे कोकणातील काजू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी संघर्ष केला आणि माननीय अर्थमंत्र्यांना निवेदन दिले होते. कारण शेजारच्या गोवा राज्यात व्हॅट 4 टक्के, कर्नाटक राज्यात 4 टक्के तसेच बॉर्डरवर फक्त 5 टक्के व्हॅट असताना सिंधुदूर्ग व रत्नागिरी जे गोव्याच्याच जवळ आहेत तेथे देखील हे प्रमाण 4 टक्क्यावर आणावे अशी आमची विनंती आहे. कारण 12.50 व्हॅट जर काजू उत्पादक शेतकरी व आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडूनन वसूल केला तर या शेतकऱ्यांना काहीच मिळणार नाही. तसेच प्रोसेसिंग युनिट सुध्दा येथे वाढणार नाही अशा व्यथा आम्ही मांडल्या आहेत. त्या अनुषंगाने आम्हाला न्याय मिळावा अशी विनंती आहे. यापूर्वी जशी बैठक घेतली तसेच काल देखील माननीय अर्थमंत्र्यांना भेटून आम्ही हाच प्रयत्न केला व त्यांनी देखील आमची अडचण समजून घेण्याचा प्रयत्न केला. आम्ही काल देखील त्यांना सांगितले की, कोकणातील शेतकऱ्यांना 12.5 टक्क्याऐवजी 4 टक्के एवढे व्हॅटचे प्रमाण करावे, आंबा आणि काजुचे नैसर्गिक आपत्तीमुळे जे नुकसान झालेले आहे त्याप्रित्यर्थ त्या शेतकऱ्याला मदत देण्याची भूमिका सुध्दा शासनाने घ्यावी अशीही विनंती आम्ही केली. मध्यंतरी वर्तमानपत्रात बातमी आली होती की, बाजरी व ज्वारीपासून मद्यार्क निर्मिती करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला. यासाठी

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

शासनाने परवानगी द्यावी की न द्यावी हे आम्ही म्हणणार नाही परंतु कोकणात पिकणाऱ्या काजूच्या बोंडांपासून मद्यनिर्मितीच्या कारखान्यांना परवानगी देण्यात यावी. कारण अशी मागणी वर्षानुवर्षे शेतकरी करीत आहेत. ऑलरेडी दोडामार्ग व सावंतवाडी येथे दोन युनिट आहेत. तसेच शासनाने यासंबंधीचे प्रस्ताव सादर करण्यास सांगितले होते. आम्ही त्यासाठी भागभांडवल देण्यास तयार आहोत परंतु अद्यापही या प्रस्तावांना शासनाने मान्यता दिली नाही. वास्तविक कोकणात जवळपास 6 लाख टन काजूची बोंडे दरवर्षी फेकून दिली जातात. हीच बोडे गोव्यात गेली तर त्यापासून फेणी काढली जाते आणि तेथील लोक मद्यार्क चवीने पितात. हे आपण प्या अथवा पिऊ नका पण अशा युनिटना परवानगी दिली तर दरवर्षी 1500 कोटीचा टर्न-ओव्हर होऊ शकतो, तरी देखील अशी परवानगी दिली जात नाही हे दु:ख आहे. शासनाने कोकणातून असे प्रस्ताव मागवून त्यांना परवानगी दिली आणि शेतकऱ्यांना उत्तेजन दिले तर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचा फायदा होऊ शकतो. त्याचबरोबर जांभळाचे पीक सुध्दा मोठ्या प्रमाणात कोकणात होते. जांभूळ हे फळ मधुमेहावर अत्यंत गुणकारी औषध मानले जाते.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी.....

अशा प्रकारे कोकणात तयार होणा-या पिकावर प्रक्रिया करणारे उद्योग आले पाहिजेत त्यामुळे अशा सर्व गोष्टींचा माननीय मंत्रीमहोदयांनी विचार करुन कोकणाला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती करतो. आज कोकणावर मोठे संकट आलेले आहे त्यामुळे कोकणातील शेतक-यांना वाचविण्यासाठी सरकारने मोठया प्रमाणात मदत करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी या ठिकाणी चांगली अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यामुळे कोकणातील शेतक-यांना किमान 50 हजार रुपये हेक्टरी इतकी नुकसान भरपाई शासनाने द्यावी. कारण आज कोकणातील शेतकरी मोठया प्रमाणात अडचणीत सापडलेला आहे त्यामुळे अडचणीत सापडलेल्या कोकणातील शेतक-याला शासनाने मोठया दिलाने नुकसानभरपाई द्यावी अशी विनंती करतो. नाही तर कोकणाला मदत देण्याची वेळ आल्यानंतर बघू, पाहू, माननीय मुख्यमंत्र्यांना विचारुन निर्णय घेऊ असे नेहमीचे उत्तर न देता कोकणातील उध्वस्त झालेल्या शेतक-याला आम्ही आजच्या आज इतकी इतकी नुकसानभरपाई देत आहोत अशी माननीय मंत्रीमहोदयांनी घोषणा करावी अशी अपेक्षा करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र ..

....2...

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली साहेबांनी या ठिकाणी नियम 97 अन्वये अडचणीत सापडलेल्या कोकणातील शेतक-यांच्या संदर्भात एक चांगली चर्चा उपस्थित केलेली असून या चर्चेवर माझे संक्षिप्त विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. आपल्या भारतात सर्वाधिक म्हणजे 56 टक्के आंबा पिकविला जातो म्हणजे जवळ जवळ 10 लाख टन आंबा पिकविला जातो. आंब्यामध्ये फार मोठी राजकीय ताकद आहे. आंबा तयार झाल्यानंतर प्रत्येक राजकीय माणूस आंब्याची पेटी घेऊन दिल्लीमध्ये जातो व आपापल्या श्रेष्ठ नेत्यांना किंवा आपल्या जवळच्या राजकीय माणसाला देवगडचा हापूस आंबा भेट म्हणून देत असतो. एवढी मोठी राजकीय ताकद देवगडच्या हापूस आंब्यामध्ये आहे. ज्यांचा आंब्याचा संबंध नसतो अशा व्यक्ती सुध्दा आंब्याची पेटी भेट देत असतात. एवढी राजकीय ताकद लाभलेल्या आंब्याची चर्चा उपस्थित करण्यासाठी आपण संधी दिल्याबद्दल मी माननीय सभापती महोदय आपले आभार मानतो.

सभापती महोदय, यावर्षी कोकणामध्ये खूप मोठया प्रमाणात तपमानात वाढ झालेली आहे. या वाढलेल्या तपमानामुळे कोकणातील आंब्याचे जवळ जवळ 300 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयात 50 वर्षात एवढे तपमान नव्हते तेवढे तपमान या एप्रिल महिन्यामध्येच वाढलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात एप्रिल महिन्यात 43-44 डिग्री तापमान पोहचलेंले आहे. आमचे आजी आजोबा सुध्दा सांगतात की, एवढे मोठे तपमान आम्ही कधी पाहिले नव्हते. खरे म्हणजे हे तपमान अवकाळी पाऊस, वादळी पाऊस, फयान यामुळे वाढलेले आहे. या वाढलेल्या तपमानामुळे आंबा पिकाला जबरदस्त फटका बसलेला आहे. हवामानात वेळोवेळी होणा-या बदलामुळे कोकणातील संपूर्ण आंबा बागायतदार आज संकटात सापडलेला आहे. आंबा तयार झाल्यानंतर त्यावर बारीक बारीक गाठी आल्यामुळे सर्व आंबे खाली पडून गेले आहे. माननीय मंत्री डॉ. विजयकुमार गावित साहेब हे पर्यटन मंत्री असून फलोत्पादन मंत्री सुध्दा आहेत. माननीय मंत्रीमहोदयांचे आमच्या कोकणावर फार प्रेम आहे. कोकणाच्या निसर्गावर ते बेहद खूष आहेत. माननीय मंत्रीमहोदयांनी आताच कोकणाला भेट दिलेली आहे त्यामुळे या ठिकाणी कोकणातील नुकसानीच्या संदर्भात आम्ही ज्या काही मागण्या करणार आहोत त्या सर्व मागण्या माननीय

...3...

श्री. सुभाष चव्हाण .....

मंत्रीमहोदय पूर्ण करतील अशी आम्हाला खात्री आहे. त्यामुळे माझी पहिली मागणी अशी आहे की, कोकणातील शेतक-यांना जी काही खते दिली जातात ती मूळ शेतकरी आपल्या बागायतदारांना देत असतात. बागायतदार आणि दलालाची ंदोस्ती असते. मूळ बागायतदारांकडे 20-20 हजार हेक्टर जमीन असते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास मी आपल्याला सांगू इच्छितो की, सात-बाराच्या उता-यावरील कब्जामध्ये जवळ जवळ 18-20 नावे मिळतील व कुळामध्ये एकच नाव मिळेल. परंतु ख-या शेतक-याला शासनाच्या योजनांचा फायदा मिळत नाही. म्हणून ज्याची जमीन कमी आहे त्याला फायदा मिळाला पाहिजे, त्याला नुकसानभरपाई मिळाली पाहिजे, बी-बियाणे मिळाले पाहिजेत. तसेच कोकणामध्ये मोठया प्रमाणात कृषी अधिका-यांना गावोगावी शिबीरे घ्यावयास सांगा अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री.भारवि.....

श्री.सुभाष चव्हाण...

त्याची पाहणी करायला सांगा. गाव,तालुका,जिल्हा पातळीवर शिबिरे घेतली पाहिजेत.

आपण जेवलो नाही तर जगू शकत नाही. तसेच झाडांच्याबाबतीत देखील आहे. आपण आंबा झाडांना पाणी शकलो नाही तर फळ येऊ शकणार नाही. 150 ते 200 लिटर पाणी आंबा झाडाच्या मुळापर्यंत गेले पाहिजे. तेव्हा आंबा झाडांची पाहणी करण्याची सूचना आपण आपल्या अधिकाऱ्यांना दिली पाहिजे. येथे मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याचा शासनाने विचार करावा. हेक्टरी 50 हजार मदत आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अशी मागणी करण्यात आली आहे. तिला मी पाठिंबा देतो. यापेक्षा आपल्याला जास्तीत जास्त मदत देता आली तर ती जरूर द्यावी अशी देखील मी मागणी करीत आहे. माझी वडिलोपार्जित 15 एकर जमीन डोंगरावर आहे. त्यात काजूची जवळ जवळ 1000 झाडे आहेत. आताच येथे सन्माननीय सदस्यांनी 6 लाख टन काजू बोंड पडलेली असतात याचा उल्लेख केला आहे, तो बरोबर आहे. माझी पणजी 100 वर्षापूर्वी काजू भट्टी लावून दारू काढायची. त्यावेळी काजूपासून दारू निर्माण करायला परवानगी होती. पण आता नाही. तेव्हा काजू बोंडापासून वाईन होत असेल तर आपण त्यास परवानगी का देत नाही ? असा माझा प्रश्न आहे. तेव्हा काजू पासून वाईन निर्माण करण्यासंबंधी आपण विचार करावा अशी विनंती करीत आहे. काजूवर आकारण्यात आलेला व्हॅट रद्द करावा यासाठी कोकणातील आमदार माननीय वित्त मंत्र्यांना भेटले. ते यासंबंधी सहानुभूतीपूर्वक निर्णय घेणार आहेत. काजूवरील व्हॅट 4 टक्केवरून शून्य टक्क्यावर आणावा अशी कोणातील सर्व आमदारांची कळकळीची मागणी आहे. त्याचा देखील आपण विचार करावा. या चर्चेवर आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभार आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, परशुराम उपरकर, गुरूनाथ कुलकर्णी यांनी कोकणातील महत्त्वाचा, ज्वलंत विषय मांडण्यासाठी जी चर्चा घडवून आणली आहे, त्याबद्दल मी मनापासून अभिनंदन करतो. त्यावर आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी आहेत त्यांच्या संदर्भातील विषय या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.परशुराम उपरकर, श्री.राजन तेली यांनी मांडला आहे. या माननीय सदस्यांनी त्या भागातील प्रत्यक्ष अनुभव, व्यथा येथे प्रभावीपणे मांडलेल्या आहेत. कोकणावर सातत्याने अन्याय होत आहे. अन्य राज्याचा विचार केला तर द्राक्ष,ऊस अशी नगदी पिके तेथे घेतली जातात. कोकणात मात्र अशा प्रकारची कोणतीही पिके होत नाहीत. कोकणवासियांचे सूंपूर्ण जीवन फळबागावर म्हणजे काजू, आंबा,फणस,करवंद,जांभूळ यावर अवलंबून असते. सध्या वातावरणात आणि तापमानामध्ये बदल झालेला आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती आली आहे. या सगळ्यांचा दुष्परिणाम आमच्या फळबाग उत्पादक शेतकऱ्यांवर झालेला आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. मी उल्हासनगरला राहतो. आमच्या येथे डझनावर आंबे मिळत नाही. वजनावर आंबे मिळतात. चार दिवसापूर्वी आंब्याचा भाव 250 रूपये किलो होता. काल जाताना सहज विचारणा केली असता फळ विक्रेत्याने 100 रूपये किलोने सुद्धा आंबा घ्यायला कोणीही तयार नाही अशी परिस्थिती आहे,असे सांगितले. आंब्याचे भाव कमी झालेले आहेत. याचे कारण असे आहे की, वर्तमानपत्रात आणि टी.व्ही.वर बातम्या ऐकतो किंवा आंब्यासंबंधी माहिती घेतो कृत्रिम पद्धतीने आंबा पिकवला जात आहे, त्यामुळे असा पिकवलेला आंबा खाऊ नये अशी लोकांची भावना झालेली आहे. दुसऱ्या बाजूला आंब्याचे पीक कमी आलेले आहे. 16 तारखेला अकाली पाऊस आला. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. या सगळ्या विपरित परिस्थितीमध्ये आांबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्याची दखल घेऊन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे.

यानंतर श्री.गायकवाड...

श्री.रामनाथ मोते..

आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे जीवन आंबा पिकावरच अवलंबून असते त्यामुळे आंब्याचे नुकसान झाल्यास आंबा उत्पादक शेतक-यांना मदत देण्याची नितांत आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या पूर्वी संबंधित शेंतक-यांना मदत करण्याच्या बाबतीत शासनाकडून घोषणा करण्यात आल्या होत्या, त्यासाठी पॅकेज जाहीर करण्यात आले होते, त्याचबरोबर यासाठी लागणारे पैसे देखील मंजूर करण्यात आले होते परंतु सर्वच आपदग्रस्त शेतक-यापर्यंत ही मदत मिळालेली नाही अजूनही काही आपदग्रस्तांना ही मदत देणे बाकी राहिलेले आहे तेव्हा ती मदत त्यांना तातडीने द्यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला आणखी एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत शासनाने काही निकष ठरविलेले आहेत हे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. सध्या हेक्टरी किती नुकसान झालेले आहे याची माहिती गोळा करण्यात येते आणि त्यावर नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात येतो. कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांचा विचार केला तर प्रती झाड नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला तरच त्यांना ख-या अर्थाने नुकसान भरपाई मिळू शकेल म्हणून प्रती झाड 500 रुपये नुकसान भरपाई देण्यात आली पाहिजे. हेक्टरी नुकसान भरपाई देण्याचे निकष बदलण्यात यावेत आणि प्रती झाड नुकसान भरपाई देण्याचे निकष ठरविण्यात यावेत अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला दुसरा मुद्दा असा मांडावयाचा आहे की नैसर्गिक आपत्तीमुळे आंब्याचे पीक कमी आल्यामुळे आंबा उत्पादक शेतक-यांना मोठया प्रमाणावर नुकसान सहन करावे लागते त्याचा विचार करुन या बाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. आंब्याला हमी भाव देण्याचा विचार करता येईल काय या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, दापोली येथे् कृषी विद्यापीठ आहे.या विद्यापीठामार्फत फळांवर संशोधन करुन कोकणातील फळ बागायतदारांना मार्गदर्शन करण्यात आले पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशा भावना व्यक्त केली की कृषी विद्यापीठाकडून जे काही संशोधन केले जाते त्या

2.

श्री.रामनाथ्ं मोते..

संशोधनाचा फळ उत्पादक शेतक-यांना फारसा फायदा होत नाही. तेव्हा फळ उत्पादक शेतक-यांना या संशोधनाचा फायदा होण्याच्या दृष्टीने शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. कृषी विद्यापीठामार्फत जे काही संशोधन केले जाईल त्या संबंधी आंबा उत्पादक शेतक-यांना मार्गदर्शन वा मदत मिळण्याची आवश्यकता आहे तेव्हा हे मार्गदर्शन त्यांना मिळेल आणि अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने संबधित शेतक-यांना मदत मिळेल या दृष्टीने शासन काही विचार करणार आहे काय ? याबाबतीत माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदय, दोन तीन दिवसापूर्वी पाऊस पडला होता त्यामुळे कोकणातील आंब्याचे नुकसान झालेले आहे. अशा प्रकारे अवेळी पडणा-या पावसामुळे वा तापमानात झालेल्या बदलामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे दहा टक्के आंबे झाडावरुन गळून पडतात. मी 14 तारखेला कोकणात गेलो होतो तेव्हा रस्त्यावरुन जात असतांना अनेक ठिकाणी आंब्याच्या झाडाखाली आंब्याचा सडा पडलेला मला पहावयास मिळाला होता. अशा प्रकारे खाली पडलेल्या आंब्याचा कोणत्याही कामासाठी उपयोग होत नाही ते फळ वाया जाते तेव्हा त्या दृष्टीने विचार करुन कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांना मदत करुन दिलासा देण्याच्या दृष्टीने विचार करावा आणि बदलत्या परिस्थितीमध्ये आंबा पिकाचे जे काही नुकसान झालेले आहे त्यांचे पंचनामे करुन, योग्य ती नोंद घेऊन सबंधित शेतक-यांना मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, यानंतर शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.कोकणातील विविध फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग कोकणात सुरु करता येतील काय याचा देखील शासनाने विचार केला पाहिजे.सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मघाशी काजूच्या बोंडावर प्रक्रिया करणारे काही उद्योग सुरु करावेत असा मुद्दा मांडला होता. जवळजवळ सहा लाख टन काजूची बोंडे वाया जात आहेत तेव्हा त्यावर प्रक्रिया करणारे उपक्रम सुरु करण्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण करण्याच्या संदर्भात आणि शेतक-यांना दिलासा मिळावा म्हणून मदत करण्याच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

नंतर श्री.सरफरे

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर,राजन तेली व अन्य माननीय सदस्यांनी कोकणातील आंबा व इतर फळ बागायतदारांच्या संदर्भात नियम 97 अन्वये चर्चा उपस्थित केली आहे. त्या चर्चेमध्ये भाग घेऊन माझे काही मुद्दे याठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोकणातील प्रश्न आम्ही बऱ्याच वेळा मांडीत असतो. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्हयामधील अनेक प्रश्नासंबंधी चर्चा होत असते. यापूर्वी कोकणामधून एखाद-दुसरा लोकप्रतिनिधी या सभागृहामध्ये निवडून येत असे, त्यामुळे कोकणामधील प्रश्नांना अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी किंवा अन्य विषयाच्या माध्यमातून वाचा फुटत नव्हती, ती वाचा आता फुटत आहे. त्यामुळे आम्हा सर्वांना आनंद होत आहे. रायगड, रत्नागिरी व सिधुदुर्ग आणि थोडयाफार प्रमाणात ठाणे जिल्हयामध्ये आंबा, काजू, जांभूळ या फळांची लागवड होत असते. या चारही जिल्हयामध्ये तुकडे जमीन आहे, एकरामध्ये सलग अशी जमीन शेतकऱ्याकडे नाही. छोटया छोटया तुकडे असलेल्या जमिनीला कुणगे म्हटले जाते. अशा तुकडयातील जमिनींमुळे शेतकरी सोसायटी करु शकत नाही. सोसायटी करावयाची म्हटले तर त्यासाठी मोठी जमीन, मोठा भू भाग आवश्यक असतो. पर्यायाने आज सरकारच्या अनेक योजनांतर्गत ऊसाच्या पिकाला मदत दिली जाते, द्राक्ष व कापसाच्या पिकाला मदत दिली जाते,सबसिडी दिली जाते. परंतु कोकणातील आंबा बागायतदार किंवा इतर फळ बागायतदारांना त्यापैकी एक रुपयासुध्दा मिळत नाही. माननीय गुरुजींच्या नेतृत्वाखाली कोकणामध्ये वॅट कमी करण्यात यावा यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले. आम्ही नेहमी आशेवर जगत असल्यामुळे आम्हाला निश्चितपणे यामध्ये यश मिळेल. मी याठिकाणी कोणत्याही मंत्रिमहोदयांचे नाव घेणार नाही. एके दिवशी कोकणातील प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आला असतांना ते "हे सर्व खोटे आहे" असे मला म्हणाले. असे म्हणणे सुध्दा धाडसाचे असते. तेव्हा कोकणातील प्रश्नांना आपण मागे टाकीत आहोत काय? अशाप्रकारचे चित्र दिसावयास लागते.

कोकणामध्ये फयान वादळ आले, तापमानामध्ये एकदम बदल झाला. तापमानामध्ये झालेल्या बदलामुळे आंब्याच्या फळावर डाग पडून ते गळायला लागले.त्यामुळे झाडाच्या खाली आंब्याचा सडा पडलेला दिसतो असे माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते म्हणाले. आंब्याच्या

श्रीमती अलका देसाई...

झालेल्या नुकसानीबद्दल आम्हा कोकणातील शेतकऱ्यांना एकरी 50 हजार रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, आम्ही शासनाकडे सबसिडी मागत नाही.परंतु आम्हाला नुकसान भरपाई देण्याबाबत आपण विचार केला पाहिजे. हवामानातील सारख्या बदलामुळे यावर्षी आंब्याला मोहोर कमी आला. त्यामुळे आंब्याचे उत्पादन कमी प्रमाणात झाले. कोकणातील आंब्याच्या पेटया मुंबईला व्यवस्थितपणे भरुन पाठविण्यात येतात. आम्हा कोकणातील लोकांचा खोटेपणा करण्याचा उद्योग नाही आणि कधी करणार नाही. कोकणातील शेतकरी हा आंबा आणि इतर फळांच्या बागायतीवर गुजराण करुन पोट भरतो. परंतु कोकणातील आंबा,काजू या फळावर प्रक्रिया करणारे छोटे मोठे उद्योग कोकणामध्ये नाहीत. आम्ही आमच्या मायबाप सरकारला विचारले की, हे उद्योग कोकणामध्ये कां नाहीत? ऊसापासून साखर कारखाने, मळीपासून दारु तयार केली जाते. ती तयार करणारे कारखाने कोकणामध्ये नाहीत म्हणून आम्ही खोटे बोलणार नाही. माझ्या मनामध्ये अशी शंका येते की, आज मुंबईतील मार्केटमध्ये आंब्याला दर नाही, आंब्याचे दर पडले आहेत. याचे कारण कोकणातील लोकांनी आंब्याचे मार्केट कॅप्चर केले तर आम्हाला मार्केट कुठे मिळणार? अशाप्रकारची शंका लोकांच्या मनामध्ये निर्माण झाली. आणि म्हणून कोकणामधून येणाऱ्या आंब्याच्या पेटया आपल्या ताब्यात घेऊन त्यामधील आंबे कृत्रिमरित्या पिकविण्याचे उद्योग सुरु आहेत. याची जर आपण चौकशी केली तर त्यामधून उलगडा होईल. आणि म्हणून आंबा बागायतदार शेतकऱ्याला न्याय मिळेल यासाठी सरकारने सजग राहिले पाहिजे. ज्याप्रमाणे ऊस आणि द्राक्षे या पिकांसाठी आपण फायनान्स पुरवितो त्याप्रमाणे कोकणातील आंबा व फळ बागायतदारांना देखील आपण आर्थिक मदत करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपविते.

(यानंतर सौ. रणदिवे)

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.राजन तेली,परशुराम उपरकर, दिवाकर रावते, गुरुनाथ कुलकर्णी, संजय दत्त, सुभाष चव्हाण,विनोद तावडे, किरण पावसकर, जयंत पाटील, श्रीमती अलका देसाई या सर्वांनी मिळून जो प्रस्ताव सदनामध्ये आणला आहे, त्याबद्दल मी सर्वात प्रथम त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, कोकणातील प्रश्नांच्या संबंधात या सदनामध्ये सातत्याने आवाज उठत आहे. मला वाटते की, प्रत्येक प्रश्नामध्ये कोकण आहे, परंतु कोकणातील प्रश्न ज्या प्रमाणात सुटावयास पाहिजेत, तसे ते सुटत नाही हे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, आमच्या सौभाग्याने फलोत्पादन मंत्री आणि पर्यटन मंत्री एकच आहेत. सिंधुदुर्ग येथे जो समुद्र किनारा आहे, तो पर्यटनाच्या दृष्टीने आणि आंबा, काजू, करवंद या सर्व गोष्टींनी युक्त असा आहे. त्यामुळे जर तुम्हाला तेथील पर्यटन व्यवसाय खऱ्या अर्थाने वाढवावयाचा असेल तर त्याच्या बरोबर फलोत्पादन देखील वाढविणे आवश्यक आहे. कारण तेथे येणाऱ्या पर्यटकाला वेगळया प्रकारचे आकर्षण असावयास पाहिजे. त्याला याठिकाणी आल्यानंतर काहीतरी घेऊन जाता आले पाहिजे. मग ती काजूच्या बोंडापासून तयार होणारी फेणी असू दे.गोवातून येताना प्रत्येक माणूस फेणी घेऊन येत असतो. त्याप्रमाणे कोकणामधून परत जाताना देखील फेणी घेऊन जाणे अत्यंत आवश्यक आहे. मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदय यातील गर्भितार्थ समजले असतील आणि यावर त्यांनी निश्चितपणे कार्यवाही करावी.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, तापमानात होणारा बदल, ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर सतत चर्चा सुरु आहे. दोन वर्षापासून सदनामध्ये ग्लोबल वॉर्मिंगबाबत सतत चर्चा होत आहे. मग ग्लोबल वार्मिंगमुळे भविष्यामध्ये काय परिणाम होतील याबाबत आपण का विचार करीत नाही ? याचा आंब्यावर परिणाम होणारच आहे, आंबा गळून पडणारच आहे. तापमान 46 ते 47 डिग्रीपर्यंत होणारच आहे. मग ग्लोबल वॉर्मिंग ही एक नैसर्गिक आपत्ती डोळयासमोर ठेऊन कोकणातील राजाला न्याय देणार आहात काय ? असा माझा प्रश्न आहे. ग्लोबल वॉर्मिंग बरोबरच मायनिंगचा राक्षस येत आहे. औष्णिक वीज प्रकल्प येत आहेत. मला असे वाटते की, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य याच्याशी सहमत होतील की, या भागामध्ये औष्णिक प्रकल्प यावयास पाहिजेत, मात्र येथील जी नैसर्गिक संपत्ती आहे, नैसर्गिक उत्पादने आहेत, त्याला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचता कामा नये. मग ती समुद्रातील जैव संपत्ती असेल किंवा आंबा, काजू अशी

. . . .एल-2

इतर पिके असतील. या राज्याच्या पर्यटन विभागाने विचार करावयास पाहिजे की, आम्हाला सिंधुदूर्ग मध्ये पर्यटनाचा व्यवसाय शाबूत ठेवावयाचा असेल तर मायनिंग प्रकल्प, औष्णिक प्रकल्प आणि ग्लोबल वॉर्मिंग या तिघांची सांगड घालून त्याबाबत उपाययोजना करावयास पाहिजे. शासनाकडून नुकसान भरपाई जाहीर केली जाते. पण कोकणामध्ये गेल्या अनेक वर्षापासूनचा नुकसान भरपाईचा बॅकलॉग आहे, तो मात्र अजूनपर्यंत दिलेला नाही. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, एकेका 7:12 वर अनेक जणांची नावे आहेत. ठीक आहे तसे आहे, जे आहे ते आहे. पण त्याबाबतीत काही उपाययोजना काढणार आहात काय ? तेथे प्रत्यक्षात जो माणूस आहे, त्याला नुकसान भरपाई देणार आहात काय ? शासनाने जरी नुकसान भरपाई दिली तरी ती काही फार मोठ्या असेल असे नाही. आंबा पिकाच्या नुकसान भरपाईपोटी 11 कोटी 51 लाख रुपये आणि काजू पिकासाठी 15 कोटी 92 लाख एवढाच निधी आतापर्यंत दिलेला आहे, म्हणजे कोकणातील एकंदर बागायतदारांची संख्या पाहिली तर त्या मानाने नुकसान भरपाईची रक्कम अतिशय अल्प आहे असा माझा दावा आहे.

सभापती महोदय, यातील दुसरी बाजू पाहिली तर आपल्याला परदेशातून आंब्याच्या बाबतीत साधारणपणे हजार ते दीड हजार टन इतकी मागणी आहे आणि आपण ही मागणी पूर्ण करु शकत नाही. आपण फक्त 500 टनच आंबा पाठवित आहोत, म्हणजे आपल्याला मोठया प्रमाणात परकीय चलन मिळण्याची अपेक्षा आहे. आपण अर्थसंकल्पाच्यादृष्टीने विचार केला तर मोठया प्रमाणात परकीय चलन मिळण्यासाठी आंबा हे एक साधन आहे. त्यासाठी काय करावयास पाहिजे तर दापोली येथे कृषी विद्यापीठ आहे, ज्याचा सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसर यांनीही उल्लेख केला होता. येथील कृषी विद्यापीठामध्ये कोणत्याही प्रकारचे संशोधन होत नाही. आंब्यावर थ्रिफ्टसारखा रोग आल्यानंतर शेतकऱ्यांना ताबडतोब उपाययोजना उपलब्ध करुन द्यावयास हवी होती. पण दोन महिन्यानंतर सांगितले जाते की, या रोगासाठी स्पिंटर हे किटकनाशक औषध असून त्याचा उपयोग होऊ शकतो. तोपर्यंत आंब्याचे पीक नष्ट झाले. तसेच स्पिंटर या किटकनाशकाच्या बाटलीची किंमत 10 हजार रुपये आहे. सामान्य शेतकरी, सामान्य बागायतदार हा खर्च कसा करु शकेल याचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा. म्हणून ग्लोबल वॉर्मिंग लक्षात घेता कृषी विद्यापीठातील जो संशोधन विभाग आहे,तो कार्यरत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

. . . .एल-3

डॉ.दीपक सावंत . . ..

माननीय मंत्री महोदय हे पेशाने डॉक्टर आहेत. त्यामुळे आपण कोकणातील पिकांवर येणाऱ्या रोगावर इलाज करण्यासाठी कृषी विभागाला ॲक्टीव्ह करणे अत्यंत आवश्यक आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

डॉ.दीपक सावंत....

सातत्याने आंब्याच्या काजूच्या आणि इतर फळांवर जो परिणाम होत आहे त्याच्यासाठी अभ्यास गट नेमण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, थोडयावेळापूर्वी याठिकाणी कोणी तरी असे सांगितले की, मदत करा, मदत करा असे म्हणण्याची कोणातील माणसाची मानसिकता नाही. ते बरोबर आहे.कोकणातील माणसाचे हे दुर्दैव आहे की, सुदैव आहे हे मला माहीत नाही. पण कोकणातील माणूस मदतीसाठी कधी हात पसरत नाही. शासनाने मदत दिली तरी ती घेण्यासाठी तो पुढे येत नाही. त्याचा एक वेगळा मान असतो.

श्रीमती मंदा म्हात्रे (बसून) : कोकणातील माणूस स्वाभिमानी असतो.

डॉ. दीपक सावंत :अभिमानी, स्वाभिमानी काहीही म्हणा. पण कोकणातील माणूस कोणाकडे हात पसरत नाही त्याचा फायदा शासनाने घेऊ नये. शासन त्याचा फायदा घेते आणि ही मदत या शेतकऱ्यांना कशी मिळणार नाही याकडेच नोकरशाचे लक्ष असते म्हणून ही मदत आज लालफितीमध्ये अडकून पडलेली आहे. 50 हजार रुपये हेक्टरी मदतीची मागणी या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सदस्यांनी केलेली आहे. पण माझी अशी मागणी आहे की, नवीन संशोधनानुसार साधारणपणे हेक्टरी 250 झाडे लावली जातात. ही झाडे एक वर्ष सोडून दुस-या वर्षी पिक देतात त्यामुळे 500 रुपये 1000 रुपये जी काही मदत जाहीर केली जाईल ती झाडामागे जाहीर केली तर जास्त बरे होईल.

सभापती महोदय,दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, सहा लाख टन काजूची बोंडे फुकट जात आहेत त्यावर प्रक्रिया करणारे कारखाने कोकणात येऊ द्यावेत. मायनिंगचा राक्षस थांबविण्यात यावा. औष्णिकचा राक्षस थांबविण्यात यावा. त्याचबरोबर ग्लोबल वार्मिंगमुळे येणाऱ्या पुढच्या वर्षात आंब्याच्या पिकाचे जास्त नुकसान होणार नाही या बाबतीत धोरण ठरविण्यात यावे. तसेच ग्लोबल वॉर्मिगमुळे नुकसान झाले तर आंब्याला आणि काजूला किती नुकसान भरपाई मिळेल याबाबतचे धोरण माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराच्या भाषणात अपेक्षित आहे. हाच खरा इलाज होऊ शकतो. धन्यवाद.

श्री. जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभेने निवडलले) : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या माध्यमातून या विषयावर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न या अधिवेशनामध्ये केला होता. त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले त्यावेळी मागणी केली होती की, या विषयावर या सभागृहात विस्तृत चर्चा झाली पाहिजे. सभापती महोदय, ही चर्चा मान्य करुन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न शासनाने केल्याबद्दल मी निश्चितपणे या शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मी फक्त दोन मुद्यावरच बोलणार आहे. कोकणात आंब्याचे उत्पादन होते पण हा आंबा कोल्ड स्टोअरेजमध्ये ठेवण्याची यंत्रणा म्हणावी तशी प्रभावी नाही. आंबा तीन महिन्यात येतो. शेवटच्या मे महिन्यात आंबा मोठया प्रमाणात येतो. परंतु प्रामुख्याने आंबा खाणारे जे लोक आहेत ते पाऊस पडल्यानंतर आंबा खात नाहीत. त्यामुळे कोकणात आंब्यासाठी चांगल्या प्रकारच्या स्टोअरेजची गरज आहे. आधुनिक पध्दतीने आंबा कसा चांगला राहील हे बघितले गेले पाहिजे. आज कोकणात या पध्दतीचे एकही स्टोअरेज आंब्यासाठी नाही. त्यासाठी संशोधन करण्याची गरज आहे. नवी मुंबईमध्ये स्टोअरेज आहेत परंतु ते कांद्यासाठी, बटाटयासाठी आणि बाकीच्या वेगवेगळया पिकासाठी आहेत. त्या स्टोअरेजमध्ये आंबा ठेवला जातो त्यामुळे त्या आंब्याला न्याय मिळत नाही. सभापती महोदय मी कोकण कृषि विद्यापीठामध्ये काम केलेले आहे त्यावेळी सिनेटमध्ये मी मागणी केली होती की, याठिकाणी आंब्यासाठी स्टोअरेज करण्याच्या बाबतीत संशोधन करण्याची आवश्यकता आहे. आंबा बारा महिने टिकला पाहिजे आणि तो आंबा ज्यावेळी मार्केटमध्ये येईल त्यावेळी त्याला खऱ्या अर्थाने भाव मिळाला पाहिजे.

सभापती महोदय, अलिबाग तालुक्यात डिसेंबर महिन्यामध्ये आंबा पिकतो. अलिबाग तालुक्यात मारुती मास्तर नावाचे एक शेतकरी आहेत.

यानंतर श्री. बरवड....

श्री. जयंत प्र. पाटील .....

ते माझे कार्यकर्ते आहेत. माझ्या वडिलांच्या काळापासून ते आमचे कार्यकर्ते आहेत. त्यांची 10 हजार झाडे आहेत. ते पहिली पेटी मला जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये देतात. मुहूर्तासाठी पहिली पेटी ते मुंबई मार्केटमध्ये, नवी मुंबई मार्केट कमिटीकडे पाठवितात. त्या 2 डझनाच्या पेटीला 5 हजार रुपये ते 8 हजार रुपये भाव मिळतो. म्हणून माझी अशी सूचना आहे की, आंब्याचे पीक लवकर कसे येईल यादृष्टीने संशोधन केले पाहिजे. अलिबागला जे काम केलेले आहे ते आपल्याला दाखविण्यास तयार आहोत. त्या ठिकाणी आंबा लवकर येतो. त्या ठिकाणचे उत्पादन आणि आंब्याची चव वेगळी आहे. ज्या आंब्याला समुद्राचा वारा लागतो त्या आंब्याची चव निश्चितपणे वेगळी लागते. आमच्या रायगड जिल्ह्यात अलिबाग तालुक्यामध्ये तशा प्रकारचे काम केलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांनी एकही डोंगर मोकळा ठेवलेला नाही. त्या ठिकाणी गेल्यानंतर सर्वत्र हिरवेगार दिसते. त्या ठिकाणी गेल्यानंतर आपण स्वित्झरलँडमध्ये किंवा कॅलिफोर्नियामध्ये आहोत की काय असे वाटते. अशा पध्दतीने त्या ठिकाणी आंब्याची लागवड केलेली आहे. परंतु त्यांना म्हणावा तसा न्याय मिळालेला नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. मी सभागृहात अनेक वेळा सांगितले आहे की, आपण हेक्टरी किंवा एकरी पैसे न देता कलमाप्रमाणे, झाडाप्रमाणे नुकसानभरपाई द्यावी. त्या मागणीचा मी या ठिकाणी पुनरुच्चार करतो.

सभापती महोदय, आंबा पिकविणारे जे शेतकरी आहेत त्यांना खऱ्या अर्थाने मुंबईमध्ये, नवीन मुंबईमध्ये त्या पध्दतीचे स्टॉल्स उपलब्ध नाहीत. नवी मुंबई मार्केट कमिटी शेतकऱ्याच्या मालाला योग्य किंमत मिळण्यासाठी निर्माण झली. परंतु नवी मुंबई मार्केट कमिटीमध्ये आमच्या शेतकऱ्यांसाठी एकही जागा उपलब्ध नाही. जुन्नर तसेच पुण्याच्या दलालांनी सर्व मार्केट कमिटी घेतलेली आहे. ते आमचा माल घेतात आणि त्या ठिकाणी आंब्याची विक्री करतात. या चर्चेच्या निमित्ताने मी अशी मागणी करतो की, त्या ठिकाणी काही टक्के जागा कोकणातील शेतकऱ्यांसाठी, कोकणातील सहकारी संस्थांसाठी, कोकणातील मार्केट कमिट्यांसाठी दिल्या गेल्या पाहिजेत आणि त्या जागा आंबा उत्पादकांसाठी खास राखून ठेवल्या पाहिजेत. तसा निर्णय घेतला तर कोकणातील

...2...

श्री. जयंत प्र. पाटील .....

शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल असे मला वाटते. तसे केल्यामुळे जी मधली दलाली आहे ती नष्ट होईल. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना त्या पध्दतीच्या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत.

सभापती महोदय, परदेशामध्ये आंब्याला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. माझ्या उद्योगाच्या निमित्ताने मी जेंव्हा दुबईला जातो तेव्हा तेथील लोक बाकीचे काही मागत नाहीत. वर्षातून ज्या ज्या वेळी महिना दीड महिन्याने मी त्या ठिकाणी जातो आणि विशेषत जेव्हा या हंगामाध्ये मी त्या ठिकाणी जातो तेव्हा मला 100 ते 150 आंब्याच्या पेट्या न्याव्या लागतात. दुबईमध्ये ऑस्ट्रेलियामधून आंबा येतो तसेच भारतातून आंबा येतो. महाराष्ट्रातून आणि विशेषत: कोकणातून येणारा आंबा कसा मिळेल त्यासाठी त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. त्या ठिकाणी मार्केट कसे उभे करता येईल याबाबतीत शासनाने प्रयत्न करावा. ज्यावेळी श्री. बी.डी.पवार डायरेक्टर होते त्यावेळी शासनाने त्याबाबत प्रयत्न केला होता. त्या ठिकाणी फोन केले, वाऱ्या झाल्या परंतु प्रत्यक्षात मार्केट उभे करण्याचा प्रयत्न केला नाही. मी या ठिकाणी अशी मागणी करतो की त्याबाबतीत ठोस निर्णय घ्यावा. कोकणातील आंबा उत्पादकांना दिलासा मिळेल असे उत्तर या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदय देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

डॉ.विजयकुमार गावित (फलोत्पादन आणि पर्यटन मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, परशुराम उपरकर, दिवाकर रावते, गुरुनाथ कुलकर्णी, सुभाष चव्हाण, जयंत प्र.पाटील आणि सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी कोकणाच्या दृष्टीने अत्यंत संवदेनशील विषयाच्या संदर्भात नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, कोकणामध्ये मोठया प्रमाणावर आंबा, काजू व इतर फळांचे उत्पादन घेतले जाते. फळांचा राजा हापूस आंबा आहे असे म्हटले जाते. परंतु आंबा बागायतदारांना वेगवेगळया नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. कोकणातील आंबा असेल, काजू असेल किंवा इतर फळे असतील या फळांच्या नुकसानीसाठी शासनाने मदत देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यात आपले शासन आहे म्हणून शेतकरी फार मोठया आशेने आपल्याकडे पहात आहे, म्हणून त्यादृष्टीकोनातून आम्ही मागणी करीत आहोत. शासन सुध्दा शेतक-यांच्याबाबतीत अतिशय संवेदनशील आहे असे आपल्याही निदर्शनास आले असेल. त्यामुळे शासनाने त्यांना शक्य तेवढया लवकर मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मागील काळामध्ये केंद्र सरकारकडून जी मदत आली ती निविष्टाच्या रुपाने द्यावयाची होती, ती देण्यास सुरुवात केली आहे. त्याला उशीर झाला हे खरे आहे. पण वेगवेगळया कारणांमुळे उशीर झाला आहे. शेतकऱ्यांना नुकसानीसाठी जास्त पैसा दिला पाहिजे यादृष्टीकोनातून एमएआयडीसीच्या माध्यमातून प्रस्ताव पाठविण्यास उशीर झाला होता. या सभागृहात 2-4 दिवसापूर्वी चर्चा झाली होती. त्यावेळी असे जाहीर केले होते की, 15 मे पर्यंत निविष्टाच्या स्वरुपात मदतीचे वाटप केले जाईल. त्याप्रमाणे 15 मेपर्यंत वाटप केले जाईल. सभापती महोदय, मध्यंतरी फयान वादळ आल्यामुळे शेतक-यांना मदत करावयाची होती. ती मदत देण्याची सुरुवात झालेली आहे असे मला वाटते. सरकारकडून या शेतक-यांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केला जातो. काही अडचणीमुळे एखाद्या ठिकाणी घडले असेल, परंतु तेथेही मदत दिली जाईल अशी मी ग्वाही देतो.

2...

NTK/

डॉ.विजयकुमार गावित.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा करीत असताना काही महत्वाचे प्रश्न मांडले आहेत. ते प्रश्न निश्चितपणे महत्वाचे आहेत. मला त्यासंदर्भात सांगितले पाहिजे की, 3 व 4 एप्रिल रोजी अचानक तापमानात वाढ झाल्यामुळे व हवेतील आर्द्रता कमी झाल्यामुळे आंब्याच्या फळाची गळती झाली, काही ठिकाणी आंब्यावर डाग पडले. काही ठिकाणी नुकताच पाऊस पडला आहे. त्यामुळेही फळांची गळती झाली आहे. या नुकसानीसाठी मदत करण्याचे शासनाचे सध्याचे धोरण आहे त्याप्रमाणे 50 टक्के नुकसान झाले असेल तरच भरपाई दिली जाते. मागील काही दिवसात शेतक-यांचे दोन वेळा नुकसान झालेले आहे. त्यामुळे 20-25 टक्के आंब्याचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी सुध्दा या नुकसानीवर विचार करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण हे सातत्याने घडत आहे. आंब्याचे पीक दोन वर्षातून एकदा येते. त्यामुळे त्यांना काही तरी मदत केली पाहिजे यादृष्टीकोनातून शासन प्रयत्न करीत आहे. आंबा प्रक्रिया युनिट सुरु करण्याची गरज आहे. शीतगृहांची गरज आहे. त्यासंदर्भात दिनांक 31.3.2010 रोजी आदेश काढले आहेत. या आदेशानुसार आंबा, काजू किंवा इतर फळांवर प्रक्रिया करावयाची असून त्यासाठी 3 वर्षांचा कार्यक्रम आखण्याची गरज आहे. त्यासाठी 575 कोटींची गरज आहे. या निधीमधून शीतगृहे, फळ प्रक्रिया युनिट असतील ती सुरु करता येतील. त्याचप्रमाणे मल्टि प्रोडक्ट प्रोजेक्टला मान्यता दिलेली आहे. या माध्यमातून शेतक-यांना मदत करता येईल.

सभापती महोदय, आपल्याकडे कोकणात दापोली कृषी विद्यापीठ आहे. या विद्यापीठामार्फत कृषी उत्पादनासंबंधी संशोधन केले जाते. परंतु त्याठिकाणी पाहिजे त्या प्रमाणात संशोधन केले जात नाही अशी तक्रार काही सन्माननीय सदस्यांनी केली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

यासंदर्भात मी संबंधितांच्या बैठका घेतो. त्या बैठका घेण्यापूर्वी कोकणातील आमदारांची बैठक घेऊन कोणकोणते प्रश्न मार्गी लावायला पाहिजेत, काय काय उपाययोजना केली पाहिजे हे समजून घेऊन त्याबाबतीत दोपोली कृषी विद्यापीठाच्या अधिका-यांबरोर बसून काय काय करता येणे शक्य आहे याबाबत चर्चा केली जाईल. कोकणातील आंबा, काजू आणि अन्य फळ पिके हा अतिशय संवेदनशील विषय आहे. कोकणातील आर्थिक व्यवस्थापन ज्यावर अवलबून आहे त्यासाठी जे जे करता येणे शक्य आहे ते निश्चितपणे केले जाईल.

सन्माननीय सदस्यांनी काजूच्या बाबतीत सांगितले. मी कॉलेज जीवनामध्ये शिकत असताना गोव्याला गेलो होतो. असे म्हटले जाते की, गोव्याला गेल्यानंतर तेथून फेणी पिऊन आले पाहिजे. परंतु मी दारु पित नसल्यामुळे फेणीला हात लावला नाही. या फेणीला सोरोही म्हटले जाते. गोव्यामध्ये फेणीला फार मोठे महत्व आहे. पर्यटक, व्यावसायिक हे गोव्यामध्ये गेल्यानंतर फेणी पितात. गोव्यामध्ये बोंडापासून फेणी निर्माण होत असेल तर ती कोकणामध्येही होण्याची गरज आहे. काजूच्या बोंडापासून, जांभळापासून करवंदापासून कोकणातील लोकांना दोन पैसे कसे मिळतील यादृष्टीने संशोधनामध्ये काही निदर्शनास आले तर त्याबाबतीतील सर्व प्रक्रिया आपण करणार आहोत. काजूवर प्रक्रिया करणारी सेंटर्स फार कमी आहेत. ही सेंटर्स असतील, कोल्ड स्टोरेज असेल, ग्रेडींग असेल, पॅकेजिंग असेल या सर्व गोष्टींचा आपण तीन वर्षाच्या 575 कोटीच्या योजनेमध्ये समावेश करु. याबाबतीत सन्माननीय सदस्यांबरोबर बसून विचारविनिमय करुन हे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचा शासनाचा शंभर टक्के मनोदय आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जांभळाचा उल्लेख केला. जांभळाचा उपयोग मधुमेह व्यक्तींसाठी होतो. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी फयान वादळाचा उल्लेख करुन अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात शेतक-यांना मार्गदर्शन करण्यासाठी वातावरणाचा अभ्यास करण्याची, त्याबाबतीत संशोधन करण्याची सूचना केली. वातावरणातील तापमानामध्ये वारंवार चढउतार होत असतील तर त्याबाबतीत संशोधन करुन शेतक-यांना मार्गदशन केले पाहिजे. या मार्गदर्शनामुळे शेतकरी बांधवाना आर्थिक परिस्थितीला तोंड देता येईल. त्याची आर्थिक परिस्थिती बिघडणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे. प्रक्रिया उद्योग तीन वर्षासाठी उपलब्ध करुन

..2..

दिलेल्या निधीच्या माध्यमातून होतील. काजूवरील व्हॅट कमी करण्याची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली. काजूवर किती टॅक्स लावायचा हे माननीय वित्तमंत्री जाहीर करणार आहेत.

...नंतर श्री. भोगले..

डॉ.विजयकुमार गावीत.....

त्यामुळे त्याठिकाणी वॅटचा निश्चितपणे फायदा होईल. काही सन्माननीय सदस्यांनी तक्रार केली की, अधिकारी योग्य ती कार्यवाही करीत नाहीत. अधिकारी शेतकऱ्यांना अडचणीत आणतात, योग्य ती कार्यवाही करीत नाहीत असे आढळून आले तर निश्चितपणे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. मी सांगितले आहे की, निविष्टा वाटप 15 मेपर्यंत होत आहे.

सभापती महोदय, विद्यापीठामध्ये एक बैठक किंवा चर्चासत्र आयोजित करीत आहोत. त्या निमित्ताने जे जे विषय समोर येतील त्याचबरोबर करवंद, जांभूळ यांचा उल्लेख केला त्या बाबतीत देखील विद्यापीठाचे प्रमुख असतील त्यांना निश्चितपणे ते विषय चर्चासत्रामध्ये नसले तरी त्याबाबतही चर्चा घेऊन मार्गदर्शन करावे असे सांगितले जाईल. त्या माध्यमातून चांगला विचार होईल. आज 70 टक्के काजू बी प्रक्रियेसाठी गोव्यामध्ये पाठविण्यात येत असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. काजू बी परराज्यात जाणार नाही यासाठी जे जे युनिट किंवा स्टोरेजची गरज असेल ते निश्चितपणे करणार आहोत.

श्री.हेमंत टकले : सन्माननीय सभापती महोदय, मंत्रीमहोदय अतिशय चांगली माहिती या निमित्ताने सभागृहात देत आहेत. विद्यापीठाने संशोधन करणे गरजेचे आहेच. परंतु कोकणातील माणसांचे वैशिष्ट्य सांगितले. त्यामध्ये स्वत:हून संशोधन करणारे अनेक शेतकरी आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना शासन आखणार आहे का? विद्यापीठामार्फत योग्य ती माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवायची असते. त्यासाठी कम्युनिटी रेडिओसारखे माध्यम वापरुन जेव्हा एखादा आपत्तीजनक प्रसंग उभा राहील तेव्हा त्यांना तात्काळ सूचना मिळेल यासाठी यंत्रणा असावी म्हणून कम्युनिटी रेडिओसारखी यंत्रणा प्रस्थापित केली तर तिचा अधिक उपयोग होऊ शकतो. कृपया याचा विचार व्हावा ही विनंती.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे ताबडतोब माहिती मिळेल यासाठी निश्चितपणे व्यवस्था करणे गरजेचे आहे. ती व्यवस्था केली जाईल. अशा पध्दतीने संशोधन करणारे कोणी पुढे आले तर त्यांना निश्चितपणे मदत केली जाईल. कोणी संशोधन करीत असेल तर ती चांगली गोष्ट आहे. त्यामधून चांगले काही निर्माण होऊ शकते. त्यामुळे निश्चितपणे मदत केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, आंबा फळ लवकर कसे तयार होईल यासाठी संशोधन करण्यास सांगावे. जर

..2..

डॉ.विजयकुमार गावीत.....

असे कोणी संशोधन करणार असेल तर त्यांना मदत करु. आंबा लवकर तयार होण्यासाठी इंजेक्शनचा वापर केला तर त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात. म्हणून नैसर्गिकदृष्ट्या आंबा फळ लवकर कसे तयार होईल हे पाहिले पाहिजे. खरोखरच हापूस आंबा त्या भागात चांगला होतो. त्याची चव चांगली असते. तेथील जमीन, माती व हवामान पोषक असल्यामुळे ही चव चांगली असते. राज्यात काही ठिकाणी मार्केट कमिटीला जागा दिलेल्या आहेत असा उल्लेख करण्यात आला. ज्या ठिकाणी अशा जागा दिल्या असतील त्याच पध्दतीने कोकणात जागा देण्याचा प्रयत्न केला जाईल. मला याठिकाणी हे सांगितले पाहिजे की, शासनाने सर्वसाधारपणे कोणत्याही फळ पिकाला आजपर्यंत हमी भाव जाहीर केलेला नाही. तो कसा देता येईल यासाठी चर्चा करुन मार्ग काढला जाईल. हमी भाव ब-याच कृषि उत्पादनाला दिला जातो, या संदर्भात कसा देता येईल यादृष्टीने सर्वसमावेशक चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केला जाईल. तापमान वाढले असल्यामुळे नुकसान झाल्याची माहिती दिली. आर्थिक मदत देण्याबाबत 50 टक्क्याचे नॉर्म्स आहेत. 50 टक्के नुकसान झाले तर मदत देता येते. सातत्याने थोडे थोडे नुकसान होते त्याबाबत मार्ग काढण्यासाठी माननीय महसूल मंत्री जे कोकणातील आहेत, माननीय अर्थमंत्री सुध्दा कोकणातील आहेत, त्यांच्याबरोबर बसून याबाबत मार्ग कसा काढता येईल हे बघितले जाईल. निश्तिचपणे एका चांगल्या विषयाला सन्माननीय सदस्यांनी हात घातला आहे, ज्या सूचना केल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

(नंतर पी.1...

श्री. राजन तेली : महोदय, सन 2006 व सन 2008 मध्ये झालेल्या नुकसानीबाबत शासनाने नुकसान भरपाई जाहीर केली परंतु अद्यापही ती शेतकऱ्यांपर्यंत पोहचली नाही. अशी नुकसान भरपाई देण्याबाबत ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार काय ? तसेच आंब्यासाठी हमी भाव व झालेल्या नुकसानीची भरपाई शासन संबंधित मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन किती दिवसात जाहीर करणार आहे ? त्याचप्रमाणे विद्यापीठांची जी बैठक होणार आहे त्या बैठकीत काजू, जांभूळ, करवंद तसेच अन्य फळांच्या संदर्भातील धोरण या बैठकीत शासन ठरविणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, काजू बोंडे, कोकम, जांभूळ वगैरे फळांचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्यासंबंधीचे संशोधन विद्यापीठाने केले असल्याची माहिती मला मिळाली आहे. ही माहिती खरी असेल तर शासन हे करणारच आहे. पण जर तसे नसेल तर सन्माननीय सदस्यांनी या अनुषंगाने ज्या ज्या सूचना केल्या त्यांचा विचार करुन चर्चा करण्यास सांगितले जाईल, त्याचबरोबर आंब्याच्या हमी भावाच्या संदर्भात 15 दिवसात एक बैठक आयोजित करण्यात येईल आणि ज्या ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सन 2006 व 2008 मध्ये झालेल्या नुकसानीपोटी मदत मिळाली नसेल त्या अधिकाऱ्यांची माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, दोन दिवसानंतर हे अधिवेशन संपणार आहे. आंब्याच्या पिकाचे हवामानातील बदलामुळे नुकसान होऊन हे पीक कमी आलेले आहे. या अनुषंगाने भरपाई देण्याबाबत दोन दिवसात घोषणा करण्यात येणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले असेल तर अशी मदत करतो असे नुकसान भरपाईच्या संदर्भातील निकष आहेत. येथे मात्र 25 टक्के नुकसान झाले असल्याचा अहवाल आमच्याकडे आलेला आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून काही मदत करता येईल काय याबाबत कोकणातील आमदारांची बैठक घेऊन विचार केला जाईल.

श्री. भगवानराव साळुंखे : महोदय, शासनाने ज्या ज्या योजना घोषित केल्या त्या अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहचल्या नाहीत म्हणून कोकणचा विकास होऊ शकला नाही. तसेच याचे कारण म्हणजे सहकाराचे तत्व कोकणात रुजलेले नाही. त्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या माध्यमातून कोल्ड स्टोअरेज तसेच विक्री वगैरे विविध योजना राबविण्याची परवानगी शासन देणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : होय.

उपसभापती : अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 11.58 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. जुन्नरे ....

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिलेला असून, "राज्यात गेल्या दोन वर्षापासून नरबळींची....

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुरु असतांना सभागृहात एक सुध्दा कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही.

सभापती : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12.15 ते 12.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी माननीय सभापती

सभागृहात मंत्री उपस्थित नसणे

सभापती : सभागृहात मंत्री नसल्यामुळे दहा मिनिटे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले होते. सभागृहाची दहा मिनिटे वाया गेलेली आहेत. हे बरोबर नाही. मंत्रिमहोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,माननीय मंत्र्यांच्या गैरहजेरीबद्दल मला हरकतीचा मुद्दा प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर उपस्थित करण्यास आपण अनुमती द्यावी.

सभापती : ठीक आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सभागृहाची दहा मिनिटे वाया गेल्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

म.वि.प.नियम 289 च्या प्रस्तावाबाबत

सभापती : आज मला म.वि.प.नियम 289 च्या दोन सूचना प्राप्त झाल्या आहेत. पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची "राज्यात जानोवारीपासून गेल्या तीन महिन्यात नरबळीच्या 6 घटना घडणे, नरबळीच्या आणि नरबळी देण्याच्या प्रयत्नांच्या 15 घटना गेल्या दोन वर्षात घडणे, अघोरी उपचार व प्रथांचा वापर केल्यामुळे ग्रामीण भागात अनेक बालमृत्यू ओढवणे, अघोरी अमानवी प्रथा व अघोरी अशास्त्रीय उपचार यांना बहुसंख्य व अशिक्षित जनता बळी पडत असणे" या आशयाची आहे.

..2

माननीय सभापती...

दुसरी सूचना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची "वाई जिल्हा सातारा येथे काल दिनांक 20 एप्रिल 2010 रोजी दुपारी 3.00 वाजताच्या दरम्याने शिवसेना पक्षाचे माजी वाई शहरप्रमुख व त्यांचे मित्र यांच्यावर मुस्लिम समाजाच्या जमावाने अचानक हल्ला करून तलवारीने वार करणे, गणपती मंदिरातील मूर्तीवर शेण, घाण वगैरे फेकून मंदिराचे पावित्र्य नष्ट करणे, या दोन्ही प्रकाराबाबत वाई शहर पोलीस स्टेशन येथे एकंदर सात मुस्लिम आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करणे, एका आरोपीला पोलिसांनी पकडणे व बाकीचे सहा आरोपी फरार होणे, ह्या दोन्ही प्रकारामुळे वाई शहरामध्ये पसरलेले भितीचे वातावरण" या आशयाची आहे.

आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये या संबंधातील कोणताही विषय नसल्यामुळे मी दोन्ही सूचनांसंबंधी शासनाने निवेदन करावे असे निदेश देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वाई येथे गणपतीच्या मूर्तीची विटंबना करण्यात आली आहे. त्यामुळे तेथे जातीय तणाव निर्माण झाला आहे. याबाबत आज निवेदन झाले तर योग्य होईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाने निवेदन करण्याचे निदेश दिल्याबद्दल धन्यवाद. आपण दोन दिवसापूर्वी शिक्षकांच्या प्रश्नाबाबत शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊनसुद्धा शासनातर्फे अद्यापि निवेदन करण्यात आलेले नाही. त्यामुळे आपण शासनाला तातडीने निवेदन करण्यास निदेश द्यावेत ही विनंती.

.....

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

मुंबईतील झोपडपट्टीमधील शाळांना एफएसआय वाढवून मिळण्याबाबत

(1) * 3526 **श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील झोपडपट्टीमधील शाळांना एफएसआय वाढवून द्यावा याबाबत शिक्षक भारती व अन्य संघटनांनी मा.मुख्यमंत्री,प्रधान सचिव, नगरविकास, आयुक्त मुंबई मनपा,महानगर आयुक्त एमएमआरडीए यांच्याकडे वेळोवेळी मागण्यांचे निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(3) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (1) होय. श्री.कपील पाटील, विधानपरिषद सदस्य व अध्यक्ष, शिक्षक भारती यांनी दि.23/2/2010 रोजी शासनास लिहिलेल्या पत्रान्वये, तसेच सचिव, मुंबई उपनगर शिक्षण संस्था संघ, मालाड (पुर्व) यांनी मा.मुख्यमंत्री यांना लिहिलेल्या त्यांचे दि.4/12/2009 रोजीचे पत्रान्वये मागविण्याचे निवेदन दिले आहे.

(2) व (3) शासनास प्राप्त झालेल्या निवेदनांवर मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई तसेच शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय दि.26/2/2010, दि.9/3/2010 व दि.19/3/2010 रोजीचे पत्रान्वये मागविण्यात आले आहेत. ते अद्याप शासनास प्राप्त झालेले नाहीत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न तीन वर्षापासून सातत्याने वेगवेगळ्या माध्यमातून मी उपस्थित केलेला आहे. अडीच वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यां समवेत या प्रश्नासंबंधी चर्चा झाली होती. तेव्हा पासून हा प्रश्न मार्गी लागलेला नाही. हा प्रश्न मार्गी लावण्याचे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले होते. मुंबई महानगरपालिका एसआरएवर आणि एसआरए मुंबई महानगरपालिकेवर जबाबदारी टाकत आहे. स्कूल रिझर्व्हेशनचा प्लॉट असेल तर 4 एफएसआय मिळतो. मुंबईत 200 शाळा झोपडपट्टीत आहेत. या शाळा स्कूल रिझर्व्हेशनच्या प्लॉटमध्ये नाही. या शाळांची अवस्था झोपड्यांसारखी आहे. तेथे कोणतीही सुविधा नाही. एका शाळेत दोन हजार मुले आहेत. या शाळांचा पुनर्विकास करावयाचा असेल तर त्यांना 4 एफएसआय देणे आवश्यक आहे. तो शासन तातडीने देणार आहे काय ? यासंबंधी मुंबई महानगरपालिका, एसआरए, संबंधित विभाग यांची तातडीने बैठक बोलावून शासन कार्यवाही करणार आहे काय ?

यानंतर श्री.गायकवाड....

ता.प्र.क्र.3526.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, एस.आर.ए.योजनेमध्ये ज्या पध्दतीने एफ.एस.आय. दिला जातो त्याचपध्दतीने त्या ठिकाणी असलेल्या शाळांना सुध्दा एफ.एस.आय.द्यावा असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा रोख आहे. या दृष्टीने शासनाने सहानुभूतिपूर्वक विचार करुन अशा प्रकारे एफ.एस.आय. वाढवून देणे व्यवहार्य आहे काय याबाबतीत मुंबई महानगरपालिका त्याचप्रमाणे उप संचालक, नगर रचना यांच्याकडून दिनांक 26.2.2010, 9.3.2010 आणि 19.3.2010 रोजी पत्र पाठवून अहवाल मागितला होता तसे करण्यामध्ये आज थोडी अडचण आहे. परंत ु शाळेतील मुलांचा शासनाने विचार केलेला नाही असा त्याचा अर्थ नाही.एस.आर.ए.योजनेमध्ये आपण विकासकाला जागा देतो आणि त्याला ती जागा डेव्हलप करण्यास सांगतो तसेच 269 स्क्वेअर फुटाची सदनिका लाभधारकांना मोफत देतो.तशा प्रकारे या शाळांच्या बाबतीत जर निर्णय घेतला तर ते व्यवहार्य होत नाही. त्याबाबतीत योग्य तो रिस्पॉन्स मिळण्याची शक्यता वाटत नाही त्यामुळे या क्षणा पर्यंत निर्णय होऊ शकला नाही परंतु शासन याबाबतीत सकारात्मक निर्णय घेण्याच्या मनस्थितीत आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. झोपडपट्टीमधील शाळांना पायाभूत सुविधा आणि मुलभूत सुविधा नाहीत अकॉमोडेशन रिझर्व्हेशन सबंधी शासनाने दहा वर्षापूवी धोरण स्वीकारले होते त्या धोरणाच्या माध्यमातून वा एस.आर.ए. योजनेच्या माध्यमातून वा अन्य माध्यमातून एफ.एस.आय जादा दिला तरच विकासकाकडून शाळा बांधून घेता येतील आणि त्या ठिकाणच्या शाळांना मुलभूत सुविधा तसेच पायाभूत सुविधा मिळतील. या संदर्भात शासन त्वरित विचार करील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,एस.आर.ए. च्या संदर्भात दिनांक 1.1.1995 रोजी निर्णय घेण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे नगरविकास मंत्री असतांना दहा वर्षापूर्वी शासनाने जो निर्णय घेतला होता त्यासंबंधीची त्यांनी अधिकची माहिती सभागृहाला दिली आहे ती माहिती तपासून पहाण्यात येईल आणि तसे करणे जर व्यवहार्य असेल तर त्याचा विचार करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय,मुंबईमध्ये झोपडपट्टी करिता वेगळया शाळा नाहीत. झोपडपट्टीच्या विकासामध्ये त्या ठिकाणच्या विकासकाला दहा बारा खोल्या बांधावयाच्या

2..

असतात. मुंबईमध्ये शाळा बांधण्यासाठी चार एफ.एस.आय. दिला जातो इतरांना मात्र 1.33 एफ.एस.आय. देण्यात येत असेल तर शाळासाठी 4 एफ.एस.आय.दिला जातो. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे आता अतिरिक्त जिनासुध्दा बांधण्यात येतो. माननीय मंत्री महोदयांना मला एक विनती करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी जो प्रश्न मांडलेला आहे त्या अनुषंगाने जेथे जेथे एस.आर.ए.च्या योजना होत आहेत त्या ठिकाणी 10 -15 वर्ग खोल्या बांधावयाच्या असतील तर त्या शाळा महानगरपालिकेला द्यावयाची की अन्य कोणाला द्यावयाची हे मला माहीत नाही. चार एफ.एस.आय. जर विकासकाला वापरावयास दिला तर विकासकाच्या खर्चातून कायम स्वरुपी शाळा उभी राहू शकेल तेव्हा याप्रमाणे करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. मला सांगावयास पाहिजे की, सद्या:स्थितीत जेंथे स्वतंत्र भूखंड असतो आणि नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय संस्थाच्या जागेवर शाळा बांधकाम केले जाते तेव्हा 5.32 इतका एफ.एस.आय. मुंबईमध्ये दिला जातो आणि उपनगरात 4 पर्यत एफ.एस.आय. देतो .शाळांना हा एफ.एस.आय. देत नाही अशातला भाग नाही सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न आहे की.एस.आर.एस.ची योजना ज्या ठिकाणी लागू झालेली आहे त्या ठिकाणी देखील हा निर्णय लागू करावा. त्यासंबंधीचे उत्तर मी मघाशी दिले असून या सर्व बाबी तपासून सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक बैठक झाली होती. त्या बैठकीत कोणती मागणी करण्यात आली होती आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणते आदेश दिले होते ? मुंबई महानगरपालिका, झोपडी पुनर्वसन प्राधिकरण आणि उपसंचालक नगररचना यांच्याकडे जो अभिप्राय मागितला होता त्यावेळी काही कालमर्यादा ठरविण्यात आली होती काय असल्यास ही कालमर्यादा किती होती ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र पाटील यांनी सागितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाल्याचे प्रोसिडींग आता माझ्याकडे उपलब्ध नाही त्यामुळे त्या बैठकीत त्यांनी कोणते आदेश दिले होते हे आता सांगता येणें कठीण आहे...

नंतर श्री.सरफरे

ता.प्र.क्र. 3526...

श्री. भास्कर जाधव...

माननीय सदस्यांनी अहवाल मागविण्यासंबंधी कालमर्यादेचा प्रश्न विचारला आहे. साधारणपणे सहा महिन्यामध्ये अहवाल येणे अपेक्षित आहे.परंतु त्यांना निश्चित अशी कालमर्यादा घालून देण्यात आलेली नाही.परंतु याबाबत विचार केलातर या झोपडपट्टीच्या एरीयामध्ये 1 कि.मी. च्या आतमध्ये शाळा नसेल तर तिथे सुध्दा 500 मुले असतीलतर शाळा देण्याचे काम करतो. तसेच, 800 मुलांवर हायस्कूल देण्याची सोय सुध्दा शासनाने केली आहे. मूळ मुद्दा एस.आर.ए.योजनेनुसार चटईक्षेत्र वाढवून देण्याबाबतचा आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, नवीन शाळा देण्यासंबंधीचा मुद्दा नाही. सद्या झोपडपट्टीमध्ये अस्तित्वात असलेल्या आणि झोपडीसदृश्य असलेल्या या शाळा आहेत, त्या अत्यंत दुरवस्थेमध्ये आहेत. त्यांना अतिरिक्त एफ.एस.आय. दिला नाहीतर त्यांचे रिडेव्हलपमेंट होऊ शकत नाही. सद्याच्या एस.आर.ए. योजनेमधून फक्त 269 चौ.फूटाची वर्ग खोली मिळते. त्यामध्ये ही मुले बसू शकत नाही. मंत्रिमहोदयांनी आता सांगितले की, माझ्याकडे प्रोसेडिंग नाही. हा प्रश्न अडीच वर्षानंतर विचारण्यात आला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी स्पष्ट आदेश दिले होते. आणि एस.आर.ए. कमिशनरनी त्या संबंधातील पत्र दिले होते. त्याला 2 वर्षे होऊन देखील आपल्या डिपार्टमेंटकडून अजून कारवाई करण्यात आली नाही. ही दुर्दैवाची बाब आहे. आणि आता महानगरपालिकेने पुन्हा हा प्रस्ताव एस.आर.ए.कडे मांडण्यासाठी सांगितले आहे. हा घोळ आपल्याला संपवावयाचा असेल तर तातडीने याच महिन्याच्या आत या संबंधी दोघांची बैठक बोलावून एस.आर.ए. योजनेमध्ये तेथील सर्व शाळांकरिता स्लम स्कूल रिहॅबिलिटेशन स्कीम नव्याने आखणार काय? आणि त्यांना 4 एफ.एस.आय. देणार काय? श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत बुध्दिमत्तेने याठिकाणी दोन प्रश्न एकाच वेळी विचारले आहेत. या दोघांची संयुक्त बैठक आपण घ्याल काय? आणि 4 एफ.एस.आय. देण्याचा विचार करणार काय? सभापती महोदय, एक महिन्याच्या आत दोघांची बैठक घेतली जाईल] परंतु निर्णय काय होईल हे याठिकाणी सांगणे थोडेसे अवघड आहे..

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, झोपडपट्टी भागातील शाळांच्या संदर्भात अत्यंत गंभीर प्रश्न आहे. माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगितल्याप्रमाणे तेथील शाळांची अत्यंत दुरवस्था

श्री. रामनाथ मोते...

झालेली आहे. त्यामुळे या प्रश्नोत्तराच्या तासामधून या विषयाला न्याय मिळणार नाही. म्हणून माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, निर्णय जो काही होईल त्याचा आपण नंतर विचार करु. परंतु हा विषय मार्गी लागणे महत्वाचे असल्यामुळे आपण स्वत: पुढाकार घेऊन 15 दिवसाच्या आत आपण बैठक घेणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, यामधील महत्वाचे बारकावे असे की, एस.आर.ए. योजनेमध्ये आपण 269 चौ.फूटाच्या सदनिका मोफत देतो. त्या पध्दतीने आपल्याला मोफत शाळा बांधून द्याव्या लागणार आहेत. जेवढा एफ.एस.आय. वाढवून देऊ, तेवढया मोफत शाळा द्याव्या लागणार आहेत. शेवटी ज्याच्याकडून आपण हे बांधून घेणार आहेत तो मोफत देणार नाही, त्यामध्ये तो स्वत:चा व्यापार बघणार, हे आता लपून राहिलेले नाही. आणि म्हणून त्या संदर्भात सर्व गोष्टींचा विचार करता काही मार्ग काढता येईल काय? 4 एफ.एस.आय. ऐवजी आणखी 2 ते अडीच एफ.एस.आय. देऊन वरचा दीड एफ.एस.आय. संबंधित विकासकाला देता येईल काय ? वगैरे गोष्टींचा हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने एक महिन्याच्या आत बैठक घेण्यात येईल.

औरंगाबाद जिल्हा प्रशासनाने साखर वाहतुक कंत्राटदारांची

अनामत रक्कम जप्त करण्याप्रकरणाची चौकशी

(२) * ६७४२ श्री.नितीन गडकरी , श्री.विनोद तावडे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा प्रशासनाने खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे साखर वाहतुक कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर साखर वाहतुक कंत्राटदार हे दिनांक ३ नोव्हेंबर, २००९ व ७ नोव्हेंबर, २००९ रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर,गंगापूर, कन्नड, सिल्लोड, पैठण,सोयगांव,खुलताबाद या तालुक्याचे काम करण्यास अयशस्वी ठरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियुक्त साखर वाहतुक कंत्राटदार यांनी निविदा, करारनाम्याचा दिनांक ३ नोव्हेंबर, २००९ व ७ नोव्हेंबर, २००९ रोजी भंग केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद जिल्हा प्रशासनाने साखर वाहतुक कंत्राटदारांची अनामत रक्कम जप्त केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय असल्यास, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.अनिल देशमुख : (१) होय.औरंगाबाद जिल्ह्यात नियुक्त केलेल्या साखर वाहतूक कंत्राटदारानी माहे नोव्हेंबर, २००९ पासून साखर वाहतूकीचे काम केलेले नाही.

(२) होय. साखर वाहतूक कंत्राटदारांकडून करारनाम्यामधील अटी व शर्तीचा भंग झालेला आहे.

(३) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संबंधित साखर वाहतुक कंत्राटदारावर कारवाई करण्यात येत आहे.

(४) होय, करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संबंधित साखर वाहतुक कंत्राटदारावर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हा प्रशासनाने साखर वाहतूक करण्यासाठी खाजगी कंत्राट दिले होते. परंतु त्या कंत्राटदारांनी करारनाम्याचे उल्लंघन केले आहे. त्यांनी वहातूक करीत असतांना हलगर्जीपणा केला आहे, दिरंगाई केली आहे, काम बंद केले आहे.

ता.प्र.क्र. ६७४२...

श्री. रामनाथ मोते...

तसे लेखी उत्तरामध्येही म्हटले आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या कंत्राटदाराचे वहातुकीचे कंत्राट तातडीने रद्द करण्याची कारवाई करणार काय? त्यांना काळया यादीमध्ये टाकणार काय? त्यांची अनामत रक्कम आपण जप्त करणार काय?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

(यानंतर सौ. रणदिवे)

विमाननगर ता.वडगाव (जि.पुणे) येथील म्हाडा वसाहतीतील अस्वच्छतेबाबत

(3) * 3243 श्री.मोहन जोशी , श्री.संजय दत्त , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील , प्रा.सुरेश नवले , श्री.संजय दत्त : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे येथील वडगावातील विमाननगर म्हाडा वसाहतीत अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, 2010 च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, म्हाडा वसाहतीच्या स्वच्छतेकडे आणि इतर नागरी समस्यांकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, नागरिकांची तक्रार दुर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (1), (2) व (3) पुणे येथील वडगावातील विमाननगर म्हाडा वसाहत अस्वच्छतेच्या विळख्यात अशा आशयाची बातमी फेब्रुवारी, 2010 मध्ये स्थानिक वर्तमानपत्रात आलेली होती. त्यानंतर या बातमीची दखल घेवून महानगरपालिकेकडून सदर भागात साफसफाईची व्यवस्था अधिक बळकट करण्यात आली असून, तेथे साफसफाईसाठी दोन कायमस्वरुपही सेवकांची व दोन रॅगपिकर्स यांची महानगरपालिकेने नियुक्ती केली आहे.त्यानंतर याबाबत नागरिकांच्या तक्रारी नाहीत. तसेच इतर नागरी सुविधामध्ये उदा.पाणी पुरवठा,ड्रेनेज, पथदिवे या सुविधा सदर भागात महानगरपालिकेकडून पुरविण्यात आलेल्या आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, संगमवाडी क्षेत्रीय कार्यालय व येरवडा क्षेत्रीय कार्यालय यांच्यामध्ये हद्दीच्या संबंधात वाद निर्माण झाला असून, म्हाडा कॉलनीतील जनतेला त्रास होत आहे. येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे म्हणणे आहे की, तेथील म्हाडा वसाहतीचा भाग आमच्या अखत्यारित येत नाही आणि संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयाचे म्हणणे आहे की, तेथील म्हाडा वसाहतीचा भाग आमच्या अखत्यारित येत नाही. मात्र या वादामुळे तेथे घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. तसेच याठिकाणी असाही प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे की, त्या परिसरामध्ये सफाई कर्मचारी स्वच्छता ठेवत नाहीत. त्यामुळे तेथे आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण झालेली आहे. आता त्याठिकाणी कायम स्वरुपी सफाई कामगाराची नेमणूक केली आहे. परंतु ते काम करीत नाहीत. अशा प्रकारे तेथे निर्माण झालेल्या वादाच्या बाबतीत शासन कायम स्वरुपी कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ? तसेच हद्दीच्या संबंधातील वाद कायम स्वरुपी सोडविण्यासाठी कोणती ठोस कार्यवाही करण्यात येणार आहे ? संगमवाडी क्षेत्रीय कार्यालय की येरवडा क्षेत्रीय ...

. . . .डल्यु-2

कार्यालय यासंबंधात शासनाने निर्णय घ्यावा जेणेकरुन या भागातील म्हाडा वसाहतीतील नागरिकांचे तेथील कचऱ्याच्या संबंधातील संकट दूर होईल. याठिकाणी म्हाडाच्या संबंधातील विषय आहे आणि माननीय मंत्री महोदय हे नगरविकास विभागाचे राज्यमंत्री देखील आहेत. तसेच पुण्याच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथील डी.पी.प्लॅनमध्ये काही गावांचा समावेश केलेला आहे. त्या डी.पी.मध्ये म्हाडासाठी आरक्षण ठेवण्यात आलेले नाही, ते शासन ठेवणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, एकतर हा विभाग संगमवाडी क्षेत्रीय कॉलनीमध्ये येतात काय ? किंवा येरवडा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये येतात ? मला पहिल्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे आहे की, हा विषय पूर्णपणे आम्ही सोडविलेला आहे. या ज्या कॉलनी आहेत, त्या पूर्णपणे संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गतच येतात आणि तशा प्रकारच्या त्यांना सूचना दिलेल्या आहेत की, हा भाग तुमच्या विभागातच येतात आणि या भागातील सगळी स्वच्छता व देखभाल करण्याचे काम तुमचे आहे असे त्यांना आदेश देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण त्याठिकाणी दोन कामगार नेमले असून ते कायम स्वरुपी तेथे रहात नाहीत. वास्तविक त्यांनी नेमून दिलेल्या ठिकाणी काम केले पाहिजे. परंतु ते कामगार जर नेमून दिलेल्या ठिकाणी काम करीत नसतील तर महानगरपालिकेला त्यांच्यावर लक्ष ठेवण्याबाबत निश्चितपणे सांगण्यात येईल आणि त्यांनी जर यामध्ये टाळाटाळ केली तर त्यासंदर्भात सुध्दा जी काही कायदेशीर कारवाई करावयाची आहे, ती करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न आहे, त्याबाबत सांगावयाचे तर पुणे शहराचा नवीन डेव्हल्पमेंट प्लॅन तयार होत आहे, त्यामध्ये म्हाडासाठी काही रिझर्व प्लॉट ठेवण्यात आलेला नाही अशी सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली आहे. परंतु मला आता यासंबंधात काही सांगणे अवघड आहे, परंतु ही बाब काय आहे ते तपासून पहाण्यात येईल.

. . . .डब्ल्यु-3

मुंबई गिरणी कामगाराच्या समस्याबाबत

(४) * ४०३७ श्री.संजय दत्त , प्रा.सुरेश नवले , श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४८३ ला दिनांक १६ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात

: सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद पडलेल्या एकूण ५८ गिरण्यांपैकी ३३ गिरण्यांच्या जमिनीवर कामे सुरु करण्याची परवानगी महानगरपालिकेने दिलेली असून त्यात ७ राष्ट्रीय वस्त्रोद्योग मंडळाच्या व उर्वरित २६ गिरण्या खाजगी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी कोणकोणत्या गिरण्यांच्या जागेवर मॉल व इतर उद्योग उभे राहिले आहेत व त्यात किती कामगारांना माहे जानेवारी, २०१० अखेर किती कुटुंबियांना सामावून घेतले आहे,

(३) ज्या मॉल व इतर उद्योगामध्ये कामगारांना अथवा त्यांच्या कुटुंबियांना सामावून घेण्यात आले नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) एका मिलच्या जागेत मॉल आहे. दोन मिलच्या जागेचा वापर व्यावसायिक व 4 गिरण्यांचा वापर माहिती तंत्रज्ञान/व्यावसायिक वापराकरिता करण्यात येत असून त्यांचा विकास अद्याप पूर्ण झालेला नाही.

शासनाने दिनांक 03-10-2007 च्या आदेशानुसार बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली नियम 58 (7) (डी) मध्ये फेरबदल केलेला आहे. त्यानुसार जे गिरणी कामगार 1 जानेवारी, 2000 रोजी कामावर होते, त्यांना अथवा त्यांच्या कुटुंबियातील एका व्यक्तीस प्राधान्याने गिरणीच्या जागेवर विकसित होत असलेल्या उद्योगांमध्ये रोजगार देणे मिल मालक/विकासक यांना बंधनकारक केले आहे. या अनुषंगाने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्र मुंबई शहर या कार्यालयात स्वतंत्र सेवायोजन कक्ष निर्माण केला असून त्यात गिरणी कामगारांची स्वतंत्रपणे नोंदणी करण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, त्यांना उत्तरामध्ये काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या विषयाच्या बाबतीत विचारीत आहे, हे जर त्यांनी सांगितले असते, तर मग मी त्यांना माहिती दिली असती. पण मी सन्माननीय सदस्यांना आपल्यामार्फत विनंती करीन की, त्यांनी प्रश्न विचारावा. मी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय,मी सर्वप्रथम आपल्या निदर्शनास एक महत्वाची बाब आणून देऊ इच्छितो आणि ही चिंतेची बाब आहे.माननीय मंत्री महोदय हे कार्यक्षम आहेत आणि त्यांनाच अडचणीमध्ये आणले जात आहे.ती बाब अशी आहे की,दि.16 डिसेंबर 2009 रोजी नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी या प्रश्नाशी संबंधित प्रश्न विचारण्यात आला होता आणि त्यावेळी जे ....

. . . .डब्ल्यू-4

श्री.संजय दत्त . . . .

उत्तर देण्यात आले होते, ते जशाच्यातसे उत्तर आजही देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, मी त्याची प्रत आपल्याकडे पाठवितो. याठिकाणी असा प्रश्न उपस्थित होतो की, मागच्या चार महिन्यामध्ये याबाबतीत काहीही घडामोड किंवा प्रगती झालेली नाही असे काही आहे काय ? मुंबईतील गिरणी कामगार अगोदरच उद्ध्वस्त झालेला आहे. गिरणी मालक टॉवर्स् आणि मॉल बांधून कोट्यावधी रुपये मिळवत आहेत. या गिरण्यांमध्ये कामगारांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना नोकरी देण्याबाबत एक मागणी आहे आणि शासनाने ती धोरणात्मकदृष्टया मान्य केलेली आहे. पण मला या प्रश्नाच्या माध्यमातून आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे की, त्यामध्ये तफावत आहे. एका बाजूला शासनाचे धोरण आहे, पण त्याची अंमलबजावणी होत नाही. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, सेवानियोजन कार्यालयामध्ये किती गिरणी कामगाराच्या मुलांनी नोंदणी केलेली आहे ?

यानंतर कु.थोरात . . . . .

श्री. संजय दत्त ...

आणि किती मुलांना या सेवा नियोजन कार्यालयातून नोकऱ्या देण्यात आल्या?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची प्रश्न विचारण्याच्या पाठीमागची तळमळ समजून घेण्यासारखी आहे. आज या विषयाच्या संदर्भात मी जेव्हा ब्रिफिंग घेत होतो तेव्हा मी जरी या शासनाचा एक प्रतिनिधी असलो तरी मी जेव्हा या सभागृहात आमदार म्हणून बसत होतो त्यावेळची माझी भुमिका मला आठवली. सभापती महोदय, ही वस्तुस्थिती खरी आहे की, कलम 58(7) मध्ये फेरबदल करुन दिनांक 1-1-2000 रोजी एक निर्णय करण्यात आला. दिनांक 1-1-2000 रोजी जे कामगार कामावर होते त्यांच्या मुलांना येथे होणाऱ्या विकासामध्ये, येथे होणाऱ्या कारखानदारीमध्ये किंवा जो काय व्यवसाय असेल, त्यामध्ये नोकरी द्यावी. त्यादृष्टीने 16512 लोकांची नोंदणी झाली. या सगळया नोंदणी केलेल्या तरुणांच्या कागदपत्राची छाननी केली आणि ते पात्र आहेत काय हे तपासण्यात आले त्यावेळी केवळ 262 लोक पात्र आहेत अशा प्रकारची माहिती तयार केली गेली. आज सकाळपर्यंत 264 लोक पात्र आहेत. या क्षणापर्यंत यापैकी एकाही तरुणाला नोकरी दिली गेली नाही, हे सांगताना मला कमीपणा वाटत नाही. मी सन्माननीय सदस्यांच्या भावना समजू शकतो. या क्षणापर्यंत एकाही गरजूला नोकरी देण्यात आलेली नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, शासनाच्या वतीने माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत आताच निर्णय द्यावा. ही गंभीर बाब आहे. या विषयासवर संपूर्ण सभागृहाच्या भावना तीव्र आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी प्रामाणिकपणे परिस्थिती सांगितल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या प्रश्नातूनच त्यांचे उत्तर अपेक्षित आहे. सभापती महोदय, या गिरण्यांच्या जमिनीवर उभ्या राहिलेल्या कुठल्याही मॉलमध्ये आपण गेलो तर दुकानामध्ये काही विकायचे असेल तर स्कील लागते. आणखी कुठल्या कामासाठी ट्रेनिंगची आवश्यक असते पण कार पार्किंगसाठी आठ-आठ मजले तेथे उभे केले आहेत. त्या कार पर्किंगमध्ये आपण गाडी नेत असताना 60 ते 70 लोक गणवेशामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी उभे असतात. हे काम या गिरणी कामगारांच्या मुलांना करता येऊ शकते. परंतु हे काम परप्रातीय करीत आहेत. जो भूमीपूत्र आहे त्याने वर्षानुवर्षे या गिरण्यांमध्ये काम केलेले आहे. सभापती महोदय, याठिकाणी

..2..

श्री. दिवाकर रावते.....

परप्रांतीय आणि मराठी हा विषय नाही. परप्रांतीय या मुंबईत कालपरवाच आलेले आहेत आणि मराठी माणसांच्या पिढया त्याठिकाणी गेलेल्या आहेत. जे परप्रांतीय शिटया मारुन गाडया पार्किंगसाठी मार्गदर्शन करण्यासाठी उभे असतात त्यांना काढले तरी काही हरकत नाही. पण या गिरणी कामागारांच्या मुलांना या मॉलमध्ये नोकरी देण्याकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन या मुलांना नोकऱ्या देण्याच्या संदर्भात त्या त्या मॉलच्या मालकांना जबरदस्ती करण्यात येईल काय आणि या मुलांना नोकऱ्या देण्यात येतील काय?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, मी शासनाची भूमिका सांगितली. शासनाने नियमामध्ये बदल केला. त्यासंदर्भात प्रधान सचिव उद्योग आणि कामगार यांची एक समिती तयार केली. त्यासाठी एक स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला. त्या कक्षामार्फत नोंदणी करण्याचे काम कागदोपत्री झाले. त्या उमेदवारांना प्रत्यक्षपणे रोजगार मिळावयास पाहिजे होता, तो मिळालेला नाही. म्हणून मी जरी शासनाचा एक प्रतिनिधी असलो तरी माझी भावना मी याठिकाणी प्रामाणिकपणे मांडली. सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत, त्याच माझ्या भावना आहेत. त्याच शासनाच्या भावना आहेत. म्हणून या लोकांना न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून काही निर्णय करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. यामध्ये असे होते की, इकडे गिरणी कामगारांच्या मुलांची नोंदणी होते आणि तिकडे मॉलचे मालक आपापले व्यवसाय सुरु करतात. आपण त्यांना या गिरणी कामगारांच्या मुलांना प्राधान्याने घ्या असे सांगितलेले आहे. परंतु ते घेत नाहीत. रिक्वायरमेंट कळवत नाहीत अशा अनेक अडचणीं आहेत. याच्या खोलामध्ये जाऊन अधिक माहिती काढण्याचा एक कार्यकर्ता म्हणून मी प्रयत्न केला तेव्हा मला देखील आपल्या सारख्याच वेदना झाल्या. याबाबतीत काही गोष्टी करण्याची गरज आहे. यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर अधिकची चर्चा करीन. गिरणी कामगारांना रोजगार देण्याच्या दृष्टीने या मॉलसाठी जी एन.ओ.सी. देण्यात येते त्याच्यामध्ये अट घालावी लागेल. त्यादृष्टीने एक निर्णय करावा लागेल. आपल्याकडे एवढा-एवढा रोजगार उपलब्ध होणार असेल तर त्यापैकी गिरणी कामगारांच्या एवढया एवढया पाल्यांना रोजगार देण्यात येणार असाल तरच एन.ओ.सी. देण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड...

ता. प्र. क्र. 4037 ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागू नये. मी नंतर आपल्याला उपप्रश्न विचारण्याची संधी देतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्यामध्ये बंधन घालण्याची गरज आहे, अटी घालण्याची गरज आहे. प्रधान सचिव, रोजगार आणि स्वयंरोजगार यांच्या समितीने अभ्यास करुन यासंदर्भात रोजगार देण्याकरिता काय करावे लागेल याकरिता त्यांनी केवळ कमिटी म्हणून राहून चालणार नाही तर आपल्या कमिटीने काय रिव्ह्यू घेतला, आपल्या कमिटीच्या आदेशानुसार या लोकांना काय रोजगार दिला याचा आढावा सुध्दा या प्रधान सचिवांनी शासनाला देण्याची आवश्यकता आहे. असे सुध्दा बंधन घालता येईल. मला असे वाटते की, यासंदर्भामध्ये लवकरच बसून या लोकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने एक कार्यपध्दती ठरवावी लागेल आणि त्यादृष्टीने शासन सकारात्मक विचार करील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो की, त्यांनी संवेदनशील भूमिका घेतलेली आहे. फक्त अपेक्षा अशी आहे की, हे जे सर्व प्रकार चाललेले आहेत त्याबाबतीत जी भूमिका आपण मांडली त्यासंबंधीचे निर्णय घेण्याच्या संदर्भात आपल्याला माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावयाची आहे त्याप्रमाणे त्यांच्याशी निश्चितपणे आपण चर्चा करावी. ते आम्ही समजू शकतो पण आपण कालमर्यादा ठरवून निर्णय घेणार काय ? दुसरा प्रश्न असा की, ज्या विकास कामांसाठी परवानगी दिली जाते ती विकासकामे पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी त्यांना नोकरी दिली जाईल असे सांगितले जाते. त्या ठिकाणी जे मॉल्स येणार किंवा इतर गोष्टी येतील ती कामे 8-10 वर्षे पूर्ण होणार नसतील तर ते गिरणी कामगार 8-10 वर्षे बेरोजगार राहतील काय ? म्हणून ही विकास कामे ठराविक कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने ठराविक कालमर्यादा घालण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विकास कामांना अशा पध्दतीने कालमर्यादा घालण्यात येईल काय असा विचारलेला आहे. कोणत्या कालावधीमध्ये ते

...2...

ता. प्र. क्र. 4037 ... श्री. भास्कर जाधव ...

काम पूर्ण करावे याबाबत सांगणे थोडेसे अवघड आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा उपस्थित केला की, आदरणीय मुख्यमंत्री महोदयांना ही सगळी परिस्थिती अवगत करुन लवकरात लवकर यासंदर्भातील निर्णय घेणार काय ? निश्यितपणे मी माननीय मुख्यमंत्र्यांना ही सर्व परिस्थिती अवगत करीन. त्याचबरोबर आम्ही आणखी एक पाऊल तात्काळ पुढे जाण्याचा निर्णय घेतलेला आहे की, या ठिकाणी आपण जो कक्ष स्थापन केलेला आहे तो केवळ नोंदणी करण्याकरिताच नाही तर नोंदणी केल्यानंतर आपण ज्या लाभार्थ्यांची नोंदणी करीत आहोत त्यांना लाभ मिळाला की, नाही हे पाहणे आणि तो मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात येत आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न माननीय मंत्रिमहोदयांच्या प्रामाणिकपणाचा नसून सरकारच्या इच्छाशक्तीचा आहे. आम्ही जेव्हा प्रश्न विचारतो तेव्हा सभागृहात शासन जर इच्छाशक्ती घेऊन येत नसेल आणि केवळ सहानुभूतीची भाषणे देणार असेल तर त्यातून समाधान होणार नाही. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या प्रामाणिकपणाबद्दल आणि तळमळीबद्दल शंका व्यक्त करीत नाही पण जवळपास दहा वर्षे महाराष्ट्र शासन टोलवाटोलवी करीत आहे. गिरणी कामगार उद्ध्वस्त झाला. 1 जानेवारी, 2000 या तारखेला किती गिरणी कामगार होते ? गिरण्यांच्या जमिनीवर जो पुनर्विकास होणार आहे त्या पुनर्विकासाच्या नियमांमध्येच शासन दुरुस्ती करणार काय ? जे कुशल कामगार लागतात त्यासाठी गेल्या दहा वर्षामध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना तयार करण्यासाठी कोणती यंत्रणा राबविली ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, व्यक्ती म्हणून सन्माननीय सदस्यांनी माझ्याबद्दल आदर व्यक्त केला परंतु शासन म्हणून माझ्या भावनेबद्दल त्यांनी संशय व्यक्त केला ही बाब अन्यायकारक आहे. सन 2000 साली किती कामगार होते असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. त्याबाबतीत थोडी मतमतांतरे आहेत. यामध्ये कामगार नक्की कोणाला ठरवावा याची व्याख्या करण्याचा निर्णय नक्की झाला आहे. ज्या कामगार संघटना आहे त्यांच्या कडून माहिती घेतली तर दोन ते अडीच लाख कामगार आहेत असे ते सांगतात. परंतु आज आपल्याकडे जी

...3...

ता. प्र. क्र. 4037 ... श्री. भास्कर जाधव ....

माहिती आहे त्याप्रमाणे साधारणपणे 68 हजार कामगार आहेत असे सांगितले जाते. या सगळ्यातून मार्ग काढण्याकरिता राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे आणि सबकमिटी म्हणून नगरविकास विभागाचे सचिव नंबर 1 यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. त्याची पहिली बैठक सुध्दा झालेली आहे. सभापती महोदय, यासंदर्भात मी सुध्दा जातीने लक्ष ठेऊन राहणार आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

श्री सय्यद जमा : माननीय सभापति जी, माननीय मंत्री महोदय की संवेदनशीलता की तारीफ करते हुए मैं दो प्रश्न माननीय मंत्री महोदय से पूछना चाहता हूं. मेरा पहला प्रश्न यह है कि 1.1.2000 तक जो कामगार काम पर थे उन्होंने या उनके डिपेंडेंट लोगों ने जो रजिस्ट्रेशन कराया है उनकी संख्या 16512 है. और उनमें से सिर्फ 262 लोग ही एलिजीबल मिले. मिल मजदूरों के परिवारों के इतने कम लोग एलिजीबल होने की बात शक के दायरे में आती है. इसलिए मुझे पूछना है कि यह छाननी किस तरह से की गयी है. मेरा दूसरा प्रश्न यह है कि इतने सालों से वहां पर बेरोजगारी की समस्या होने के बाद भी अभी तक वहां पर एक भी आदमी को रोजगार या स्वयं रोजगार नहीं मिल पाया है. अभी आपने कहा कि उस बारे में आप माननीय मुख्यमंत्री जी से बात करेंगे. लेकिन मुझे पूछना है कि उस बारे में हमारे श्रम विभाग का क्या रोल है ? अब तक श्रम विभाग वहां क्या कर रहा था. ऐसा लगता है कि हमारा श्रम विभाग इस बारे में संवेदनशील नहीं है. उन लोगों को रोजगार दिलाने के लिए या स्वंय रोजगार दिलाने के लिए श्रम विभाग ने कोई कदम ही नहीं उठाया है. इसलिए मैं पूछना चाहता हूं कि उन लोगों को रोजगार दिलाने के लिए या स्वयं रोजगार दिलाने के लिए क्या माननीय मंत्री महोदय एक समयबद्ध कार्यक्रम की घोषणा करेंगे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाच्यावतीने सेवायोजन कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. त्यामध्ये 16512 लोकांची नोंदणी झालेली आहे असे मी मघाशी सांगितले आहे. परंतु जे संबंधित विकासक आहेत किंवा जे व्यावसायिक आहेत त्यांच्याकडून ज्या प्रकारचे कामगार पाहिजेत आहेत त्यामध्ये एकूण 264 कामगार पात्र ठरले. परंतु 16,512 पैकी केवळ 264 पात्र ठरले व बाकीचे अपात्र ठरले असे होणार नाही. उर्वरित उमेदवार सुध्दा कसे पात्र होतील यादृष्टीने हा विभाग काम करील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय यांनी गेल्या 10 वर्षामध्ये कोणत्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध झाला नाही किंवा 262 कामगारांची मुले पात्र ठरली आहेत असे सांगितले आहे. यासंबंधी ज्या अधिका-यांनी हलगर्जीपणा केला त्या अधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ते सांगावे. या अधिका-यांना हा धडा शिकविणे आवश्यक आहे. असा माझा आग्रही प्रश्न आहे. अन्यथा, पुढील 10 वर्षामध्ये यासाठी जातील.

...2

श्री.भास्कर जाधव : या प्रश्नाच्या माध्यमातून थोडेसे अधिक खोलात जात असताना काही गोष्टी माझ्यासमोर आल्या आहेत. यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून शासन प्रयत्न करीत आहे. यासंबंधी जो निर्णय झालेला आहे त्यासंबंधी कोणावर जबाबदारी दिली होती त्याचा अभ्यास केला जाईल. तोपर्यंत यावर भाष्य करणे बरोबर होणार नाही.

...3

ता.पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागेच्या दत्त घाट, महाद्वार घाट, कुंभार घाट आदि प्रमुख घाटांची झालेली दुरवस्था

(५) * ३२०९ श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.संजय दत्त , प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील चंद्रभागेच्या दत्त घाट, महाद्वार घाट, कुंभार घाट आदी प्रमूख घाटांची अतिशय दुरावस्था झाल्याचे माहे दिनांक २३ नोव्हेंबर, २००९ च्या सुमारास निदर्शनास आले आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चंद्रभागेच्या दत्त घाट सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (१) व (२) दत्त घाट, महाद्वार घाट, कुंभार घाट हे तीनघाट सुस्थितीत आहेत. मात्र काही इतर घाटांची दुरावस्था झालेली आहे. पंढरपूर विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या विकास कामांमध्ये दुरावस्था झालेल्या घाटांच्या दुरुस्तीच्या कामाचा समावेश करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पंढरपूर विकासाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. दत्त घाटासंबंधी पंढरपूरचे नगराध्यक्ष व प्राधिकरणाचे सदस्य यांनी या विषयाच्या संदर्भात असा आरोप केलेला आहे की, या प्राधिकरणाची अद्याप नियमावली तयार केलेली नाही. तथापि, लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "पंढरपूर विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणा-या विकास कामांमध्ये दुरवस्था झालेल्या घाटांच्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश करण्यात येत आहे." तेथील नगराध्यक्षांनी असे म्हटले आहे की, शासनाने प्राधिकरणाच्या कामासाठी एका पैशाची सुध्दा तरतूद केलेली नाही. प्राधिकरणाने उद्घाटनाचे काम केले असले तरी पंढरपूर नगरपालिकेने ही कामे केलेली आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

माझा प्रश्न असा आहे की, या घाटाच्या दुरुस्तीसाठी प्राधिकरणामार्फत किती तरतूद करण्यात आलेली आहे ?

श्री. भास्कर जाधव : प्रश्नकर्त्यांनी वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारे प्रश्न विचारला असावा असे मला वाटते. घाटाच्या दुरुस्तीसाठी किती पैसे दिलेले आहेत, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. हे दोन वेगवेगळे विषय आहेत. एकूण 11 घाट आहेत. ज्या घाटांबद्दल प्रश्न विचारला आहे ते घाट सुस्थितीत आहेत आणि बाकीचे खराब झालेले आहेत. तरतुदीच्या बाबतीत सांगायचे झाले तर शासनाने तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार केला होता. तो 101 कोटीचा होता. तो आता 123 कोटीवर गेला आहे. त्या संदर्भात शासनाने 38 कोटी रुपये दिले. आजच्या दिवसापर्यन्त 17 कोटी 21 लाख रुपये खर्च झालेला आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज जन्मचतु:शताब्दी आराखडा तयार केला आहे. तो 434 कोटी 75 लाख रु. चा आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बजेटमध्ये शासनाने 140 कोटीची तरतूद केलेली आहे. ते पैसे विभागीय आयुक्तांकडे जमा झालेले आहेत. त्यामुळे शासनाने एकही पैसे दिला नाही असे म्हणणे उचित नाही.

डॉ. नीलम गो-हे : पावसाळयाआधी हे काम पूर्ण होईल काय ?

श्री. संजय दत्त : पंढरपूर विकास प्राधिकरणाच्या आराखडयात इतर कोणकोणत्या कामांचा समावेश करण्यात आलेला आहे ?

श्री. भास्कर जाधव : हा 434 कोटी 75 लाख रु.चा आराखडा आहे. पंढरपूर शहर आणि शहराच्या परिसरातील 10 कि.मी.चा परिसर असा एकत्रितपणे प्लॅन करण्याचे काम सुरु आहे. हा आराखडा लहान नाही. नगरोत्थान कार्यक्रमामध्ये पंढरपूर शहर घेतलेले आहे. कोणकोणत्या कामांचा यामध्ये समावेश आहे याची माहिती आता माझ्याकडे नसली तरी हा विषय फार मोठा आहे.

प्रा. सुरेश नवले : 3 घाट सुस्थितीत आहेत. उर्वरित घाटांची दुरवस्था आहे. दुरवस्था असलेले घाट किती आणि त्यांची नांवे काय आहेत ?

....2..

(ता.प्र.क्र. 3209....

श्री. भास्कर जाधव : एकूण 11 घाट आहेत. पहिल्यांदा सुस्थितीत असलेल्या घाटांची नांवे सांगतो. 1) दत्त घाट 2) महाद्वार घाट आणि 3) कुंभार घाट, हे घाट सुस्थितीत आहेत. वडार घाट, उद्धव घाट, दत्त घाट, राम मंदिर घाट, स्मशानभूमी घाट, चंद्रभागा घाट, शिस्ते घाट, हे घाट दुरवस्थेत आहेत.

..3..

ठाणे जिल्ह्यातील सुनितादेवी सिंघानिया इस्पितळाच्या जागेच्या आरक्षणात परस्पर बदल करण्यात येत असल्याबाबत

(६) * ५१३१ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यु. ज़मा : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सुनितादेवी सिंघानिया इस्पितळाच्या जागेवरील रुग्णालय हे आरक्षण बदलून त्यावर सुनितादेवी सिंघानिया शाळा असे नवे आरक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेले अनेक वेळा ठाण्यातील नागरिकांनी व स्वयंसेवी संस्थानी सदर बंद पडलेले रुग्णालय पुन्हा सुरु करण्याची वारंवार मागणी सिंघानिया समुहाकडे करुनही त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याठिकाणी शाळेऐवजी सुपरस्पेशालीटी रुग्णालय होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

श्री. भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता : (१), (२), (३), (४) व (५) स.क्र.१२५ ब (१), १२६ व (१) ते १२६ ब (४) मौजे पाचपाखाडी या भूखंडावर मे.रेमण्ड लि.यांनी उक्त जमिनीचा वापर बदलून सदर क्षेत्र शैक्षणिक वापर म्हणून श्रीमती सुनितादेवी सिंघानिया स्कुलसाठी दर्शविणेबाबत शासनास विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २५/५/२००४ रोजी ठाणे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अन्वये ६० दिवसांचे आत फेरबदलाची कार्यवाही करण्याचे निदेश दिले होते. उपरोक्त कालावधीत महानगरपालिकेने उक्त फेरबदल करण्याची कार्यवाही केली नसल्यामुळे शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१अ) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारानुसार फेरबदल प्रस्तावित करुन आम जनतेकडून सुचना हरकती मागविण्याची नोटीस दिनांक १४/३/२००६ रोजी प्रसिद्ध केली होती. सदर फेरबदलाबाबत मागविलेल्या सुचना हरकतींवर विहित मुदतीत एकही सुचना हरकत शासनास प्राप्त न झाल्यामुळे शासनाने संचालक नगर रचना, पुणे यांचेशी सल्ला मसलत करुन उक्त फेरबदलास कलम ३७ (२) अन्वये दिनांक २५/७/२००६ रोजी अंतिम मान्यता दिली आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : ठाणे येथील सिंघानिया ग्रुपचे हॉस्पिटल मोठे होते. दुर्दैवाने स्वर्गीय आनंद दीघे यांच्या मृत्यू नंतर शिवसैनिकांच्या भावना तीव्र झाल्यानंतर या हॉस्पिटलची मोडतोड झाली. हॉस्पिटल बंद झाले. त्यानंतर सिंघानिया ग्रुपने महानगरपालिकेला विनंती करुन या जागेचे आरक्षण बदलून ते शाळेसाठी केले. या बाबतीत महानगरपालिकेने ठराव केलेला नाही. हा प्रस्ताव परस्पर सरकारकडे आला आणि सरकारने हे आरक्षण बदलले. गॅझेटमध्ये जे उत्तर आलेले आहे त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, स्थानिक सर्तमानपत्राला जे नियम लागू

आहेत ते एशिअन न्यूज या वर्तमानपत्राला लागू आहेत. परंतु एशिअन न्यूज हे स्थानिक वर्तमानपत्र नाही. हे आरक्षण बदलल्यामुळे स्थानिक आणि सर्वसामान्य लोकांचे नुकसान झालेले आहे. त्याठिकाणी हॉस्पिटलची गरज आहे.

...नंतर श्री. भोगले...

श्री.जयप्रकाश छाजेड..... ता.प्र.क्र.५१३१...

सभापती महोदय, शासनाने मंजुरी दिलेली नसताना महापालिकेकडून परवानगी देण्यात आली. फेरप्रस्ताव महापालिकेकडून मागविण्यात येईल काय? याच समुहाची त्या परिसरात १ कि.मी. आत शाळा आहे. त्यामुळे शाळा ही गरज नसून हॉस्पिटलची गरज आहे. याचा गांभीर्याने विचार केला जाईल काय? शासन स्वत: जागा संपादित करुन तेथे हॉस्पिटल सुरु करणार का?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, २००१ साली कै.आनंद दिघे यांच्या दु:खद निधनानंतर जो काही उद्रेक झाला त्यातून सिंघानिया हॉस्पिटलचे नुकसान करण्यात आले. तेव्हापासून हे हॉस्पिटल बंद आहे. ही गोष्ट खरी आहे की, हॉस्पिटल बंद पडल्यानंतर सिंघानिया समुहाने पुन्हा हॉस्पिटल सुरु करायचे नाही असा निर्णय घेतला. सामाजिक बांधिलकी म्हणून आम्हाला समाजकार्य करावयाचे आहे त्यासाठी आम्हाला शाळा सुरु करायची आहे अशी त्या समुहाने मागणी केली. शासनाने त्या संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३७(१अ) नुसार मान्यता दिली. त्यासाठी ६० दिवसांची नोटीस देण्यात आली. त्यानंतर कलम ३७(१) अन्वये प्रस्ताव आला. त्याबाबत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. कलम ३७(२) नुसार मान्यता देण्यात आली. पुन्हा महापालिकेकडून प्रस्ताव मागविणे शक्य होईल असे वाटत नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आजूबाजूला शाळा आहे. आजूबाजूला शाळा आहे तशाच पध्दतीने त्या भागामध्ये छत्रपती शिवाजी महाराज नावाचे ५०० खाटांचे मोठे रुग्णालय आहे. ठाण्यामध्ये खाजगी व अतिशय चांगल्या प्रकारची ३२७ रुग्णालये आहेत. आरोग्य सेवा ही देखील सामाजिक सेवा आहे तशी शिक्षण देणे ही सुध्दा सामाजिक सेवा आहे. सेवा या भावनेतूनच सामाजिक सेवेचे काम केले जाते म्हणून यामध्ये बदल करणे अवघड आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, यामध्ये काही बदल होणार नाही हे मान्य आहे. यापूर्वी कलम ३७ चे अधिकार हे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे होते. २००४-०५ मध्ये शासनाने कलम ३७(१) अन्वये "मायनर" शब्द वगळून या कलमाचे अधिकार आपल्याकडे सुरक्षित ठेवले. महानगरपालिकांना फक्त ६० दिवसांची मुदत देऊन हे अधिकार शासनाने आपल्याकडे ठेवले. अशा परिस्थितीत त्यांच्याकडे कोणत्याही हरकती व सूचना पोहोचत नाहीत. कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रॉपर संधी देणार आहात का?

...२..

ता.प्र.क्र.५१३१.....

श्री.भास्कर जाधव : हा एकच विषय आहे. त्यांचे इतर सर्व अधिकार त्यांच्याकडे अबाधित आहेत.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, सिंघानिया समुहाला सामाजिक भान आहे. त्यांची शाळा सुरु करण्याची इच्छा आहे. मग ही शाळा मराठी माध्यमाची सुरु करुन त्यांच्याच पैशातून मुलांना मोफत शिक्षण दिले जाईल का? असे करायला शासन त्यांना भाग पाडणार आहे का? त्यांच्या संवेदनांना जागृती आणणार का?

श्री.भास्कर जाधव : याच समुहाची तेथे एक शाळा आहे आणि ती अत्यंत दर्जेदार शाळा आहे. कोणतेही डोनेशन न घेता ते शाळा चालवित आहेत.

..३...

भाईंदर (जि.ठाणे) एस.टी.बस स्थानकाचे काम अनेक वर्षांपासून बंद असल्याबाबत.

(७) * ३१८९ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.चरणसिंग सप्रा : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) भाईंदर (जि.ठाणे) एस.टी.बस स्थानकाचे काम अनेक वर्षांपासून बंद आहे हे खरे आहे काय?

२) असल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिका एस.टी.आरक्षण क्र.५७ चा भूखंड, ४.९० हेक्टर हया स्थानकांच्या जागेवरती भराव टाकून कुंपण ही बांधण्यात आले आहे हे ही खरे आहे काय?

३) असल्यास, एस.टी.स्थानक सुरु करण्यासाठी कोणतीही कारवाई करण्यात येत नाही हे ही खरे आहे काय?

४) नसल्यास, एस.टी स्थानक सुरु करण्यास विलंब का होत आहे?

श्री.गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे- पाटील यांच्याकरिता : (१) व (२) हे खरे नाही.

भाईंदर जिल्हा ठाणे येथील राज्य परिवहन महामंडळाने संपादीत केलेल्या जागेचे क्षेत्रफळ सुमारे २.४२ हेक्टर एवढे असून संपूर्ण जागेवर कुंपण भिंत घातलेली आहे. उर्वरीत ०.३० हेक्टर जागेचे भरणीकरण करण्यात आले आहे. सदर जागेवर बस स्थानकांचे काम सुरु करण्यात आले नाही वा सद्यस्थितीत प्रस्तावित नाही.

(३) व (४)

सध्या भाईंदर येथील राज्य परिवहन वाहतूक भाईंदर महानगरपालिकेने बांधलेल्या स्थानकावर सुरु आहे. सदर बसस्थानकाची जागा नागरिकांना वाहतुकीच्या दृष्टीने सोयीची आहे. राज्य परिवहन महामंडळाने बसस्थानकासाठी संपादित केलेली जागा रेल्वेस्थ्ांनकापासून सुमारे ५०० ते ६०० मी. अंतरावर असल्याने तुलनात्मकरित्या नागरिकांसाठी सोयीची होत नाही. त्यामुळे राज्य परिवहन जागेत बसस्थानक बांधणे सद्यस्थितीत प्रस्तावीत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, राज्य परिवहन महामंडळाने त्याठिकाणी 2.42 हेक्टर जागा संपादित केली असून त्यापैकी फक्त 0.30 हेक्टर जागेवर भरणा करण्याचे काम केले आहे. उर्वरित जागेला कंपाऊंड वॉल घातले आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की,सध्या भाईंदर येथील राज्य परिवहन वाहतूक भाईंदर महानगरपालिकेने बांधलेल्या स्थानकावर सुरु आहे. सदर जागा रेल्वे स्थानकापासून 500-600 मीटर अंतरावर असल्यामुळे लोकांना सोयीस्कर नाही. सदर जागा रेल्वे स्टेशनसमोर असून महामंडळाने संपादित केलेली आहे. जागेवर कंपाऊंड भिंत घातली आहे. असे असताना आतापर्यंत तेथे डेपो का सुरु केला नाही? हा डेपो केव्हा सुरु करणार आहात?

नंतर 2सी.1...

ता. प्र. क्र. 3189.....

श्री. गुलाबराव देवकर : सध्या जे बस स्थानक आहे ते महापालिकेच्या जागेत असून आतापर्यंत महामंडळाची परिस्थिती बरी नसल्यामुळे हे बस स्थानक बांधण्यास उशिर झालेला आहे. परंतु ही जागा महामंडळाच्या बस स्थानकासाठी कमी पडत असल्यामुळे नवीन जागेत हे बस स्थानक बांधण्याबाबतचा प्रस्ताव सादर करुन त्या अनुषंगाने कार्यवाही चालू केली आहे.

श्री. मुजफ्फर हुसैन : महोदय, ही जागा महामंडळाच ताब्यात आहे परंतु ज्या ठिकाणी महानगरपालिकेची बस सेवा सुरु आहे तेथेच एस.टी. ची सेवा सुध्दा सुरु आहे पण जागा कमी असल्यामुळे तेथे रहदारीला मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होते व नागरिकांना त्रा ास होतो. म्हणून शासन नवी बस स्थानकाचे काम किती दिवसात करणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, हे काम लवकरात लवकर सुरु करण्यात येईल.

मुंबईतील माटुंगा व सांताक्रुझ येथे जलवाहिन्या फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले असल्याबाबत

(8) * 3761 **ॲड.अनिल परब, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम, डॉ.निलम गोऱ्हे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील माटुंगा व सांताक्रुझ येथील दिनांक 31 जानेवारी, 2010 रोजी वा त्यासुमारास जलवाहिन्या फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त जलवाहिन्या एमएमआरडीए ने केलेल्या खोदकामामुळे फूटल्या, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, या प्रकरणी नेमकी वस्तुस्थिती काय आहे,

(5) त्यानुसार मुळातच पाणीटंचाई असतांना पाण्याचा अपव्यय होण्यास जबाबदार असलेल्यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे?

श्री. भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता :(1),(2),(4) व (5) माटुंगा येथे जलवाहिनीची गळती झाल्यामुळे व सांताक्रुझ येथील जलवाहिनी एमएमआरडीए मार्फत घेण्यात आलेल्या विकास कामासाठीचे खोदकाम करीत असताना फुटली. माटुंगा येथील जलवाहिनीची गळती झाल्याचे निदर्शनास आल्यावर ती महानगरपालिकेमार्फत शोधून दुरुस्त करण्यात आली.

सांताक्रुझ येथे एमएमआरडीएच्या कंत्राटदाराकडून स्काय वॉकचे काम करताना तेथील जलवाहिनी फुटली. सदर कंत्राटदाराने महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता स्वत:चे अधिकारात काम केल्यामुळे सदर घटना घडली. याबाबत महानगरपालिकेने संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवला असून या घटनेमुळे पाणी वाया गेल्यामुळे त्यांच्याकडून देय होणाऱ्या नुकसानाची भरपाई देण्याची मागणी केलेली आहे.

ॲड. अनिल परब : महोदय, मुंबईत पाण्याची टंचाई तीव्र स्वरुपात असताना अशा प्रकारे अनेक वेळा जलवाहिन्या फुटतात आणि दुसऱ्या बाजूला एमएमआरडीए कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता काम करीत असते म्हणून देखील अशा अनेक वेळा जलवाहिन्या फुटलेल्या आहेत. याचाच फायदा घेऊन पाण्याची चोरी करणारे, टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्या अनेक टोळ्या सुध्दा मुंबईत कार्यरत आहेत. म्हणून विनापरवानगी काम करणाऱ्या एमएमआरडीए सारख्या संस्था अथवा अन्य ऑथॉरिटीज असतील त्यांच्या बाबतीत, ज्याप्रमाणे केंद्रशासनाने वीज चोरीसंबंधीचा कडक कायदा केलेला आहे त्याच धर्तीवर पाणी चोरणाऱ्या टोळ्यांच्या बाबतीत कडक कारवाई करण्यासाठी शासन असा कायदा करणार काय ?

....3..

ता. प्र. क्र. 3761.....

श्री. भास्कर जाधव : महोदय, मागील वेळेस सभागृहात अशाच प्रकारचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्याला उत्तर देताना अशा प्रकारचे कोणतेही काम करताना किंवा केबल वगैरे टाकत असताना महापालिकेला विश्वासात न घेता परस्पर काम केले जाते परंतु नंतर मात्र नागरी सुविधा देण्याचे काम महापालिकेला करावे लागते. म्हणून एमएमआरडीए असेल किंवा कोणतीही ऑथॉरिटी असेल अथवा डेव्हलपर्स असतील अशा सर्वांना सक्त ताकीद देण्यात आली असल्याचे मी सांगितले होते. तसेच या अनुषंगाने कारवाई सुरु झालेली आहे. काही दिवसापूर्वी तर आपण त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हेही दाखल केले आहेत. त्यातून जवळपास 4.30 लाखाची वसुली करण्यात आली असून आजतागायत आपण 1 कोटीपर्यंत नुकसान भरपाई अशा विविध एजन्सीजकडून वसूल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय नुकताच घेतला असून यापूढे ज्या एजन्सीज असे काम करीत असतील त्यांच्याकडून अशी रक्कम बिलातूनच वळती करुन घेण्यात येईल, असेही आपण ठरविलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, सांताक्रूझ येथे स्काय वॉकचे काम करताना ही जलवाहिनी फुटली असल्याचे येथे म्हटले आहे. या ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ? तसेच ही जलवाहिनी फुटल्यानंतर पाणी वाहून जाण्याचे लवकर थांबले कारण त्या ठिकाणीच व्हॉल्व्ह आहे. अन्यथा लाखो लिटर पाणी वाया गेले असते. म्हणून अशा प्रकारचे व्हॉल्व्ह ठिकठिकाणी बसविण्याची व्यवस्था शासन करणार काय ? जेणेकरुन भविष्यात सुध्दा असे प्रकार झाले तरी पाणी वाया जाणार नाही.

श्री. भास्कर जाधव : महोदय, वीज चोरीच्या संदर्भात जो केंद्राने कायदा केलेला आहे त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, खालच्या सभागृहात मुंबईसंबंधीची चर्चा सुरु असल्याने माननीय मुख्यमंत्री त्यासंदर्भातील निर्णय तेथे सांगतीलच. तसेच एमएमआरडीए अथवा कोणत्याही संस्थेकडून असे नुकसान झाले तरी त्याचा गुन्हा दाखल करुन नुकसान भरपाई आपण घेत असतो. त्याप्रमाणे या ठेकेदाराविरुध्द देखील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

....4...

राज्य एस.टी.महामंडळामधील हंगामी वेतनश्रेणीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अद्याप सेवेत कायम न केल्याबाबत

(9) * 3288 **श्री.हेमंत टकले, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.अरुण गुजराथी** : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात एस.टी.महामंडळामध्ये सुमारे 5 ते 10 वर्षापासून हंगामी वेतनश्रेणीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अद्याप सेवेत कायम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : महोदय, उत्तरात हंगामी वेतनश्रेणीवर काम करणाऱ्यांना कायम सेवेत घेण्यात आले काय, याला उत्तर देताना "हे खरे नाही" म्हणून सांगण्यात आले आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत एस.टी.कडे हंगामी वेतनश्रेणीवर काम करणारे किती कामगार आहेत ? तसेच त्यांना कायम करण्याबाबत शासनाची कोणती योजना आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

ता.प्र.क्र. :3782.....

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, एस.टी. महामंडळामध्ये 5619 कर्मचारी तात्पुरत्या समय वेतन श्रेणीवर असून एस.टी. महामंडळामध्ये आता हंगामी वेतन श्रेणीवर एकही कर्मचारी कामावर नाही. एस.टी. महामंडळामध्ये सुरुवातीला कर्मचा-यांना तात्पुरत्या वेतनश्रेणीवर घेतले जाते. जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यामध्ये हंगामाच्या दिवसात 95 टक्क्यापर्यंत कर्मचा-यांना आरक्षणानुसार रिक्त पदावर सामावून घेतले जात असते. मुंबई शहरात या पध्दतीने 258 कर्मचारी शिल्लक राहिले होते त्यांना कालच कायमस्वरुपी पध्दतीने कामावर सामावून घेण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता एस.टी.महामंडळात कोणताही कर्मचारी हंगामी पध्दतीने शिल्लक राहिलेला नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, तात्पुरती वेतनश्रेणी आणि हंगामी वेतन श्रेणी यातील फरक काय? महामंडळात कनिष्ठ कर्मचारी किती आहेत व किती वर्षापासून हे कर्मचारी काम करीत आहेत?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, एस.टी.महामंडळात 5619 कर्मचारी हे तात्पुरत्या समय वेतन श्रेणीवर असून त्यापैकी 2434 कर्मचारी हे 3 वर्षापासून काम करीत आहेत. पध्दत अशी आहे की, जे तात्पुरते कर्मचारी असतात त्यांना कनिष्ठ वेतन श्रेणीवर सुरुवातीला कामावर घेतले जाते व त्यांना गणवेष भत्ता, धुलाई भत्ता, वैद्यकीय भत्ते असे भत्ते दिले जात असतात. पाच वर्ष त्यांची सेवा पूर्ण झाल्यानंतर त्यांना वरच्या श्रेणीमध्ये कायमस्वरुपी घेतले जाते. एस.टी. महामंडळात हंगामी कर्मचारी म्हणून एकही कर्मचारी कार्यरत नाही. एस.टी. महामंडळातील कर्मचारी आता कनिष्ठ वेतन श्रेणी आणि हंगामी वेतन श्रेणीवर काम करीत आहेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, तात्पुरत्या समय वेतन श्रेणीवर 5619 कर्मचारी एस.टी. महामंडळात काम करीत आहेत असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले आहे. त्यामुळे या कर्मचा-यांची नेमणूक आपण किती वर्षापर्यंत दिलेली आहे ? या कर्मचा-यांचा कालावधी संपल्यानंतर या कर्मचा-यांना कामावरुन काढून टाकले जाणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सुरुवातीला कर्मचा-यांना कनिष्ठ वेतन श्रेणीवर घेतले जाते व त्यांची सेवा पाच वर्षाची झाल्यानंतर या कर्मचा-यांना वरच्या श्रेणीमध्ये कायमस्वरुपी केले जाते व यामध्ये कोणत्याही कर्मचा-याला कमी केले जात नाही.

सभापती :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. ...2...

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, "अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) वीज वाहिन्यांकडे महावितरणाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 42793 ला दिनांक 21 जुलै, 2008 रोजी सभागृहात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती छापावी.)

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, "नागपूर जिल्हयातील काही गावात विद्युत बिलाचा भरणा न केल्यामुळे पूर्वसूचना न देता शेतक-यांच्या कृषी पंपाचा विद्युत पुरवठा खंडित केल्याची घटना" या विषयावरील सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व श्री. अशोक मानकर, माजी वि.प.स.यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 52459 ला दिनांक 11 जून, 2009 रोजी सभागृहात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटालावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती छापावी.)

पृ.शी./मु.शी.: सभागृहाच्या विशेषाधिकार भंगाबद्दल श्री. मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक रुग्णालय, मुंबई यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून ताकीद देणे.

सभापती : आता श्री.मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक रुग्णालय, मुंबई यांना सभागृहाच्या विशेषाधिकार भंगाबद्दल सभागृहाच्या न्यायासनासमारे बोलविण्यात येऊन ताकीद देण्यात येणार आहे. या निमित्ताने मी सदस्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, अशा प्रसंगी सभागृहाची भूमिका न्यायालयाची असते. त्यामुळे अशा प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन सभागृहात संपूर्ण शांतता असणे अत्यावश्यक आहे. मी आता सुरक्षा प्रमुखांना श्री.मनेश मसंद यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर हजर करण्याची आज्ञा देतो.

(श्री. मनेश मसंद सभागृहाच्या न्यायासनासमोर हजर झाल्यानंतर)

यानंतर श्री.भारवि.....

सभापती : मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इत्यादी धर्मादाय रूग्णालयांच्या तपासणी संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद सदस्यांच्या तदर्थ समितीने दिनांक 16 जानेवारी 2008 रोजी जसलोक हॉस्पिटलला भेट देऊन रूग्णांचे रेकॉर्ड मागितले असता, श्री मनेश मसंद आपण समितीस रेकॉर्ड देण्यास नकार दिल्यामुळे तसेच समिती सदस्यांशी दुरूत्तरे व गैरवर्तन केल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा, तदर्थ समितीचा व पर्यायाने सभागृहाचा विशेषाधिकार भंग आणि अवमान केल्याबाबत सभागृहाने आपणास दोषी ठरविले आहे. समितीच्या कामकाजात ही अत्यंत खेदजनक बाब आहे. म्हणून आपण केलेल्या अपराधाबद्दल मी या सभागृहाच्या वतीने आपणास ताकीद देत असून भविष्यात आपणांकडून असे प्रकार घडल्यास आपण कठोर शिक्षेला पात्र ठराल अशी ताकीद देत आहे.

(ताकीद दिल्यानंतर)

सभापती : सुरक्षा प्रमुखांनी श्री.मनेश मसंद यांना घेऊन जावे.

.....

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी "पेट्रोल-डिझेलचा पुरवठा करणाऱ्या पुण्या शेजारी लोणी काळभोर या ठिकाणी असलेल्या टर्मिनलमधून रोज टँकरमधून भरून जात असताना शेवाळवाडी (पुणे) येथील जकात नाक्यावर होत असलेली पेट्रोल-डिझेलची चोरी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील,कपिल पाटील यांनी "सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड या बँकेचे संचालक श्री.सुरेश दळवी हे विद्यमान संचालक मंडळात खोटे दस्तऐवज तयार करून निवडून आल्याबाबतची तक्रार श्री.प्रविण देसाई यांनी प्रशासनाकडे केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर,परशुराम उपरकर यांनी "महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळातील सुमारे 300 कर्मचारी गेल्या 35 वर्षापासून एकाच पदावर कार्यरत असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "किनारा कोळी सहकारी गृहनिर्माण संथा,खारदांडा कोळीवाडा,खार (प) मुंबई या संस्थेच्या माध्यमातून स्थानिक भूमीपुत्र कोळी रहिवाशांनी सर्वे क्रमांक 308 वरील भूखंड घर बांधणीसाठी मिळावा यासाठी 1994 मध्ये केलेली मागणी,सदर मागणीनुसार महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये कोळी हौसिंगसाठी आरक्षित असणे आणि वरील प्रस्तावास महसूल व वित्त विभागाकडून मान्यता मिळाली असूनही हा भूखंड परस्पर बिल्डर लॉबीला देण्यात होत असलेले प्रयत्न " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता यांनी "राज्यातील किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमातील कर्मचाऱ्यांना पूर्वी त्यांची सेवाखंडित करून नियमित करणे, त्यानंतर त्या कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करण्यात आली असून 1989-90 ला नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून खंड समापित करून आर्थिक लाभ मिळण्याबाबतचे प्रस्ताव सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागीय कार्यालय नागपूर यांच्याकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रीतमकुमार शेगावकर,जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "अनूसूचित जातीच्या मुलामुलींसाठी राज्यात 353 तालुक्यात निवासी शाळा सुरू करण्याची शासनाने केलेली घोषणा, त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधण्याचे शासनाने घोषित करूनही बऱ्याच जिल्ह्यात या धोरणाचे काम ठप्प असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.गायकवाड....

माननीय सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपकर यांनी " सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला व मालवण नगरपालिकेमध्ये घेतलेल्या भुयारी गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने त्याबाबत चौकशी करुन संबंधिताविरुध्द कठोर कारवाई करावी अशी नगरसेवक व तेथील नागरिकांनी केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

पृ. शी. : मुंबई आणि उपनगरातील म्हाडाच्या अतिधोकादायक असलेल्या 35 इमारती

मु. शी. : मुंबई आणि उपनगरातील म्हाडाच्या अतिधोकादायक असलेल्या35 इमारती याबाबत सर्वश्री किरण पावसकर,परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री .किरण पावसकर, परशुराम उपकर. यांनी मुंबई आणि उपनगरातील म्हाडाच्या अतिधोकादायक असलेल्या 35 इमारती या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

-निवेदना नंतर -

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय,मुंबई आणि उपनगरात म्हाडाच्या जवळजवळ 35 इमारती धोकादायक अवस्थेत आहेत. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की," 35 अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतीपैकी 7 इमारतींना पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे व एक इमारतीच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाबाबत त्रृटी आढळल्याने वास्तुशास्त्रज्ञ यांना त्रृटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे."35 इमारतीपैकी 8 इमारतींचा प्रश्न सुटला आहे परंतु उर्वरित 28 इमारतीच्या बाबतीत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे. ? उत्तरामध्ये भाडेकरुची संख्या आणि गाळयांच्या संख्ेचा विचार करता त्यांना धांरावी येथे गाळे देता येतील असे सांगण्यात आलेले आहे प्रत्येक पावसाळयाच्या अगोदर अधिका-याकडून भाडेकरुंना सूचना देण्यात येत असतात परंतु अशा प्रकारे भाडेकरुंची राहण्याची पर्यायी व्यवस्था झाली असती तर युसुफ मंझील आणि रे चेंबर सारख्या इमारती कोसळल्या नसत्या. उर्वरित 27 इमारतीमध्ये राहणा-या भाडेकरुंना धोका पोहोचू नये यासाठी पावसाळयापूर्वी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.सचिन अहिर :सभापती महोदय, एकूण 35 इमारती पैकी 7 इमारतींना ना हरकत प्रमाणपत्र् दिलेले आहे. 70 टक्क्यापेक्षा जास्त भाडेकरुंनी घरमालकाची एन.ओ.सी. घेऊन प्रस्ताव दिला होता अशा सात इमारतीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.एका इमारतीच्या बाबतीत वास्तूशास्त्रज्ञाच्या संदर्भात वाद असल्यामुळे त्यांना प्रमाणपत्र देण्याचे काम प्रलंबित आहे. ॅम्हाडाच्या माध्यमातून सहा इमारतीच्या दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे. तीन इमारतीमध्ये राहणा-या भाडेकरुंनी स्वत: इमारत दुरुस्ती करतो असे सांगितले असल्यामुळे त्यासंदर्भात ना हरकत प्रमाणपत्र मागितलेले आहे. अठरा इमारतीची देखभाल आपल्याला करावयाची आहे. या इमारतीपैकी संपूर्ण इमारत धोकादायक अवस्थेत नाहीत परंतु त्या इमारतीपैकी शौचालयाचा भाग धोकादायक झाल्यानंतर धोकादायक इमारत असल्याचे जाहीर केले जाते.त्या दृष्टीकोनातून या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी निधी देण्यात येत असतो.एवढेच नव्हेतर संबंधित रहिवाशांना निधी भरण्यास सागितले जातें आमदार निधीच्या माध्यमातून वा विधान परिषद सदस्यांच्या निधीच्या माध्यमातून मिळालेल्या पैशातून इमारतीची दुरुस्ती करण्याचे काम केले जाते. इमारत दुरुस्ती

4...

पुनर्रचना मंडळाच्या माध्यमातून वेळोवेळी अशा इमारतीची सर्व्हेक्षण करण्याचे काम केले जाते., स्वत:चे घर असतांनासुध्दा म्हाडाच्या माध्यमातून त्यांना पर्यायी ट्रॅझिट कॅम्पमध्ये राहण्याची सोय केली जाते.अशा प्रकारची योजना महाराष्ट्र राज्यात प्रथमच सुरु केली गेली आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : आज प्रश्नोत्तराच्या यादीतील बाराव्या नंबरचा प्रश्न माझा होता परंतु वेळेच्या अभावी तो येऊ शकला नाही.आय.टी.आय.च्या धर्तीवर सर्व इमारतींचा सर्व्हे केला जाईल काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, इमारतीचे सर्वेक्षण करण्याबाबत अधिका-यांना सागितले जाते परंतु इमारतीमध्ये जाऊन बघू शकतील आणि संपूर्ण इमारत धोकादायक आहे किंवा नाही हे सांगू शकतील यासाठी आपल्याकडे आज कोणतीही टेक्नॉलॉजी उपलब्ध नाही.म्हणून आय.टी.आय.च्या धर्तीवर सर्व्हे करण्याचे ठरविण्यात आले होते. गेल्या वेळी त्यासाठी आर्किटेक्टची नेमणूक करण्यासाठी पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही .स्ट्रक्चरल ऑडिटच्या बाबतीत आय.टी.आय.च्या धर्तीवर असे फेर सर्व्हेक्षणं् करता येईल काय ही बाब तपासून पाहण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,आय.टी.आय.च्या धर्तीवर आपण काही पावले उचलू शकतो परंतु स्ट्रक्चरल ऑडिट केल्यानंतर त्या इमारतीची आजची स्थिती काय आहे यासबंधी माहिती मिळू शकते एक्स रे च्या रिपोर्टसारखा त्या इमारतीचा हा रिपोर्ट असतो म्हणून इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिट संबंधी काही पावले उचलण्यात येणार आहेत काय ?

श्री.साचिन अहिर :सभापती महोदय, राज्य शासनाने नवीन धोरण स्वीकारले असून त्यानुसार प्रत्येक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे क्रमप्राप्त आहे.या इमारतीमध्ये भाडेकरु राहत असल्यामुळे व घरमालक वेगळे असल्यामुळे या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करता आलेले नाही. म्हाडाने या इमारतीची दुरुस्त करण्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत सागितले आहे आहे तशा प्रकारची सूचना सबंधित बोर्डाला दिली जाईल.

नंतर श्री.सरफरे s

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, यह प्रश्न मकान की सुरक्षा के बारे में है. लेकिन मैं मंत्री महोदय का ध्यान एक ओर प्रश्न की ओर खींचना चाहता हूं. दो-तीन दिन पहले 7 साल की एक बच्ची की लिफ्ट में फंस जाने के कारण मृत्यु हो गई. सरकार ने लिफ्ट की सुरक्षा से संबंधित कानून बनाया है. मैं यह जानना चाहता हूं कि जितनी भी सोसायटी है उनको उनकी लिफ्ट का सेफ्टी ऑडिट करने की व्यवस्था करने के लिए लिए क्या शासन की ओर से आदेश दिया जाएगा ? अगर ऐसी व्यवस्था नहीं है तो क्या शासन की ओर से सेफ्टी ऑडिट करने की योजना है ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला असला तरी मी सांगू इच्छितो की, आता आपण नव्याने धोरण तयार करीत आहोत. त्यामध्ये एस.आर.ए. योजनेमधून ज्या इमारती बांधण्यात येणार आहेत, आणि भविष्य काळात म्हाडाच्या ज्या काही इमारती बांधण्यात येणार आहेत. त्याठिकाणी खाजगी विकासक त्या इमारती विकसित करीत असतांना आपण त्यांच्यावर बंधन घालणार आहोत की, त्यांनी किमान दहा वर्षे लिफ्ट मेंटेनन्सची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अनेक वेळा इमारतींची अलॉटमेंट होत नाही, अनेक वेळा रहिवाश्यांमध्ये वाद असल्यामुळे त्या लिफ्टचे मेंटेनन्स होत नाही. सोसायटी फॉर्म होत नाही अशाप्रकारच्या तक्रारी आपल्याकडे येत होत्या. म्हणून भविष्यकाळात किमान दहा वर्षे विकासकांनी लिफ्टचे मेंटेनन्स करावे अशाप्रकारच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात येतील.

पृ. शी. : पूरक पोषण आहार योजनेचे लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित असणे

मु. शी. : पूरक पोषण आहार योजनेचे लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित असणे याबाबत श्री डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुभाष झनक (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "पूरक पोषण आहार योजनेचे लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनामध्ये लाभार्थ्यांची संख्या 58 लाख 61 हजार 648 आहे. आणि योजनेंतर्गत 45 लाख 79 हजार 738 बालकांना आहार मिळतो. त्यांना फक्त 300 दिवस हा पूरक पोषण आहार मिळतो. पहिला प्रश्न असा की, वर्षाचे 365 दिवस असतात त्यापैकी 300 दिवस हा आहार कां दिला जातो? यासाठी एकंदरीत किती निधी अंदाजित केला होता? त्यापैकी प्रत्याक्षात किती निधी खर्च झाला?

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, आय.सी.डी.एस. योजना ही मुळातच केंद्र सरकारची आहे. केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे किमान 300 दिवस बालकांना आहार दिला पाहिजे. राहिलेल्या 65 दिवसांमध्ये दिवाळीच्या सुट्टया, रविवारच्या सुट्टया व इतर सुट्टया असतात. त्यामुळे 300 दिवसांचा आहार दिला जातो. माननीय सदस्यांनी खर्चाच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, यामध्ये केंद्र सरकारचा हिस्सा 196 कोटी 99 लक्ष 98 हजार इतका आहे. आणि राज्याचा हिस्सा 466 कोटी 67 लक्ष 76 हजार इतका आहे. यावर्षीच्या खर्चाचे आकडे प्राप्त झाले नाहीत. अंदाजित खर्चाचे आकडे मे अखेरपर्यंत प्राप्त होतील .

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही नियम 93 अन्वये सूचना देण्यामागील उद्देश असा होता की, बालकांना दिल्या जाणाऱ्या आहाराची क्वॉलिटी ॲश्युरन्स नसते. जो आहार दिला जातो त्यामध्ये 3 प्रकार असतात. एक तर आपण पौष्टिक उपमा 45 ग्रॅम देतो, पौष्टिक सातू 45 ग्रॅम देतो, ब्लेंडेड सुकडी व ब्लेंडेड शिरा 45 ग्रॅम देतो. हे सर्व पदार्थ ठराविक वेस्टनामधून त्यांना द्यावयाचे असतात. हा आहार तयार करण्याचे काम बचत गटाकडे देत असाल तर ते सक्षम आहेत काय? 300 दिवस ही मुले काय घेतात? आणि उरलेले 65 दिवस त्यांना आहार देण्यासाठी आपण केंद्राकडे शिफारस करणार काय?

श्री. सुभाष झनक : निश्चितपणे केंद्र सरकारकडे शिफारस करता येईल. आपण सांगितल्याप्रमाणे महिला बचत गटांना आहार देण्याचे काम दिले जाते. महिला बचत गटाची निवड जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती करते. त्याप्रमाणे त्यांना आपण काम दिले आहे. त्या सक्षम आहेत. केंद्र सरकारने महिला बचत गटांना काम दिले पाहिजे असे सांगितले आहे. कारण ही योजना त्याच्यासाठी आहे.

पृ. शी. : महाराष्ट्र राज्याच्या समुद्र सीमेत "अल सलाम" नावाच्या पांढऱ्या बोटीने केलेला समावेश

मु. शी. : महाराष्ट्र राज्याच्या समुद्र सीमेत "अल सलाम" नावाच्या पांढऱ्या बोटीने केलेला समावेश याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "महाराष्ट्र राज्याच्या समुद्र सीमेत "अल सलाम" नावाच्या पांढऱ्या बोटीने केलेला समावेश" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

(यानंतर सौ.रणदिवे)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दि.29 मार्च 2010 रोजी ही बोट संशयास्पद परिस्थितीमध्ये दिसली. आता या घटनेला जवळजवळ महिना झालेला आहे. यासंबंधात निवेदनामध्ये पाचव्या ओळीमध्ये म्हटलेले आहे की,"चेकपोस्ट वरील पोलिसांना सतर्क करण्यात आले असून वाहन व संशयित व्यक्तींची सखोल तपासणी करण्यात येत आहे." माझा असा प्रश्न आहे की, सतर्कतेच्या सूचना किती कालावधीसाठी देण्यात आल्या आहेत ? दुसरा प्रश्न असा आहे की, तटरक्षक दलाकडून, सागरी सुरक्षा दलाकडून पहाणी केली जाते. पण आजकाल तंत्रज्ञान एवढे विकसित झालेले आहे की, आकाशात हेलिकॉप्टरने गस्त घालून, सातत्याने छायाचित्र घेऊन तेथे येत असलेली बोट संशयास्पद आहे का ? यादृष्टीने तपासणी करणे सहज शक्य आहे. माझा प्रश्न असा आहे की, सध्या तशा प्रकारची तपासणी होत आहे काय ? जर तशा प्रकारची तपासणी होत असेल तर मग ही बोट देखील सापडावयास हवी होती. तेव्हा तशा प्रकारची तपासणी करण्यात येणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपण तशा तऱ्हेची तपासणी करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण हेलिकॉप्टरने देखील तपासणी करतो.सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी माननीय गृहमंत्री उत्तर देत आहेत. आम्हाला माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या माध्यमातून आज खुलासा होणे आवश्यक आहे. काल सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी पुण्याच्या संदर्भात चर्चा सुरु होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी ठाम उत्तर दिले की, पुण्याच्या पोलीस आयुक्तांची बदली करण्यात येईल आणि माननीय गृहमंत्री महोदयांनी मिडियाच्या माध्यमातून असे सांगितले की, "मला त्याची काही कल्पना नाही. मी तपासून पाहीन." म्हणजे हे विपर्यस्त वाटते. कारण ते माननीय मंत्री आहेत. तेव्हा आपण आता जे उत्तर देत आहात, ती बाब माननीय मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित आहे. आपण या सदनामध्ये उत्तर देताना सरकार म्हणून देत असता आणि अशा वेळी ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित आहे की आणखी कोणाच्या अखत्यारित आहे याच्याशी सदनाचा संबंध नसतो. तेव्हा आपण जेव्हा मंत्री म्हणून उत्तर देत आहात, तेव्हा त्याचा निर्णय झालेला आहे असे ठामपणे गृहीत धरले जाते. सभापती महोदय, त्यामुळे आज यासंदर्भातील खुलासा होणे आवश्यक आहे, नाहीतर आम्हाला .....

. . . . 2एच-2

श्री.दिवाकर रावते . . . .

माननीय मंत्री महोदयांकडून उत्तरे घेणे कठीण जाईल आणि आम्हाला या सभागृहामध्ये फक्त माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांचीच उत्तरे स्विकारावी लागतील. कारण तुम्ही प्रामाणिक आहात ना. सभापती महोदय, मी जे सांगितले, त्याबाबतीत आज खुलासा होणे आवश्यक आहे, नाहीतर सदनाचा अवमान झाला म्हणून आजच आम्हाला मुखोद्गत हक्कभंग सूचना मांडावी लागेल. त्यामुळे माननीय सभापतींनी याबाबत निर्देश द्यावेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे, त्याअनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी माहिती सांगावी.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्या अनुषंगाने कालच या सदनाचे नेते आणि आमचे नेते आदरणीय मुख्यमंत्री साहेबांनी याठिकाणी प्रेससमोर निवेदन केलेले आहे की, ते निर्णय घेतील. त्यामुळे आपण आता याठिकाणी जो विषय सुरु होता, त्याबाबत चर्चा करु या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत शब्द दिलेला आहे की, त्यांची बदली करणार असा मॅसेज संपूर्ण महाराष्ट्रभर गेलेला आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, त्याचा खुलासा माननीय मुख्यमंत्रीसाहेब करतील.

सभापती : ठीक आहे. मी त्यांच्याकडून माहिती घेतो. मी सन्माननीय गृहमंत्र्यांकडून याबाबतीत खातरजमा करतो. मघाशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, ज्यावेळेला तटरक्षक दलाकडून हा संदेश प्राप्त झाला आणि आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, याठिकाणी "अल सलाम" नावाच्या बोटीबाबत संदेश मिळताच सागरी किनाऱ्याच्या तटरक्षकांनी, गृहरक्षकांनी, ग्राम सुरक्षा दल यांनी कसून तपासणी सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी हवाई दलामार्फत तपासणी का करण्यात आली नाही ? असा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबतीत सांगावयाचे तर हवाई दलामार्फत तपासणी होत असते आणि तशा प्रकारची कार्यवाही सुरु आहे. परंतु याठिकाणी तपासामध्ये अजून काही निष्पन्न झाले नसून, याबाबत शोध सुरु आहे.

श्री सय्यद ज़मा : सभापती महोदय, यह गंभीर मामला है कि 29 मार्च से "अल सलाम "

. . . .2 एच-3

नाम की बोट समुद्र में दिखाई दी है. मैं यह जानना चाहता हूं कि इस बोट का नाम "अल सलाम " है, यह किसने पढ़ा है और इस नाम से बोट की पहचान किसने की है ? अगर यह नाम पढ़ने के दायरे में था तो नेव्ही, कोस्टगार्ड और पुलिस को यह बोट लोकेट करने के लिए एक महीना क्यों लग रहा है ? यह सुरक्षा में कमी का गंभीर मामला है. क्योंकि यह बोट इधर-उधर घूम रही है, इस बोट से खतरा भी हो सकता है.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, याठिकाणी नियम 93 अन्वये जी सूचना देण्यात आली आहे, त्यामध्ये "महाराष्ट्र राज्याच्या समुद्र सीमेमध्ये "अल कायदा"नावाच्या पांढऱ्या रंगाच्या संशयित बोटीने केलेला प्रवेश"असा विषय आहे. परंतु दि.31-03-2010 रोजी तटरक्षक दलाकडून जो संदेश प्राप्त झालेला आहे, तो असा आहे की,"दि.29-03-2010 रोजी दीव-दमण येथील समुद्राच्या किनाऱ्याजवळ म्हणजे 70 ते 80 कि.मी.अंतरावर समुद्रात "अल सलाम" नावाची संशयित बोट उभी असून त्यामधील व्यक्ती या पाकिस्तानी आहेत." तो संदेश गुप्त वार्ता विभागाच्या माध्यमातून राज्यातील संपूर्ण सागरी किनाऱ्यावरील तटरक्षकांना, गृहरक्षकांना देऊन, त्याठिकाणी दक्षता घेण्यास सांगितले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. रमेश बागवे...

सागरी किनाऱ्याची सुरक्षा नेव्ही, कोस्टलगार्ड आणि पोलीस यांच्या संयुक्त जबाबदारीने केली जाते. सागरी किनाऱ्यावर 5 नॉटिकल मैलापर्यंतची सुरक्षा पोलीस सांभाळतात 5 नॉटिकल ते 12 नॉटिकल मैलापर्यंत कोस्टलगार्ड सुरक्षा सांभाळतात. 12 नॉटिकल ते पुढील सागरी हद्दीपर्यंतची सुरक्षा नेव्ही सांभाळते. अशा तऱ्हेने या हद्दी ठरविलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे सुरक्षा केली जाते. तपास चालू आहे.

श्री दिवाकर रावते : सभापती महोदय, आतंकवादी हल्यानंतर सुरक्षेच्या संदर्भात ही चर्चा चालू आहे. माझ्या मोबाईलवर एक संदेश आलेला आहे. हा संदेश पाठविणारा मोबाईल नंबर 919321205523 आहे. सभापती महोदय, संदेश अत्यंत गंभीर आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून पोलिसांनी याबाबतीत ताबडतोब तपास करावा अशी विनंती करतो. या संदेशात असे म्हटल्ेले आहे की,

" Shocking news, as per Tata Social Science study 89,839 illegal Pakistanis staying in Mumbai."

सभापती महोदय, अशा प्रकारचा संदेश कदाचित अपप्रचार करण्याकरिता आलेला असेल. या नंबरवर मी फोन लावला असता फक्त जयहिंद, जयहिंद एवढेच बोलले जात आहे पुढे काही बोलले जात नाही. तेव्हा अशा प्रकारे पाकिस्तानी राहात आहेत काय हे तपासावे. नसेल तर अशा प्रकारे गैरसमज परसरवण्याचे काम कोणी करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करावी, याकरिता मी मुद्दाम जाणीवपूर्वक हा संदेश याठिकाणी वाचून दाखविलेला आहे.

सभापती : सन्माननीय गृहराज्य मंत्र्यांनी याची नोंद घ्यावी आणि योग्य ती खात्री करुन घ्यावी.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, याची नोंद घेऊन याची दखल घेतली जाईल आणि त्याप्रमाणे सूचना देण्यात येतील.

...2..

पृ. शी. : मुंबईत स्फोटके, केमिकलचे साठे दाखल झाल्याच्या संशयामुळे मुंबई,ठाणे,पुणे येथील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व घबराटीचे वातावरण.

मु. शी. : मुंबईत स्फोटके,केमिकलचे साठे दाखल झाल्याच्या संशयामुळे मुंबई,ठाणे,पुणे येथील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व घबराटीचे वातावरण याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे वि.प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुंबईत स्फोटके,केमिकलचे साठे दाखल झाल्याच्या संशयामुळे मुंबई,ठाणे,पुणे येथील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व घबराटीचे वातावरण या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,या निवेदनामध्ये शासनाने सहजगत्या उत्तर दिलेले आहे. दिल्लीमध्ये संशयास्पद म्हणता येतील असे स्फोट नुकतेच घडले. बेंगलोरमध्ये काही वैज्ञानिकांचा मृत्यू अशा पध्दतीच्या रासायनिक स्फोटकांमुळे झाला आणि चैन्नईमध्ये टाकीमधील पाण्यामधून घातपाताने काही वैज्ञानिकांचा मृत्यू झालेला आहे.मला याठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे की, या केमिकल्सचा स्फोट होऊ नये या दृष्टिकोनातून कोणत्या पध्दतीची दक्षता घेतलेली आहे.? पुणे आणि ठाण्याचा उल्लेख केलेला आहे. जर्मन बेकरीमध्ये झालेल्या स्फोटातील आरोपी अद्याप मिळालेले नाहीत. अशा परिस्थिती पुण्याच्या सुरक्षिततेसाठी शासनाने काय पाऊले उचललेली आहेत?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, बॉम्बस्फोटाच्या संदर्भातील तपास एटीएसच्या माध्यमातून सुरु आहे. देशातील सर्व राज्यातील तपास एटीएसच्या माध्यमातून सुरु आहे. हा तपास अतिरेकी स्फोटाच्या संदर्भात असल्यामुळे याचे गांभीर्य लक्षात घेऊन याबद्दल गोपनीयता पाळणे गरजेचे आहे. सभापती महोदय, तपासाची सूत्रेजोराने सुरु आहेत.

पृ. शी. :वठफळ ता.नेर,जि,यवतमाळ येथे श्री. अनिल महल्ले याला कोरडया विहिरीत टाकून जीवे मारण्याचा घडलेला प्रकार.

मु. शी. :वठफळ ता.नेर,जि.यवतमाळ येथे श्री. अनिल महल्ले याला कोरडया विहिरीत टाकून जीवे मारण्याचा घडलेला प्रकार याबाबत श्री. दिवाकर रावते वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रमेश बागवे(गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. दिवाकर रावते यांनी "वठफळ ता.नेर,जि,यवतमाळ येथे श्री. अनिल महल्ले याला कोरडया विहिरीत टाकून जीवे मारण्याचा घडलेला प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वटफळ ता.नेर जि.यवतमाळ या गावातील तीन आरोपी आहेत. श्री. अनिल महल्ले याला सर्व गावाच्या समक्ष कोरडया विहिरीत टाकण्याकरिता उलटे टांगून ठेवले होते. त्याला विहिरीमध्ये टाकण्याचा व त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. अशा वेळी संपूर्ण गाव तेथे जमा झालले होते. यातून हा सगळा वाद निर्माण झालेला आहे. त्याचवेळी या दोघांच्याही तक्रारी झाल्या. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, भादविस कलम 323,504 आणि 506 हे जामीनपात्र गुन्हे नोंदवले आणि दोघांच्याही तक्रारी नोंदवून घेतल्या. एका बाजूचे आरोपी शिवसैनिक होते आणि दुसऱ्या बाजूचे आरोपी काँग्रेसचे अधिकृत होते. म्हणून पक्ष दबावामुळे ज्याला उलटे टांगण्यात आले होते त्याबाबतीत सर्व गाव साक्षीला होते. तक्रारदार शिवसैनिकांना तेथील पोलीस स्टेशनच्या पी.आय. ने खूप बदडले.

यानंतर श्री. बरवड....

श्री. दिवाकर रावते .....

आणि या आरोंपींनी त्यांना सांगितले की, बघा आम्ही तुम्हाला शिक्षा करुन दाखवली. हा जो सरपंच आहे तो मध्यस्थी म्हणून गेला. त्याने ही भानगड सोडवली पण निवेदनामध्ये जे म्हटले आहे की, रस्त्यामध्ये कुऱ्हाडीने मारले तसे नसून दुसऱ्या दिवशी त्या आरोपीने त्याच्या घरी बोलविले आणि त्या घरामध्ये त्याच्यावर हल्ला करण्यात आला. त्या घरातील जी महिला आहे तिने आमच्या घरामध्ये कशी मारहाण झाली याबाबत साक्ष दिली आहे. हा जो पोलीस अधिकारी आहे त्याने मुळातच कलम 307 च्या गुन्ह्याखाली त्यांना जर अटक केली असती तर हा खूनच झाला नसता असा आक्षेप आहे. हा जो पोलीस अधिकारी आहे त्याने योग्य प्रकारे तक्रार नोंदविली नसल्यामुळे हा खून झालेला आहे त्या पोलीस अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार काय ? हे सर्व घडल्यानंतर अधिकृतरीत्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे 50 हजार रुपये मंजूर झाले असताना साडेसात लाखाचे काम पोलीस स्टेशनमध्ये करुन हा अधिकारी राजेशाही पध्दतीने राहतो. त्यांची त्या पोलीस स्टेशनमधून ताबडतोब बदली करणार काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने संबंधित ठाणेदार श्री. अंबाडकर यांची चौकशी डी.वाय.एस.पी., दारव्हा यांच्या माध्यमातून सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे की, 50 हजार खर्च करण्याचा अधिकार असताना 10 लाख रुपये खर्च केलेला आहे. श्री. ओ. पी. अंबाडकर यांची 31 डिसेंबरला नेर पोलीस स्टेशनला ठाणेदार म्हणून नेमणूक झाली. त्यांनी या काळामध्ये पोलीस स्टेशन दुरुस्ती व देखभाल यासाठी 2009-2010 या आर्थिक वर्षाकरिता शासनाकडून 70 हजार रुपये मंजूर झाले होते. त्यापैकी श्री. अंबाडकर यांनी त्या कार्यकाळात त्या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामासाठी 50 हजार रुपये केले. उपविभागीय सार्वजनिक बांधकाम खात्याकडून त्यांनी काम केल्याचे पत्र दिलेले आहे. 16 एप्रिलच्या पत्र क्रमांक 248 व्दारे तसे कळविले आहे. हा खर्च त्यांनी शासकीय खर्चातूनच केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालावरुन हे स्पष्ट होते की, 10 लाख रुपये खर्च केले यामध्ये

...2...

तथ्य नाही. फक्त त्यांनी 50 हजार रुपयांपर्यंत खर्च केलेला आहे. त्या ठिकाणी त्यांनी एकूण 70 हजार रुपये खर्च केला. त्यांनी 24 हजार रुपयांचा जो अतिरिक्त खर्च केलेला आहे त्याचे मूल्यांकन करुन त्यांनी कोणत्या पैशातून काम केले आहे याबद्दल उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा यांच्या माध्यमातून चौकशी सुरु केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण त्यांना त्याच ठिकाणी ठेवलेले आहे. त्यांच्या बदलीच्या बाबतीत काय कारवाई करणार ? माझे अधिकृत असे म्हणणे आहे की, त्यांनी 7 लाख रुपयांचे काम केले आहे. आपण याची नोंद घेऊन ही बाब चौकशीसाठी पाठवावी. त्यांनी अतिरिक्त काम केल्याचे आपण मान्य केले आहे. त्यांनी 7 लाख रुपयांचे काम केले आहे. त्या ठिकाणी ए.सी. बसविला आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर राजमहाल बांधलेला आहे. आपण ही बाब चौकशीमध्ये तर घ्यावीच पण त्याचेवेळला असा अंमलदार जो बेकायदेशीरपणे काम करतो, त्याने आरोपींना अटक न केल्यामुळे त्याच्या या कृतीमुळे खून झाला आहे, त्याला किमान रजेवर पाठूवन पुन्हा त्या पोलीस स्टेशनमध्ये पाठविणार नाही असे तरी सांगावे. त्यांची आपण बदली करणार काय ? कारण मी स्वत: त्या गावात गेलो होतो. मी स्वत: पाहून आलेलो आहे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, डी.वाय.एस.पी.च्या माध्यमातून त्यांची चौकशी सुरु झालेली आहे. चौकशीचा अहवाल आल्याबरोबर तात्काळ त्यांची बदली करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : त्यांनी अतिरिक्त खर्च केला आहे हे शासनाने मान्य केले आहे. आपण चौकशी करीत आहात. मी अधिकृतपणे सांगत आहे. खून झाला त्या गावात मी स्वत: जाऊन आलो आहे. त्याने सात ते साडेसात लाख रुपये खर्च केले आहेत. त्याने अतिरिक्त खर्च केला आहे हे आपण मान्य करीत आहात. हा प्रश्न पैशाचा आहे. एक अधिकारी बेकायदेशीर काम करतो आपण त्याला निलंबित करणार काय ? मी साधी बदली मागतो त्याबाबत माननीय मंत्रिमहोदय 'होय' असे उत्तर देत नाहीत त्यामुळे मी त्यांच्या निलंबनाची मागणी करतो.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या ठिकाणी आपण जो आकडा सांगत आहात तो नाही.

...3...

श्री. दिवाकर रावते : कोणाचा दबाव आहे हे मला रेकॉर्डवर आणावयाचे नाही. आपण बदलीच्या बाबतीत होय म्हणत नाही त्यामुळे मी निलंबनाची मागणी करतो. काही तरी कारवाई करणार की नाही ? आपण एवढ्या दबावाखाली काम करणार काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, दबावाखाली काम करण्याचा प्रश्न नाही. शासन या ठिकाणी अशा कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालत नाही. त्या ठिकाणी त्यांची चौकशी सुरु केली आहे. त्यांची तात्काळ बदली करण्यात येईल.

पृ. शी. : कोकणात आंबा पिकाची मोठ्या प्रमाणावर होणारी गळ

मु. शी. : कोकणात आंबा पिकाची मोठ्या प्रमाणावर होणारी गळ याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी " कोकणात आंबा पिकाची मोठ्या प्रमाणावर होणारी गळ " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. खंदारे...

श्री.परशुराम उपरकर : माननीय मंत्री महोदयांनी 16 तारखेला सर्व आमदारांची बैठक घेतली आहे. आता अधिवेशनाचे दोन दिवस शिल्लक राहिलेले आहेत. व्हॅट 12 टक्क्यांवरुन 4 टक्क्यावर आणण्याचा निर्णय तातडीने घेणार काय आणि ते या दोन दिवसात जाहीर करणार काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, निवेदनामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भात बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपल्या मनामध्ये अजिबात शंका ठेवू नये.

2...

पृ. शी. : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, पडघा येथील स्टोअर रुममधून 30 लाख किंमतीच्या केबलची चोरी होणे

मु. शी. : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, पडघा येथील स्टोअर रुममधून 30 लाख किंमतीच्या केबलची चोरी होणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.विजय वडेट्टीवार (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, यांनी "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, पडघा येथील स्टोअर रुममधून 30 लाख किंमतीच्या केबलची चोरी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, पडघा, ता.भिवंडी, जिल्हा ठाणे याठिकाणी जवळजवळ 30 लाख रुपये किंमतीची केबल चोरीला गेली आहे. या घटना घडून 7 महिने झालेले आहेत. तरी देखील चोरीचा तपास लागलेला नाही. निवेदनात शासनाने मान्य केलेले आहे की, 30 लाखाची चोरी झालेली आहे. ज्याठिकाणी केबल ठेवली होती तेथे 24 तास सुरक्षा रक्षक नेमलेले होते. असे असताना 30 लाखाची केबल चोरीला जाते. या चोरीच्या प्रकरणात 3 लोकांना निलंबित केले आहे. परंतु त्यांना पुन्हा कामावर घेतले गेले आहे. सुरक्षा रक्षक 24 तास तैनात असताना सुध्दा 30 लाखाच्या किंमतीचा माल चोरीला जातो. त्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणामध्ये तेथील अधिकारीही सामील आहेत काय ? आरोपी सापडत नसतील तर हे प्रकरण सीआयडीकडे सोपविले जाईल काय, कारण हे फार मोठे प्रकरण आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, पडघा येथील विद्युत केंद्राचा विस्तीर्ण परिसर आहे. जवळजवळ 305 एकराचा हा परिसर आहे. एवढया मोठया परिसरात 30 लोक सुरक्षा रक्षक काम करतात. 26 नोव्हेंबर रोजी घटना घडली होती त्यावेळी या विभागाने पोलीस विभागाकडे सिक्युरिटीची मागणी केली होती. यासाठी किमान एसआरपी किंवा सीआरपीचे जवान उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी केलेली आहे. या चोरीच्या प्रकरणासाठी एफआायआर दाखल झालेला आहे. त्याठिकाणी आऊट सोर्सिंगद्वारे मुख्य सुरक्षा रक्षक बलबीरसिंग भामरा यांना नेमले होते. त्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. या लोकांवर एफआयआर दाखल केला आहे. या विभागाचे अधिकारी सातत्याने पोलिसांच्या संपर्कात आहेत. आम्ही असे सांगितले आहे की, वेगळया मार्गाने जाऊन या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरु करावी. या प्रकरणात चोरीला गेलेले साहित्य अद्याप हस्तगत झालेले नाही. ही गंभीर घटना आहे, 30 लाख रुपयांची चोरी झालेली आहे. पोलिसांकडून तपास सुरु आहे, परंतु त्यांना अजूनही यश आलेले नाही. याप्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे निदर्शनास आलेले आहे. दिनांक 29.11.2007 रोजी पडघा सबस्टेशनमध्ये साहित्य आले. दिनांक 7.7.2009 पर्यंत म्हणजे 18 महिने पूर्वी या साहित्याची खरेदी का करण्यात आली आहे, याबाबतची अधिका-यांकडून माहिती

4...

NTK/

श्री.विजय वडेट्टीवार....

घेतली आहे. जर दोन-दोन वर्षापूर्वी साहित्याची खरेदी होत असेल आणि अशाप्रकारे चोरी होत असेल तर ही गंभीर बाब आहे. म्हणून एक महिन्यात पोलिसांकडून याप्रकरणी निर्णय लागला नाही तर एक महिन्यात सीआयडीकडे हे प्रकरण सोपविले जाईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, एक महिन्यात पोलिसांनी तपास केला नाही तर हे प्रकरण सीआयडीकडे सोपविले जाईल असे मंत्री महोदयांनी म्हटले आहे. सन्माननीय मंत्री महोदयांकडे ऊर्जा खाते आहे, गृह खाते नाही. त्यामुळे ते मागणी करु शकतात, असा आदेश देऊ शकत नाहीत. याच्यामध्ये फार मोठे रॅकेट आहे. ज्यावेळी पोलीस अशाप्रकारची कारवाई करतात त्यावेळी संगनमताचा गुन्हा दाखल करीत नाही म्हणून पोलिसांना कस्टडी मिळत नाही, म्हणून ते आरोपी जामिनावर सुटतात आणि पोलिसांची पुढची चौकशी थांबते. ज्यावेळी आरोपी कटकारस्थान करुन एखादा गुन्हा करतात त्यावेळी त्या गुन्हयातील दुसरे आरोपी शोधायचे असतील तर अदखलपात्र गुन्हा दाखल होतो की नाही, पोलिसांना कस्टडी मिळते की नाही हे सर्व पाहणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.शिगम.....

तेव्हा या प्रकरणी या सर्व गोष्टी पुन्हा एकदा तपासून या आरोपीला किमान 14 दिवसाची पोलीस कस्टडी मिळवून या प्रकरणी पूर्ण चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : या आरोपीला दि. 16.9.2009 ला अटक झाली आणि 6.10.2009 पर्यन्त तो अटकेत होता. अजामीनपात्र गुन्ह्याखाली त्याला अटक केलेली होती. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सत्यता तपासून त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

...2..

पृ.शी. : महागाई भत्ता न मिळणा-या कुटुंबाना 2 रु.किलो दराने गहू आणि 3 रु.किलो दराने तांदूळ देण्याबाबत

मु.शी. : महागाई भत्ता न मिळणा-या कुटुंबाना 2 रु.किलो दराने गहू आणि 3 रु.किलो दराने तांदूळ देण्याबाबत बाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील, वि.प.स.यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील आणि कपिल पाटील, वि.प.स. यांनी "महागाई भत्ता न मिळणा-या कुटुंबाना 2 रु. किलो दराने गहू आणि 3 रु.किलो दराने तांदूळ देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3..

श्री. कपिल पाटील : या सूचनेवर माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर निवेदन दिलेले आहे. परंतु शेवटी जे तीन प्रश्न विचारले होते त्यांचे समाधान केलेले नाही. डॉ. बाबा आढाव आणि भाई वैद्य यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व कष्टकरी, श्रमिक, गरीब वर्ग सत्याग्रह करीत आहेत. या सर्वांना दिलासा देण्यासाठी आंध्रप्रदेश, तामीळनाडू, झारखंड, छत्तीसगड या राज्यांनी ज्या प्रमाणे 2 रु. किलो दराने गहू आणि 3 रु. किलो दराने तांदूळ देण्याची जी योजना केलेली आहे तशी योजना राज्य सरकार राबविणार आहे काय ? ज्यांना महागाई भत्ता मिळत नाही अशा कष्टकरी वर्गाला सवलतीच्या दरात धान्य पुरविणार आहात काय ? जे सत्याग्रह करणारे नेते आहेत त्यांना चर्चेला बोलावून या कष्टकरी जनतेला दिलासा देण्यासाठी शासन व्यापक योजना आखणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांनी शासनाला सविस्तर पत्र लिहिले असून महागाईच्या महत्वाच्या विषयावर त्यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. आंध्रप्रदेश, तामीळनाडू, छत्तीसगड या राज्यांनी राबविलेल्या योजनेच्या धर्तीवर 2 रु. किलो दराने गहू आणि 2 रु. किलो दराने तांदूळ वाटप केले जाईल काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. केन्द्र शासनाच्या माध्यमातून अशा प्रकारच्या योजनेबाबत विचार चालू आहे. याबाबतीत लवकरात लवकर निर्णय होईल अशी परिस्थिती आहे. जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात देण्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. आपणा सर्वांना कल्पना आहे की, महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून 5 जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात देण्याची योजना महाराष्ट्रामध्ये राबवित आहोत. अशा प्रकारची योजना फार कमी राज्यात आहे. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन चालू आहे. मी याबाबतीत त्यांच्याशी स्वत: चर्चा करुन मंत्रालयामध्ये किंवा त्यांना सोईची होईल अशी वेळ आणि त्यांना सोईचे होईल अशा ठिकाणी शिष्टमंडळाबरोबर चर्चा करुन त्यांचे मुद्दे समजावून घेऊन त्याप्रमाणे कारवाई करु.

<u>निवेदन क्रमांक 10 संबंधी</u>

सभापती : निवेदन क्रमांक 10 हे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 93 अन्वये उपस्थित केलेल्या सूचनेबाबतचे आहे. ते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. मी हे निवेदन तहकूब करीत आहे.

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.59 ते 2.30 मध्यंतर)

...नंतर श्री. भोगले....

मध्यंतरानंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आमदार निधी 1.50 कोटी करण्याबाबत चौकशी करुन निर्णय देणार होतात. काल विधानसभेमध्ये आमदारांचा स्थानिक विकास निधी 1.50 कोटी रुपये केल्याची घोषणा करण्यात आली. स्थानिक विकास निधी 1 कोटी रुपयांऐवजी 1.50 कोटी रुपये करण्यात आला आहे. हा निर्णय विधानपरिषद सदस्यांना लागू होईल का?

श्री.विजय वडेट्टीवार : आतापर्यंत विधानसभा सदस्यांना जेवढा आमदार निधी दिला जात होता तेवढाच आमदार निधी विधानपरिषद सदस्यांना देखील दिला जातो. त्यामुळे अतिरिक्त मागणी करण्यापेक्षा जो निधी देण्यात आला आहे त्याबद्दल समाधान मानावे. विधानपरिषद सदस्यांना देखील 1.50 कोटी रुपये स्थानिक विकास निधी उपलब्ध होणार आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्रीमहोदय म्हणाले की, जेवढा आमदार निधी दिला आहे तेवढ्यात समाधान माना. 1.50 कोटी रुपये निधी दिला तो कमी आहे अशी तक्रार केलेली नव्हती. हा निर्णय विधानपरिषद सदस्यांना देखील लागू होईल का एवढाच प्रश्न आहे. केव्हापासून हा निर्णय लागू होईल?

श्री.विजय वडेट्टीवार : विधानपरिषद सदस्यांना त्याप्रमाणेच स्थानिक विकास निधी लागू होईल.

नंतर 2एन.1...

पृ.शी./मु.शी.: <u>कामकाज पत्रिकेवरील कामकाजातील बदलासंबंधी</u>

उपसभापती : आज दिनांक 21 एप्रिल, 2010 रोजी कामकाज पत्रिकेवरील क्रमांक 7 वर दाखविलेला सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे व इतर यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दाखविलेला असून तो उद्या दिनांक 22 एप्रिल, 2010 रोजी घेण्यात येईल व त्याऐवजी काल दि. 20 एप्रिल, 2010 रोजीच्या कामकाज पत्रिकेतील सातव्या क्रमांकावरील सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले व इतर यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आज घेण्यात येईल.

....2...

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजाच्या लोकांना त्या जातीचे फायदे न मिळणे

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाजाच्या लोकांना त्या जातीचे फायदे न मिळणे यासंबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण, राजन तेली, भाई जगताप ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील सर्व ठाकर समाजातील लोकांना अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट केलेले असतानाही सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाज बांधवांना अनुसूचित जमातीत समाविष्ट करण्यात न येणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजातील लोक चालरिती व रूढी परंपरेने जगत असून अजूनही जाडे भरडे गुंडाळलेले कपडे, अंधश्रध्दा,भूत-पिशाच्छ इत्यादी गोष्टींवर विश्वास ठेवून जीवन जगत असणे, राज्यातील इतर ठाकर समाजाला सन १९७६ पासून क्षेत्र बंधन उठवून अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करुन दाखले दिले जाणे, परंतु फक्त सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजाला अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट न केल्याने त्यांच्यात पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, मी प्रथम आपले आभार मानतो कारण ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवली व आज चर्चेला घेतली. मुळात अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती व या अंतर्गत असंख्य जाती व पोट जाती, गट व पोट गट तसेच गावोगाव हिंडणारे अशा 50-60 जाती समाविष्ट आहेत. अशा किती तरी लोकांना पिढ्यान्पिढ्या समाजाच्या मुख्य प्रवाहात येता आले नाही. शासनाच्या कोणत्याही सवलतींचा फायदा या समाजाला झाला नाही. माननीय सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असतानाच्या काळातील वित्त मंत्र्यांचे भाषण माझ्याकडे आहे. त्या आधारे मी सांगणार आहे की, जरी पिढ्यानपिढ्या समाजाच्या मुख्य प्रवाहात येता आले नाही तरी या ठाकर समाज जो सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे त्याची शिरगणती शासन नव्याने करणार काय ? तसेच अनुसूचित जमातीच्या सवलतींचा फायदा या समाजाला देणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, केंद्रशासनाचा जनगणनेचा कार्यक्रम सुरु झालेला असून त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याची सुध्दा शिरगणती होणारच आहे त्यामुळे स्वतंत्रपणे जनगणना करण्याची गरज नाही.

श्री. राजन तेली : महोदय, कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्यानुसार नाम साधर्म्याचा प्रश्नच येत नाही. उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याचा उलट अर्थ काढू नये अशी माझी विनंती आहे. आद्य नावाची तपासणी करण्याचा अधिकार समितीला आहे. मी यापूर्वी सुध्दा अनेक पुरावे दिलेले आहेत. त्याप्रमाणे सन 1880 मध्ये जे शासनाचे गॅझेट निघाले आहे त्यात "Thakars have come from above the Sahyadris 400 years ago." म्हणजे 400 वर्षापूर्वी हा समाज सह्याद्रीच्या पट्टयात आलेला आहे असे त्या गॅझेटमध्ये म्हटले आहे. त्यामुळे कुठलाही अन्य पुरावा देण्याची गरज नाही असे मला वाटते. याचा विचार करुन ठाकर समाजाला शासन न्याय देणार काय ? त्याचबरोबर परवा उत्तर देताना मंत्री महोदयांनी सांगितले की, कोर्टाच्या निर्णयानंतर असे दाखले देण्याचे काम बंद करण्यात आले आहे. सन 2008 पासून सन 2010 पर्यंत तीन वर्षात 1472 जातीचे दाखले दिलेले आहेत, हे दाखले देणे बंद झालेले नाही. जनगणनेच्या संदर्भात गेल्या वेळेस जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे रिझर्व्हेशन काढण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकमेव रिझर्व्हेशन हे एस.टी. साठी निघाले. आम्ही मंत्री महोदयांना विनंती केली तेव्हा त्यांनी जनगणनेचे कारण आम्हाला सांगितले, अशी भूमिका शासनाला कशी घेता येईल. म्हणून अशा प्रकारे पुन्हा पुराव्याची गरज नाही....

यानंतर श्री. जुन्नरे ....

श्री. बबनराव पाचपुते :सभापती महोदय, हा विषय आजच चर्चेला आलेला आहे असे नसून अनेक वर्षापासून यावर चर्चा सुरु आहे. यासंदर्भात ठाकर समाजाचे लोक अनेक वेळा भेटलेले आहेत. त्यावेळेस दोन्ही खाते वेगवेगळी होती त्यामुळे वेगवेगळे आदेश काढण्यात आले होते. या समाजाचे म्हणणे होते की, आम्हाला ओबीसीमध्ये टाका, भटक्या विमुक्त जाती मध्ये टाका त्यामुळे त्यांची जशी मागणी आली तसा शासनाने निर्णय काढलेला आहे. त्यामुळे या विषयासंदर्भात वेगळी चर्चा करण्याची गरज नाही. सुप्रीम कोर्टाने यासंदर्भात श्रीमती माधुरी पाटील यांच्या प्रकरणात निर्णय दिलेला आहे. "Each Case must be considered in the backdrop of its own facts." सुप्रिम कोर्टाने प्रत्येक केस तपासण्यास सांगितलेले आहे. यामध्ये वडिलांना जातप्रमाणपत्र दिले म्हणून तसे प्रमाणपत्र मुलाला दिलेच पाहिजे असे काही नाही. प्रत्येक केस ही स्वतंत्र तपासावी लागणार आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार सर्व पुरावे तपासले जातील. त्या भागातील जे कार्यकर्ते आहेत किंवा त्या ठिकाणचे जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांच्याबरोबर यासंदर्भात एक बैठक घेण्यात येईल. या लोकांना दाखले देण्याची सिस्टीम बंद केलेली नाही हे मी येथे आपणास सांगू इच्छितो. कमिटीच्या समोर यासंदर्भातील सर्व पुराव्आपण ो दिले तर ते पुरावे विचारात घेऊन तशा प्रकारे दाखले दिले जात असतात. पूर्वी आपल्याकडे एकच कमिटी होती परंतु आता आपण 8 विभागीय कमिट्या तयार केलेल्या असल्यामुळे दाखले देण्याचे काम सुरळीत पार पडते व यासंदर्भात मिटिंग लावण्याची शासनाची तयारी आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न जातपडताळणी कमिटीकडे पाठविण्याचा नाही. सिंधुदुर्ग जिल्हयातील ठराविक कुटुंबाना ठाकर म्हणून आदिवासी म्हणून समजण्याचा व तसे दाखले देण्याचा हा मुद्दा आहे. सावंतवाडीचे संस्थान खेम सावंत यांच्या त्या काळातील गॅझेटचा पुरावा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी दिलेला आहे. 400 वर्षापूर्वी 800 लोक सहयाद्रीतून स्थलांतरित होऊन या ठिकाणी आले होते व त्यामुळे त्यांचे राहणीमान व व्यवसाय बदललेला आहे. याचे मुख्य कारण श्री. खेम सावंत हे पुरोगामी राजे होते. त्यांनी सर्व लोकांना जमिनीचे पट्टे दिले होते तसेच शिक्षण सुध्दा त्यांनी सक्तीचे केले होते त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक जातीच्या राहणीमानामध्ये, जीवनमानामध्ये फरक झालेला आहे. त्यामुळे तशी

श्री. कपिल पाटील....

तुलना आता करता येणार नाही. फक्त हे लोक स्थलांतरित होते किंवा नाही, हे लोक मुळ ठाकर समाजाशी निगडीत आहेत की, नाहीत एवढया दोन बाबी आदिवासी संशोधन केंद्राकडून तपासून घेण्याची आवश्यकता आहे. संशोधन केंद्राने जर "होय" म्हटले तर या ठाकर कुटुंबियांना ठाकर म्हणून सवलती मिळू शकतात. त्यामुळे पुण्याच्या आदिवासी संशोधन केंद्राकडे हे प्रकरण पुन्हा तपासावयास पाठविणार आहात काय व या केंद्राचा अहवाल आल्यानंतर त्या प्रमाणे अंमलबजावणी करणार का ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, होय.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी या विषयाच्या संदर्भात परवा जे उत्तर दिले होते तेच उत्तर त्यांनी आता दिलेले आहे. परवा या लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली होती त्यावेळी मी सांगितले होते की, 1950 पासून या समाजाला एस.टी.च्या प्रवर्गात ठेवण्यात आले होते. नंतर त्यांना तुम्ही एन.टी. केले. एन.टी.नंतर या लोकांना ओ.बी.सी. केले होते. त्यामुळे या लोकांचा समावेश एस.टी.च्या प्रवर्गामध्ये करण्यात यावा यासाठी हे लोक हायकोर्टात गेले होते. हाय कोर्टाने या लोकांचे म्हणणे ग्राहय धरले व या लोकांना हायकोर्टाने एस.टी.प्रवर्गात घेण्यात यावे असे आदेश दिले होते. परंतु यासंदर्भात तुमचा विभाग सुप्रिम कोर्टात गेला परंतु या गोष्टीचा उल्लेख तुम्ही कोठेही केला नाही. परंतु हायकोर्टाचा निर्णय सुप्रिम कोर्टाने ग्राहय धरला. यासंदर्भात सुप्रिम कोर्टाने डायरेक्शन दिले. तुमचे पुण्याचे जे कमिशनर ऑफिस आहे त्यांना यांसदर्भात पूर्ण जजमेंट मिळाले व तुमच्या विभागाने यासंदर्भात कलेक्टरांना आदेश काढले की, या लोकांना एस.टी.म्हणून प्रमाणपत्र देण्यात यावे. आपण सिंधुदुर्ग जिल्हयात अशा प्रकारे किती तरी प्रमाणपत्र इस्यू केलेले आहे व त्याचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी केलेला आहे. सिंधुदुर्गमध्ये वडिलांना प्रमाणपत्र दिले जाते, बहिणीला प्रमाणपत्र दिले परंतु मुलाला प्रमाणपत्र दिले जात नाही अशी स्थिती आहे. 1880 च्या गॅझेटच्या पूर्वी 400 वर्षापूर्वीचा दाखला सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी दिलेला आहे. महाराष्ट्रातील ठाकर समाजासाठी तुम्ही काय करता हा प्रश्न या ठिकाणी नाही तर सिंधुदुर्ग

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

जिल्हयापुरताच हा प्रश्न मर्यादित आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजाचे जे पुरावे दिलेले आहेत त्या पुराव्याची आपण पुन्हा पडताळणी करणार आहात काय? तसेच या ठिकाणी वडिलांना,बहिणीला जे जातीचे दाखले दिले परंतु मुलाला दाखले दिले जात नाही त्यामुळे ज्यांना अशा प्रकारे जातीचे दाखले दिले जात नाही त्यांना तुम्ही दाखले उपलब्ध करुन देणार आहात काय असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

यानंतर श्री.भारवि.....

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाला "होय" असे उत्तर आहे. दुसऱ्या प्रश्नासंबंधी असे उत्तर आहे की, सर्वोच्च न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. उच्च न्यायालयाचे पूर्ण बेंच बसलेले आहे. आपण त्यांना नाकारलेले नाही. त्यांनी जातपडताळणी कार्यालयामध्ये जाऊन आपले जातीचे प्रमाणपत्र, चालीरिती सिद्ध करणे आवश्यक आहे. यासाठी बैठक घेण्याची तयारी आहे.

ॲड.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ज्यांना आपण दाखले दिलेले आहेत ते सुद्धा बरोबर आहेत की चूक आहे हे आपण तपासणार आहात. आता आपण जातपडताळणी समितीसमोर गेले पाहिजे असे सांगितले आहे. त्यामुळे यापैकी आपले कोणते उत्तर खरे आहे आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ज्येष्ठ आहे. ते वकील आहेत. "Each Case must be considered in the backdrop of its own facts." सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार उच्च न्यायालयाचे बेंच बसले आणि त्यांनी निर्णय दिला की, प्रत्येक अनुसूचित जमातीची केस तपासावी. मुलाला किंवा वडिलांना प्रमाणपत्र दिले असले तरी ते तपासावे. अनुसूचित जमातीमध्ये एकाला जातीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याच्या घरातील अन्य सदस्यांना देता येते. तसे अनुसूचित जमातीमध्ये नाही, ही सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. त्याप्रमाणे आम्ही दाखले तपासण्याची तयारी ठेवली आहे. आपले प्रमाणपत्र योग्य आहे हे संबंधिताने सिद्ध करायचे आहे. उत्तरामध्ये सांगितले आहे की, जातपडताळणी समितीला जात प्रमाणापत्र तपासण्यासंबंधीचे आदेश दिलेले आहेत.

.....

पृ. शी. : मीरा-भाईंदर या शहरास भेडसावित असलेली पाणी टंचाई

मु. शी.:मीरा-भाईंदर या शहरास भेडसावित असलेली पाणी टंचाई यासंबंधी सर्वश्री मुझफ्फर हुसेन सय्यद, चरणसिंग सप्रा, सुभाष चव्हाण, राजन तेली,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मीरा-भाईंदर या शहरास शहाड-टेमघर (स्टेम) प्राधिकरणाकडून 86,000 दश लक्ष लिटर व एम.आय.डी.सी. कडून 30,000 दश लक्ष लिटर एवढा पाणीपुरवठा मंजूर असणे, सध्या एकूण पाणीपुरवठा 98 दश लक्ष लिटर इतका असल्याचे माहे मार्च, 2010 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, सध्या लोकसंख्या 10 लक्ष इतकी असणे, 36 ते 40 तासांनी शहरास पाणी पुरवठा होत असणे, मिरा-भाईंदर हे पाण्यासाठी संवेदनशील असून पाण्याकरीता महानगरपालिकेत यापूर्वी सन 1996 मध्ये जन आंदोलन होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, पाणी टंचाई लक्षात घेऊन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी दिनांक 20 मे, 2009 रोजी मीरा-भाईंदर शहरासाठी सुर्या धरणामधून 100 दश लक्ष लिटर व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या कोटयातून 100 दश लक्ष लिटर पाणी एकूण 200 द.ल.लि. पाणी आरक्षित करण्यास मंजूरी दिलेली आहे. मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्य शासनाच्या सुकाणू समितीने मान्यता दिलेली आहे. हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविणे, मंजूर होणे व प्रकल्प कार्यान्वित होणे यासाठी चार ते पाच वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे. भविष्यात चार ते पाच दिवसातून एकदाच पाणी पुरवठा होऊ शकतो. त्यामुळे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.राज्य शासनाने मंजूर केलेला प्रस्ताव पाठविला व सदरहू प्रस्ताव मंजूर होऊन जनउद्रेकामुळे रेल्वे जाळणे, तोडफोड करणे या सर्व बाबी घडलेल्या आहेत. पाणी टंचाई लक्षात घेऊन मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी दिनांक 20.5.2009 मिरा-भाईंदर शहरासाठी सुर्या धरणामधून 100 दश लक्ष लिटर मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या कोटयातून 100 दश लक्ष

3....

श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद.....

लिटर असे एकूण 200 दश लक्ष लिटर पाणी आरक्षित करण्यास मंजूरी देणे तसेच मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्य शासनाच्या सुकाणू समितीने मान्यता दिलेली असणे, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येऊन प्रकल्प कार्यान्वित होण्यास चार ते पाच वर्षाचा कालावधी अपेक्षित असणे, सदरहू प्रस्तावास मंजुरीसाठी लागणाऱ्या कालावधीबाबत उक्त परिसरातील स्थानिक जनतेच्या मनात संभ्रमाची भावना निर्माण होणे, सबब शासनाने उक्त प्रस्तावाचा पाठपुरावा करुन सदरहू योजना कार्यान्वित करण्याकरिता करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मीरा-भाईंदर महानगरपालिकेला एमएमआरडीएकडून 100 एमएलडी पाणी देण्याच्या योजनेला शासनाने मंजुरी दिली. त्याच बरोबर पाटबंधारे विभागाकडून 100 एमएलडी पाणी देण्याची मंजुरी दिलेली आहे. यासाठी सुर्या प्रकल्पातून पाणी उपलब्ध होणार आहे. सदर योजनेचा खर्च हा JNNURM मधून करण्यात येणार आहे. म्हणून MMRDA ने JNNURM ला केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविताना मीरा-भाईंदर शहराचा फक्त इंटर्नल डिस्ट्रीब्युशनचा प्रस्ताव पाठविला आणि वितरण व्यवस्थेकरिता उद्भवाची योजना केंद्र शासनाकडे पाठवायला पाहिजे होती. ती अद्यापि पाठविलेली नाही. शुद्धीकरणाचा व अन्य प्रस्ताव पाठविलेला नाही. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहे की, हे प्रस्ताव आपण त्वरित कधी पाठवणार आहात ? त्याच बरोबर या योजनेला टॉप प्रॉयॉरिटी देण्यासाठी शासन केंद्र शासनाला कळविणार आहे काय ? 3-4 वर्षापूर्वी या सभागृहाच्या माध्यमातून एमआयडीसीच्या माध्यमातून 30 एलएलडी पाणी मीरा-भाईंदर साठी शासनाने जाहीर केले होते. त्यातील फक्त 12 एमएलडी पाणी उपलब्ध होते. बाकीचे पाणी उपलब्ध होत नाही. आज सुद्धा प्रश्नात्तराचा तासाला तारांकित प्रश्न येऊ शकला नाही. या प्रश्नाला शासनाने जे उत्तर दिले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा करण्यासाठी महामंडळाच्या जलवाहिन्या बदलण्याची/दुरूस्तीची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, सदर ठिकाणी नवीन पाईप लाईन टाकलेली आहे. असे असताना सुद्धा येथे लेखी स्वरूपात चुकीचे उत्तर दिलेले आहे. येथे पाण्याची बिकट परिस्थिती उद्भवलेली आहे. 10 ते 12 लाख लोकवस्ती आहे. मागील 2-3 महिन्यांपासून आम्हाला 116 एमएलडी पाण्यापैकी फक्त 90 एमलडी पाणी उपलब्ध होत आहे. लोकांना फक्त दोन तास पाणी मिळत आहे. म्हणून आम्हाला एमआयडीसीचे पाणी कधी उपलब्ध करून देणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मीरा-भाईंदर शहराला पाणी पुरवठा करण्यासंबंधातील हा प्रश्न आहे. येथे सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. पहिला प्रश्न सदर योजना जेएनएनयुआरम मध्ये घेण्यात येणार आहे. त्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव पाठवायला पाहिजे. तो पाठविण्यात आला नाही. जो मूळ प्रस्ताव होता तो मागे राहिला व स्प्लेमेंटरी प्रस्ताव पाठविण्यात आला. असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

श्री.भास्कर जाधव .....

माझ्या माहिती प्रमाणे अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविण्यात आला नव्हता.सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती खरी आहे असे समजून त्या संबंधी जो प्रस्ताव पाठवावयाचा असतो तो प्रस्ताव प्राधान्याने शासनाच्या वतीने पाठविण्यात येईल.सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांच्या एक गोष्ट मी निदर्श्नास आणून देऊ इच्छितो की, केन्द्र सरकारने आपल्याला जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत निधी देण्याचे मान्य केले होते वा प्रस्तावित केले होते. देशातील इतर राज्यांना जो निधी देण्यात आला होता त्यापेक्षा महाराष्ट्र राज्याला थोडा जास्त निधी केन्द्र सरकारने दिला आहे. मी मघाशी सन्माननीय सदस्यांना ही बाब समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होतो. मी त्यांना पुन्हा सांगतो की या बाबतीत राज्य सरकार निश्चितपणे प्राधान्य देईल व तो प्रस्ताव प्राधान्याने लवकरच पाठविण्यात येईल.सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा मांडला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या शहरासाठी शहाड टेमघर येथील प्राधिकरणाकडून प्रतिदिन 86 दशलक्ष लिटर्स पाण्ी मिळते. औद्योगिक विकास महामंडळाकडून या महानगरपालिकेला 30 दशलक्ष लिटर्स मिळणे आवश्यक आहे परंतु सध्या 12 दशलक्ष लिटर्स पाणी मिळत आहे. त्या ठिकाणची पाईप लाईन लिकेज होते त्यामुळे पाणीपुरवठा कमी होतो असे सांगितले जाते. त्या ठिकाणी नवीन पाईप लाईन टाकण्यात आलेली अशी सन्माननीय सदस्यांनी आता अधिकची माहिती दिली आहे तेथे नवीन पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे.परंतु काही तरी कारणे सांगून नागरिकांना पाण्यापासून वंचित ठेवले जाते. त्या ठिकाणी नवीन पाईप लाईन टाकण्यात आली असेल आणि जाणुनबुजून त्या शहराला पाणी देण्याबाबत जर टाळाटाळ केली जात असेल तर तातडीने 30 दशलक्ष लिटर्स पाणी देण्याबाबतच्या सबंधितांना सूचना देण्यात येतील.

पृ. शी. : पुणे शहरात रिक्षा चालकाचा पोलीस ठाण्यात झालेला मृत्यू

मु. शी. :पुणे शहरात रिक्षा चालकाचा पोलीस ठाण्यात झालेला मृत्यू. यासंबंधी डॉ.नीलम गो-हे,डॉ.दीपक सावंत. सर्वश्री परशुराम उपकर,किरण पावसकर,किसनचंद तनवाणी,गोपीकिसन बाजोरिया वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" पुणे् शहरातील दांडेकर पूल परिसरात दिनांक 23 फेब्रुवारी 2010 रोजी वा त्या सुमारास एका व्यक्तिच्या डोक्यावर दगड मारुन खून करण्यात येणे,याप्रकरणी चौकशी करण्यासाठी पोलिसांनी बोलाविलेल्या रिक्षा चालकाचा पोलीस ठाण्यात मृत्यू होणे,त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण,सदर खून प्रकरणी पोलिसांनी अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये कायदा व सुव्यवस्थ्ेच्या विश्वासार्हतेबद्दल संशय निर्माण होणे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

निवेदना नंतर

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, श्री.प्रकाश पोपट गोफणे यांचा पोलीस स्टेशनमध्ये संशयास्पदस्थितीत मृत्यू झाला आहे. त्यासंदर्भात निवेदनात असे म्हटलेले आहे की चैतन्य हॉस्पिटलमध्ये त्याला दाखल केले असतांना तेथेच त्याचा मृत्यू झाला.या संबंधीची चौकशी सी.आय.डी.कडे सोपविण्यात आली आहे.या बाबत मला माननीय मंत्रीमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की,एका संशयीत बाल आरोपीला पकडण्यात आले असून त्याला बाल सुधारगृहात पाठविले होते त्याचे हे वडील होते काय ? श्री.प्रकाश पोपट गोफणे यांचा या गुन्हयाशी काय सबंध आहे हे स्पष्ट होत नाही श्री प्रकाश पोपट गोफणे याला चौकशीसाठी बोलावले होते श्री.आलीम अब्दुलचा आत्तरचा प्रकाश मित्र होता. माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार श्री.गोफणे् हा आवारात असतांना त्याच्या छातीत दुखावयास लागले आणि तेथेच त्याचा मृत झाला . निवेदनात असे म्हटलेले आहे की," त्याला चैतन्य हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले होते आणि उपचार केले होते. डेड बॉडीवर उपचार केले जात नाहीत.श्री.प्रकाश पोपट गोफणे हे आरोपीचे वडील होते काय ? त्याचबरोबर या प्रकरणात संशयास्पद मृत्यू झालेला असल्यामुळे पोस्ट मार्टेम आणि फॉरेन्सीक लॅबोरेटरीच्या रिपोर्ट मध्ये काय म्हटले आहे ?

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, बाल आरोपी सुरज नंदू उतेकर असून त्याचा आणि श्री गोफणे याचा काहीही सबंध नाही.मयत व्यक्तीची ओळख पटत नव्हती म्हणून घटनास्थळावरुन पाच लोकांना बोलाविण्यात आले होते त्यापैकी श्री.आलीम अब्दुल सत्तार एक असून श्री.पोपट गोफणे हा त्याचा मित्र आहे. तो चौकीमध्ये त्याला भेटावयास गेला होता. भेटल्यानंतर खाली येत असतांना त्याच्या छातीत दुखावयास लागले व पालीस स्टेशनच्या भिंतीवर बसला असतांना चक्कर येऊन तो पडला होता तेव्हा रिक्षावाल्यांनी आणि पोलिसांनी त्याला दवाखान्यात नेले होते .दवाखान्यात नेल्यानंतर तो मृत्यू पावला असे डॉक्टरांनी सागितले होते. जी व्यक्ती मित्राला भेटावयास आली होती ती व्यक्ती पोलीस स्टेशनच्या आवारात मृत्यू पावलेली नाही तरी सुध्दा पोलीस स्टेशनच्या आवारात हा प्रकार घडल्याने दिनांक 25.4.2010 रोजी राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडे सखोल चौकशीसाठी हे प्रकरण दिले होते...

नंतर श्री.सरफरे

नंतर श्री.सरफरे S

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पोस्ट मार्टेम झाले की नाही? याचे मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले नाही. पोस्ट मार्टेम झाले असेल तर अहवालामध्ये काय आढळून आले?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय,पोस्ट मार्टेममध्ये डॉक्टरांनी मृत्यूची कारणे सांगितली असली तरी त्यांनी अंतिम मत दिलेले नाही. मयताच्या शरीरातील फुफ्फुस, हृदय इत्यादी अवयव फॉरेन्सिक लॅबोरेटरीकडे पाठवून देण्यात आले आहेत. मयताच्या अंगावर आंतर व बाह्य स्वरुपाच्या कोणत्याही जखमा आढळून आलेल्या नाहीत.

पृ.शी. : वैभववाडी विश्रामगृह ते फोंडाघाट या रस्त्याचे नूतनीकरण करणे

मु.शी. : वैभववाडी विश्रामगृह ते फोंडाघाट या रस्त्याचे नूतनीकरण करणे यासंबंधी श्रीमती अलका देसाई,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने समाननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"कोकणातील वैभववाडी विश्रामगृह ते फोंडाघाट हा रस्ता नादुरुस्त असल्याने वाहतुकीस अत्यंत धोकादायक असणे, त्यामुळे दरवर्षी ३ ते ४ मोठे अपघात होणे, या रस्त्याचे नूतनीकरण करण्याकरिता राज्य शासनाने दिनांक ९ डिसेंबर, २००९ रोजी आदेश देऊनही संबंधित ठेकेदाराच्या गलथानपणामुळे आजपर्यंत सदरहू रस्त्याचे नूतनीकरण करण्यात न येणे, त्यामुळे सदरहू रस्त्यावरुन नियमित वाहतूक करणाऱ्या मोटार चालकांच्या मनात निर्माण झालेले भितीचे वातावरण या संदर्भात राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन पावसाळयापूर्वी सदर रस्ता त्वरीत दुरुस्त करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवर शासनाने दिलेले निवेदन चुकीचे आहे असे माझे मत आहे. याचे कारण असे की, फोंडाघाट, वैभववाडी या मार्गाने हा रस्ता कोकणात उतरतो.त्यामुळे वळण मार्गाने हा रस्ता जातो. रस्त्याच्या बाजूला जे काम करावयाचे आहे, ते अजून पूर्ण झालेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, या रस्त्यावर काम झाले असेल तर सारखे अपघात कां होतात? या वर्षभरात चार अपघात झाले आहेत. या कामाची वर्क ऑर्डर केव्हा देण्यात आली? हे काम केव्हा पूर्ण झाले? पूर्ण झाले नसेलतर पावसाळयापूर्वी हे काम सुरु करणार काय? आणि कोकणातील रस्त्यावरुन जाणाऱ्या लोकांना दिलासा देणार काय?

श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी : सभापती महोदय, या कामाचा कार्यादेश दि.15.2 रोजी देण्यात आला आणि हे काम दि.24.7 रोजी पूर्ण झाले. हे काम सहा महिन्यामध्ये पूर्ण करावयाचे होते परंतु तीन महिन्यात काम पूर्ण करण्यात आले आहे. त्याठिकाणी अपघात कशामुळे होतात? कसे होतात? कां होतात? याबाबतची माहिती मी देऊ शकत नाही.परंतु ज्या कंत्राटदाराला हे काम देण्यात आले होते त्याने मुदतीच्या आत काम पूर्ण केले आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वैभववाडी विश्रामगृह ते फोंडा घाट राजमार्ग क्र.117 हा रस्ता कोल्हापूर-राधानगरी यामार्गाने फोंडा घाटामधून खाली उतरतो. या घाटाची परिस्थिती अशी आहे की, रस्ता अरुंद आहे, आपण सुळयावर चढतो त्याप्रमाणे हा घाट आहे. विशेषत: रस्ता अरुंद असल्यामुळे पावसाळयामध्ये हा मृत्यूचा सापळा ठरतो. तेव्हा या रस्त्याचे रुंदीकरण झाले पाहिजे, त्याची दुरुस्ती झाली पाहिजे, रस्त्याच्या बाजूला कठडे बांधले पाहिजेत अशाप्रकारच्या अनेक मागण्या करण्यात आल्या, तरीही शासन काहीही कारवाई करीत नाही हे मी मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणतो. तेव्हा या घाटाचे रुंदीकरण करुन रस्त्याच्या बाजूला कठडे बांधून अर्धवट झालेले काम आपण पूर्ण करणार काय? त्याठिकाणी आज मोठया प्रमाणावर अपघात होतात हे लक्षात घेऊन आपण कामकाज करणार काय? त्यासाठी रस्त्याचे सर्व्हेक्षण करणार काय? सर्व्हेक्षण करुन तात्काळ या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नियोजनबध्द असा कार्यक्रम तयार करणार काय? याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारल्यामुळे रस्त्याची व घाटाची वेगळी माहिती दिली. कामाच्या टेंडरबाबत माहिती विचारली म्हणून त्याबाबतची

श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी....

माहिती दिली. आपण आता घाटाच्या परिस्थितीबाबत माहिती दिली आहे. त्याबाबत पावसाळयापूर्वी त्या रस्त्याची पहाणी करुन ज्याठिकाणी वळणे असतील त्याठिकाणी संरक्षित भिंत बांधण्यासाठी जो काही आवश्यक निधी लागणार असेल त्याचे एस्टिमेट तयार करुन हे काम केले जाईल.

(यानंतर श्रीमती थोरात)

21-04-2010 (असुधारित

प्रत / प्रसिद्धीसाठी नाही)

RR 5

DGS/ D/ KTG/ 14:55

पृ.शी. : पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळासाठी पुरेशा प्रमाणात निधी न मिळणे

मु.शी. : पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळासाठी पुरेशा प्रमाणात निधी न मिळणे यासंबंधी सर्वश्री. रमेश शेंडगे, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले, राम पंडागळे, दिलीपराव सोनवणे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. अरुण गुजराथी, संजय दत्त, प्रा.सुरेश नवले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने समाजकल्याण पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची स्थापना सन १९७८ मध्ये करण्यात येणे, या मंडळाद्वारे राज्यातील धनगर समाजाच्या उत्थानासाठी शेळी व मेंढी पालन व्यवसायास अधिक गती देण्यासाठी शासनाने या महामंडळास सन २००३ मध्ये १० कोटी रुपये देणे, राज्यात धनगर समाजाची संख्या दीड कोटीच्या जवळपास असणे, परंतु या महामंडळाला पुरेशा प्रमाणात निधी देण्यात न येणे, त्यामुळे महामंडळ ज्या कारणासाठी स्थापन करण्यात आले, त्याचा हेतू साध्य न होणे, सन २००३ पासून या महामंडळाने वार्षिक २५ कोटी रुपयांची मागणी करणे, शासनाने प्रत्येक वेळी निधी देण्याचे आश्वासन देणे, परंतु प्रत्यक्ष निधी न देणे, या महामंडळाची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत फक्त १० कोटी रुपये देण्यात येणे, इतर महामंडळास शेकडो कोटी रुपये देत असताना या महामंडळास तुटपुंजा निधी देण्यात येणे, या महामंडळास २००३ पासून आतापर्यंत निधी न देण्यात आल्यामुळे या समाजाची कुंठीत होत असलेली प्रगती, त्यामुळे राज्यातील धनगर समाजात शासनाविरुध्द पसरलेला तीव्र असंतोष, इतर महामंडळाला ज्याप्रमाणे निधी देण्यात येतो तेवढा व नियमित निधी या महामंडळास मिळावा अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री. गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

विषय

(प्रेस : येथे सोबतचे विषय छापावे)

21-04-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) RR 6

DGS/ D/ KTG/ 14:55

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना ही अर्थ खात्याशी संबंधित होती. त्यामध्ये मी महामंडळासाठी निधी मागितला होता. त्याबाबत अर्थ खात्याकडून निवेदन येण्याऐवजी पशुसंवर्धन खात्याकडून निवेदन देण्यात आले आहे. पशुसंवर्धन खात्याकडे पैसे नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

लक्षवेधी सूचना क्रमांक पाच संबंधी

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक पाच ही अर्थखात्याशी संबंधित आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये महामंडळासाठी निधी मागण्यात आलेला आहे. या लक्षवेधी सूचनेला अर्थखात्याकडून उत्तर येण्या ऐवजी पशुसंवर्धन खात्याकडून उत्तर आलेले आहे. परंतु पशुसंवर्धन खात्याकडेच पैसे नाहीत. पशुसंवर्धन खात्याचे मंत्रीच स्वत: आम्हाला सांगत असतात की, आमच्याकडेच पैसे नाहीत तर आम्ही तुम्हाला पैसे कुठून देणार? म्हणून या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्यावेळी सभागृहात माननीय अर्थमंत्री उपस्थित असते तर बरे झाले असते. तेव्हा माननीय अर्थमंत्री सभागृहात उपस्थित झाल्यानंतरच ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्यावेळी माननीय अर्थ मंत्र्यांना उपस्थित राहण्यास सांगण्यात यावे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, धन्यवाद.

लक्षवेधी सूचना क्रमांक सहा संबंधी

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी लक्षवेधी सूचना क्रमांक 6 आज न घेता ती उद्या घेण्यात यावी, अशी विनंती केली असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली आहे.

पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशनबाबत

श्री. रमेश पंडागळे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन असा आहे की, सभागृहामध्ये माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील उपस्थित आहेत. आणि ते सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यापैकी एक आहेत. विशेषत: दलित समाजामध्ये त्यांच्याबद्दल अस्मिता आणि आदराचे स्थान आहे. मी माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांना अशी विनंती करतो की, काल खैरलांजी गावाला पुरस्काराच्या यादीमध्ये टाकलेले आहे. या गावाला पुरस्काराच्या यादीतून काढण्याच्या संदर्भात काही आदेश देण्यात येतील काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, तंटामुक्त मोहीम आपल्या राज्यामध्ये सुरु केलेली आहे. याबाबतीत काही निकष ठरविण्यात आलेले आहेत. कुठलेही महत्वाचे तंटे गावात बसून मिटविणे. एक ते पाच हे प्रमुख गुन्हे तंटामुक्त समितीमध्ये मिटवले जात नाहीत. त्याबाबत तडजोड केली जात नाही. सभापती महोदय, खैरलांजीच्या संदर्भात कालही या सदनामध्ये चर्चा झाली. या वर्षी ज्यावेळी ही मोहीम सुरु होईल त्यावेळी ज्या गावांना जातीय आणि धार्मिक दंगलीची पार्श्वभूमी आहे अशी गावे या स्पर्धेमध्ये समाविष्ट होऊ शकणार नाहीत अशा पध्दतीची दुरुस्ती निश्चित करण्यात येईल.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे आणि माननीय गृहमंत्र्यांचा देखील आभारी आहे.

विशेष उल्लेख

पृ. शी. : "नॅसल बब्बल" या उपकरणाच्या संशोधनाबद्दल डॉ. आरती किणीकर यांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देणे.

मु. शी. : "नॅसल बब्बल" या उपकरणाच्या संशोधानाबद्दल डॉ. आरती किणीकर यांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देणे याबाबत श्री. हेमंत टकले वि. प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.हेमंत टकले यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले(महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील स्वाईन फ्ल्यूची सर्वात मोठी लागण पुणे येथे झाली. अनेक नागरिकांचा बळी गेला. स्वाईन फ्ल्यूसारख्या साथीच्या रोगाचा मुकाबला करताना सार्वजनिक इस्पितळे पुरी पडू शकली नाहीत ही दुर्दैवी बाब सुध्दा समोर आली. अशा परिस्थितीत पुणे येथील ससून हॉस्पिटल मध्ये विभाग प्रमुख डॉ. आरती किणीकर यांनी व्हेंटिलेटरची अपुरी संख्या असताना "नॅसल बब्बल" हया सोप्या उपकरणाची उपलब्ध साधनातून निर्मिती करुन अनेक रुग्णांसाठी त्याचा वापर करुन असंख्य रुग्णांचे प्राण वाचविले. असे हे महत्वाचे संशोधन करुन तयार करण्यात आलेले उपकरण शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तातडीने राज्यात पुरविण्यात यावे. त्याचप्रमाणे डॉ. आरती किणीकर यांच्या योगदानाबद्दल सन्मानपूर्वक सत्कार करुन त्यांना अधिक संशोधन कार्यासाठी चांगल्याप्रकारे प्रोत्साहन द्यावे, अशा प्रकारची मी विंनती करतो.

यानंतर श्री. बरवड...

पृ. शी. : पाली सुधागड (जि. रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण वर्गाची झालेली गंभीर अवस्था

मु. शी. : पाली सुधागड (जि. रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण वर्गाची झालेली गंभीर अवस्था याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

"पाली सुधागड (जि. रायगड) येथे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना औद्योगिक कंपन्यांमध्ये रोजगार मिळावा या उद्देशाने सन 1999 मध्ये औद्योगिक प्रशिक्षण वर्ग सुरु करणे, सन 2008-09 या शैक्षणिक वर्षापासून औद्योगिक प्रशिक्षण वर्गाची सद्या गंभीर अवस्था असून प्रशासनाच्या बेफिकीरीमुळे प्लंबर व टेलरिंग हे दोन ट्रेड बंद असणे, या ठिकाणी असलेले फिटर व तारतंत्री या दोन ट्रेडमधील विद्यार्थ्यांना सात तासाऐवजी फक्त चारच तास शिक्षण देणे, टेलरिंग ट्रेडसाठी खरेदी करण्यात आलेल्या लाखो रुपयांच्या शिलाई मशिन धूळ खात पडून असणे व यामध्ये शासनाच्या लाखो रुपयांची हानी होणे, या घटनेमुळे या परिसरातील पालक, विद्यार्थी व नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. सबब शासनाने या महत्वाच्या व भावी पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबीच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

पृ. शी. : मौलाना शेख सय्यद रब्बानी यांच्या आपल्या देशाबद्दल अनादर व व्देष निर्माण करणाऱ्या भाषणाच्या सी.डी.ची मुंबईत व राज्यात विक्री करण्यात येणे

मु. शी. : मौलाना शेख सय्यद रब्बानी यांच्या आपल्या देशाबद्दल अनादर व व्देष निर्माण करणाऱ्या भाषणाच्या सी.डी.ची मुंबईत व राज्यात विक्री करण्यात येणे याबाबत प्रा. सुरेश नवले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य प्रा. सुरेश नवले यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

" राज्यातील मुस्लीम समाजातील तरुण पिढीमध्ये आपल्या देशाबद्दल अनादर व व्देष निर्माण व्हावा यासाठी मौलाना शेख सय्यद रब्बानी यांच्या भाषणाच्या सी.डी. मुंबईतील तसेच राज्यातील काही भागात विक्री करण्यात येत असणे, मौलाना रब्बानी यांच्या या सीडीमध्ये इतर जाती जमातीबद्दल अनुद्गार, देवदेवतांबद्दल नीच पातळीचे संवाद, दर्गा, मंदिर येथे बॉम्ब ठेवून उडविण्याची सूचना, आदेश इत्यादी समाजविघातक प्रवृत्तींना चालना देण्याचे भाष्य या सीडीमध्ये ठासून भरलेले असणे, मौलाना रब्बानी यांचेवर घाटकोपर येथील भाषणाच्या वेळी दि. 28 जानेवारी, 2010 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून कोणतीच कारवाई न होणे, मौलाना रब्बानी यांच्या सीडी मुस्लीम समाजातील अशिक्षित तरुणांमध्ये दहशतवादी वृत्ती वाढावी यासाठी सर्वात कमी किंमतीत म्हणजे फक्त दीड रुपयात विक्री करण्यात येत असणे, मौलाना रब्बानी यांचे अहिले हदीस या संघटनेशी संबंध असून अहिले हदीसचे तालीबानी संबंधही निदर्शनास आलेले असणे, राज्यात सिमी संघटनेवर बंदी असताना अहिले हदीस या संघटनेवर बंदी नसणे, त्यामुळे मुस्लीम तरुणांमध्ये समाजविघातक विचार तयार होऊन दहशतवादी संघटनांशी संबंध निर्माण

प्रा. सुरेश नवले ....

होण्याची शक्यता, हा विषय अत्यंत गंभीर असल्याने मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो."

सभापती महोदय, माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. माझ्याकडे असलेल्या या सर्व सीडीज मी त्यांच्याकडे पाठवितो. या सीडीज दीड रुपयाला मिळतात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही गंभीर घटना आहे. याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले पाहिजे. यामध्ये आंतकवाद्यांशी, अल कायदाशी संबंध जोडणारी बाब आहे. माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी याबाबतीत काही तरी सांगावे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य माननीय मंत्रिमहोदयांकडे सीडी देणार आहेत.

श्री. दिवाकर रावते : विशेष उल्लेखाच्या बाबतीत सभागृहामध्ये सुध्दा उत्तर देता येते.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी ती सीडी घेईन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना ती बघावयास सांगेन आणि त्यात काय तथ्य आहे ते सदनाला सांगण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांकडे सीडी पाठवतो.

पृ. शी. : बेलापूर गावठाण किल्ल्याच्या संवर्धनाचे काम प्रलंबित राहणे

मु. शी. : बेलापूर गावठाण किल्ल्याच्या संवर्धनाचे काम प्रलंबित राहणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडते.

"बेलापूर (नवी मुंबई) गावाचे वैभव असलेल्या बेलापूर गावठाण किल्ल्याच्या संवर्धनाचे काम सिडकोमार्फत करण्याचे निश्चित करण्यात येऊन सुमारे 2.50 कोटीचा प्रस्ताव शासनाकडून पाठवून अद्याप सदर प्रस्तावास मान्यता न मिळणे, परिणामी बेलापूर गावठाण परिसरातील किल्ल्याच्या संवर्धनाचे काम प्रलंबित राहणे, त्यामुळे स्थानिक नागरिकात निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाकडे फाईल पाठविलेली आहे. सहा महिने झाले तरी सांस्कृतिक कार्य विभागाने या प्रस्तावाला मान्यता दिलेली नाही. त्यामुळे बेलापूर गावातील या किल्ल्याच्या संवर्धनाचे काम तसेच राहिलेले आहे. याबाबतीत शासनाने ताबडतोब निर्णय घेऊन सांस्कृतिक कार्य विभागास तसे आदेश द्यावेत अशी मी विनंती करते.

...5...

पृ. शी. : लातूर व उस्मानाबाद येथील विद्यापीठाच्या उपकेंद्राचे विद्यापीठात रुतांतर करण्याची मागणी

मु. शी. : लातूर व उस्मानाबाद येथील विद्यापीठाच्या उपकेंद्राचे विद्यापीठात रुतांतर करण्याची मागणी याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

" राज्यात पूर्व प्राथमिक पासून ते पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी शाळा / महाविद्यालयांची स्थापना करण्यात आलेली आहे. परंतु प्राथमिक शाळात शिक्षण घेणारे पूर्णत: विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहचत नाहीत. त्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची गळती होते, हे अनेक निष्कर्षाने सिध्द झालेले आहे. आज उच्च शिक्षणात म्हणजे पदवी शिक्षणात फक्त 6 टक्के विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. आपल्या देशात फक्त 6 टक्के विद्यार्थ्यांना सहभाग आहे परंतु बाहेरच्या देशात उदा. कॅनडा 88 टक्के, ऑस्ट्रेलिया 79.8 टक्के, युएसए 80.9 टक्के, युके 52 टक्के, थायलंड 19 टक्के

यानंतर श्री. खंदारे...

श्री.विक्रम काळे....

ब्राझील 12टक्के इतका विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. जपानची लोकसंख्या 12.7 करोड आहे. तेथे 686 विद्यापीठे आहेत. यु.एस.ए.ची लोकसंख्या 27.6 करोड आहे, तेथे 2364 विद्यापीठे आहेत, युकेची लोकसंख्या 5.98 करोड आहे तेथे 330 विद्यापीठे आहेत. भारताची लोकसंख्या 111 करोड आहे, येथे फक्त 345 विद्यापीठे आहेत. म्हणजे इतर देशाच्या तुलनेत अत्यंत कमी विद्यापीठे भारतात उच्च शिक्षणासाठी आहेत. म्हणून उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विद्यापीठांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. म्हणून लातूर व उस्मानाबाद येथील विद्यापीठाच्या उपकेंद्राचे विद्यापीठात तातडीने रुपांतर करावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

2....

पृ. शी. : नगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील म्हसे खुर्द व गुनेरे येथे घातलेल्या दरोडयात शेतकरी कुटुंबातील सदस्य जखमी होणे

मु. शी. : नगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील म्हसे खुर्द व गुनेरे येथे घातलेल्या दरोडयात शेतकरी कुटुंबातील सदस्य जखमी होणे याबाबत डॉ.सुधीर तांबे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ.सुधीर तांबे यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

"अहमदनगर जिल्हयात पारनेर तालुक्यातील म्हसे खु.व गुनेरे येथे 10.4.2010 रोजी दरोडा पडला. अतिशय क्रूर पध्दतीने शेतकरी कुटुंबातील सदस्यांना जखमी करण्यात आले. त्यात एका महिलेचा मृत्यू झाला. राज्यात अनेक ठिकाणी असे दरोडे घालण्यात येतात व निर्घृणपणे मारहाण, स्त्रियांवर पाशवी अत्याचार होतात. अशा घटनांना पायबंद घालण्यास पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे वाडी वस्तीवर राहणा-या शेतक-यांमध्ये निर्माण होत असलेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, अशाप्रकारे सध्या राज्यात वाढत असलेल्या दरोडयाला आळा घालण्याची तसेच दरोडयावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अशा या गंभीर व अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

सभापती महोदय, अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील म्हसे खुर्द व गुनेरे येथे दि.10.4.2010 रोजी दरोडा घालण्यात आला. या दरोडयात त्या कुटुंबांना जखमी करण्यात आला. यामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला. शेतकऱ्याला ग्रामीण भागात वाडी वस्तीवर रहावे लागते. या राज्यात दरोडयाचे सत्र सातत्याने चालू आहे. दरोडे घालण्याची पध्दत अमानवी आहे. लोकांवर

3...

डॉ.सुधीर तांबे....

क्रूर पध्दतीने हल्ले केले जातात. त्यामध्ये काहींचा मृत्यू होतो. अनेक स्त्रियांवर पाशवी अत्याचार केले जातात. त्यामुळे शेतक-यांमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. या प्रश्नामध्ये पोलिसांनी गंभीरपणे लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. या दरोडेखोराच्या टोळयांना पोलिसांनी शोधून काढून त्यांना पायबंद घालण्याची गरज आहे असे मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

4....

पृ. शी. : एकतिसाव्या मराठवाडा साहित्य संमलेनाने पारित केलेले विविध विषयांचे ठराव

मु. शी. : एकतिसाव्या मराठवाडा साहित्य संमलेनाने पारित केलेले विविध विषयांचे ठराव याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडते.

"किसान शिक्षक मंडळ बोरगाव काळे व रुरज एज्यूकेशन सोसायटी, मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 31 वे मराठवाडा साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. त्यामध्ये खालील ठराव पारित केले. 1) दुकाने, उपहारगृहे, कार्यालय, सा.बां.विभागाचे सर्व बोर्ड, सूचना मराठीतून असाव्यात. 2) सर्व शाळा, केंद्र कार्यालये (शासकीय) व विद्यापीठाचा, न्यायालयाचा कारभार मराठीतून चालण्याची कठोर अंमलबजावणी करावी 3) केंद्र सरकारने सर्व आकाशवाणी केंद्राची प्रसारण क्षमता वाढवावी 4) राज्यात उद्योगधंद्यात 80 टक्के मराठी भाषिकांना क्षमता वाढवावी. 5) सीमावर्ती भागात मराठीतून शिक्षण देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत 6) राज्याबाहेरील मराठी शिकविणा-या केंद्राने आर्थिक मदत द्यावी. 7) विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ पूर्ववत सुरु करावे. 8) विद्यापीठांनी प्रमाणपत्रे मराठीतून छापावीत. 9) बेळगांव, कारवार, निपाणी, संतपूर, भालकी, बाऱ्हाळा, औराद या गावांना भाविक सलगता व खेडी मूळ घटक समजून हे सूत्र समजून सीमा प्रश्न सोडवावा. 10) मराठवाडा रेल्वे विभाग मध्य रेल्वेला जोडला जावा. धर्माबाद मनमाड रेल्वे मार्ग दुहेरी करावा. सोलापूर, तुळजापूर, बीड, जळगांव नवीन रेल्वे मार्ग टाकण्यात यावा. 11) प्रक्षोभक व क्रौर्यपूर्ण दृश्य वृत्तवाहिन्यावरुन न दाखविण्याबाबत महाराष्ट्र शासनाने योग्य ती आचारसंहिता तयार करावी व कायदा करावा. 12) नरहर कुरुंदकर यांचे स्मारक नांदेड येथे

5....

डॉ.उषा दराडे....

उभारावे. 13) मराठवाडा लोककला अकादमी स्थापन करावी. 14) मराठवाडा साहित्य संमेलनास प्रतिवर्षी संमेलन 5 लाख रुपये महाराष्ट्र शासनाने द्यावेत. यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना."

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी विशेष उल्लेख मांडला आहे, तो ऐकून मला चमत्कारिक वाटले आहे. कारण त्यांनी त्यामध्ये इतक्या खात्याचे विषय मांडले आहेत त्यांना एक महिन्यामध्ये उत्तर कसे काय मिळणार आहे ? एका विशेष उल्लेखाच्या सूचनेमध्ये बेळगांव कारवारपासून ते नवीन रेल्वे मार्ग टाकण्यापर्यंतचे विषय त्यांनी मांडले आहेत.

6....

<u>पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. आताच माझ्या मोबाईलवर मॅसेज आला आहे. "निनावी लेटर टू सी.एम. पंढरपूर विठ्ठल मंदिर उडविणार, हा बामणी कावा विठ्ठल बहुजन मुस्लिम विद्रोही, सनातनी चाल आहे." सभागृहात सन्माननीय गृहमंत्री आणि राज्यमंत्री सुध्दा उपस्थित आहेत. ही अत्यंत गंभीर बाब आहे. तातडीने याविषयी तपास करण्यात यावा...

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, त्यापेक्षाही गंभीर बाब अशी आहे की, आपण सभागृहामध्ये मोबाईल आणला आणि तो ऑन ठेवला. ही माहिती सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांच्या चेंबरमध्ये जाऊन द्यावी.

यानंतर श्री.शिगम.....

श्री. विक्रम काळे : माझा मोबाईल बाहेर पी.अे. जवळ होता. पी.अे.ने सांगितले म्हणून मी तो येथे घेऊन आलो.

श्री. रमेश बागवे : सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याची नोंद घेऊन दक्षता घेतली जाईल. प्रत्यक्ष जाऊन पाहण्यात येईल.

..2..

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 5 संबंधी</u>

उपसभापती : सन्माननीय वित्तमंत्री सभागृहामध्ये हजर आहेत आणि लक्षवेधी सूचना क्रमांक 5 मधील विषय वित्त खात्याशी संबंधित असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना इतर कामकाजाच्या अगोदर घेण्याची विनंती सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी केली असून त्यांची विनंती मी मान्य केलेली आहे.

...3...

पृ.शी. : पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला पुरेसा निधी देण्याबाबत

मु.शी. : पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला पुरेसा निधी देण्याबाबत सर्वश्री. रमेश शेंडगे, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले, राम पंडागळे, दिलीपराव सोनवणे, श्रीमती मंदा म्हात्रे सर्वश्री अरुण गुजराथी,संजय दत्त व प्रा. सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची स्थापना सन १९७८ मध्ये करण्यात येणे, या मंडळाद्वारे राज्यातील धनगर समाजाच्या उत्थानासाठी शेळी व मेंढी पालन व्यवसायास अधिक गती देण्यासाठी शासनाने या महामंडळास सन २००३ मध्ये १० कोटी रुपये देणे, राज्यात धनगर समाजाची संख्या दीड कोटीच्या जवळपास असणे, परंतु या महामंडळाला पुरेशा प्रमाणात निधी देण्यात न येणे, त्यामुळे महामंडळ ज्या कारणासाठी स्थापन करण्यात आले, त्याचा हेतू साध्य न होणे, सन २००३ पासून या महामंडळाने वार्षिक २५ कोटी रुपयांची मागणी करणे, शासनाने प्रत्येक वेळी निधी देण्याचे आश्वासन देणे, परंतु प्रत्यक्ष निधी न देणे, या महामंडळाची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत फक्त १० कोटी रुपये देण्यात येणे, इतर महामंडळास शेकडो कोटी रुपये देत असताना या महामंडळास तुटपुंजा निधी देण्यात येणे, या महामंडळास २००३ पासून आतापर्यंत निधी न देण्यात आल्यामुळे या समाजाची कुंठीत होत असलेली प्रगती, त्यामुळे राज्यातील धनगर समाजात शासनाविरुध्द पसरलेला तीव्र असंतोष, इतर महामंडळाला ज्याप्रमाणे निधी देण्यात येतो तेवढा व नियमित निधी या महामंडळास मिळावा अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

==३==

श्री.गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5..

श्री. रमेश शेंडगे : संपूर्ण राज्यामध्ये जवळपास दीड कोटी लोकसंख्या असणारा धनगर समाज आहे. या राज्यातील शेती व्यवसाय करणारे शेतकरी, अल्पभूधारक, मेंढपाळ व्यवसाय करणारे धनगर यांच्यासाठी राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. हे महामंडळ 1978 साली स्थापन झाले. तेव्हापासून या महामंडळाला फक्त 10 कोटी रुपये निधी दिलेला आहे. मागील 32 वर्षामध्ये या राज्यात मोठ्या संख्येने असलेल्या समाजातील फक्त 694 लोकांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. अनेक वेळा मागणी करुन देखील महामंडळाला कोणत्याही प्रकारचा निधी दिला जात नाही. इतर सामाजिक महामंडळांना शेकडो कोटी रुपयाचे नियोजन केले जाते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला फक्त 5 कोटी भागभांडवल दिलेले आहे. अन्य महामंडळांना 100 कोटी रुपयापासून 400 कोटी रुपयापर्यन्त निधी दिलेला आहे. माननीय अर्थ मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्याना या लक्षवेधीच्या माध्यमातून मी विचारु इच्छितो की, मेंढपाळाचा व्यवसाय करणा-या धनगर समाजाच्या विकासाच्या दृष्टीने या महामंडळासाठी 100 कोटी निधी उपलब्ध करुन द्याल काय ? या महामंडळाला निधी देण्याच्या संदर्भात अनेक आश्वासने दिली गेली. त्या आश्वासनांच्या पूर्ततेसाठी हा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : या महामंडळाच्या अध्यक्षांनी वार्षिक 25 कोटीची मागणी केलेली आहे. हे महामंडळ स्थापन झाल्यापासून या महामंडळाला दिलेले भागभांडवल आणि अन्य कामासाठी दिलेला निधी हा सविस्तरपणे पाहिला असता याबाबतीत अधिक निधी देण्याची निश्चितपणे आावश्यकता आहे. म्हणून महामंडळाचे अध्यक्ष, संबंधित सर्व अधिकारी, संबंधित विभागाचे मंत्री यांची बैठक येत्या 15 दिवसात घेऊन अधिकाधिक निधी या महामंडळाला उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करु.

श्री. अरुण गुजराथी : दरवर्षी देण्यात येणारी तरतूद ही फक्त कर्मचा-यांचे पगार, वाहनाचे डिझेल आणि ड्रायव्हरचा पगार यासाठी खर्च होते. त्यादृष्टीकोनातून सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी केलेली मागणी उचित आहे. आता पर्यन्त 10 कोटी रु. दिलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

श्री.अरुण गुजराथी.... लक्षवेधी सूचना क्र.5...

मागील बॅकलॉगसह जादा रक्कम देण्याचा शासन विचार करणार काय? सन्माननीय सदस्यांनी 100 कोटी रुपयांची मागणी केली आहे, तो जादा निधी त्वरेने देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी जी लक्षवेधी सूचना दिली आहे त्यामध्ये सुध्दा त्यांनी 25 कोटी रुपयांचीच मागणी केली आहे. सभागृहात बोलत असताना त्यांनी 100 कोटी रुपयांची मागणी जरुर केली आहे. ज्यावेळी बैठक घेऊ त्यावेळी आवश्यक असणारा निधी निश्चितपणाने उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, हे महामंडळ पशुसंवर्धन खात्याशी संबंधित असून शेळी व मेंढी व्यवसायासाठी शासनाचे धोरण काय आहे? या व्यवसायाच्या विकासासाठी धोरणामध्ये बदल करुन नवनवीन योजना आणणार आहात काय? धोरणामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना विचारली आहे ती अत्यंत महत्वपूर्ण आहे. राज्य शासनाने या राज्यातील टंचाईग्रस्त भागातील, आत्महत्याग्रस्त भागातील, नक्षलग्रस्त भागातील शेतकरी आहेत त्यांना जोडधंदा रुपाने चांगले उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊ शकते असा हा शेळी मेंढी व्यवसाय आहे. त्यामुळे केंद्र सरकारने पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेला अहवाल सादर करण्यास सुचविले. फेब्रुवारी, 2010 मध्ये गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेने केंद्र सरकारला अहवाल सादर केला आहे. त्या अनुषंगाने शेळी मेंढी व्यवसायाच्या विकासासंबंधी राज्य शासनाला निश्चितपणे नवीन धोरण आखावे लागणार आहे. त्यासंबंधीची कार्यवाही केली जाईल. त्यासाठी सन्माननीय वित्तमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे विशेष बैठक घेण्यात येऊन निधीची उपलब्धता करण्यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल.

पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आमदारांचा स्थानिक विकास निधी वाढविण्यात आला आहे, त्यासंबंधी माननीय अर्थमंत्री सभागृहाला अवगत करतील काय?

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सभापती महोदय, आमदारांना स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दरवर्षी 1 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जातो. या वर्षापासून 1.5 कोटी रुपयांचा निधी दिला जाईल. विधानपरिषद सदस्यांना सुध्दा 1.5 कोटी रुपयांचा निधी स्थानिक विकास निधी अंतर्गत या वर्षापासून उपलब्ध करण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, विधानपरिषद सदस्यांना राज्यभर निधी वापरावा लागतो. विधानसभा सदस्यांना मतदारसंघापुरता निधी वापरावा लागतो. निश्चितपणे विधानपरिषद सदस्यांना विधानसभा सदस्यांपेक्षा जास्त निधी मिळाला पाहिजे.

..3..

पृ.शी. : कर विषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक

मु.शी.:

L.A. BILL NO. XLV OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.सुनील तटकरे (वित्तमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 45, महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले.

नंतर 2एक्स.1..

श्री. सुनील तटकरे : महोदय, विधानसभा विधेयक क्र. 45-महाराष्ट्र राज्यामध्ये अमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

महोदय, विधानसभा विधेयक क्र. 45 मध्ये खालील काही बाबींमध्ये वित्त विभागाने फरक सुचविलेले आहेत :-

अ) ऐषाराम कर, मुल्यवर्धित कर व मुंबई मोटर वाहन कर अधिनियम यातील कर विषयक तरतुदींमध्ये सुधारणा सुचविणे,

ब) मुल्यवर्धित करातील काही प्रशासकीय स्वरुपाचे बदल सुचविणे

महोदय, अर्थसंकल्पिय भाषणानुसार मुंबई मोटर वाहन कर अधिनियमामध्ये काळी-पिवळी टॅक्सी, ॲटो रिक्षा या वाहनांना एकरकमी कर आकारण्याची कार्यपध्दती सूचित केली होती व त्याप्रमाणे अधिनियमात बदल सुचविण्यात आलेले आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील या वाहनधारकांना वारंवार कार्यालयात जावे लागू नये हा या सुधारणेमागचा हेतू आहे.

ऐषाराम कर कायद्यातील तरतुदीनुसार प्रतिदि प्रति निवासी रु. 200/- पर्यंत भाडयास ऐषाराम कर लागू नव्हता. ही आर्थिक मर्यादा कालबाह्य झाली असल्यामुळे आता रु. 750/- पर्यंतच्या प्रतिदि प्रति निवास भाड्यास ऐषाराम कर लागू राहणार नाही. या व्यतिरिक्त बॅटरी, सौर उर्जेवर चालणारी वाहने, कापूर, धूप, लोबान व कात हेअर पिन्स, खादी ग्रामोद्योग बोर्डाने मान्यता दिलेला हस्तनिर्मित कपडे धुण्याचा साबण यास कर सवलत घोषित केली होती. त्याची देखील कायद्यात सुधारणा करण्याचे आता प्रस्तावित केले आहे.

तांदूळ, गहू, डाळी, त्यांचे पीठ, मिरची, हळद, गूळ, चिंच, नारळ, चणे, मेथी, पाड, खजूर, सोलापूर चादरी व टॉवेल या अत्यावश्यक वस्तूंना संपूर्ण करमाफी एक वर्षासाठी लागू करण्याचे मी माझ्या भाषणात सूचित केले आहे. त्याप्रमाणे स्वतंत्र अधिसूचना दि. 30 मार्च, 2010 रोजी निर्गमित केली आहे. याचा लाभ राज्यातील सर्वसामान्य ग्राहकांना निश्चितपणे होईल असा माझा विश्वास आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये लेखा परीक्षणासाठी आवश्यक उलाढालीची मर्यादा रु. 40 लाखावरुन रु. 60 लाखापर्यंत वाढविण्यात आली असून, तीच मर्यादा मूल्यवर्धित करामध्ये देखील लागू राहील. याचा फायदा छोट्या व्यावसायिकांना होईल अशी माझी खात्री आहे.

....2...

श्री. सुनील तटकरे .....

या व्यतिरिक्त तांत्रिक आणि प्रशासकीय सवलतीतील काही सुधारणा प्रस्तुत विधेयकामध्ये असून त्याचा मूळ उद्देश हा ई-रिटर्न व ई-पेमेंट पध्दती ऐषाराम कर व व्यवसाय कर यांना लागू करणे हा आहे. तसेच व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवसायासंबंधी अचूक माहिती देणे व शास्ती आणि दंड या कायद्यामध्ये सुचविणे असेही बदल सुचविले आहेत. त्यामुळे करविषयक प्रकरणे प्रलंबित राहण्यास आळा बसून योग्य तो देय कर शासनाच्या तिजोरीत जमा होईल.

सन 2009-10 मध्ये रु. 36 हजार 415 कोटी एवढा महसूल विक्रीकर विभागाअंतर्गत जमा झाला असून हा आतापर्यंतचा उच्चांक आहे. तसेच वेळेवर महसूल गोळा व्हावा व अशा चांगल्या योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून त्याचा फायदा व्हावा अशी तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. शेवटी या सर्व तरतुदी करीत असताना या वर्षात जवळपास सर्व विषयांच्या बाबतीत कर सवलती दिलेल्या आहेत. अशा सवलती देत असताना सामान्य ग्राहकांनादिलासा देण्याचे शासनाचे स्पष्ट धोरण देखील या निमित्ताने स्वीकारलेले आहे. म्हणूनच हे विधेयक विधानसभेने पारित केलेले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक एकमताने संमत करावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

खंड 2 ते 21 (दोन्ही सम्मिलित), खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य हे एकापाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

(नंतर श्री. जुन्नरे....

<u>एमपीएससीच्या परीक्षा शुल्कासंबंधी</u>

श्री. सुनील तटकरे (वित्त मंत्री) : सभापती महोदय, एमपीएससीच्या परीक्षा फॉर्मची किंमत 100 रुपये आकारली जात होती परंतु युपीएससीच्या फॉर्मची किंमत 20 रुपये होती त्यामुळे आता एमपीएससीच्या परीक्षा फॉर्मची किंमत 20 रुपये राहील.

...2...

पृ. शी. : मुंबई मोटार वाहन (कर बसविणे व सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. XLI OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.)

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्य मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 41 मुंबई मोटार वाहन कर अधिनियम,1958 मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 41 मुंबई मोटार वाहन कर अधिनियम,1958 मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो.शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2, खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

पृ.शी.: राज्यातील बहुतांशी आरोग्य केंद्रे दुरावस्थेत असल्यामुळे रुग्णाची होत असलेली हेळसांड व जनतेत निर्माण झालेली तीव्र संतापाची भावना.

मु.शी.: राज्यातील बहुतांशी आरोग्य केंद्रे दुरावस्थेत असल्यामुळे रुग्णीच होत असलेली हेळसांड व जनतेत निर्माण झालेली तीव्र संतापाची भावना या विषयावर प्रा. सुरेश नवले, सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, सुभाष चव्हाण,राजन तेली, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांचा 260 अन्वये प्रस्ताव.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील बहुतांशी सार्वजनिक आरोग्य केंद्रे दुरावस्थेत असणे, कित्येक आरोग्य केंद्रांच्या इमारती मोडकळीस आलेल्या असणे, डॉक्टर, कर्मचारी व सफाई कामगारांची कमतरता, औषधांचा तुटवडा, स्वच्छतेचा अभाव, बंद पडलेली व अपुरी यंत्र सामुग्री यामुळे शासनाच्या आरोग्य केंद्राकडे जनसामान्यांचा कल कमी होत असून, रुग्णांना औषोधोपचारासाठी खाजगी रुग्णालयात जावे लागणे, खाजगी रुग्णालयामध्ये वैद्यकीय खर्चाची रक्कम अवाक्याबाहेर जात असल्याने व वेळीच औषोधोपचार न मिळाल्याने अनेक रुग्ण दगावल्याच्या घटना घडलेल्या असणे, आरोग्य केंद्रात योग्य औषोधोपचार मिळत नसल्याने नागरीकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र संतापाचे वातावरण, राज्यात जिल्हा पातळीवर व ग्रामीण भागातील शासकीय सार्वजनिक आरोग्य केंद्रात सुधारणा करुन विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

यानंतर श्री.भारवि.....

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, महाराष्ट्र हे देशामधील मोठी लोकसंख्या असलेले राज्य आहे. प्रगत विचारांची कास धरणारे आणि नवनवीन विचारांच्या वाटा शोधणारे देशातील अग्रगण्य राज्य आहे. या राज्यामधील लोकांची आरोग्य व्यवस्था आणि आरोग्य देणे ही जबाबदारी राज्य शासनाची आहे. महाराष्ट्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय आणि उप केंद्र यामध्ये ज्या सुविधा देण्यात येतात त्या मात्र अपुऱ्या आहेत हे खेदाने मंत्रिमहोदयांच्या उपस्थितीत नमूद करावे लागत आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या जवळ जवळ 11 कोटीच्या आसपास आहे. ग्रामीण भागामध्ये ज्या सुविधा देणे आवश्यक आहे, त्या आपण देऊ शकलो नाहीत. लोकांना आरोग्याची सेवा दिली गेली पाहिजे, अशी राज्य शासनाची प्रामाणिक भावना आहे. राज्य शासनाच्या हेतूबद्दल आणि प्रामाणिकतेबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. सन्माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांचे हिंदी आणि उर्दूवर सुरूवातीपासून प्रभुत्त्व आहे. परंतु,मंत्री झाल्यानंतर त्यांनी मराठी भाषेविषयी जी वाटचाल केली त्याबद्दल मला खरे तर नवल वाटते. या सभागृहात घडलेले हे एक नवल आहे. त्यामुळे नवलेनांही नवल वाटल्याशिवाय रहात नाही. असे असले तरी आरोग्य खात्यामध्ये अनेक नवलपूर्ण घटना घडत आहे. ... (अडथळा)..... मंत्रिमहोदयांसारखे सर्वांना आरोग्य मिळावे ही सगळ्यांची अपेक्षा असेल तर आपण एवढे खजिल होऊ नका. त्यांच्या सारखे आरोग्य सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना देखील मिळाले आहे. महाराष्ट्रातील सर्व लोकांना हे आरोग्य मिळावे ही जी माझी भावना आहे तिच मंत्रिमहोदयांची देखील आहे. परंतु, प्रशासनामधील काही रोगट प्रवृत्ती आहे, त्याचा दुष्परिणाम महाराष्ट्रातील जनतेला भोगावा लागतो. तो दुष्परिणाम निदर्शनास आणून देण्याचे काम मी या क्षणी करणारआहे. महाराष्ट्रामध्ये 10 हजार पेक्षा जास्त उपकेंद्र आहेत.स्त्रियांची रूग्णालये जवळ जवळ 8 आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र 1816 आहेत. ग्रामीण रूग्णालयांची संख्या 366 आहे. 50 खाटांची संख्या 100 पेक्षा जास्त आहे. 100 खाटांपेक्षा जास्त असणाऱ्या रूग्णालयांची संख्या 24 आहे. हा सगळा डोलारा घेऊन आरोग्य खाते वाटचाल करीत आहे. तरीही महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांच्या वाट्याला आरोग्य येत नाही, हे दुर्भाग्य आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राची एकूण परिस्थिती पाहिली तर मला असे वाटते की, अतिशय तोकड्या सुविधा आहेत. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रूग्णालयामध्ये पंखे नाहीत. 70 टक्के

....2

प्रा.सुरेश नवले....

प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये फोन नाही. 40 टक्के ग्रामीण रूग्णालयात फोन आहेत. परंतु, ते बंद आहेत. अशा स्थितीत डॉक्टर तेथे रहात नाही ही वस्तुस्थिती. कारणांना बाहेरची हवा लागलेली आहे. कारण ते तालुक्याची ठिकाणी असतात किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहतात. प्राथमिक आरोग्य केंद्राकडे फिरकत नाही. मला असे वाटते की, याचे मूळ शिक्षण पद्धतीमध्ये शोधावे लागेल. कारण शिक्षण पद्धतीच सदोष आहे. डॉक्टर होण्यासाठी त्यांना लाखोंच्या संख्येने देणगी मोजावी लागते किंवा कोट्यवधी रूपये द्यावे लागतात. मग डॉक्टर झाल्यापासून पहिल्या दिवशी ही रक्कम वसूल करायला तो प्रारंभ करतो. शेवट पर्यंत त्याचे लक्ष ही रक्कम वसूल करण्यामध्ये जाते. त्यामुळे लोकांच्या आरोग्याकडे तो दुर्लक्ष करतो. हे महाराष्ट्रामध्ये बहुतांशी ठिकाणी होत आहे ही वस्तुस्थिती आहे. रूग्णालयामध्ये रूग्ण येतात. तासनतास डॉक्टरांची वाट पाहतात. मुर्च्छा येऊन पडतात तरी डॉक्टर त्यांच्याकडे लक्ष करीत नाही. ही जर महाराष्ट्रातील वस्तुस्थिती असेल तर मला असे वाटते की, डॉक्टरांचा हा बेमूर्वतखोरपणा आहे. त्याला आळा घालण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. राज्यशासनाने आता पर्यंत म्हणावे तसे यश संपादन केलेले नाही, ही सुद्धा विस्तुस्थिती आहे. या डॉक्टरांच्या समोर आदर्श कोणता आहे ?

सभापती महोदय, बाहेर डॉक्टर 20 ते 25 हजार रूपये कमावितो. शासकीय रूग्णालयातील डॉक्टरांचा आदर्श खाजगी रूणालयातील डॉक्टर असतात. त्यांना असे वाटते की, महिन्यानंतर 25 ते 30 हजार रूपये आम्हाला मिळणार. प्रत्येक दिवसाला 25-30 हजार रूपये तिकडे कमवणार. मग आम्ही देखील त्याच वाटेने जातो. ही भावना त्यांची असल्याने लोकांना आरोग्य देत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. एक धोरण म्हणून राज्य शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. किराणा दुकानात दरपत्रक असते. कटलरीच्या दुकानात गेलो तर तेथे देखील दरपत्रक असते. कपड्याच्या दुकानात देखील दरपत्रक असते. एवढेच कशाला सलूनमध्ये गेलात तर तेथे देखील दर ठरलेले असतात हे आपल्याला दिसून येईल. परंतु, महाराष्ट्रामध्ये डॉक्टर व्यवसायामध्ये ताप आल्यानंतर किती शुल्क आकारावे यासंबंधीचे दर ठरलेले नाही.

यानंतर श्री.गायकवाड.....

प्रा.सुरेश नवले.....

डॉक्टरांचे दरसुध्दा कायद्यान्वये ठरविण्यात यावेत अशी राज्य सरकारला माझी विनंती आहे की, या खात्याचा कारभार यापूर्वी मी देखील काही वर्षे सांभाळला होता आणि अशा प्रकारचे दर ठरविता येत नाहीत याची मला देखील जाणीव आहे परंतु केन्द्र सरकारकडे या बाबतीत आग्रह धरुन कायदा करण्यात आला तर महाराष्ट्रातील जनता माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांना आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही. या आशीर्वादामुळे आपलयाला राज्यमंत्री पदा ऐवजी मंत्री पद सुध्दा मिळेल.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री अनिल देशमुख या ठिकाणी उपस्थित आहेत त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या कार्यकक्षेत डॉक्टरांना आणावे असे मी सुचविणार नाही परंतु डॉक्टरांचे दर निश्चित करावयास पाहिजे. हे दर निश्चित करण्यात आलेले नसल्यामुळे मन मानेल त्याप्रमाणे दर आकारले जातात आणि रुग्णांचे वा त्यांच्या नातेवाईकांचे खिसे मारण्याचे काम महाराष्ट्रातील रुग्णालयामध्ये चालते त्याला आळा घालण्याचे काम राज्य सरकारने केले पाहिजे अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, लुसलुशीत हरणावर वाघाने झेप घ्यावी व त्याचा फडशा पाडावा त्याप्रमाणे खाजगी रुग्णालयामध्ये गेल्यानंतर डॉक्टर मंडळी रुग्णांचा वा त्याच्या नातेवाईकांचा फडशा पाडण्याचे काम करीत असतात त्याला आळा घालण्याचे काम राज्य सरकारने केले पाहिते. एखादा जख्खड रुग्ण रुग्णालयात गेल्यानंतर व तेथे तो मृत्युमुखी पडल्यानंतर त्याचे शव नातेवाईकांच्या ताब्यात दिले जात नाही. रुग्णालयाचे पैसे भरा त्यानंतरच शव ताब्यात दिले जाईल असे डॉक्टरांकडून सांगण्यात येते. रुग्णाच्या नातेवाईकांच्या खिशात पैसे नसल्यामुळे त्याचे नातेवाईक असे म्हणतात की , "हे शव घेऊन आम्ही काय करणार आहे ?" तरीसुध्दा डॉक्टर शव नातेवाईकाच्या ताब्यात देत नाहीत. डॉक्टर्स इतके बेमुवर्तखोरपणाने वागत आहेत त्याला राज्य सरकारने आळा घालण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केन्द्रात सहसा कोणी जात नाही.प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या दरवाजाजवळ एखादा शिपाई बिडी ओढत बसलेला असतो . डॉक्टरांनी जर पैसे दिले असतील तर त्याच्या हातात बिडी ऐवजी सिगारेट असते. रुग्णाने वा त्याच्या नातेवाईकाने डॉक्टर आहेत काय ? अशी विचारणा केली असता डॉक्टर नाहीत असे तो शिपाई सांगतो.

2..

प्रा.सुरेश नवले.....

.प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या आवारात एखाद्या झाडाखाली वा वेडया बाभळीखाली डॉक्टरांची वाट पहात तो रुग्ण व त्याचे नातेवाईक बसतात. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या आवारात वेडया बाभळीची सख्या बरीच वाढलेली आहे.रुग्णावर त्वरित उपचार केला जात नाही विचार करता राज्य शासनाने या विषयाकडे गांभ्ीर्याने पाहण्याची गरज आहे.असे मला वाटते. ग्रामीण भागातील सर्व सामान्य माणूस आर्थिकदृष्टया अतिशय विपन्नावस्थेत जगत आहे याचे भान, जाणीव व अवधान राज्य सरकारने ठेवावे अशी आग्रहाची विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय,खाजगी मेडीकल स्टोअर्सना शासनाची 70 टक्के औषधे डॉक्टर्सकडून पुरविली जातात. प्राथमिक आरोग्य केन्द्रातील डॉक्टर्स, उप केन्द्रातील डॉक्टर्स आणि ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर्स शासनाची 70 टक्के औषधे खाजगी मेडीकल स्टोअर्समध्ये विकत असतात एक रुपयाची वस्तू हे डॉक्टर्स 70 पैशाला त्या खाजगी मेडीकल स्टोअर्स चालविणा-याला विकत असतात या प्रकाराला आळा घालण्यासाठी भरारी पथकाची नेमणूक करुन अशा प्रकारे काळा धंदा करणारे जे डॉक्टर्स किंवा स्टोअस किपर्स असतील त्यांना जेरबंद करण्यात यावे तरच ग्रामीण रुग्णालयातील औषधांचा साठा ग्रामीण रुग्णालयात राहील व त्याचा फायदा शासकीय रुग्णालयात येणा-या गरीब रुग्णाना मिळू शकेल. असे मला शासनाला सांगावयाचे आहे.सभापती महोदय, ज्यांची आर्थिक कुवत नसते असे रुग्ण प्राथमिक आरोग्य केन्द्रात वा ग्रामीण रुग्णालयात येत असतात . आमची मान तुमच्या हातात दिलेली आहे आम्ही तुमच्या मांडीवर मान ठेवलेली आहे, तुम्हाला जे काही करावयाचे असेल ते करा असे सांगतात. ग्रामीण भागातील गरीब रुग्ण खाजगी रुग्णालयात जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे या गरीब माणसाकडे डॉक्टर्स लक्ष देत नाहीत तेव्हा या बाबीकडे शासनाने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.महाराष्ट्रामध्ये गरिबीलासुध्दा लाज वाटेल इतकी गरीबी सर्वसामान्य माणसाची आहे. काही विदीर्ण करणारी दृश्ये आदिवासी भागात पहावयास मिळतात .आपण जर आदिवासी भागात गेलो तर एखाद्या गावातील घरासमोरील अंगणात एक वृध्दा बसलेली असते. तेथेच अंगावर कपडे नसलेले लहान मूल ओरडत असते .अन्नान्न दशेत जीवन कंठणारे हे कुटूंब असल्यामुळे अन्नाचा शोध घेण्यासाठी त्या मुलाचे आई वडील घरा बाहेर गेलेले असतात . वेळेवर पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे त्या लहान मुलाचे कुपोषण होत असते हे कुपोषण टाळणे आवश्यक आहे... .नंतर सरफरे

श्री.सुरेश नवले...

हा गंभीर मुद्दा मी आपल्या निदर्शनास आणतो.आपण हे दृश्य बदलणार आहोत की नाही? सामान्य माणसाचा अधिकार आहे, शेतकऱ्याचा अधिकार आहे, शेतमजुरांचा अधिकार आहे, त्या अधिकाराचा फायदा राज्य सरकार त्यांना देणार आहे की नाही? आपण या सर्व गोष्टींवर कोटयावधी रुपये खर्च करतो परंतु सामान्य माणसाला त्याचा फायदा होत नाही. त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुविधा दिल्या जात नाहीत.म्हणून सर्वसामान्य माणूस खाजगी डॉक्टराच्या आश्रयाला जातो, त्याच्या वाटेने जातो, आणि त्याठिकाणी त्याची आर्थिक पिळवणूक होते ही वस्तुस्थिती आहे. आपण आदिवासी भागामध्ये गेलो तर त्या ठिकाणी आदिवासींची परिस्थिती यापेक्षा भयानक आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आदिवासी भागाचा दौरा केला आहे. त्या पाडयामध्ये राहणाऱ्या सर्वसामान्य आदिवासी माणसाच्या वाटयाला कोणत्याही प्रकारच्या आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत. आदिवासी भागामध्ये भूकबळी आणि कुपोषणाची संख्या सर्वात जास्त आहे. त्याठिकाणी त्यांना आरोग्याच्या सुविधा पुरवून त्यांना चांगले आरोग्य बहाल करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. ती जबाबदारी पार पाडण्यामध्ये आपण खरोखरच यशस्वी झालो काय? याचा अंतर्मुख होऊन विचार राज्य सरकारने करावा असा मी आग्रह धरतो. बालमृत्यूंचे आणि बालमाता मृत्यूचे प्रमाण अलिकडच्या काळात आटोक्यात आणण्यामध्ये आपल्याला यश आले असले तरी त्या बाबतीत म्हणावे तितके यश अजूनही आले नाही. हजाराच्या पाठिमागे 36 अर्भकांचा मृत्यू होतो ही परिस्थिती महाराष्ट्रामध्ये आहे. तेव्हा हजाराच्या पाठिमागे 36 अर्भकांचा मृत्यू होत असेल तर त्याचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, 30 हजार लोकसंख्येच्या पाठिमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र मिळते. प्रत्येक तालुक्याच्या बरोबरीने आपण त्यांना ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा दिला आहे.आदिवासी भागामध्ये 20 हजार लोकसंख्येच्या पाठिमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र देण्यासंबंधीचे निकष लागू केले आहेत. परंतु या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये काम करणारे डॉक्टर दोन वर्षानंतर राजीनामा देऊन घरी जातात. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी 20 हजार लोकसंख्येची अट लावली जाते ती अट शिथिल करावी. आणि किमान अंतराची अट त्याठिकाणी ठेवावी. दोन प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किमान एवढे अंतर असेल त्यापेक्षा जास्त अंतर असणार नाही अशाप्रकारच प्रयत्न आपण केला पाहिजे...

(वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात येते)

DGS/

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, मी आता फक्त माझ्या भाषणाची सुरुवात केली आहे. खेडापाडयातील आबालवृध्दांना, शेळया-मेंढयांच्या पाठिमागे जाणाऱ्यांना आरोग्य प्रदान करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. आपण ज्या खुर्चीवर बसलेले आहात,त्या खुर्चीकडून निश्चितपणे मला न्याय मिळेल अशी मी यानिमित्ताने खात्री बाळगतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये डेंग्यू, चिकनगुनिया,स्वाईन फ्ल्यू सारखे साथीचे रोग मध्यंतरीच्या काळात अचानकपणे आले. ज्याप्रमाणे अतिरेकी अचानकपणे येतात व माणसांना मारुन निघून जातात, त्याप्रमाणे साथीचे रोग अचानकपणे येतात आणि त्या साथीच्या रोगामध्ये माणसे पटा पटा मरतात. त्याकरिता शासनाने दोन गोष्टींची उपाय योजना करावी. ज्याप्रमाणे अतिरेकी येणार नाहीत यासाठी शासन काळजी घेते, त्याप्रमाणे साथीचे रोग पुन्हा येणार नाहीत याची आपण काळजी घेतली तर निश्चितपणे आपले आरोग्य चांगले राहू शकेल.

सभापती महोदय,आपण पहिलीपासून मॅट्रिकपर्यंतच्या म्हणजे दहावीपर्यंतच्या मुलांच्या आरोग्याची मोफत तपासणी करतो. मध्यंतरी बीड जिल्हयातील धारुर तालुक्यातील वडवणी या डोंगर पट्टयातील भागामध्ये मी जाऊन पहाणी केली असता 100 पैकी 70 विद्यार्थ्यांना हृदय विकार झाल्याचे आढळले. हृदय विकाराने विकलांग झालेल्या या मुलांवर शासन कोणत्याही प्रकारे शस्त्रक्रिया करीत नाही. यानिमित्ताने 1 कोटींपेक्षा जास्त मुलांचे सर्व्हेक्षण केले असता त्यामध्ये फक्त 315 हृदय विकार झालेल्या मुलांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. अशाप्रकारे महाराष्ट्रामध्ये हृदय विकार झालेल्या मुलांची तपासणी केल्यानंतर हे रोग आढळले. माझी राज्य सरकारला विनंती आहे की, हृदय विकार झालेल्या मुलांवर उत्तम प्रकारे मोफत शस्त्रक्रिया केली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये शेतकरी, शेतमजुरांची मुले आहेत, त्यांची आर्थिक परिस्थिती नाजुक आहे. त्यामुळे त्यांच्यावर आपण मोफत उपचार केले पाहिजेत. ही मुले शाळेमध्ये शिक्षण घेण्यासाठी जातात त्यावेळी त्यांचे आई-वडिल कामावर असतात. तेव्हा अशा परिस्थितीमध्ये ही गोजिरवाणी मुले शिकली पाहिजेत. ही वेलीवरची फुले उमलली पाहिजेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

प्रा. सुरेश नवले.....

यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. सभापती महोदय, या प्रयत्नामध्ये राज्य शासनाला निश्चितपणे यश येऊ शकेल. हा प्रस्ताव माझा आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने बहुतांश सदस्यांनी त्यांचा वेळ मला दिलेला आहे.(अडथळा) सभापती महोदय, या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री. रावते साहेबांनी सुध्दा मला वेळ दिलेला आहे. एकेकाळी ते माझे नेते होते आणि मी त्यांचा कार्यकर्ता होतो तेव्हा पासून त्यांचे आणि माझे ऋणानुबंध आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी हरकत एवढीच आहे की, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना कोणी कितीही वेळ दिला तरी 45 मिनिटांपेक्षा जास्त बोलण्याचा अधिकार प्राध्यापकांना नाही.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्रातील नागरिकांचे आयुर्मान वाढलेले आहे. महिलांना 69 आणि पुरुषाना 67 असे आयुर्मान मिळालेले आहे. आयुर्मानामध्ये तशी प्रगती झाली पण चाळीशी नंतर धडपडत जीवन जगणारे महाराष्ट्रातील प्रौढ आपल्याला पहायला मिळतात म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, वयाच्या चाळीशी नंतरच रोग शरीरात शिरायला सुरुवात होते आणि शरीरातील प्रतिकार शक्ती कमी होते. एकीकडे हे होत असताना दुसरीकडे डासांची प्रतिकार शक्ती वाढलेली आहे. डास उंच उंच भरारी घेऊ लागले आहेत गरुडांच्या पंखातील बळ या डासांच्या पंखात आले की काय अशी शंका निर्माण होते. म्हणजे निसर्ग एककडे माणसांना आयुर्मान देत असताना दुसरीकडे या माणसांवर हल्ला करणाऱ्या या डासांना सुध्दा बळ देत आहे, याचा संशोधकांनी, वैज्ञानिकांनी आणि राज्य शासनाने गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, आमदार निवासामध्ये ढेकणांची संख्या खूप आहे. आणि ते आमदार सोडून दुसऱ्याचे रक्त प्यायला तयार नसतात. ते आमदारांवर तुटून पडतात. त्यामुळे आमदार गॅलरीमध्ये आणि कार्यकर्ते आतमध्ये असतात. मग आमदारही विचार करतात की, ठीक आहे. कार्यकर्ता मुंबईला आला आहे ना, त्यालाही ढेकणांचे दर्शन होऊ द्यावे मग तो पुढच्या वेळी तो येण्याचा विचार करणार नाही असाही विचार करणारी काही मंडळी आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाच्या वतीने सुपरस्पेशालिटी रुग्णालय किंवा विशेष सुविधा रुग्णालय विभागीय स्तरावर ठिकाणी करण्यात येणार आहे. उदाहरणार्थ ते औरंगाबादमध्ये करण्यात येणार आहे. नागपूरमध्ये करण्यात येणार आहे. किंवा विभागाच्या ठिकाणी करण्यात येणार आहे.

...2..

SMT/ SBT/ ST/

प्रा. सुरेश नवले....

सभापती महोदय, जर नांदेडच्या पलीकडून एखाद्याला औरंगाबादला यायचे असेल तर 250 ते 300 कि.मी.अंतर कापून यावे लागते. आर्थिक परिस्थिती त्यांच्या बाजूने नसते म्हणून माझी राज्य शासनाला विनंती आहे की, आज ना उद्या हे सुपरस्पेशालिटी रुग्णालये जिल्हयाच्या ठिकाणी करण्याचा विचार करण्यात यावा.

सभापती महोदय, जीवनदायी योजना महाराष्ट्रामध्ये लागू आहे पण या योजनेचा फायदा दारिद्रयरेषेखालील लोकांनाचा होतो. महाराष्ट्रतील शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांना ही जीवनदायी योजना लागू केली तर त्याचा फायदा होऊ शकेल. कारण शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये निश्चितपणे धोरण जाहीर करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरा एक मुद्दा मुदत संपलेल्या औषधांच्या बाबतीत महत्वाचा आहे. मुदत संपलेली औषधे अनेक मेडिकल स्टोअर्समध्ये असतात. मुदत संपलेली औषधे आणि माती यामध्ये तसा फरक नाही. एक वेळ माती बरी असे म्हणण्याची वेळ येईल परंतु ही मुदत संपलेली औषधे अतिशय घातक आहेत. आता मातीचीही माती झालेली आहे त्यामुळे मातीही माती राहिलेली नाही. प्रश्न एवढाच आहे की, पूर्वी महिला गरोदर राहिल्यानंतर त्यांना माती खाविशी वाटायची. त्यांना डोहाळे लागयचे आणि त्या मातीचा शोध घ्यायच्या.

यानंतर श्री. बरवड...

प्रा. सुरेश नवले .....

आमच्या गंगावाडीतील आजी सांगतात की, आम्हाला डोहाळे लागल्यानंतर आम्ही खळ्यामातीमध्ये जावयाचो आणि ढेकळे खावयाचो. आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. आताची माती आणि मुदत संपलेली औषधे या दोघांचेही शरीरावर दुष्परिणाम होत असतात. त्यादृष्टीने आपण थोडा प्रयत्न करावा. मध्यंतरी महाराष्ट्रामध्ये काही हॉस्पिटल्समधून मुले चोरीला गेली. पूर्वी चित्रपटांमध्ये आम्ही असे दृश्य पाहात होतो की, खलनायक खिडकीतून उडी मारुन यावयाचा आणि बाळाला पाळण्यातून उचलून घेऊन पळून जावयाचा. आता महाराष्ट्रामध्ये बाळांची चोरी होत आहे. हा सिनेमा रुग्णालयांमध्ये दिवसाढवळ्या दिसू लागलेला आहे. हे बद करण्यासाठी शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावा.

सभापती महोदय, सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा की, ग्रामीण भागातील मुतारी आणि शौचालये यांची परिस्थिती पाहिली तर अंगावर काटा आल्याशिवाय राहणार नाही. त्या मुतारी आणि शौचालयामध्ये गेल्यानंतर ती दुर्गंधी नाकामध्ये जाते आणि ती एवढी असह्य होते की नाक गळून पडेल की काय अशी भीती निर्माण होते. शौचालयामध्ये गेल्यानंतर तेथील भिंतीवर विष्ठेचे नकाशे तयार झालेले असतात. तेथील विष्ठेमध्ये अळ्या असतात. शहरात राहणाऱ्या लोकांना ते दृश्य पहावणार नाही. ते अळ्यांचे सैन्य पाहिल्यानंतर त्या ठिकाणी जाण्याचे धाडस कोणी करणार नाही आणि कोणी गेला तर त्या अळ्या त्याचा फडशा पाडल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रातील हे चित्र आपण बदलणार की नाही ? हा महत्वाचा मुद्दा आहे. हे जे चित्र आहे ते अतिशय वाईट आहे. माझे बोलणे अतिशयोक्तीपूर्ण वाटत असेल तर ते विहंगम दृश्य मी माननीय मंत्रिमहोदयांना दाखविण्यास तयार आहे. हे महाराष्ट्रातील चित्र आहे. हे चित्र बदलण्याचा शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गेल्यानंतर ज्यांना रोग नसतो ते रोग घेऊन बाहेर येतात. महाराष्ट्रामध्ये असे चित्र असेल तर ते बदलण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. हे चित्र शासन बदलणार की नाही ? घुशी आणि उंदीर याबाबत मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये वाचले. धूस तरी केवढी असावी ? त्या घुशीकडे पाहिल्यानंतर मांजर क्षणभर थांबते आणि विचार करते हे

...2...

प्रा. सुरेश नवले .....

जनावर कोठून आले ? प्रशासनाने आपल्यासाठी काही बंदोबस्त केला आहे काय असा विचार करते. त्या घुशीला बघून मांजर पाठीमागे पळून जाते. अशा घुशी आणि उंदीर महाराष्टातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वास करीत असतील तर रुग्णांनी त्या ठिकाणी कसे जावयाचे हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आरोग्य खात्यामध्ये काही चांगले डॉक्टर्स आहेत. पद्मश्री तात्याराव लहाने यांनी या खात्यामध्ये उत्तम काम केले आहे. त्यांनी अंधांना दृष्टीदान देण्याचे डोंगराएवढे काम महाराष्ट्रामध्ये केले आहे. त्यामुळे केंद्र शासनाने त्यांना पद्मश्री दिली. आज आपल्या खात्याची जी प्रतिष्ठा अबाधित आहे ती अशा डॉक्टर्समुळे आहे. अशा डॉक्टरांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहावे असा आग्रह मी या निमित्ताने करणार आहे.

सभापती महोदय, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि इतर राज्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र राज्य शासनाच्या ताब्यात आहेत. फक्त महाराष्ट्रामध्येच प्राथमिक आरोग्य केंद्रे राज्य शासनाच्या अखत्यारित ठेवलेली नाहीत. आपल्या राज्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे जिल्हा परिषदेकडे ठेवलेली आहेत. या जिल्हा परिषदेकडे असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये काम करणाऱ्या ज्या परिचारिका आहेत त्यांचे जीवन असह्य होईल असे प्रसंग त्यांच्यावर गुदरत असतात. जिल्हा परिषदेच्या राजकारणाचे दुष्परिणाम प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये काम करणाऱ्या डॉक्टर्स आणि परिचारिकांना भोगावे लागतात. एकवेळ अशी येईल की, या सभागृहातील महिला सन्माननीय सदस्यांना त्या प्रश्नावर उठाव करावा लागेल. म्हणून ही सगळी प्राथमिक आरोग्य केंद्रे शासनाने आपल्या ताब्यात घेतली तर निश्चितपणे आपण लोकांना उत्तम प्रकारची सेवा देऊ शकू. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जे डॉक्टर्स असतात त्यांची आपण कंबाईन सीईटी ठेवलेली आहे. ती सीईटी वैद्यकीय शिक्षण विभाग घेते. ती कंबाईन सीईटी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत घेतली तर निश्चितपणे त्याचा फायदा होऊ शकतो.

यानंतर श्री. खंदारे .....

प्रा.सुरेश नवले....

प्रॅक्टीकली डॉक्टरांचे प्रश्न आहेत. 200 मार्कांची परीक्षा असेल तर 120 मार्क मिळाले तरच तुम्ही पास अन्यथा, नाही असा त्यांच्यासमोरचा प्रश्न आहे. या परीक्षेपासून अनेक डॉक्टर्स वंचित राहिलेले आहेत. सिव्हिल सर्जनला नॉन प्रॅक्टीसेस अलाऊंस देत नाही तोही देण्याचा प्रयत्न करावा. डायलेसिसची व्यवस्था प्रत्येक शासकीय रुग्णालयात करण्यात यावी. कारण ही व्यवस्था अनेक ठिकाणी नसल्यामुळे ती करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये लोकसंख्या नियंत्रित ठेवण्यासाठी व आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामध्ये अर्भक मृत्यू दर, माता दर, जन्म दर लक्षणीय प्रमाणात कमी करणे, मला वाटते की, ही उद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. ग्रामीण भागात काम करणारा माणूस मोकळा ढाकळा असतो. तो उत्तम प्रकारे जीवन जगतो. तरीही आमच्या ग्रामीण भागातील महिला लग्न झाल्यावर दुसऱ्या दिवशी कामाला गेलेल्या असतात. रोजगार हमी योजनेच्या कामावर जातात, ओढयावर धुणे धुण्यासाठी त्या जातात. त्यांच्या वाटयाला असे मधुचंद्र येत नाहीत. ही जर वस्तुस्थिती असेल तर ते चित्र बदलण्यासाठी प्रयत्न करावा. त्यांना आरोग्य द्यावे. कविवर्य विठ्ठल वाघ यांच्या एका कवितेची मला आठवण येते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना मी सांगू इच्छितो की, आपल्यासाठी ही कविता आहे. आपल्याला साहित्यामध्ये विशेष रस असल्यामुळे आणि आपलाच आदर्श डोळयासमोर असल्यामुळे आता थोडेफार आम्ही म्हणतो की, पुणेकरांनी जास्त ज्ञान संपादन केले असेल, त्यातील अंश आपल्या वाटयाला आला तर आपणही त्यामध्ये आनंद मानावा. शहरी भागामध्ये सर्व ठीक आहे. परंतु आमच्या ग्रामीण भागामधील महिला लग्न झाल्यावर दुस-या दिवशी पाणवठयावर असते. ती काम करते. सन्माननीय गृहमंत्र्यांच्या जिल्हयामध्ये आणि माझ्याही जिल्हयामध्ये हे सर्व दृश्य दिसते. त्यांना चांगले आरोग्य देण्याची जबाबदारी शासनाची आहे. कविवर्य विठ्ठल वाघ हे कवितेत काय म्हणतात ते सांगतो,

"काल पाणवठयावरी बाई गेले मी पाण्याले,
सख्या सोबतीने मला सा-या लागले पुसाले
तुझ्या हातातला हिरवा कुठे गेला वं बिल्लोर

2....

प्रा.सुरेश नवले....

हिरव्या बिल्लोरावरच झयकणार कनोर
होता उठून दिसत तूया गवाया हातात
सोनियाच्या अंगोठीत जसा हिराव काकत
त्याच्या आहिच पसंतीन म्या व बांगळया भरल्या
काल होतीस सांगत
आज कुठ लपवल्या
राती पलंगापासचा दिवा
इजोता इजोता
हात सख्याच्या हातुन
नाही आलाच सोळता
सरशेवटी किनई दिवा
इजू इजू गेला
मंग अंधारात बाई
तुवा बिल्लोर फुटला"

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, हा दिवा विझू द्या, परंतु त्यांच्या हाताला इलेक्ट्रीक दिव्याचे बटन येईल अशी व्यवस्था राज्य शासनाने करावी. सभापती महोदय, माझे विचार व्यक्त करण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि येथेच थांबतो.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी आरोग्य सेवेच्या संदर्भात अतिशय महत्वाचा व गंभीर प्रश्न मांडलेला आहे. त्यांनी या प्रस्तावावर बोलत असताना सुंदर कविता म्हणून दाखविली. या कवितेतील काही ओळींचा अर्थ आम्हाला समजला नाही, कारण आम्ही मुंबईत वाढलेलो आहोत, परंतु त्यांनी म्हटलेली कविता सुंदर होती, सुंदर आवाजात त्यांनी ती म्हणून दाखविली.

सभापती महोदय, या गंभीर प्रश्नाला वाचा फोडत असताना अनेक विषय सभागृहात मांडण्यात आले आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

(श्रीमती मंदा म्हात्रे....

त्या विषयाला मी परत हात घालणार नाही. परंतु शेतक-यांच्या दृष्टीने या प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या बाबतीत मला असे सांगावेसे वाटते की, शेतामध्ये काम करीत असताना शेताच्या बांधावर साप, विंचूने दंश केला किंवा कुत्रा चावला तर पूर्वी प्राथमिक आरोग्य केन्द्रातून शेतक-यांना औषधे मिळत होती. शेतकरी वर्ग हा गरीब आहे. तो 300-400 रुपयाचे औषध घेऊ शकत नाही. आता या प्राथमिक आरोग्य केन्द्राची परिस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागामध्ये शेतक-याला किंवा कोणत्याही व्यक्तीला जर सर्प किंवा विंचू दंश झाला किंवा कुत्रा चावला तर त्यांना ती औषधे दिली जात नाहीत. तेव्हा या निमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, ग्रामीण भागामध्ये जेथे जेथे प्राथमिक आरोग्य केन्द्रे आहे त्या सर्व केन्द्रामध्ये सर्प दंश, विंचू दंश, रॅबीज वरील आणि अन्य रोगावरील औषधांची व्यवस्था करावी. ही औषधे फार महाग असतात आणि ग्रामीण भागातील शेतक-याला ती घेणे परवडत नाही. औषधांच्या अभावामुळे कित्येकांचे प्राण गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत. तेव्हा ही बाब माननीय मंत्री महोदयांनी अतिशय गांभीर्याने घेऊन प्राथमिक आरोग्य केन्द्रातून अशा औषधाची व्यवस्था करावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी ग्रामीण भागातील आमच्या शेतकरी भगिनींच्या व्यथा येथे मांडल्या. आज सर्वात जास्त तास काम कोण करीत असेल तर ती आमची ग्रामीण भागातील महिला होय. सकाळी भाक-या बडविणे, शेतात काम करणा-या नव-यासाठी त्या शेतावर घेऊन जाणे, पुन्हा त्याला शेतीच्या कामात मदत करणे आणि सायंकाळी घरी आल्यानंतर पुन्हा स्वयंपाकाला जुंपणे, अशा पध्दतीने दिवसभर ही आमची भगिनी राबराब राबत असते. पण या भगिनीच्या आरोग्याची काळजी घेतली जात नाही. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी प्राथमिक आरोग्य केन्द्रोतील बाथरुम, शौचालये इत्यादींची जी अवस्था या ठिकाणी मांडली ती जर आम्ही जेवण्याच्या आधी मांडली असती तर आम्ही जेवलोही नसतो, इतके विदाराक चित्र त्यांनी या ठिकाणी मांडले. या प्राथमिक आरोग्य केन्द्राची दुरवस्था होऊ नये यासाठी आरोग्य खात्याने याकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये महिलांसाठी आरोग्य तपासणी कार्यक्रम राबविला गेला पाहिजे. ग्रामीण भागातील आमच्या भगिनी ह्या शेतामध्ये काम करीत असल्यामुळे त्यांना पोटाचे

..2..

(श्रीमती मंदा म्हात्रे...

विकार जास्त होतात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नसतात. अशा परिस्थितीमध्ये या भगिनी कशा प्रकारे जीवन जगत असतील याची कल्पना न केलेली बरी. तेव्हा या प्राथमिक आरोग्य केन्द्राना आवश्यक तो औषध पुरवठा करावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करते.

सभापती महोदय, मुंबई-पुणे आणि मुंबई-नाशिक महामार्गावर बरेच अपघात होतात. मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर, जव्हार, मोखाडा या ठिकाणी अपघात होतात, अपघातात अनेक जण मृत्यूमुखी पडतात. काही वेळा अपघातात कुटुंबच्या कुटुंब उद्ध्वस्त झाल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. या महामार्गावर शहापूर, जव्हार, मोखाडा दरम्यान ट्रॉमा केअर सेंटर उपलब्ध करुन द्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. शेवटी जेथे जेथे प्राथमिक आरोग्य केन्द्र असेल तेथे तेथे औषधे उपलब्ध करुन द्यावीत अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपविते.

..3...

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या दूरवस्थे संबंधी नियम 260 अन्वये या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये अनेक वेळा डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत विविध माध्यमातून चर्चा होते. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अनेक डॉक्टरांची पदे रिक्त असून ती भरण्याबाबत सभागृहामध्ये आश्वासने दिली जातात. परंतु ती पदे न भरली गेल्यामुळे पुन्हा दुस-या अधिवेशनामध्ये त्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित करावा लागतो. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये परिस्थिती अशी आहे की, कोणताही रुग्ण गंभीर आजारी असेल, त्याला अतिदक्षता विभागात ठेवायचे असेल तर एक तर त्याला गोव्याला, कोल्हापूर किंवा मुंबईला हलवावे लागते आणि कित्येक वेळा रुग्णाचा वाटेतच मृत्यू होतो. याबाबतीत वारंवार लक्ष वेधूनही आरोग्य विभाग त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयामध्ये जेव्हा श्री. दिग्विजय खानविलकर हे सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री होते त्यावेळी फिलिप्स कंपनीची सी.टी.स्कॅन मशिन घेतलेली आहे. ही मशिन टाकावू झालेली आहे. त्याठिकाणी सी.टी.स्कॅन मशीन आहे.....

...नंतर श्री. भोगले...

श्री.परशुराम उपरकर.....

परंतु त्या मशिनचा वापर सुरु झाल्यापासून आतापर्यंत किती वेळा आणि किती रुग्णांची तपासणी करण्यात आली याचा आढावा घेतला तर त्याचा आऊटपूट आपल्या लक्षात येईल. 20 वर्षापेक्षा अधिक काळापूर्वी खरेदी करण्यात आलेले मशिन स्क्रॅप करुन नवीन मशिनचा पुरवठा त्वरित केला पाहिजे. आज त्याठिकाणी एक्स-रे मशिन उपलब्ध आहे. परंतु एक्स-रे काढण्यासाठी तंत्रज्ञ उपलब्ध नाही. त्यामुळे तातडीने आवश्यक असलेली सर्व रिक्त पदे भरण्यात यावीत अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आयुष योजना सुरु केली. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये या योजनेची जाहिरात दिली गेली नाही. आयुष योजनेच्या माध्यमातून आयुर्वेदिक औषधांचे उपचार केले जाणार आहेत. प्रत्येक ग्रामीण रुग्णालय, प्रा.आ.केंद्र व आरोग्य उपकेंद्राच्या ठिकाणी आयुष योजनेद्वारे आयुर्वेदिक औषधोपचार होणार असले तरी एनआरएचएम अंतर्गत ही योजना राबवित असताना अद्याप सिंधुदुर्ग जिल्हयात जाहिरात का दिली जात नाही? या प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. एनआरएचएम अंतर्गत खरेदी करण्याच्या बाबीवर तातडीने निर्णय घेतला जातो. परंतु रुग्णसेवा देण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आयुष योजना ग्रामीण रुग्णालयात सुरु करण्यासाठी प्रयत्न व्हावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण शहरामध्ये एक ग्रामीण रुग्णालय आहे. पूर्वी नगरपालिकेमार्फत चालविण्यात येणारा दवाखाना आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. या ग्रामीण रुग्णालयाला मालवण शहरातील लोकवस्ती आणि ग्रामीण भाग जोडलेला आहे. या ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन पदे रिक्त आहेत. एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून ते अनेकदा रजेवर जातात. वैद्यकीय अधिकारी रजेवर गेल्यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नाही. या ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची आवश्यकता आहे. या ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध नाहीत. त्याठिकाणी तातडीने निवासस्थानाचे बांधकाम करण्याची गरज आहे. मालवण शहरामध्ये हत्तीरोगाचा प्रादुर्भाव सातत्याने दृष्टोत्पत्तीस दिसून येत आहे. गेल्या 20 वर्षाच्या काळात या भागातील हत्तीरोगाचे उच्चाटन होऊ शकलेले नाही. शासनामार्फत अनेक उपाययोजना

..2..

श्री.परशुराम उपरकर.....

केल्या जातात. परंतु अजूनही हत्तीरोगाचे रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे मालवण ग्रामीण रुग्णालयाचे उप जिल्हा रुग्णालयात रुपांतर करावे आणि तेथे तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची तातडीने नियुक्ती करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, आज सिंधुदुर्ग जिल्हयात मोठ्या प्रमाण युरिन स्टोनचे रुग्ण आढळून येत आहेत. लेझर तंत्राच्या माध्यमातून युरिन स्टोन नष्ट केले जातात. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लेझर तंत्राची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे डॉक्टरांकडून या उपचारासाठी रुग्णांना कोल्हापूर येथे पाठविण्यात येते. कारण या संदर्भातील मशिनरी कोल्हापूर येथे उपलब्ध आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील युरिन स्टोनचे रुग्ण कोल्हापूर येथे जाण्यास तयार नसतात. आज दर महिन्याला कणकवलीसारख्या शहरामध्ये युरिन स्टोनचे सरासरी 200 रुग्ण, सावंतवाडी तालुक्यामध्ये सरासरी 250 रुग्ण उपचारासाठी डॉक्टरांकडे धाव घेत आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात मायनिंगचे काम सुरु असल्यामुळे वातावरणात धुळीकणांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. आरोग्य विभागाने या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याचे पद मागील एक वर्षापासून रिक्त आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी या पदावर वर्ग.1 च्या अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. मध्यंतरीच्या काळात वर्ग.2 च्या अधिकाऱ्याकडे जिल्हा आरोग्य अधिकारी पदाचा चार्ज देण्यात आला होता. या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रोटीन खरेदी, औषध खरेदी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन खूप मोठा भ्रष्टाचार केला. वर्ग.1 चे पद असताना या पदावर वर्ग.2 च्या अधिकाऱ्याची त्या पदावर तात्पुरती नियुक्ती केल्यामुळे त्यांच्या माध्यमातून बदल्या, खरेदी व नोकर भरती यामध्ये घोटाळा झालेला आहे. एका घोटाळ्याची चौकशी सुरु आहे. इतर घोटाळ्यांची सुध्दा चौकशी करण्याची गरज आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात तातडीने नियमित जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. आज जिल्हयातील प्रा.आ.केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व आरोग्य अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानांची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज निर्माण झाली आहे. या भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे निवासस्थाने व आरोग्य केंद्राच्या इमारतींमध्ये गळती होत आहे. ही गळती दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात यावी. जिल्हा

..3...

श्री.परशुराम उपरकर.....

परिषदेतील आरोग्य विभागामध्ये सुधारणा करण्यात यावी आणि सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे पद तातडीने भरले जाईल काय? ग्रामीण रुग्णालयांची दुर्दशा बदलण्यात येईल काय? याचे मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

नंतर 3एच.1...

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, ग्रामीण रुग्णालयांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी अत्यंत महत्वाचा प्रस्ताव सदनात चर्चेसाठी आणलेला आहे. या प्रस्तावावर बोलत असताना त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत तसेच सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी ज्या सूचना केल्या त्यांची पुनरावृत्ती न करता फक्त दोन ती सूचनाच मी या निमित्ताने करणार आहे.

महोदय, जिल्हा व ग्रामीण रुग्णालयामध्ये आज जे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करीत आहेत त्यांची परिस्थिती अशी आहे की, हे डॉक्टर्स फक्त कागदावरच असतात. कारण काही ठिकाणी तर पती आणि पत्नी सुध्दा असतात. त्यांचा दोघांचा मिळून जवळपास 1.40 लाख रुपये पगार ते घेत असतात, त्याव्यतिरिक्त एनपीए सुध्दा घेत असतात आणि रुग्णांना सेवा न देता क्वार्टर्समध्ये खाजगी दवाखाने चालवित असतात. इतकेच नव्हे तर ज्यांना मोफत आरोग्य सेवा द्यावयाची आहे, ज्यांच्यासाठी शासनाच्या योजना असतात त्यांच्याकडून वेगळा ऑन मनी घेतल्याशिवाय त्यांना सेवा देत नाहीत. अशा डॉक्टर्सवर कुठेतरी काऊंटर चेक ठेवून त्यांना रोखण्याची तरतूद सध्या नाही, ती तरतूद करणे आवश्यक आहे. कारण हे डॉक्टर्स शासनाच्या तिजोरीतून पगार घेत असतात परंतु ज्या लाभार्थ्यांसाठी शासनाची आरोग्य सेवा आहे त्यांच्यापर्यंत ती जात नाही म्हणून अशा डॉक्टर्सना कंडक्ट करणे आवश्यक आहे.

त्यानंतर दवाखान्यातील इतर स्टाफ, मग त्यात नर्सेस असतील हे लोक सुध्दा राजकीय लोकांच्या आश्रयाखाली असतात तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाची परिस्थिती अशी आहे की त्यांना उत्पन्न कोठून मिळते माहीत नाही पण ते व्यसनाधिन झालेले असतात आणि कोणतीही मशिनरी हाताळत असताना त्यांचे हात मात्र नेहमी थरथरत असतात. अशा प्रकारे डॉक्टर हजर नसतात आणि इतर स्टाफची सुध्दा ही परिस्थिती असल्याने एकमेकांना सांभाळून घेण्याचेच काम चालते. याला काही ठिकाणी सन्माननीय अपवाद आहे, पण हे प्रमाण कमी आहे. पूर्वी हे प्रमाण जास्त होते परंतु आता मी वर सांगितलेल्या वस्तुस्थितीनुसारच सर्वत्र घडतांना दिसत आहे, म्हणून यासंबंधात नियंत्रण आणता येईल काय याचाही विचार होणे आवश्यक आहे.

महोदय, यानंतर मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अशा दवाखान्यांमधून मिळणारी औषधे बाहेर विकली जातात. सॅम्पल्सपोटी मिळणारी औषधेही रुग्णांना दिली जात नाहीत

श्री. भगवानराव साळुंखे .....

तर त्यांना प्रिस्क्रिप्शन्स लिहून दिले जाते व बाहेरुन ही औषधे आणण्यास सांगितले जाते. अशा प्रकारे हे दवाखाने केवळ निदान करणे व उपचार करण्यापलिकडे राहिलेले नाहीत, हे देखील खेदाने नमूद करावेसे वाटते. शासनाने अतिशय चांगली भूमिका घेऊन ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ऑपरेशन थिएटर्स सुरु केलेली आहेत. पण दुर्दैवाने या ठिकाणी किती ऑपरेशन्स केली जातात याचा सर्व्हे केला तर लक्षात येईल की, यातील कित्येक ऑपरेशन्समध्ये कित्येक महिन्यांपासून ऑपरेशन्स झालेलेच नाहीत. तेथे असलेले ऑपरेटस गंजलेले आहेत, त्यांचा उपयोग केला जात नाही. एवढे मोठमोठे ऑपरेशन थिएटर्स शासनाने तयार करुन दिलेले आहेत परंतु रुग्ण आमच्याकडे येत नाहीत असे सांगितले जाते. वास्तविक तेथे रुग्ण कसे येणार नाही, त्यांना कशा प्रकारे पळवून लावावयाचे याचे टेकनिक चांगल्या प्रकारे या डॉक्टर्स व इतर स्टाफला माहिती असते. कारण त्यांचे वेतन सुरक्षित आहे, नोकऱ्या सुरक्षित आहेत आणि रुग्णांना सेवा देताना मात्र या गोष्टींचे भान ठेवले जात नाही, याचे दु:ख वाटते.

महोदय, यानंतर दवाखान्यांच्या ठिकाणी असलेल्या वेहिकल्सची परिस्थिती तर अत्यंत खराब आहे. अनेक गाडया मोडकळीस आलेल्या असतात तर काही गाडयांचे टायर्स खराब असतात, काहींमध्ये स्टार्टिंग ट्रबल असतो आणि मोडतोड होऊन ती वाहने बाजूला पडलेली असतात तरी देखील अशा वाहनांचे दुरुस्तीसाठी शासन निधी देत नाही म्हणून वर्षानुवर्षे या गाडया गंजत पडलेल्या आहेत. म्हणून अशा दवाखान्यांमध्ये जी साधने दिली जातात ती इम्पॅक्ट आहेत की नाही हे पाहण्याची गरज आहे. तशी ती नसतील तर त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच येथील यंत्रणेने जी तत्परता दाखवायला पाहिजे ती दाखविली जात नाही. येथे उदाहरण देण्यात आले की, स्नेक बाईट, डॉग बाईटच्या केसेस आल्या तर अशा वेळेस इतर ठिकाणी घेऊन जाण्याची वेळ आली तर गाड्यांची व्यवस्था नसल्याने रुग्णांना नेता येत नाही. तसेच स्कॉर्पियो बाईट हा अत्यंत भयानक प्रकार आहे त्या रुग्णांपर्यंत शासनाकडून दिलेली औषधे पोहचत नाहीत. यासाठी चांगली यंत्रणा राबविली तर ज्या हेतूने शासनाने हे सर्व सुरु केले आहे तो हेतू साध्य होऊ शकेल, म्हणून याकडे लक्ष देण्याची गरज आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानतर श्री. जुन्नरे ....

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भात सनमाननीय सदस्य श्री. नवले साहेबांनी अतिशय चांगला प्रस्ताव या ठिकाणी आणलेला असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याची स्थिती अतिशय गंभीर आहे. आपल्या शासनाने सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भात पुष्कळ प्रयत्न केलेले आहेत. आपल्या राज्यात सुमारे 10579 उपकेंद्र असून 1816 प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, ग्रामीण रुग्णालये आहेत, सीव्हील हॉस्पीटल्स आहेत. सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भात एवढी सोय असली तरी सुध्दा रुग्णांचा शासकीय आरोग्य सेवेवर आता विश्वास राहिलेला नाही. सर्वसामान्य माणूस आजारी पडला तर तो नाईलाजाने शासकीय रुग्णालयात जात असतो हे आपल्याला मान्य करावे लागेल. जनतेचा शासकीय रुग्णालयावरील विश्वास का उडाला आहे याचा सुध्दा विचार करण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा ग्रामीण आरोग्य केंद्रात रुग्ण स्वत:हून जाण्यास कधीही तयार नसतो ही वस्तुस्थिती आहे. शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून काही चांगल्या गोष्टी सुध्दा केलेल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून लसीकरणाचे काम चांगल्या प्रकारे झालेले आहे हे सुध्दा आपल्याला मान्य करावे लागेल. त्याच प्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्राने कुटुंब कल्याणाचा कार्यक्रम फार चांगल्या पध्दतीने राबविलेला आहे हे सुध्दा आपल्याला मान्य करावे लागेल. परंतु सध्या प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अतिशय वाईट आहे. या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, अनेक प्राथमिक केंद्रावर बरीच रिक्त पदे आहेत. या ठिकाणच्या रिक्त पदांचा प्रश्न ख-या अर्थाने सोडविणे गरजेचे आहे. या निमित्ताने मी शासनास एक उपाय सूचवू इच्छितो की, आपल्याकडे एमबीबीएस डॉक्टरांची संख्या पुरेशी नाही परंतु आपल्याकडे बीएएमएस, बीएचएमएस तसेच बीयुएमएस झालेले डॉक्टर्स मोठया प्रमाणात आहेत. ग्रामीण किंवा शहरी भागात बरेचसे बीएएमएस, बीएचएमएस तसेच बीयुएमएस झालेले डॉक्टर्स ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करीत असतात. या डॉक्टरांना ॲलोपॅथीचे उपचार करण्याच्या संदर्भात अडचणी असल्या तरी वस्तुस्थिती अशी आहे की, हे सर्व डॉक्टर्स आज ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतांना आपल्याला दिसून येतात. या डॉक्टरांना

...2...

डॉ. सुधीर तांबे .....

जर आपण शासकीय सेवेत संधी दिली, त्यांच्यासाठी एखादा इंटीग्रेटेड कोर्स जोडला आणि त्यांना मॉडर्न मेडीसीनचे किंवा ॲलोपॅथीचे ज्ञान दिले आणि या डॉक्टर्सना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे धोरण घेतले तर मोठया प्रमाणात आपल्याला डॉक्टर्स उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे याबाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा असे मला वाटते.

सभापती महोदय सार्वजनिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स ब-याच वेळा रुग्णालयात हजर राहत नाहीत. अनेक डॉक्टर्स शहराच्या ठिकाणी राहत असतात व प्राथमिक आरोग्य केंद्रात कधी तरी जात असतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्रीच्या वेळेस डॉक्टर्स उपस्थित राहत नाही. रात्रीच्या वेळेस उखाद्याला जेव्हा साप चावला किंवा ॲटॅक आला तर त्या ठिकाणी डॉक्टर्स नसल्यामुळे या रुग्णाची स्थिती अतिशय वाईट होते व त्या रुग्णाला खाजगी दवाखान्यात जाण्याशिवाय मार्ग शिल्लक नसतो. खाजगी रुग्णालयात जाऊन ट्रिटमेंट घेणे फार महागडे झालेले आहे.

सभापती महोदय, अनेक लोक वैद्यकीय व्यवसायीकांना दोष देत असतात मी हे मान्य करतो की, प्रत्येक व्यवसायात एक वाईट बाजू असते. चुकीच्या गोष्टी वैद्यकीय व्यवसायात चालू असतील परंतु सर्वच गोष्टी वाईट आहेत असे आपण म्हणू शकत नाही. खरे म्हणजे हा प्रश्न या ठिकाणी चर्चेचा नाही. आज आपण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरवस्थेच्या संदर्भात चर्चा करीत आहोत. या ठिकाणी मला काही उपाययोजना सूचवावयाच्या आहेत. आजारांचे आपण ॲनालिसीस केले तर आपल्याला दिसून येईल की, 70 ते 80 टक्के आजार हे प्राथमिक स्वरुपातील असतात व हे आजार प्राथमिक आरोग्य केंद्रातच बरे होऊ शकतात. त्यामुळे येथील डॉक्टरांना चांगल्या प्रकारचे ट्रेनिंग देणे गरजेचे आहे. एखादा गंभीर आजार झाला, अपघात झाला आणि रुग्णाला कृत्रिम श्वास देण्याची वेळ आली तर प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स त्या रुग्णाला तसा उपचार देऊ शकत नाही. त्यामुळे जो महत्वाचा काळ असतो तो वाया जातो व रुग्ण शहरापर्यंत पोहचे पर्यंत दगावतो.

यानंतर श्री.भारवि.....

डॉ.सुधीर तांबे...

ग्रामीण भागामध्ये संर्पदंशासह अनेक अतिशय गंभीर आजार आहेत. यासाठी प्राथमिक स्वरूपाचा जो प्रथमोपचार लागतो त्याचे प्रशिक्षण या डॉक्टरांना नसते. त्यांनी पदवी घेतलेली असते. परंतु, मधल्या काळात जे बदल होतात त्याचे प्रशिक्षण मिळत नाही. पूर्वी शासकीय सेवेमध्ये जे वैद्यकीय अधिकारी होते त्यांना भूल देण्याचे देखील प्रशिक्षण दिले जात असे. कारण तेव्हा पुरेशा प्रमाणात भूल तज्ज्ञ नव्हते. ज्या इमर्जन्सी सेवा आहेत त्याचे प्रशिक्षण शासनाने डॉक्टराना दिले तर त्याचा सुद्धा चांगला उपयोग होऊ शकेल. गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रे ही गावापासून बऱ्याच लांब अंतरावर असतात. यामध्ये शासनाची विचित्र मागणी असते की, जागा मोफत मिळाली पाहिजे. मी येथे आर.एच.चे उदाहरण सांगू इच्छितो. त्याची नोंद माननीय मंत्रिमहोदय घेतील अशी मला अपेक्षा आहे. आर.एच.वर आपण कोट्यवधी रूपये खर्च करतो. त्यावेळी शासनाचा हट्ट असतो की, ती जागा मोफत मिळावी. मोफत जागा उपलब्ध नसते. जी जागा उपलब्ध असते ती गावाच्या बाहेर असते. दूर दिली जाते. त्यामुळे नागरिक त्याचा उपयोग करून घेऊ शकत नाही. शासनाने आज किती तरी आर.एच.उभे केले आहेत. त्याचा आढावा घेतला तर खरोखर किती काम चालू आहे हे लक्षात येईल. बऱ्याच वेळा सर्जन असतो तर भूल तज्ज्ञ नसतो. एक्सरे मशिन आहे, तर रेडिऑलॉजिस्ट नाही अशी परिस्थिती असते. शासनाने कोट्यवधी रूपये खर्च केले आहेत. त्यापैकी खूप कमी भाग खऱ्या अर्थाने उपयोगी आला आहे असे माझे मत आहे. म्हणून यासंबंधी देखील शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरीज आहेत. आपल्याला माहिती आहे की, तेथे डीएमएलटी धारक काम करीत असतात. मध्यंतरी कोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे डीएमएलटीचा प्रश्न तातडीने सोडविणे गरजेचे आहे. जेणे करून ग्रामीण भागातील लोकांना प्रयोगशाळा उपलब्ध होऊ शकतील.

ग्रामीण भागामध्ये अनेक लोक शेतामध्ये काम करतात. येथे हत्ती रोगाचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच ब्रूसोलेसिस नावाचा देखील फार मोठा आजार आहे. हा आजार सुप्तरित्या लागतो. या आजारात रूग्णाचे खांदे दुखतात. त्याचे निदान होऊ शकत नाही. शेतीमध्ये काम करताना शेतकऱ्यांना जे आजार होतात त्या आजारांवर देखील संशोधन करणे गरजेचे आहे.

डॉ.सुधीर तांबे...

ब्रूसोलेसिस सारखा आजार आहे. त्याच्यावर अतिशय साधी उपाययोजना आहे. त्याचे निदान निश्चितपणाने झाले तर रूग्णाला निश्चितपणे चांगले उपचार मिळू शकतात.

मी येथे शेवटचा मुद्दा मांडणार आहे. तो पोस्ट मार्टेम रूमचा आहे. बऱ्याच ठिकाणी आपण बघतो की, अपघात घडल्यानंतर सायंकाळी मृतदेह आणला जातो. तेथे जर लाईटची व्यवस्था नसेल तर पोस्ट मार्टेम करू शकत नाही. दु:खद घटना घडलेली असताना ती बॉडी सकाळ पर्यंत ठेवली जाते. अतिशय साधी गोष्ट आहे. पोस्ट मार्टेम स्वरूप आपण व्यवस्थित करून घेतल्या तर काहीही अडचण येणार नाही. परंतु, तेथील व्यवस्था चांगली नसल्यामुळे नातेवाईकांना अनेक तास शव ताब्यात घेण्यासाठी तिष्ठत रहावे लागते. तेव्हा ही बाब देखील शासनाने गांभीर्याने घ्यावी अशी माझी विनंत आहे.

सभापती महोदय, आता औषधे महाग होत चालली आहे. पण जनेरिक औषधे अतिशय स्वस्त असतात. त्याला ब्रँड नेम नसते. ते औषध अतिशय स्वस्त असते. शासनाने जनेरिक औषधे सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ठिकठिकाणी उपलब्ध करून दिली तर नागरिकांचा औषधावर होणारा खर्च अतिशय कमी होऊ शकतो. मी येथे काही मुद्दे मांडलेले आहेत. त्याचा शासनाने जरूर विचार करावा. सभापती महोदय, आपण मला येथे बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

.....

...3

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आरोग्य विषयक प्रश्नावर प्रा.सुरेशजी नवले यांनी अत्यंत चांगला प्रस्ताव मांडला आहे. त्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

आज आपल्याला आरोग्य विषयक असमान परिस्थिती महाराष्ट्रात आणि समाजामध्ये पहायला मिळत आहे. आयुर्मान कोणाला मिळते ? जो आरोग्य विकत घेऊ शकते त्याला आयुर्मान मिळते. त्यांचे आयुर्मान वाढलेले असते. पण ज्यांच्यामध्ये आरोग्य विकत घेण्याची क्षमताच नाही किंवा क्षमता कमी प्रमाणात आहे, अशा लोकांना आपले आरोग्य सांभाळणे फार कठीण जाते. यामध्ये अवेरनेस हा फार मोठा प्रश्न आहे. कितीही शहरीकरण झाले असले तरी ग्रामीण भागामध्ये फार मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या आहे. ग्रामीण भागामध्ये शेतीवर विसंबून काम करणाऱ्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. शेतकरी महिला आणि शेतमजूर महिला

यानंतर श्री.गायकवाड...

ॲड.उषा दराडे .....

आणि मागास वस्त्यांमध्ये राहणा-या महिला आरोग्याला बळी पडत असल्याचे दिसून येते महाराष्ट्राची जर पहाणी केली तर 95 टक्क्यापेक्षा जांस्त महिलांमध्ये ॲनिमिया, बी कॉम्पलेक्स , आयर्नची डिफिशियन्सी आहे तसेच अनेक ठिकाणी कुपोषित बालके जन्मतात असे आढळून येईल. या सगळया परिस्थितीचा संबंध अर्थकारणाशी असतो आपल्याकडील अर्थव्यवस्थेमध्ये समान विकास होत नाही. सामाजाचा समान आर्थिक विकास होत नाही. त्याचबरोबर आपल्याकडे क्रयशक्ती समान नाही त्यामुळे शासनाने प्रत्येकाच्या दारात आरोग्य देण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा फायदा होत नाही या सर्व परिस्थितीवर मात करावयाची असेल तर आरोग्याचा मुलभूत अधिकार देणे गरजेचे आहे.ज्याप्रमाणे शिक्षणाचा मुलभूत अधिकार आपण मागत आहोत त्याचप्रमाणे आरोग्याचा देखील मुलभूत अधिकार दिला पाहिजे त्याचबरोबर त्यासाठी तरतूद वाढवून दिली पाहिजे तसेच समाजामध्ये अवेअरनेस निर्माण करण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील महिला आजार टोकाला जाईपर्यंत औषधोपचार घेत नाहीत . ग्रामीण भागात राहणा-या एखाद्या महिलेला जर गर्भाशयाचा कॅन्सर झाला असेल तर मरणासन्न अवस्थेत जाई पर्यंत या महिला डॉक्टरांकडे जाऊन ओषधोपचार घेण्याबाबत घरातील लोकांना सांगत नाहीत.इतकेच नव्हे तर एखाद्या महिलेची पाठ दुखत असेल वा डोके दुखत असेल तर तसे सांगण्याचे धाडस सुध्दा सामान्य महिलामध्ये नाही. या महिलेने स्वत:साठी जगावयाचे नाही. त्या महिलेने फक्त श्रम करावयाचे, तिने मुलांना जन्म द्यावयाचा, वंश वाढवावयाचा ,कुटुंब सांभाळावयाचे असते. इतरांसाठी सतत श्रम करीत असतांना स्वत:च्या अस्तित्वाकडे ती लक्ष देत नसते तेव्हा यासंबंधी तिच्यामध्ये अवेअरनेस निर्माण करण्याची आवश्यकता आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये, तसेच झोपडपट्टयामध्ये वा मागास वस्त्यांमध्ये राहणा-या लोकांमध्ये जर आरोग्य विषयक अवेअरनेस निर्माण करण्याचा कार्यक्रम शासनाने राबविला तरच सध्या ज्या सुविधा दिल्या जातात त्या सुविधा अधिक चांगल्या प्रकारे देता येतील.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे.हुंडा प्रतिबंधक कायदा,बालविवाह प्रतिबंधक कायदा,भ्रृण हत्या प्रतिबंधक कायदा इत्यादी अनेक कायदे आपल्याकडे आहेत.बाल विवाह प्रतिबंधक कायदा राज्यामध्ये असतांनासुध्दा लहान मुलींची लग्ने लावली जातात.

ॲड.उषा दराडे .....

13 ते 16 वयाच्या मुलीचे विवाह होण्याचे प्रमाण राज्यात अधिक आहे. लहान वयात मुलींचे विवाह झाल्यामुळे तिचे आरोग्य ढासळते.वयाच्या तिसाव्या वर्षी तिला चष्मा लागतो,चाळीसाच्या वर्षी ती साठ वर्षामध्ये येते आणि त्यानंतर साठावे वर्ष गाठता येईल किंवा नाही याची शाश्वती देता येत नाही. तेराव्या वर्षी जर मुलीचे लग्न झाले तर चौदाव्या वा पंधराव्या वर्षी तिला मूल होते ही परिस्थिती ग्रामीण भागातील मागासलेल्या समाजामध्ये आहे त्याचबरोबर शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये देखील आहे.

सभापती महोदय , बीड जिल्हयात आरोग्य विषयक परिस्थिती अत्यंत वाईट आहे व त्या गोष्टीचा मी नेहमीच उल्लेख करीत असते.त्या ठिकाणी बाल विवाह मोठया प्रमाणावर होत असून त्याला गेट केन विवाह असे म्हटले जाते.बीड जिल्हयात लहान मुलीचा विवाह जुळवला जातो. कोयता म्हणून नव-या बरोबर बायकोला जावयाचे असते. बीड जिल्हयात 25 हजार रुपये मुकादमाकडून उचल दिली जाते. कमरेवर कोयता ठेवावयाचा आणि पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या आजूबाजूला असलेल्या ऊसाच्या फडात ऊस तोडण्यासाठी जावयाचे अशी त्याचीअवस्था आहे. 25 हजार रुपये ॲडव्हान्स मिळावा म्हणून तेराव्या वा चौदाव्या वर्षी मुलीची लग्ने लावली जातात . या मुलीला गर्भ राहिला तर अत्यंत क्रूरपध्दतीने गर्भपात केला जातो . गर्भपात करण्यासाठी तिला दवाखान्यात नेले जात नाही.राज्यात भृणहत्या कायदा व बाल विवाह प्रतिबंधक कायदा असला तरी मोठया प्रमाणावर भृणहत्या केली जाते व बाल विवाह देखील लावले जातात.. काल परवा एका दवाखान्यात 15 अर्भके मारुन टाकलेली आहेत अशी एका वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. बीड जिल्हयात भृणहत्या होत नाही असे सांगितले जात असतांना मुलांच्या आणि मुलींच्या संख्येत मात्र असमानता दिसून येत आहे. बीड जिल्हयामध्ये एक हजार मुला मागे 843 मुली असे प्रमाणे आहे आणि शिरुर(कासार) तालुक्यामध्ये 1 हजार मुलामागे 799 इतकेच मुलींचे प्रमाण आहे.यावरुन मोठया प्रमाणावर भ्रृण हत्या होत आहे असे दिसून येईल. हे प्रकार थांबावेत यासाठी शासनाकडून मोठया प्रमाणावर निधी दिला जातो व विविध कार्यक्रम राबविले जातात परंतु त्याची प्रत्यक्षात परिणामकारक अंमलबजावणी होत असतांना दिसून येत नाही.

3..

VTG/ KTG/ SBT/ D/ ST/ प्रथम श्री.भारवि 16.30

ॲड.उषा दराडे .....

सभापती महोदय, प्रत्येकाची काम करण्याची इच्छा असली पाहिजे. केलेल्या कामावर प्रत्येकाने प्रेम केले पाहिजे. शाहू, फुले, आंबेडकरांचे हे राज्य आहे असे प्रत्येकजण म्हणत असतो परंतु आपल्याला दिलेल्या कामावर आपण किती प्रेम करतो हे प्रत्येकाने तपासून पाहिले पाहिजे.डॉ.तात्यासाहेब लहाने यांनी वैद्यकीय क्षेत्रावर प्रेम केलेले आहे आणि नोकरी करीत असतांना सामाजिक दृष्टीकोन ठेवला आहे. त्यांच्या प्रमाणे इतरांनीही नोकरी करीत असतांना सामाजिक दृष्टीकोन ठेवला तर अधिक बरे होईल.असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आह. वैद्यकीय क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर शोषण केले जात आहे. अनेक ठिकाणी मक्तेदारी निर्माण झालेली आहे. कोणत्याही ठिकाणाच्या मल्टीनॅशनल हॉस्पिटलमध्ये आपण गेलो तर तेथील कर्मचारी काळया फिती लावून काम करीत असल्याचे आपल्याला आढळून येईल. तृतीय श्रेणी आणि चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे त्या ठिकाणी शोषण केले जाते त्यामुळे त्यांना आंदोलने करावी लागतात. या हॉस्पिटलमधील एका ऑपरेशनसाठी 65 हजार रुपये किंवा एक लाख रुपये फी घेतली जाते ....

नंतर श्री.सारफरे

ॲड. उषा दराडे...

दीड - दीड लाख रुपये डॉक्टर्स एका ऑपरेशनसाठी घेतात त्याठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मात्र दोन, तीन, चार हजार रुपये पगार दिला जातो. परवा एका हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांचा संप चालू होता. मी त्यांना विचारले की,काळया फिती लावून तुम्ही कशासाठी काम करीत आहात? त्यावेळी त्या म्हणाल्या की, "ताई मी गेल्या 20 वर्षापासून या हॉस्पिटलमध्ये काम करते, मला फक्त 4 हजार रुपये अजूनही पगार मिळत आहे". यावर शासन नियंत्रण आणणार आहे की नाही? एकीकडे तुम्ही सुविधा देत आहात आणि दुसऱ्या बाजूला उघडया डोळयांनी एक्सप्लॉयटेशन होत असल्याचे आम्ही पहात आहोत. ही खाजगी हॉस्पिटल्स या देशाच्या बाहेरची आहेत काय? ही आमच्याच जीवावर चालतात, आमच्याच लोकांकडून पैसे स्वीकारले जातात. असे एन.एम. कर्मचाऱ्यांचे हे प्रश्न आहेत.

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी प्रश्न विचारला की, आपण स्पेसिफिकेशन कोण कोणते सांगणार आहोत? एकाही सिव्हिल हॉस्पिटलमधील आणि एकाही ग्रामीण रुग्णालयातील औषधे आणि गोळया पेशंटपर्यंत जात नाहीत. त्याठिकाणी पॅरासिटेमॉलशिवाय दुसरे काहीही नसते, नाईस गोळयांशिवाय काहीच नसते. ड्रेसिंगच्या सामानाशिवाय काहीच नसते. जेवढया सुया वापरल्या जातात त्या पुन्हा सर्क्युलेट होऊन बाजारात येतात. हे मी दाव्यासहीत सांगू शकते. या संदर्भात कडक उपाय योजना करणे गरजेचे आहे. कोणत्या पध्दतीने हा भ्रष्टाचार थांबेल हे आपण पाहिले पाहिजे. या माध्यमातून शासन सेन्सेटिव्ह पध्दतीने काम करुन खूप देण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु त्यामधून ज्या पध्दतीने रिलिफ मिळावयास पाहिजे त्या पध्दतीने मिळत नाही. त्या पध्दतीने शासनाने काम करावे आणि आरोग्याचा मूलभूत अधिकार मिळेल यासाठी शासनाने स्वत:ची बांधिलकी मानावी अशाप्रकारचे विचार व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर प्रा. सुरेश नवले यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. त्याबाबत मी काही महत्वाचे मुद्दे याठिकाणी मांडू इच्छिते.

सभापती महोदय, ताजमहाल हे प्रेमाचे प्रतिक म्हणून मानले जाते, परंतु त्या मुमताज बेगम यांचा सोळाव्या बाळंतपणामध्ये मृत्यू झाला होता. त्यामुळे प्रेम, स्त्रियांची शारीरीक व स्त्रीरोग विषयक परिस्थिती यावर खूप वेगवेगळया पध्दतीने आपण विश्लेषण करु शकतो. 1994 साली इंटरनॅशनल कॉन्फरन्स फॉर पॉप्युलेशन डेव्हलपमेंट झाली. त्यानंतर आरोग्य विभागामार्फत लोकसंख्या कमी करण्याचे साधन म्हणून स्त्रीकडे पाहिले जात होते. आरोग्य विषयक ॲप्रोच बदलावा आणि एक नागरीक म्हणून स्त्रियांकडे पाहिले जावे याकरिता जागतिक स्तरावर धोरण आखले गेले, ते भारत सरकारनेही स्वीकारले. त्यानंतर राज्य सरकारने व भारत सरकारने एक वैचारीक अशी भूमिका स्वीकारली. त्यानुसार प्रत्येक विषयामध्ये त्यामध्ये आरोग्य असेल, हिंसाचार असेल, बाळंतपणाच्या संदर्भातील सोयी-सुविधा असतील, किशोरवयीन मुलींना त्या संदर्भातील माहिती देणे गरजेचे असेल याबद्दल एक व्यवस्थित कृती कार्यक्रम केंद्र व राज्य सरकारने स्वीकारला. मला या गोष्टीकडे लक्ष वेधले पाहिजे की, आज जिल्हा स्तरावरील सिव्हिल सर्जन, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे जाऊन आपले आरोग्य विषयक धोरण काय आहे? आणि त्याप्रमाणे आपण कोणता कृती कार्यक्रम आखला आहे? हे जर विचारले तर त्यामधील अज्ञान आपल्याला ठिकठिकाणी दिसून येईल.

मी स्वत: आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून मराठवाडयातील उदगीर येथे 3 वर्षे आणि पुण्याजवळ हडपसर येथे 10 वर्षे प्रॅक्टिस केली. त्याठिकाणी माझ्या असे निदर्शनास आले की, आरोग्य विषयक खाजगी सेवा, सरकारी हॉस्पिटल आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील सेवा, आणि फार मोठ मोठी असलेली हॉस्पिटल्स या तिन्हींच्या ठिकाणी पेशंट येतो त्यावेळी त्याची प्रेमाने विचारपूस व्हावी अशी साधी अपेक्षा असते. असे अनेक पेशंट मला भेटले त्यांनी सांगितले की, केवळ मजुरीसाठी किंवा घरामध्ये लग्न कार्य असेल तर किंवा आम्ही आजारी असलो तर आम्हाला बाहेर पडता येते. आणि म्हणून तुमच्याबरोबर बोलल्यामुळे आम्हाला बरे वाटत असले तरी आम्ही परत दवाखान्यामध्ये येतो. यामधून असा अर्थ निघतो की, एखादी बाई बाळंतीण होण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येते, किंवा एखाद्या सरकारी रुग्णालयामध्ये जाते

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्यावेळी तिची काय अवस्था होते? याबाबतीत सभागृहातील माननीय सदस्यांनी आपल्या पत्नीला जावून विचारावे. त्या हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरीसाठी गेल्यापासून प्रत्यक्ष डिलिव्हरी होईपर्यंतच्या काही तासामध्ये तेथील सेवक आणि डॉक्टर त्या स्त्रीबरोबर कसे वागतात? त्यावेळी सुखद अनुभव आलेले लोक किती आहेत? आपल्या ओळखीच्या माणसाबरोबर एखाद्या सार्वजनिक रुग्णालयामध्ये गेल्यानंतर सुध्दा त्याठिकाणी कळा देत असणाऱ्या स्त्रीकडून सातत्याने कळत न कळत पैशाची मागणी केली जाते.

(यानंतर सौ. रणदिवे)

डॉ. नीलम गोऱ्हे.....

मोठया रुग्णालयांमध्ये काही वेळ बेडपॅन वेळेवर न दिल्यामुळे टॉयलेटमध्ये त्या बाईची डिलिव्हरी होते. सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रात पहाणी करायला गेल्यावर मी स्वत: डोळयांनी पाहिलेले आहे की, तान्हेबाळ कॉटवर आणि पेशंट उघडयावर संडासला गेलेली आहे ही परिस्थिती असेल तर आपण नक्की कशा पध्दतीने मातृत्वाचा गौरव करतो हा प्रश्न मनामध्ये निर्माण होतो. म्हणून मला सांगावेसे वाटते की, पहिला कार्यक्रम घेण्याची आवश्यक आहे तो म्हणजे आलेल्या रुग्णाशी माणुसकीने वागण्याचा प्रयत्न करणे, प्रेमाने बोलणे. स्त्रियांची आतून तपासणी होत असताना पडदा नीट सारलेला आहे की नाही हे बघितले तर त्या पडद्यामधून डोकावणाऱ्या नजरा त्या बायका टाळू शकत नाहीत. अंगावरच्या साडीने पांघरुन घेण्याचा प्रयत्न करतात ही आज आमच्या बऱ्याचशा सार्वजनिक सेवेमधील महिला रुग्णांची परिस्थिती आहे. (वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात आली)

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, जन्मत: वेगवेगळया कारणांनी अपंगत्व, मतीमंद किंवा मुकबधीर असलेल्या मुलांचा सर्व्हेच आमच्या आरोग्य केंद्रावर होण्याची पध्दत नाही. बहुतेक कुटुंबामध्ये मुलामध्ये काही व्यंग आहे, कमीपणा आहे हे लपवून ठेवले जाते. ते मूल मोठे झाल्यावर ते उघडकीस येते ज्याच्या ज्यांच्या मध्ये अशा पध्दतीचे व्यंग आहे किंवा डिसॲबिलीटी आहे त्याच्या संदर्भात आसपासच्या गावात सर्व्हेक्षण केले पाहिजे, ही आज आरोग्य सेवेची प्राथमिक जबाबदारी आहे. त्या मुलांच्या गरजानुसार त्यांना समाजकल्याणाच्या योजना किंवा आरोग्य सेवेच्या योजनांचा लाभ मिळातो की नाही हे देखील पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा मनोरुग्णांच्या संदर्भात आहे. मनोरुग्णांचा पुरेसा सर्व्हे होत नाही. मनोरुग्ण अगदी टोकाचा झाला, शेवटच्या स्टेजला येऊन विचित्र वर्तन करायला लागल्यानंतर मग त्या मनोरुग्णाला सेवा मिळतात. मनोरुग्णांसाठी मानसिक चिकित्सा केंद्रे प्रत्येक जिल्हयामध्ये पुरेशी नाहीत. तालुका स्तरावर याची व्यवस्था असणे हे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझी चौथी सूचना कर्क रोगाचे लवकर निदान होण्याच्या संदर्भात आहे. खासकरुन स्त्रियांना गर्भाशयाचा आणि स्तनांचा जो कर्करोग होतो त्याची तपासणी माझ्या माहिती प्रमाणे सरकारी रुग्णालयामध्ये जवळ जवळ उपलब्धच नाही. मुंबई सारख्या ठिकाणी एखाद-

...2..

डॉ. नीलम गोऱ्हे....

दोन रुग्णालयात ही तपासणी होत असेल पण जिल्हास्तरावर या कर्करोगाच्या संदर्भातील निदानाची तपासणी मोफत उपलब्ध असली पाहिजे त्यासाठी जागृतीची एक मोहिम घेतली गेली पाहिजे. विशेषत: गर्भाशयाचा कर्करोग झाला तर नवरा सोडून देईन या भितीने ब-याचशा वेळेला स्त्रिया सांगत नाहीत, हे खरे आहे म्हणून स्तनांचा कर्करोग आणि गर्भाशयाचा कर्करोग याची तपासणी झाली पाहिजे.

सभापती महोदय, माझी सहावी सूचना अशी आहे की, औषधांचा दर्जा चांगला असला पाहिजे हे गरजेचे आहे. सार्वजनिक रुग्णालयामध्ये जेव्हा बाळंतपण होते आणि ज्या स्त्रियां मुलींना जन्म देतात यासंदर्भात आम्ही स्वत: संभाजीनगर येथील रुग्णालयात सर्व्हे केला. तेव्हा बहुतेक प्रकरणांमध्ये असे दिसते की, ज्या स्त्रीला दुसरी किंवा तिसरी मुलगी झालेली आहे तिची विचारपुस करायला आणि तिला जेवण घेऊन सुध्दा कोणी आलेले नसते. आम्ही संभाजीनगर रुग्णालयाला याबाबत सूचना केली. माझी आरोग्य विभागालाही सूचना आहे की, दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी ज्या महिलांना रुग्णालयातून जेवण मिळत नसेल त्यांची काही ना काही जेवणाची व्यवस्था झाली पाहिजे. मी तर असे म्हणेन की, जिला दुसरी किंवा तिसरी मुलगी जन्माला आली आहे अशा स्त्रीला एक बिस्किटचा पुडा घेऊन विचारपूस करायला गेलो तरी तिला असे वाटते की, माझी कुणी तरी विचारपुस करणारे आहेत. पण सासरचे कोणी येत नाही. माहेरचे कोणी येत नाहीत. सगळे नाराज होऊन रुसल्यासारखे असतात. तेव्हा अशा स्त्रियांच्या पाठीमागे शासनाने उभे राहिले पाहिजे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रात हिंसाचार पीडित महिला, जळालेले रुग्ण आणि बलात्कार पीडित रुग्ण यांच्यासाठी मोठया रुग्णालयात समुपदेशन सेवा उपलब्ध नाही. काठवडेच्या प्रकरणाच्या वेळी मी बीडला स्वत: पाहिलेले की, मेडिकल सोशल वर्कर आणि कौन्सिलरच्या पोस्ट कोणत्याही रुग्णालयात भरल्या गेल्या नाहीत. तसेच अंधश्रध्दा पीडित लोक दिसतात त्यांना विज्ञानाची माहिती देणारी कोणतीही व्यवस्था नाही. सभापती महोदय, या विषयावर बोलावे तेवढे कमीच आहे.

...3..

डॉ. नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, के.ई.एम. रुग्णालयात श्रीमती अरुणा शानबाग या परिचारिकेवर वॉर्डबॉयने बलात्कार केला आजही ती कोमामध्ये आहे. इच्छा मरणाची चर्चा चाललेली आहे. या आरोग्य सेवेमध्ये परिचारिका आणि महिला कर्मचारी यांचे प्रमाण मोठे आहे त्यांच्या सुरक्षिततेसाठीसुध्दा विशाखा गाईड लाईन्सची अमलबजावणी आरोग्य विभागाने करणे गरजेचे आहे याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते तसेच सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी एका दुर्लक्षित प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे त्याबद्दल मी निश्चितपणे या प्रस्तावाचे समर्थन करते.

याननंतर श्री. बरवड...

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आदरणीय प्रा. सुरेश नवले साहेब यांनी आरोग्य विषयक जो प्रस्ताव चर्चेसाठी आणलेला आहे त्यासंदर्भात थोडक्यात माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सत्ताधारी पक्षाकडून तसेच विरोधी पक्षाकडून सर्व सन्माननीय सदस्यांनी राज्यातील आरोग्याच्या प्रश्नावर आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत, आपले मनोगत व्यक्त केलेले आहे. एकूण आरोग्य क्षेत्रात जी दुरावस्था निर्माण झालेली आहे ती सभागृहामध्ये मांडण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. या सभागृहातील काही सन्माननीय सदस्य मनोरा आमदार निवासमध्ये राहतात. परवा त्या ठिकाणी एक घटना घडली. एका व्यक्तीला हृदयविकाराचा झटका आला. त्यावेळी डॉक्टर उपलब्ध नव्हते. ॲम्ब्युलंस उपलब्ध नव्हती. मनोरा आमदार निवासमध्ये अशी अवस्था असेल तर राज्यातील ग्रामीण भागामध्ये, ज्या ठिकाणी आमचे सर्वसामान्य गोरगरीब राहतात, आदिवासी क्षेत्रात राहणारे लोक ज्या आरोग्य केंद्राचा फायदा घेतात त्या ठिकाणी किती दुरावस्था असेल याची कल्पना येते. ही चिंतनीय बाब आहे. मी दहावीत असताना एक धडा शिकलो. फ्लॉरेन्स नाईटिंगेल नावाची परिचारिका बॉर्डरवर सैनिकांची देखभाल किंवा सेवा करण्याचे काम करीत होती. सर्व सैनिक रात्री झोपल्यानंतर दिवे बंद असताना ती स्वत: दिवा घेऊन प्रत्येक बेडजवळ जाऊन सर्वांची अत्यंत आपुलकीने, जिव्हाळ्याने विचारपूस करीत असे. फ्लॉरेन्स नाईटिंगेल जिला आपण लेडी विथ लॅम्प म्हणतो तिच्या सारखी आत्मीयता, तिच्यासारखी मानसिकता आमच्या आरोग्य विभागामध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये आली पाहिजे. त्या ठिकाणी सोयीसुविधा कमी जास्त असतील. सगळ्या ठिकाणी सर्वच सेवा उपलब्ध होतील असे नाही. आम्ही अपेक्षा करतो त्या पध्दतीने सर्व सुविधा उपलब्ध होतील असे नाही परंतु आरोग्य केंद्रावर येणाऱ्या नागरिकांशी त्या पध्दतीच्या आत्मीयतेने, तळमळीने वागण्याची आवश्यकता आहे. अनेक आरोग्य केंद्रांमध्ये किंवा दवाखान्यांमध्ये सुविधा उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती आहे. काही ठिकाणी डॉक्टर्स नाहीत. काही ठिकाणी शस्त्रक्रियेसाठी सोयी उपलब्ध नाहीत. काही ठिकाणी औषधे नाहीत. परंतु या सगळ्या गोष्टींवर संबंधित विभागाचे जे अधिकारी असतील त्यांचे कोणत्या ना कोणत्या पध्दतीने नियंत्रण असावयास पाहिजे.

...2...

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदय, आम्ही ग्रामीण भागातील, आदिवासी भागातील अनेक रुग्णालयांना आणि प्राथमिक आरोग्य केंद्राना भेटी दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी चार चार महिने जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या नसतात. त्या ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार कसा चालू आहे, त्या ठिकाणी कोणकोणत्या अडचणी आहेत, त्या ठिकाणी येणाऱ्या पेशन्टची संख्या किती आहे, त्यांना आवश्यक त्या सुविधा मिळतात काय, कोणाच्या काही तक्रारी आहेत काय, ग्रामस्थांचे काय म्हणणे आहे, केंद्रावर येणाऱ्या लोकांचे काय म्हणणे आहे, लोकप्रतिनिधींचे काय म्हणणे आहे ते जाणून घेऊन त्यामध्ये निश्चितपणे सुधारणा करता येऊ शकतात, बदल करता येऊ शकतात, काही उपाययोजना करता येऊ शकतात. म्हणून जे अधिकारी आहेत त्यांनी यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. अधूनमधून या आरोग्य केंद्राना भेटी देऊन आढावा घेणे ही बाब सुध्दा अतिशय महत्वाची असल्यामुळे त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आंतररुग्ण एकही नसतो परंतु दुसऱ्या बाजूला त्या गावामध्ये जे चांगले दवाखाने असतात, खाजगी दवाखाने असतात ते पेशन्टने भरलेले असतात. त्या ठिकाणी बेडची व्यवस्था नसते ही वस्तुस्थिती आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये लोक का जातात, पैसे खर्च करुन लोक त्या ठिकाणी का जातात याचा विचार करावयास पाहिजे. शासकीय रुग्णालयांमध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ज्या पध्दतीचे उपचार मिळावयास पाहिजे, ज्या पध्दतीने रुग्णांकडे लक्ष द्यावयास पाहिजे त्या पध्दतीने लक्ष दिले जात नाही म्हणून लोक जास्त पैसे गेले तरी चालतील पण कर्ज काढून, इकडून तिकडून पैसे घेऊन खाजगी रुग्णालयांमध्ये जातात. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सर्वसामान्य लोकांना चांगले दर्जेदार उपचार कसे देऊ शकू यादृष्टीकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी डॉक्टर नसल्यामुळे दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. आमच्या ठाणे जिल्ह्यात वाडा, तलासरी, मोखाडा, डहाणू, जव्हार हे सगळे आदिवासी तालुके आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

श्री.रामनाथ मोते....

या तालुक्यांमधील खेडया पाडयावर, वाडया वस्त्यांमध्ये राहणारी जी आदिवासी मंडळी आहे त्यांना आरोग्याची सुविधा दिली नाही तर वेळप्रसंगी प्राण गमवावे लागतात. त्याठिकाणी 2-3 विद्यार्थ्यांना वेळेवर ॲम्ब्यूलंस मिळाली नाही. पोहोचल्यानंतर डॉक्टर उपलब्ध झाले नाही. त्यामुळे त्या मुलांचा सर्पदंशाने मृत्यू झाला. यासंदर्भात सभागृहात विषय मांडल्यावर चर्चा झाली आहे. यादृष्टीने विचार होण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रामध्ये काम करणारी जी मंडळी आहेत त्यांनी समर्पित भावनेने काम करण्याची आवश्यकता आहे. अशाप्रकारे काम करणारी मंडळी सेवा देऊ शकतात. ते उत्तम आरोग्य सेवा देऊ शकतात. उल्हासनगर येथील एका रुग्णालयात दोन महिलांचा प्रसूतीच्या काळात मृत्यू झाला आहे. अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणा-या वैद्यकीय क्षेत्रात काम करणा-या डॉक्टरांनी अत्यंत जबाबदारीने काम करण्याची आवश्यकता आहे. ही गोष्ट करता येऊ शकेल आणि शासनाने त्याची दखल घेण्याची आवश्यकता आहे, उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

NTK/

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विषयावर सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी चांगल्या भाषेमध्ये विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्यांकडून भाषणे केल्यावर नेहमी दोन तीन प्रश्न विचारले जातात. या भ्रष्टाचाराला जबाबदार असणा-यांना निलंबित केले जाईल काय, याप्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत केली जाईल काय, संबंधित अधिका-यांवर कारवाई केली जाईल काय असे प्रश्न विचारले जातात. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी बजेटमध्ये तरतूद केली जाते, पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली जाते. तरी सुध्दा आरोग्याच्या सुविधांबाबत अनास्था असेल तर हा पैसा कोठे जातो ? तत्कालीन पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी असे म्हटले होते की, वरच्या स्तरावरुन 1 रुपया पाठविला तर ग्रामीण भागामध्ये त्यापैकी 15 पैसे पोहोचतात. परंतु आता 15 पैसेही पोहोचत नाहीत. याचे कारण असे की, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले ते ऐकल्यावर सरकारचे प्रशासनावर, अधिका-यांवर नियंत्रण राहिलेले नाही असे दिसते. त्यामुळे राज्यात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आरोग्य सेवेसाठी बजेटमध्ये तरतूद केली जाते. परंतु ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये चादर नाही, गादी नाही, इक्विपमेंटस् दिसत नाहीत. म्हणून मी म्हटले की, सरकार खरोखर भ्रष्टाचारावर नियंत्रण आणणार आहे काय ? सभापती महोदय, शासकीय रुग्णालयात जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांची यादी माझ्याकडे आहे. राज्यातील कामगार विमा योजनेतील 18 हजार कामगार बदली कामगार म्हणून काम करीत आहेत. त्यांना कायम केलेले नाही. मग अशा स्थितीत या कर्मचा-यांकडून चांगल्या सेवेची अपेक्षा केली जाते. सरकार या कर्मचा-यांसाठी काही करणार आहे की नाही ?

3...

NTK/

श्री.किरण पावसकर....

सभापती महोदय, जीवनदायी योजनेसंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या योजनेच्या माध्यमातून 6500 शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये जीवनदायी योजना लोकप्रिय झाली होती, परंतु आता ही मरणदायी योजना झाली आहे. कारण तिला आर्थिक आधार दिला जात नाही. या योजनेतील 21 कोटी रुपये शासनाकडून येणे आहे. ते दिले जातील काय ? सध्या सरकारी हॉस्पिटलमध्ये औषध पुरवठा बंद करण्यात आला आहे. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांना 600 कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. मुंबईच्या रुग्णालयांना औषध विभागाकडून औषध पुरवठा बंद केल्याची बातमी आजच्या वर्तमानपत्रातून आलेली आहे. मग के.ई.एम. असेल नायर, जे.जे. सेंट जॉर्जेस या रुग्णालयासाठी देण्यात येणारा औषध पुरवठा बंद करण्यात आला आहे. या रुग्णालयात पेशंट वाढलेले आहेत. त्यामुळे बंद केलेला औषधांचा पुरवठा सुरु करण्यात यावा. सध्या औषधांच्या किंमती वाढलेल्या आहेत. सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागावर विचार करीत असताना या सर्व गैरव्यवस्थेला जबाबदार कोण असेल तर सरकार आहे. सरकारी यंत्रणा ठरवित असेल की, आपण याकडे दुर्लक्ष करावयाचे.

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. किरण पावसकर...)

एक वर्ष, दोन वर्ष प्रतिक्षा करणे ठीक आहे. परंतु 20-20 वर्षे रुग्णांना प्रतिक्षा करावी लागणार असेल तर अशा प्रकारच्या सार्वजनिक आरोग्य सेवेला नक्की काय म्हणायचे असा प्रश्न पडतो. सभापती महोदय, वर्तमानपत्रातून आरोग्य विषयक उपचाराच्या मोठमोठ्या जाहिराती आपण पाहतो. त्यामध्ये मुख्यत: किडनी स्टोन, संधीवात यावरील उपचाराच्या जाहिराती असतात आणि ही उपचाराची ठिकाणे पनवेल, ठाणे येथे असतात. गोरगरीब माणसे या जाहिरातीवर विश्वास ठेवून तेथे जाऊन औषधोपचार घेतात आणि बराचसा पैसा खर्च झाल्यानंतर आपली फसवणूक झालेली आहे हे त्यांच्या लक्षात येते. तेव्हा गोरगरीब रुग्णांची फसवणूक होऊ नये म्हणून अशा प्रकारच्या जाहिरातीवर आरोग्य खात्या मार्फत भविष्यात बंदी घातली जाणार आहे की नाही असा माझा माननीय मंत्री महोदयांना सवाल आहे. आरोग्याच्या संदर्भात ग्रामीण भाग आणि शहरी भाग असे दोन भाग असल्याचे येथे सांगण्यात आले. शहरी आरोग्याच्या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काही वेळा राजकीय मंडळीना आमदार निवासामध्ये हृदय विकाराच्या बाबतीत ट्रीटमेंट देता आली नाही. जिल्ह्याच्या ठिकाणी एखाद्या उद्योजकाला किंवा राजकीय मंडळींना तातडीने उपचार घ्यावयाचे असतील तर त्यांना मुंबईमध्ये आणण्याचा करत्न केला जाते. मी याबाबतीत गरीब किंवा श्रीमंत असा भेदभाव करीत नाही. कारण आरोग्य सेवेची गरज ही गरीब आणि श्रीमंत या दोघांनाही असते. तेव्हा अशा जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या व्यक्तीला मुंबईत चांगल्या हॉस्पिटलमध्ये आणावयाचे असेल तर त्यासाठी एअर लिफ्टची, एअर ॲम्ब्युलन्सची उपययोजना करणे नितांत गरजेचे आहे. एखाद्या उद्योजकाला किंवा राजकीय व्यक्तीला तातडीने मुंबईला उपचारासाठी आणावयाचे असेल तर या एअर ॲम्ब्युलन्सचा निश्चितच फायदा होऊन शकेल.

सभापती महोदय, या निमित्ताने मला आणखी एक सूचना करावयाची आहे ती म्हणजे माझे गाव आचरा हे आहे. तेथे शवविच्छेदन केन्द्र आठ वर्षापूर्वी मंजूर झालेले आहे. परंतु त्याठिकाणी शवविच्छेदन सेंटर कार्यान्वित झालेले नाही, शव विच्छेदन केले जात नाही. आम्ही ज्यावेळी भेट देतो त्यावेळी आमदार फंडातून निधी द्या असे अधिकारी आम्हाला सांगतात. त्या ठिकाणी आरोग्य

..2..

(श्री. किरण पावसकर...

केन्द्राची जागा आजही राज्य शासनाच्या नावावर नाही हे भयानक सत्य मी आपल्या समोर मांडतो. सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपणाला धन्यवाद देवून माझे दोन शब्द संपवितो.

--

..2..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता उल्लेख केला की, हृदय विकाराचा झटका आला त्यावेळी मनो-यामध्ये डॉक्टर उपलब्ध नव्हता. ॲम्ब्युलन्स उपलब्ध नव्हती. या बाबतीत वस्तुस्थिती मी मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. मनोरा आमदार निवासामध्ये एकच डॉक्टर आहे. मनोरा निवास तीन आहेत. त्या डॉक्टरांना तीनही निवासामध्ये जावे लागते. विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे (पाटील) यांना जेव्हा कापरे भरुन ताप आला त्यावेळी डॉक्टर उपलब्ध झाले नाहीत. त्याबाबतीत त्यांनी तक्रार केली. मी त्याबाबतीत माहिती घेतली. तेथे एकच डॉक्टर असल्यामुळे एका ठिकाणी डॉक्टर गेला तर दुस-या ठिकाणी तो नसतो. तेव्हा परिस्थिती नेमकी काय आहे याची मी माहिती घेतली. चार आमदार निवास आहेत. एकाच डॉक्टरला या चारही ठिकाणी जावे लागते. त्यामुळे डॉक्टर एकाच जागेवर सापडत नाही. संध्याकाळी 5 नंतर डाक्टर तेथे नसतात. मध्यंतरी अशी परिस्थिती होती की, मंत्रालय डिस्पेन्सरीतील डॉक्टर रजेवर गेल्यामुळे मनोरा आमदार निवासातील डॉक्टरला अर्धावेळ मनो-यातील डिस्पेन्सरीमध्ये आणि अर्धावेळ मंत्रालयातील डिस्पेन्सरीमध्ये जावे लागत होते. तेव्हा त्या ठिकाणी दोन डॉक्टरांच्या नेमणुका कराव्या लागतील. त्याबाबतीत मंत्री महोदयांनी विचार करावा. काही घटना घडली तर आपण डॉक्टरांवर आरोप करतो. हे डॉक्टर सेंट जॉर्जेस रुग्णालयाच्या अधिपत्याखाली असतात. परंतु अशी परिस्थिती असेल तर डॉक्टर बळी पडायला नको एवढया पुरताच हा विषय होता.

--

..यानंतर हिंदी भाषण ...

श्री सय्यद जमा (महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : माननीय सभापति जी, अभी यहां पर माननीय सदस्य ने मनोरा आमदार निवास का प्रश्न उठाया. मैं कहना चाहूंगा कि वहां पर यदि परमानेंट व्यवस्था न भी हो तो कम से कम सेशन के समय तो वहां पर मेडिकल संबंधी अच्छी व्यवस्था होनी ही चाहिए क्यों कि वहां पर बहुत सारे बुजुर्ग आमदार रहते हैं. उनमें से बहुत से मानानीय सदस्य डायबिटीज और ब्लड प्रेशर के मरीज रहते हैं. उनको कभी भी अटैक आ सकता है. इसलिए इमरजेंसी की स्थिति में माननीय सदस्यों को डाक्टरों की सुविधा समय पर उपलब्ध कराने के लिए कोई उचित व्यवस्था सरकार की ओर से आमदार निवास में होना बहुत आवश्यक है. एक दो घटनाएं मेरे सामने भी वहां पर हुई हैं जब इमरजेंसी की स्थिति में मरीज को हास्पीटल ले जाने की व्यवस्था तुरंत नहीं हो पायी थी.

तालिका सभापति : आप इस चर्चा के ऊपर अपना भाषण कर रहे हैं क्या ?

श्री सय्यद जमा : हां सर, मुझे इस चर्चा में भाग लेना है.

तालिका सभापति : लेकिन यहां पर माननीय सदस्य श्री टकले साहब को मैने बोलने के लिए कहा है. उनका नाम यहां पर बोलने के लिए है. उनके बाद माननीय मंत्री महोदया को उत्तर देना है और समय बहुत कम है.

श्री सय्यद जमा : माननीय सभापति जी, कृपया आप घंटी मत बजाना. मैं अपनी बात सिर्फ 5 मिनट में पूरी कर दूंगा. मुझे कहना है कि हमारी जो आरोग्य सेवा है उस बारे में अनेक माननीय सदस्यों ने अपने अपने सुझाव दिए हैं. सार्वजनिक आरोग्य सेवा की ग्रामीण लेवल पर क्या पोजीशन है वह हकीकत तो सभी को मालूम है. यह बात सही है कि पिछले कुछ सालों में केन्द्र सरकार और महाराष्ट्र सरकार ने सार्वजनिक आरोग्य सेवा में काफी सुधार किया है. लेकिन एक इन्हेरेंट डिफिकल्टी यह है कि हमारे डाक्टर और पैरा मेडिकल स्टाफ जगह पर नहीं मिलता है. संबंधित लोग हाजिरी लगाकर घर चले जाते हैं और जरुरत पड़ने पर वह स्टाफ अपनी जगह पर नहीं मिलता है. इस बारे में मैं कहना चाहूंगा कि हमारी जो सोशल सिस्टम है
उसके हम शिकार है.लेकिन हमारी यह जो पब्लिक हेल्थ सिस्टम है यह नेशनल पॉपुलेशन

श्री सय्यद जमा..

पॉलिसी से जुड़ी है. अपने देश में जब तक हम अपनी आबादी को करटेल नहीं करेंगे तब तक हमारी पब्लिक हेल्थ पॉलिसी बहुत इफेक्टिव नहीं हो पाएगी. हमारी सामाजिक तरक्की कितनी हुई है इसको मापने के के दो ही पैमाने हैं एक तो यह कि हमारे यहां पर लिटरेशी रेट क्या है और दूसरा यह कि हमारे यहां पर इन्फेंट मॉरटेलिटी रेट क्या है.इस बारे में सुधार की जरुरत है. पहले हमारा महाराष्ट्र राज्य पब्लिक हेल्थ सर्विस के बारे में बहुत ही अच्छा और अग्रणी राज्य था. लेकिन अब आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरल जैसे राज्य पब्लिक हेल्थ सर्विस के क्षेत्र में हमसे आगे जा रहे है. इन राज्यों में मेडिकल सर्विस बहुत ज्यादा इम्प्रुव हो रही हैं. वहां पर मेडिकल सर्विस ज्यादा विकेंद्रित हुई हैं और ग्रामीण भागों तक ये सुविधाएं वहां पर ज्यादा अच्छी तरहसे पहुंची हैं. लेकिन महाराष्ट्र में इस दिशा में प्रगति कुछ रुकी है. इसलिए मैं उम्मीद करता हूं कि महाराष्ट्र सरकार इस ओर विशेष ध्यान देगी. इस काम के लिए केन्द्र सरकार ने भी बजट अलोकेशन बढ़ाया है. और नेशनल रुरल हेल्थ मिशन के जरिए बच्चों और महिलाओं की मॉरटेलिटी रेट कम करने के लिए और उनको इम्युनाइज करने के लिए बहुत सारी योजनाएं बनायी हैं और वहां से महाराष्ट्र शासन को भी काफी ग्रांट प्राप्त होती है. लेकिन मुझे लगता है कि हमने अभी तक जो प्राइमरी हेल्थ सेंटर बनाए हैं उनकी संख्या कम है. हालत यह है कि अगर महाराष्ट्र में 35 जिले हैं तो डिस्ट्रीक्ट हास्पीटल सिर्फ 23 ही हैं. सभी जिलों में भी अभी तक हम जिला हास्पीटल नहीं बना पाये हैं. जबकि वे हमें बनाने चाहिए. यदि हम तालुका लेवल पर हास्पीटल नहीं बना सकते तो जिला स्तर पर तो कम से कम एक वेल-इक्वीप्ड हास्पीटल होना ही चाहिए. आज छोटे शहरों में भी कारपोरेट हास्पीटल का कल्चर आ गया है. इसलिए सभी लोगों का टेस्ट बदल गया है. आज हमारे यहां पर इंश्योरेंज कवरेज का कल्चर आ गया है. इसलिए मेरा कहना है कि यदि हम आम लोगों को तालुका लेवल पर प्राइमरी हेल्थ सेंटर या सब सेंटर नहीं दे सकते तो कम से कम जिला स्तर पर अच्छे हास्पीटल की व्यवस्था तो करनी ही चाहिए. यह मेरा सुझाव है.

माननीय सभापति जी, हमारे केबिनेट मंत्री महोदय और राज्य मंत्री महोदय ने कहा था कि हमारी जीवन दायी योजना में काफी सुधार हुआ है. इस बारे में मेरे कुछ सुझाव है मेरा कहना है कि जहां पर इलाज की व्यवस्था होती है उसमें बीपीएल कार्ड होल्डर तो रहते ही हैं

...3

श्री सय्यद जमा..

लेकिन आपके इस प्रोग्राम में वीकर सेक्शन भी शामिल है. मैं बताना चाहूंगा कि वीकर सेक्शन का सर्टिफिकेट लेने में संबंधित व्यक्ति को बहुत परेशानी होती है. इसलिए व्यवस्था ऐसी होनी चाहिए कि यदि क्रिटिकल पोजीशन में कोई पेशेंट हास्पीटल में आया है तो सरकार द्वारा हास्पीटल को आदेश देने चाहिए कि संबंधित व्यक्ति से बीपीएल का कार्ड या वीकर सेक्शन से संबंधित होने का प्रुफ मांगने के बजाय पहले मरीज का ट्रीटमेंट शुरु करना चाहिए. और बाद में आप बाकी फॉर्मेलिटीज को पूरा करिए. यदि किडनी ट्रांस्प्लांट करनी है तो ऐसे केस में इलाज के बाद काफी सतर्कता बरतनी होती है. पोस्ट सर्जरी ट्रीटमेंट काफी लंबा चलता है. मुझे कहना है कि पोस्ट सर्जरी ट्रीटमेंट का समावेश भी इस नयी जीवनदायी योजना में होना चाहिए. यहां पर हमारे कई माननीय सदस्यों ने कहा और मैं भी कहना चाहता हूं कि हमारे ग्रामीण क्षेत्र में जो गरीब लोग हैं जो बीपीएल का कार्ड नहीं ले पाते और गरीब किसान हैं, जिनको यह बीपीएल का कार्ड नहीं मिल पाता या वे खुद भी गरीबी की रेखा के नीचे के लोगों की लिस्ट में शामिल नहीं होना चाहते. ऐसे लोगों को भी नयी जीवनदायी योजना में शामिल करने का काम सरकार की ओर से होना चाहिए. इसके अलावा मैं कहना चाहूंगा कि हमारे यहां पर ऐसा सिस्टम है कि यदि कोई कम्पलेंट करेगा कि दवा नकली है तभी उसकी चेकिंग होती है. मेरा कहना है कि दवाई बनाने वाली जिस कंपनी से सरकार दवा लेती है वहां से लेकर नीचे तक उन दवाईयों का सेम्पल सर्वे होना ही चाहिए. 5-10 परसेंट दवाईयों का सेम्पल सर्वे होना ही चाहिए क्योंकि बाजार में बहुत सारी नकली दवाईयां आ गयी हैं. लेकिन उनको चेक करनी की कोई अच्छी व्यवस्था हमारे यहां पर नहीं है. एक बात मैं यह कहना चाहूंगा कि हमारे पेशेंट्स को जल्दी ट्रीटमेंट मिलने के लिए हमारे जो नेशनल हाइवे हैं या स्टेट हाइवे हैं वहां पर हमारे सरकारी हास्पीटल हैं तो ठीक है. यदि नहीं हैं तो क्रिटिकल पोजीशन में या इमरजेंसी की हालत में पेशेंट को ट्रीटमेंट देने के लिए सरकार कुछ हास्पीटल नॉमिनेट करे, उनका एक पॅनल बनाए क्योंकि एक्सीडेंट होने के बाद समय पर ट्रीटमेंट न मिलने की वजह से बहुत से पेशेंट्स की मृत्यु हो जाती है. मुझे पूरी उम्मीद है कि जो बातें मैंने कहीं हैं उनकी ओर हमारी महाराष्ट्र सरकार विशेष ध्यान अवश्य देगी. मैं यह

...4

श्री सय्यद जमा...

भी कहना चाहूंगा कि महाराष्ट्र सरकार हास्पीटल के रुप में खुद का इन्फ्रास्ट्रक्चर तैयार करने के बजाय सरकार द्वारा ग्रामीण क्षेत्र के गरीबों को इंश्योरेंस कवरेज दिया जाना चाहिए और उसका प्रीमियम सरकार द्वारा भरा जाना चाहिए. क्योंकि आज कल बहुत बड़े-बड़े कारपोरेट हास्पीटल हमारे यहां पर आ रहे हैं. वहां पर उन गरीब मरीजों का अच्छा इलाज हो जाएगा और हास्पीटल के रुप में खुद का बहुत बड़ा इन्फ्रास्ट्रक्चर तैयार करने की भी सरकार को जरुरत नहीं पड़ेगी.

माननीय सभापति जी, आपने मुझे बोलने का समय दिया इसके लिए आपको भी बहुत बहुत धन्यवाद.

-0-

(इसके बाद श्री खर्चे..

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : महोदय, आरोग्यविषयक सुविधांच्या अनुषंगाने जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे त्यावर माझे विचार मी थोडक्यात व्यक्त करणार आहे.

महोदय, योगायोगाची गोष्ट म्हणजे आजच सकाळी आरोग्य व्यवस्थेवरुन सभागृहात एक अभूतपूर्व प्रसंग अनुभवायला मिळाला. तो म्हणजे एका खाजगी इस्पितळाच्या प्रमुखाला येथे आणून ताकीद द्यावी लागली असे प्रसंग सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करणाऱ्या लोकांवर येऊ नयेत आणि सभागृहाला असा दुर्दैवी प्रसंग बघायला लागू नये एवढीच प्रामाणिक इच्छा आहे.

साधारणपणे आरोग्य सेवेचा विषय ज्यावेळेला आपण म्हणतो त्यावेळेस त्याच्याशी निगडित असलेले आरोग्य विषयक समाज शिक्षण हे देखील शेवटपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक ती प्रामाणिकता पाहिजे. आरोग्य विभागामार्फत वेगळ्या बाबींच्या संदर्भात काय करायला पाहिजे याचा सोप्या शब्दात, सोप्या भाषेत आणि सोप्या व्याख्यानाद्वारे छोट्या छोट्या रस्त्यांमध्ये जाऊन जर प्रसार केला तर लोक अधिक काळजी घ्यायला तयार होतील आणि आरोग्यावरील ताण काही प्रमाणात तरी कमी करता येईल. या निमित्ताने एकूणच व्यवस्थेबद्दल सुधारणात्मक तक्ता आपल्याला काढावयाचा झाला तर प्रत्यक्ष आजारी पडून, रोग होऊन मृत झालेल्यांची संख्या आणि आजारी पडून, रोग होऊन व त्यावर औषधोपचार किंवा डॉक्टरी इलाज न मिळालेल्यांची संख्या काढली तर त्यातून आपल्याला या व्यवस्थेचे बळी किती आणि रोगाचे बळी किती याचेही चित्र समोर येईल. अनेक ठिकाणी पोस्ट मार्टेमला जाणे हा सगळ्यात दुर्दैवी प्रसंग असतो. एखाद्या घटनेत ज्यावेळी पोस्ट मार्टेमची वेळ येते तेव्हा ज्या प्रकारची वणवण करावी लागते, संबंधितांना आणावे लागते ते किती दिव्य असते त्यातून लवकरच जनतेला बाहेर काढावे अशी माझी मंत्री महोदयांना सूचना आहे. प्रत्येक जिल्ह्याचे सिव्हील सर्जन या संपूर्ण व्यवस्थेचे प्रमुख असतात. आताच सभागृहात प्रसिध्द नेत्र तज्ज्ञ डॉ. लहाने यांचा उल्लेख झाला. त्या अनुषंगाने मी असे सांगणार आहे की, पूर्वीच्या काळात अनेक सिव्हील सर्जन होऊन गेले. नाशिक जिल्ह्यात सुध्दा डॉ. भालचंद्र म्हणून अत्यंत चांगले व प्रख्यात असे नेत्ररोग तज्ज्ञ होते. त्यांच्या नावाने दि. 10 जून हा दिवस "डॉ. भालचंद्र डे" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला व तो दिवस पाळायला आपण सुरुवात करीत आहोत. ते डोळ्याचे अतिशय चांगले डॉक्टर होते, तज्ज्ञ होते पण त्यांचा प्रशासकीय कामाचा वकूब किती होता हा प्रश्न वेगळाच असू शकतो. त्यामुळे जिल्ह्याचे

श्री. हेमंत टकले .....

जबाबदार म्हणून सिव्हील सर्जन वगैरे डॉक्टर्स असतील त्यांच्यासाठी रिफ्रेशर्स कोर्सेसच्या माध्यमातून प्रशासकीय प्रशिक्षण देऊन त्यांच्यावर या व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी टाकावी, यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. आजकाल बोगस डॉक्टर्स शोधून काढा अशी शासनाची मोहीम असते. कारण अंधश्रध्देमुळे अनेक लोक बुवाबाजीकडे जातात असे दिसून येते. पण हे लोक का जातात तर शासनाने जी आरोग्याची व्यवस्था उपलब्ध करुन दिलेली आहे त्यात .....

नंतर श्री. जुन्नरे .....

श्री. हेमंत टकले...

डॉक्टरांची संख्या पुरेशी नसल्यामुळे जनतेला नाईलाजाने या लोकांकडे जावे लागते व त्यामुळे तेथील व्यवस्था अजूनच खराब होऊ शकते. स्पेशालिटी, सुपर स्पेशालिटीचे तज्ञ मिळण्यासाठी शासनाने एक नवीन प्रयोग करावयास हरकत नाही. स्पेशालिस्ट डॉक्टर्सना एका एका जिल्हयात जाण्यासाठी एक वार ठरवून, फिरत्या वाहनामधून त्या त्या ठिकाणच्या वस्तीवर जाऊन तेथे आरोग्याचे डायग्नोस्टीक कॅम्प घेतले तर त्यातून निश्चितपणे मार्ग काढता येईल. महागडे तसेच फार वर्षाचे शिक्षण डॉक्टरांना घ्यावे लागत असते व नंतर हे डॉक्टर्स नोकरीमध्ये उतरतात. या डॉक्टरांना जर सरकारी नोकरी मिळाली तर ते डॉक्टर्स नोकरीच्या ठिकाणी राहत नाहीत त्यामुळे व्यवस्था कोलमडते. याचा अर्थ असा आहे की, आरोग्य खात्याला लागणा-या मनुष्य बळाचा व्यवस्थित विचार झालेला आहे असे दिसत नाही. राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्याला ज्या आरोग्य सेवा द्यावयाच्या आहेत त्यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ त्या त्या ठिकाणी कसे उपलब्ध करुन देता येईल यासाठी एक स्वतंत्र व्यवस्था करावयास पाहिजे.

जेव्हा एस.टी. महामंडळाची परिस्थिती वाईट होती त्यावेळेस वाहक आणि चालकांवर एका एका बसची जबाबदारी देण्यात आली होती. या चालकांनी व वाहकांनी ही बस व्यवस्थित ठेवायची, मेन्टेंनस व्यवस्थित ठेवायचा, बस स्वच्छ ठेवायची व ग्राहकांना चांगली सुविधा देण्याची जबाबदारी त्यांच्यावर दिली होती व हे करण्यासाठी त्यांना विशेष आर्थिक प्रोत्साहन देण्यात येत होते त्यामुळे अशा प्रकारची योजना आपण आरोग्य केंद्राना लागू केली तर चांगल्या प्रकारचा रिझल्ट मिळू शकेल असे मला वाटते. आरोग्य सेवेच्या ब-याच गोष्टी इन्फ्रास्ट्रक्चरवर अवलंबून आहेत. एनआरयुएचएम किंवा राज्याच्या योजनेतून जे काही उपचार केले जातात परंतु यापैकी कोणती कामे डॉक्टरांनी करावयाची व कोणती पॅरामेडीकल स्टाफने करावयाची व कोणती करावयाची नाही याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. जी कामे त्यांची नाहीत त्यासाठी ती कामे कंत्राटी पध्दतीने देऊन त्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी दिली तर ही व्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकेल.

सभापती महोदय, अपंगाना आज कोणत्याही प्रकारे सुविधा मिळत नाही. अपंगांना सर्टिफिकेट मिळवण्यासाठी ज्या यातना सहन कराव्या लागतात त्यातही बदल करण्याची

...2...

श्री. हेमंत टकले...

आवश्यकता आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र असेल, जिल्हा आरोग्य केंद्र असेल या ठिकाणी अस्वच्छता असते त्यामुळे या ठिकाणी चांगली स्वच्छता असण्याची गरज आहे. मला वाटते की, आरोग्य विभागासाठी मोठया प्रमाणात आर्थिक तरतूद उपलब्ध आहे परंतु या विभागाने जर योग्य पध्दतीचे नियोजन केले तर या व्यवस्थेमध्ये गुणात्मक बदल झाल्याशिवाय राहणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. त्यामुळे आरोग्य मंत्र्यांनी या सर्व गोष्टींचा विचार करावा अशी विनंती करुन मी माझे विचार थांबवितो.

...3...

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : आदरणीय सभापती महोदय, राज्यातील आरोग्याच्या व्यवस्थेसंदर्भात सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री परशुराम उपरकर, भगवानराव साळुंखे, डॉ. सुधीर तांबे, डॉ. उषा दराडे, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री रामनाथ मोते, किरण पावसकर, सय्यद ज़मा, हेमंत टकले यांनी या प्रस्तावावर भाग घेतला असून आपल्या अमूल्य सूचना मांडलेल्या आहेत. या प्रस्तावात प्रामुख्याने पाच मुद्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. रिक्त पदे, अपुरी व नादुरुस्त यंत्र सामुग्री,

यानंतर श्री.भारवि.....

प्रा.फौजिया खान....

औषधांचा तुटवडा असणे, आरोग्य केंद्राची दुरवस्था, सरकारी रूग्णालयात जाण्यामध्ये रूग्णांची संख्या कमी होणे या पाच मुद्यांवर सन्माननीय सदस्यांनी ज्या पद्धतीने तीव्र भावना व्यक्त केल्या त्या मी समजू शकते. समस्या गंभीर असली तरी एका सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, आपली लोकसंख्या प्रचंड आहे. त्यामुळे अनेक तांत्रिक अडचणीवर मात करत गैरसोय, हेळसांड होणार नाही यासाठी शासन प्रयत्न करीत आहे, हे मी विश्वासपूर्वक सांगू इच्छिते. शासन अत्यंत संवेदनशील आहे. आपल्या देशामध्ये, राज्यामध्ये नेहमी शॉर्ट टर्म ॲप्रोच राहिला आहे. आपण नेहमी उपाययोजना करत असतो. कपडा फाटल्यानंतर तेथे ठिगळ लावण्याचे काम आपण करतो. पण आता ठिगळ लावून चालणार नाही. सार्वजनिक आरोग्याच्या सिस्टीममध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे, हे वारंवार आरोग्य मंत्र्यांनी आणि मी सभागृहाला सांगितले आहे. प्रत्येक विषयावर एक नवीन योजना करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. एवढेच नव्हे तर स्वच्छ कारभार करण्याचा प्रयत्न विभागाच्या माध्यमातून करीत आहोत. मी मिर्झा गालिब यांच्या शायरीतील दोन ओळी आपल्याला सांगते.

चिपक रहा है लहू से बदन पे पहराहन
हमारी जेब को अब हाजते रफीक क्या है.

कपडा फाटला आहे. तो कुठे शिवणार आणि कसा जोडणार? तेव्हा उपाययोजना करण्यासंबंधी शासन गंभीरपणे विचार करीत आहे. प्रश्न रिक्त पदांचा असो, खरेदी धोरणाचा असो किंवा अन्य विषयासंबंधातील असो. सगळ्या कामात आता फंडामेंटल करेक्शन करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. सभागृहात वारंवार रिक्त पदांबद्दल चर्चा करण्यात आली आहे. रिक्त पदांची संख्या फार मोठी आहे. याला अनेक कारणे आहेत. मागे जे काही झाले त्याबद्दल मला काही भाष्य करायचे नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी शब्द दिला आहे की, जर तीन महिन्यामध्ये सगळी रिक्त पदे भरली नाही तर मी आरोग्य मंत्री म्हणून पुन्हा येणार नाही. तीन महिन्यात वॉर फुटींगवर कामे करण्यात येणार आहेत. ज्येष्ठता यादी तयार नसली तरी ती तयार करण्यात येईल. सर्व रिक्त पदे भरण्याचे काम करण्यात येईल.

यानंतर श्री.गायकयवाड....

प्रा.फौजिया खान ..

सभापती महोदय,, स्थानिक अधिका-यांना काही पदे भरण्याचे अधिकार शासनाने दिलेले आहेत. जर एखाद्या ठिकाणी पदे कमी पडत असतील तर एन.आर.एच.एम.च्या माध्यमातून कंत्राटी पध्दतीने काही पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आरोग्याच्या संदर्भातील संपूर्ण चित्र आता बदलले पाहिजे या दृष्टीने शासन प्रयत्नशील असून त्या संदर्भात सभागृहात यापूर्वी देखील सांगण्यात आले होते. सभापती महोदय, रिक्त पदाच्या बाबतीत या पेक्षा मी जास्त काही सांगू शकत नाही. जी पदे रिक्त आहेत ती पदे एम.पी.एस.सी.च्या माध्यमातून किंवा प्रमोशनच्या माध्यमातून भरण्याच्या दृष्टीने शासन नियोजन करीत आहे.

सभापती महोदय,या चर्चेच्या निमित्ताने औषधांच्या तुटवडयाचा उल्लेख करण्यात आला होता. त्या बाबतीत मी सांगू इच्छिते की ,औषधे खरेदी करण्याची पूर्वीची जी पध्दत होती त्या पध्दतीनुसार ए , बी आणि सी अशा प्रकारे ओषधांची कॅटेगरी करण्यात आली होती. ए कॅटेगरीतील औषधे डायरेक्टर लेव्हलवर खरेदी करण्याचे अधिकार दिले होते. त्याचप्रमाणे बी आणि सी कॅटेगॅरीतील औषधे सिव्हील सर्जनच्या लेव्हलवर खरेदी करण्याचे अधिकार दिले होते.सभापती महोदय, सब सेन्टर्समध्ये दर वर्षी बारा हजार रुपयांची औषधे खरेदी करण्याचे नॉर्म्स् आहेत, आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये 1 लाख 60 हजार रुपयांची औषधे खरेदी करण्याचे नॉर्म्सृ आहेत, तसेच बिगर आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये 1 लाख 20 हजार रुपयांची औषधे खरेदी करण्याचे नॉर्म्स् आहेत. रुरल हॉस्पिटलमध्ये नॉन ट्रायबल एरियामध्ये 4 लाख आणि ट्रायबलमध्ये 6 लाख रुपयांची औषधे खरेदी करण्याचे नॉर्म्स् निकष ठरविण्यात आले असून ते नॉर्म्स तसेच राहणार आहेत परंतु सेन्ट्रल प्रोक्युअरमेन्ट पॉलिसी आणण्याचे शासनाने निश्चित केले आहे व त्या संबंधीची जी.आर.सुध्दा काढण्यात आला आहे.. अडथळा.. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, उत्तर देण्यास मला दोन तास लागले तरी चालतील परंतु मी प्रत्येक मुद्याचा सविस्तर खुलासा करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या सर्व प्रश्नांचवी मी उत्तरे देणार आहे.

सभापती महोदय, ए.बी आणि सी अशा औषधांच्या कॅटॅगरीज ठरविण्यात आल्या आहेत ही औषधे तसेच लॅब मटेरिअल आणि लिनन हे सेन्ट्रली परचेस होणार असून त्याकरता टेडर काढण्यात येणार आहे.आज पर्यंत ही खरेदी रेट कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने केली जात होती परंतु आता

प्रा.फौजिया खान

टेंडर प्रोसेसव्दारे ही खरेदी केली जाणार आहे.त्यासाठी राज्यात तीन रिजनमध्ये वेअर हाऊसेस उभी करण्यात येणार आहेत. मॅन्युफॅक्चसर्सकडून ही औषधे डायरेक्ट खरेदी करण्यात येणार आहेत. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की ,जेनिरीक ड्रग्ज स्वस्त पडतात. म्हणून अशा प्रकारची जेनिरीक ड्रग्ज खरेदी करुन वेअर हाऊसेसमध्ये ठेवण्यात येणार आहेत आणि तेथून रुग्णालयाकडे ही औषधे पाठविण्यात येणार आहेत त्याकरिता वेगवेगळया टेकनिकल कमिटया स्थापन करण्याचा देखील निर्णय घेण्यात आला आहे. टी.बी., लेप्रसी, मलेरिया यासारख्या रोगासाठी केन्द्र सरकारकडून औषधे येणार आहेत ती पध्दत तशीच राहणार आहे परंतु राज्याच्या बजेटमधून जी औषधे खरेदी करण्यात येत असतात ती नवीन सेन्ट्रल प्रोक्युअरमेन्ट पॉलिसीप्रमाणे खरेदी करण्यात येणार आहेत. स्थानिक पातळीवर जर काही औषधांची कमतरता पडलीतर स्थानिक पातळीवर काही अधिकार देण्यात आलेले आहेत त्यांना त्या अधिकाराचा वापर करता येईल त्यासाठी रुग्ण कल्याण समित्या देखील स्थापन करण्यात आल्या असून त्यांना फंडस देण्यात आले आहेत आणि प्रत्येक स्तरावर अधिकार देण्यात आलेले आहेत जर राज्याकडून औषधे मिळाली नाही तर त्यांना ओषधे खरेदी करण्याचे अधिकार असल्यामुळे त्यांच्याकडून औषधाची खरेदी करता येईल व त्यामुळे औषधाची कमतरता भासणार नाही.

श्री.सरफरे

प्रा. फौजिया खान...

दोन-तीन माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, स्नेक बाईट, स्कॉर्पिअन बाईट आणि डॉग बाईटसाठी अेआरव्हीएस, एसव्ही ही औषधे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालयामध्ये उपलब्ध नाहीत. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की, त्याठिकाणी ही औषधे शासनाकडून पुरविण्यात आली आहेत. तरीसुध्दा स्थानिक पातळीवरदेखील यामध्ये भ्रष्टाचार होत असल्यामुळे याबाबतीत आपली काही तक्रार असेल तर ती स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे. या राज्याच्या अर्थसंकल्पामधून, प्लॅन आणि नॉन प्लॅनमधून मटेरिअल सप्लायकरिता 142.97 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे अतिशय स्वच्छ आणि पारदर्शक पध्दतीने ही औषधे रुग्णालयापर्यंत उपलब्ध होतील असे शासनाचे धोरण आहे. आपल्याला यामधील भ्रष्टाचाराला तोंड द्यावयाचे असेल तर सर्व समाजाची साथ मिळाली पाहिजे. परंतु समाजाकडून भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळणार असेल तर आपली कितीही इच्छा असली तरी त्यावर आपल्याला मात करता येणार नाही. आणि म्हणून भ्रष्टाचाराला आळा घालून आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी आपण मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, उपकरणाबद्दल सांगण्यात आले. वेगवेगळया रुग्णालयांमध्ये मशिन्स बंद असल्याचे दिसते. ते मशिन्स ऑपरेट करता येत नाही, त्यासाठी तांत्रिक मदत मिळत नाही. त्या मशिन्स दुरुस्त करण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर रुग्ण कल्याण समितीला देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे आपण राज्यामध्ये संगणकीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. यामध्ये वेब बेस्ड ई गव्हर्नसच्या माध्यमातून रुग्णालयाच्या पातळीवर शासनाकडून इंडेंट ऑनलाईनव्दारे जेवढी गरज आहे तेवढी औषधे पाठविण्याचे काम सुरु आहे. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला संगणक पुरविण्यात आले आहे. त्याचा डेटा फिड होत आहे. ही सर्व कामे होत असतांना आपण ॲसेट्स मॅनेजमेंट, सिस्टीम ऑनलाईन डेव्हलप करण्याचा विचार करीत आहोत. कारण आज डिसिजन सपोर्ट सिस्टीम उपलब्ध नसल्यामुळे आपल्याला अडचणींना सामोरे जावे लागते. मेडिसिन मॅनेजमेंट सिस्टीम, ईक्विपमेंट मॅनेजमेंट सिस्टीम, वेहिकल मॅनेजमेंट सिस्टीम, हॉस्पिटल मॅनेजमेंट सिस्टीम या सर्व समस्यांच्या बाबतीत ई गव्हर्नसचा डिसीजन घेतल्यामुळे जास्त प्रमाणात त्यावर आपल्याला नियंत्रण आणता येईल असे मला वाटते. आपण हॉस्पिटलच्या पातळीवर ॲन्युअल मेंटेनन्स कॉंट्रॅक्ट देत आहोत. आपण पीएलए अकाऊंटमधून लहान सहान रिपेअरचे अधिकार दिले आहेत. आणि ते काम एनआरएचएमच्या माध्यमातून त्या पातळीवर होऊ शकते. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या

प्रा. फौजिया खान....

दुरवस्थेबद्दल सांगितले. स्थानिक पातळीवर प्रत्येक उपकेंद्रासाठी व प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी त्यांच्याकडे निधी उपलब्ध आहे, व त्यांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे त्यांना सर्व रिपेअरची कामे करता येईल. त्याची अंमलबजावणी होत नसेल तर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार सुध्दा दिले आहेत. तो निधी जिल्हा पातळीवर व्यवस्थित खर्च होत नसेल तर त्याबद्दल जरुर आमच्याकडे तक्रार करु शकता. आपण ॲसेट मॅनेजमेंट सिस्टीमबद्दल उल्लेख केला. सर्व ठिकाणी ईक्विपमेंटचा स्टॉक किती राहणार आहे, ते चालू आहेत की बंद आहेत?

(यानंतर सौ. रणदिवे)

वर्कींग कंडीशनमध्ये आहे की नाही किंवा दुरुस्तीची गरज आहे काय? किंवा आऊट ऑफ ऑर्डरमध्ये कंडीशनमध्ये आहे काय? तसेच त्याचे डिप्रीसिएशन काय आहे? आपल्याला त्यासाठी बजेट प्रोव्हीजन कशी करता येईल आणि आय.पी.एच.एस.च्या स्टॅडर्डपर्यंत पोहोचण्यासाठी काय रिक्वायरमेंट आहे? त्यासाठी आपल्याकडे कोणती उपलब्धता आहे? या सर्व बाबतीत विचार करावा लागेल. आज आपल्या राज्यात रिजनल लेव्हलच्या म्हणजेच 8 रिजन्स्मध्ये हेल्थ इक्वीपमेंट रिपेअर युनिटस् कार्यरत आहेत. आपण अजून यांना कशा प्रकारे सशक्त करु शकतो याकडे शासन लक्ष देईल. येथे टेक्नीशिअन्स् आहेत, मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक, कोल्ड-चेन रिपेअरसाठी टेक्नीशिअन उपलब्ध आहेत. पण येथे बायो मेडिकल इंजिनिअर्स्ची गरज आहे आणि ही पदे मंजूर करण्यासाठी प्रस्ताव देण्यात आलेला आहे.आपण इंजिनिअर्स् देखील कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर घेण्याच्या दृष्टीने देखील विचार करता येईल.यासाठी दीड कोटी रुपयांची तरतूद एन.आर.एच.एम.च्या अंतर्गत करण्यात आलेली आहे.प्रत्येक डिस्ट्रीक्टमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हल्पमेंट विंग सुध्दा आहे आणि सन्माननीय सदस्यांनी रिपेअरच्या बाबतीत मुद्दा मांडला आहे.रिपेअर करण्याच्या बाबतीत एन.आर.एच.एम.अंतर्गत डि-सेंट्रलाईज् पध्दतीने सी.ई.ओ.यांना आता अधिकार दिलेले आहेत. यामध्ये 137.90 कोटी रुपये 2009-2010 मध्ये मंजूर करण्यात आले होते आणि फेब्रुवारी अखेरपर्यंत 79.13 कोटी रुपये यावर खर्च झालेला आहे. या माध्यमातून 3772 कामांची दुरुस्ती करण्याबाबत आपले लक्ष होते आणि त्यापेक्षी प्रत्यक्षात 2175 कामे पूर्ण झालेली आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी असा उल्लेख करण्यात आला की, महाराष्ट्र राज्यामध्ये कुपोषण आहे आणि सन्माननीय सदस्यांनी खरे सांगितले की, आपल्याकडे ज्या योजना आखल्या जातात, त्यांच्यामुळे कुपोषणाच्या प्रश्नाबाबत काहीतरी नियंत्रण आणण्यामध्ये यश आलेले आहे. आज आपला 33 असा आयएमआर आहे. अगोदर 149 होता आणि आता 130 मॅटनल मॉर्टॅलिटी रेट आहे. यु.एन.रिपोर्टमध्ये सुध्दा हा उल्लेख करण्यात आला आहे की, आता महाराष्ट्रामध्ये हे प्रमाण डिक्लाईन होत आहे. तरी सुध्दा आपल्या राज्यापेक्षा इतर राज्यांमध्ये हे प्रमाण चांगले आहे. त्यामध्ये तामिळनाडू मागे असून त्यांच्याकडे हे 32 इतके प्रमाण आहे आणि आपल्याकडे 33 इतके प्रमाण आहे. पण केरळ राज्य हे खूप पुढे असून त्यांच्याकडे फक्त 12 आयएमआर आहे आणि आपल्याला तेथपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.तसेच सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा

. . . .3 डब्ल्यु-2

श्रीमती फौजिया खान . . . .

यांनी सांगितल्याप्रमाणे नॅशनल प्रोग्रॅम्स् मध्ये सब सेंटर लेव्हलवर याबाबतीत आरोग्य विभागाचे कार्य असून ते यशस्वी होत आहे. ज्याच्यामध्ये आपण खूप चांगले काम करीत आहोत, त्यामध्ये हे नॅशनल प्रोग्रॅम्स् देखील आहेत. त्यामध्ये इम्युनायझेशन देखील आहे आणि हे काम करीत असताना आपल्याला यश देखील आलेले आहे.

सभापती महोदय, जननी सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना किंवा महिलांनी रुग्णालयामध्ये डिलीव्हरीज केल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न करणे किंवा सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या महिलांना वेगवेगळया प्रकारची डेफीशिअन्सी आहे किंवा ज्या महिलांमध्ये हिमोग्लोबीन कमी आहे, त्यांचे हिमोग्लोबीन करेक्ट व्हावे यासाठी आपण प्रेग्नंट ॲण्ड लॅक्टेटींग महिलांना आयर्नच्या गोळया देतो. आपण मातृत्व अनुदान योजनेतून 400 रुपयांची औषधे आणि 400 रुपये रोख देत आहोत. जननी सुरक्षा योजनेतून पैसे देत आहोत इ.अशा अनेक योजना आहेत, ज्याच्यावर शासनामार्फत निधी खर्च केला जात आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

प्रा. फौजिया खान...

त्याची आकडेवारी शासनाकडे आहे ग्रामीण भागामध्ये प्रचंड संख्येने लाभार्थी याचा फायदा घेत आहेत. ज्यांना अनुदान देण्यात आलेले आहे, त्यांची नावे सुध्दा शासनाकडे आहेत.

सभापती महोदय, प्रा. सुरेश नवले यांनी बृहत आराखडयाबद्दलचा मुद्दा उपस्थित करुन पीएचसी आणि सबसेंटर्सच्या नॉर्म्समध्ये थोडासा बदल करण्यात यावा असे सांगितले. सभापती महोदय, हा बृहत आराखडा मंत्रिमंडळासमोर नेण्याचे प्रस्तावित आहे.जास्तीत जास्त लोकांना आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने पुढाकार घेतलेला आहे. हा बृहत आराखडा लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल. या बृहत आराखडयामध्ये सहा कि.मी.च्या अंतरावर सबसेंटर आणि 25 कि.मी.च्या अंतरावर प्राथमिक आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यात आलेले आहे. आयुष बद्दल सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी सांगितलेले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रावर मेडिकल ऑफिसर्स म्हणून 25 टक्के बीएएमएस डॉक्टर्सना नियुक्त करण्याचे आज शासनाचे धोरण आहे आणि शासन ते करीत आहे. त्याशिवाय ज्या आयुर्वेदिक डिस्पेन्सरीज आहेत त्याठिकाणी सुध्दा बीएएमएस डॉक्टर्सना नियुक्त करण्यात येत आहे.

सभापती महोदय, पीएचसी सेंटरवर इमर्जन्सीसाठी अँब्युलन्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे. जर एखाद्या पीएचसी सेंटरवर अँब्युलन्सची व्यवस्था नसेल तर भाडयाने गाडी घेऊ शकतो. जर त्या क्षेत्रात भाडयाने गाडी उपलब्ध नसेल आणि रुग्णाची परिस्थिती क्रिटिकल असेल तर त्यांनी भाडयाने गाडी घेऊन रुग्णाला जिल्हा स्तरावर नेले किंवा सुपेरिअर रुग्णालयालयामध्ये नेले तर त्यांना सुध्दा त्या गाडीचे भाडे देण्याचे प्रावधान विभागामार्फत करण्यात येते.

सभापती महोदय. एक खूप चांगली सूचना डॉ. तांबे यांनी केलेली आहे. मेडिकल ऑफिसर्सना ट्रेनिग देण्याची गरज आहे. कारण एखाद्या रुग्णाला अगदी महत्वाच्या वेळी सेवा उपलब्ध झाली तर कदाचित रुग्णाचा जीव वाचतो आणि त्यावेळी जर ती सेवा उपलब्ध झाली नाही तर उशीर होतो. यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. इन सर्व्हिस ट्रेनिंग डिव्हिजनल हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सेंटरमधून देण्यात येत आहे. जिल्हा पातळीवर प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्याशिवाय ॲनास्थेशियासाठी अठरा आठवडयांचा मेडिकल ऑफिसर्ससाठी ट्रेनिंग प्रोग्राम घेण्यात येतो. जिथे ऑपरेशन थियेटर्स आहेत तेथे त्यांची पोस्टिंग

...2..

प्रा. फोजिया खान.....

करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. पण सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना मला खूप चांगली वाटली. त्यादृष्टिकोनातून या डॉक्टर्ससाठी अजून काही शॉर्टटर्म कोर्सेस करता येतील काय? याचा जरुर विचार केला जाईल, एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छिते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी खूप चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी एक खूप महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. डॉक्टर्स आणि परिचारिकांची रुग्णांबरोबरची वागणूक मानवतेची असली पाहिजे तशी राहात नाही, सभापती महोदय, मी हे मुळीच Deny करणार नाही. कारण हे खरे आहे. मला वाटते सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले की, एक वेळ सुविधा कमी असल्या तरी चालतील पण रुग्णांसोबत आपण कसे वागतो यामुळे रुग्णांचा अर्धा आजार कमी होतो. पण आपल्याकडे अशी Humanitarian/मानवतेची वागणूक कुठेच मिळत नाही. मी ज्या ज्या ठिकाणी भेटी दिल्या त्या प्रत्येक ठिकाणी याबाबतीत सूचना दिलेल्या आहेत. रुग्णाबरोबर चांगले बोलणे हे खूप महत्वाचे आहे. माणूस संकटात सापडला की तो देवाचा धावा करतो आणि आजारी पडला की डॉक्टरांमध्ये देव शोधतो, ही मानवी प्रवृत्ती असून तिची व्यापकता वैश्विक स्वरुपाची आहे.

यानंतर श्री. बरवड...

प्रा. फौजिया खान ....

आणि आरोग्याचा संबंध थेट जीवनमरणाशी असल्यामुळे स्वाभाविकपणे ते संवेदनशील आणि आवश्यक असते. या खात्याची यंत्रणा संवेदनशील असल्याशिवाय ते रुग्णांच्या वेदना समजू शकत नाही याची मला जाणीव आहे. या यंत्रणेत सर्व काही आलबेल आहे असे मला बिलकुल म्हणावयाचे नाही परंतु प्राप्त परिस्थिती आणि कामाचा यंत्रणेवर जो प्रचड तणाव असतो त्यामुळे गोरगरीब जनतेला या दबावाखाली जगणे भारी पडते. पण मला डॉक्टरांना सुध्दा असे सांगावयाचे आहे की, जर तुमच्यामध्ये जनता देव शोधत असेल तर तुम्हाला सुध्दा त्यांच्यामध्ये हनुमानपुत्र दिसला पाहिजे. हे डॉक्टरांसाठी सुध्दा आवश्यक आहे. अशी वागणूक जर झाली तर आपण या ठिकाणी इतक्या तक्रारी करणार नाही.

सभापती महोदय, शासनाकडून सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना आणि सिव्हिल सर्जन्सला एक पत्र लिहू की, यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी आणि सर्व नर्सेसचे सेंसिटायझेशन प्रोग्राम्स आपल्या स्तरावर जरुर घ्यावेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी फिजिकली चॅलेंज्ड रुग्णांबद्दल सांगितले की, त्यांचा सर्व्हे होत नाही. त्यासाठी सुध्दा शासनाच्या माध्यमातून नॅशनल डेफनेस कंट्रोल अँड प्रिव्हेंशन प्रोग्राम होत आहे. 2010-2011 मध्ये नॅशनल डेफनेस कंट्रोल अँड प्रिव्हेंशन प्रोग्राम करण्यात येणार आहे. या वर्षी पहिल्यांदा आठ जिल्हे घेतले गेले आहेत. त्यामध्ये अर्ली डायग्नोसिस, रिहॅबिलिटेशन आणि हिअरींग एड्स पुरविण्याचा समावेश आहे आणि याची व्यापकता आपल्याला वाढविता येते. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी अपंगांच्या बाबतीत सांगितले. अपंगांसाठी आपण जरुर शासनाच्या माध्यमातून पावले उचलणार आहोत आणि ते आवश्यक आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी आणखी एक महत्वाचा उल्लेख कर्करोगाच्या डिटेक्शनबद्दल केलेला आहे. मला वाटते की, कर्करोगाच्या घटना प्रथमदर्शनी प्रचंड प्रमाणावर वाढलेल्या दिसतात. याबाबत अर्ली डिटेक्शन हेच सर्वात मोठे प्रिव्हेंटीव्ह मेझर आहे. कारण कर्करोग वाढला की, मग तो आपल्या कंट्रोलच्या बाहेर जातो. 40 वर्षानंतर महिलांची कर्करोग डिटैक्शनची तपासणी झालीच पाहिजे आणि हे कॅम्पस् आपण प्रत्येक प्राथमिक आरोग्य

प्रा. फौजिया खान .....

केंद्रावर आयोजित करण्याचे काम जरुर करु. याचे प्रमाण आपण वाढवू कारण याची आज आवश्यकता आहे असे मला वाटते. माझ्या स्वत:च्या घरामध्ये मला अशा घटना मोठ्या प्रमाणावर दिसल्या. ज्या ठिकाणी आपण बघतो त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर लोकांना कॅन्सर झालेला आपल्याला दिसतो. यावर जरुर आपल्याला लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मनोरुग्णालयाबाबत सांगितले. आपण मनोरुग्णालयाची समिती केलेली आहे मी सर्व जिल्ह्यात भेटी दिलेल्या आहेत. खरोखर त्याचे खूप प्रश्न आहेत. त्याचा अहवाल तयार करुन आम्ही त्यावर अंमलबजावणी करण्याचे काम करणार आहोत. काही मनोरुग्णालयामध्ये अवस्था ठीक आहे पण काही ठिकाणी दुरावस्था आहे आणि त्या ठिकाणी खूप करेक्टीव्ह मेझर्स घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. आपल्या समाजामध्ये आपण मनोरुग्णांना टॅबू समजतो. आपण त्यांचा स्वीकार करीत नाही. हे खरे आहे की, ज्या खूपच क्रिटिकल केसेस आहेत त्यांनाच आपण रुग्णालयामध्ये घेऊन जातो. पण मेंटल इलनेस याबाबतीत मी कोठे तरी वाचले होते की, सहा व्यक्तींपैकी एकाला क्लिनिकल डिप्रेशन असते, कोणत्या तरी बाबतीत मनोरुग्ण असतो. पाश्चिमात्य देशामध्ये याकडे लक्ष देत आहेत तसे आपल्याकडे नाही. याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्यांनी तालुका स्तरावरील चिकित्सा केंद्राबाबत सांगितले आणि ते फार ॲम्बिशियस आहे. पण याबाबतीत काही ना काही विचार करण्याची गरज आहे एवढे मी सांगू इच्छिते.

यानंतर श्री. खंदारे .....

प्रा.फौजिया खान....

एमएलए हॉस्टेलसंबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मत मांडले आहे. त्याबाबत जरुर विचार करण्यात येईल. त्यासाठी काय करता येईल याबाबत विचार केला जाईल.

सभापती महोदय, मोबाईल मेडिकल युनिट संबंधी महत्वाची सूचना केलेली आहे. मला येथे सांगावयाचे आहे की, राज्यामध्ये यावर्षी 50 मोबाईल मेडिकल युनिट सुरु करणार आहे. या मोबाईल मेडिकल युनिटमार्फत डायग्नोसिस ट्रिटमेंट दिली जाणार आहे. इमर्जन्सी रिस्पॉन्सच्या धोरणामध्ये या बाबीचा सुध्दा समावेश आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी म्हटले होते की, नवीन धोरणाप्रमाणे हायवेवर अपघात होतात, इमर्जन्सीच्या काळात रुग्णालयात लवकर पोहोचणे गरजेचे असते. तिकडे एक फिक्स फोन नंबर दिला जाईल, तेथे फोन केल्यावर ॲम्ब्युलन्स येईल. त्या ॲम्ब्युलन्समध्ये पॅरा मेडिक्सची व्यवस्था असेल. ही गाडी स्टेट हायवे, नॅशनल हायवेवर असेल. ती गाडी तातडीने रिस्पॉन्ससाठी जाईल. हे काम सुरु करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी आरोग्यश्री योजनेबद्दल वारंवार या सभागृहात उल्लेख केलेला आहे. आता आंध्र प्रदेशच्या धर्तीवर योजना सुरु आहे. जीवनदायी योजनेचा बोजवारा उडालेला नाही. ती मरणदायी योजना झाली आहे असे बोलले गेले ते बिलकुल खरे नाही. ही योजना खूप फायदेशीर आहे, लोकप्रिय आहे. शासनाच्या अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद या योजनेला मिळाला. या योजनेसाठी तरतूद केली होती ती कमी पडली आहे. या योजनेसाठी 27 कोटी 31 लाख रुपये कमी पडले आहेत. तरी सुध्दा कॉन्टिंजन्सी फंडातून पैसे घेतल्यानंतर त्याच्या देयकांचा पैसा ट्रेझरीमार्फत देण्याचे ठरविले आहे. पुढील वर्षी या योजनेसाठी 1.25 कोटी रुपये म्हणजे जवळपास तिप्पट तरतूद केलेली आहे. जीवनदायी योजनेचा फायदा गोरगरीब जनतेला होत आहे हे विसरुन चालणार नाही. त्याचा फायदा झाला असल्यामुळे ती योजना लोकप्रिय झालेली आहे. कधी कधी या योजनेत तांत्रिक अडचणी येतात. शासनाची प्रक्रिया खूप किचकट असते, वित्त विभागाची परवानगी घेण्यासाठी वेळ लागतो आणि तेवढाच वेळ लागलेला आहे. शासनाची इच्छाशक्ती कधीच कमी नव्हती. या योजनेमध्ये आणखी काही रोगांचा समावेश व्हावा, ही योजना आणखी चांगली व्हावी यासाठी शासनाने पुढाकार घेतलेला आहे. सन्माननीय

2...

प्रा.फौजिया खान....

सदस्य श्री.जमा यांनी औषधांच्या नमुन्यांची रॅण्डम सिस्टिमनुसार तपासणी केली पाहिजे. नवीन धोरणाप्रमाणे औषधे खरेदी करीत असताना खरेदीपूर्वी प्रयोगशाळेत तपासणी न करता खरेदी केल्यानंतर बॅचमधून रॅण्डम सॅम्पलींग करुन त्याची एफडीएच्या माध्यमातून केली जाणार आहे. सभापती महोदय, मी मुख्य मुद्यांची उत्तरे दिलेली आहेत असे वाटते.

सभापती महोदय, डोळयांबद्दल किंवा ब्लाईंडनेसबद्दल येथे विचार मांडण्यात आलेले आहेत. मला यासंबंधी सांगावयाचे आहे की, नेत्रदानाच्या बाबतीत देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे वरच्या क्रमांकावर आहे. सन्माननीय सदस्यांना ऐकून खूप चांगले वाटेल की, देशाच्या माननीय राष्ट्रपतींनी स्वत: नेत्रदान करण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. मला वाटते की, हे पवित्र कार्य आपण सर्वांनी केले पाहिजे. मी स्वत:, या खात्याचे सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी, या विभागाचे सर्व संचालक, कर्मचारी यांनी नेत्रदान करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

आपण सुध्दा सर्वांनी नेत्रदान करावे अशी माझी आपणास विनंती आहे. जर आपण आमची विनंती मान्य केली तर आम्ही दोन दिवस येथे एक टेबल लावून घेऊ. डॉ. लहाने येण्यास तयार आहेत. अधिवेशन आणखी दोन दिवस चालणार आहे. सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर आपण येथे एक टेबल टाकू. ज्या आमदारांना आणि अधिका-यांना नेत्रदान करण्याची इच्छा असेल त्यांनी तसा फॉर्म भरुन द्यावा. ज्यांनी आधीच नेत्रदानाचा फॉर्म भरलेला आहे त्यांनी नेत्रदानाचे खूप मोठे काम केलेले आहे, त्याबद्दल मी त्यांना खूप खूप धन्यवाद देते. आपल्या देशाच्या राष्ट्रपतींनी नेत्रदान केलेले आहे, तेव्हा आपण देखील सर्वांनी नेत्रदान करावे अशी मी विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

..2..

प्रा. सुरेश नवले : या प्रस्तावाला माननीय मंत्री महोदयांनी फार विस्ताराने उत्तर दिलेले आहे. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. मात्र दोन-तीन मुद्यांचा त्यांनी उल्लेख केला नाही. प्राथमिक आरोग्य केन्द्रे राज्य शासनाच्या कार्यकक्षेमध्ये आणण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे? जीवनदायी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील 1 कोटी 30 लाख 64 हजार विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी फक्त 309 विद्यार्थ्यांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या. हे हास्यास्पद आहे. हजारो विद्यार्थ्यांना हृदयविकाराचे आजार आहेत आणि फक्त 309 शस्त्रक्रिया करण्यात आल्या. माझी अशी विनंती आहे की, मॅट्रीक पर्यन्त शिकणारे जे हृदय विकाराचे रुग्ण आहेत त्यांच्यावर सरसकट जीवनदायी योजनेतून शस्त्रक्रिया करावी. दुसरे असे की, नसबंदीला प्रोत्साहन म्हणून केवळ 351 रुपये दिले जातात. अधिकारी एकाद्या फाईव्हस्टार हॉटेलमध्ये गेला तर 351रु.ला सूप देखील मिळणार नाही. तेव्हा ही प्रोत्साहनात्मक रक्कम वाढवून ती 3051 किंवा 3 लाख 51 करता येते का ते पहावे.

प्रा. फौजिया खान : प्राथमिक आरोग्य केन्द्रे राज्याच्या कार्यकक्षेत घ्यावीत अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केली. याबाबतीत आपण डिसेंट्रलायझेशनचा अवलंब करीत आहोत. डिसेंट्रलायझेशनमुळे प्राथमिक आरोग्य केन्द्रे अधिक कार्यक्षमतेने चालू राहातील. सन्माननीय सदस्यांनी स्कूल हेल्थ प्रोग्रॅमचा उल्लेख केला. गरज असलेल्या शंभर टक्के विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी शासन कटीबध्द आहे. पण यामध्ये तांत्रिक अडचण अशी आहे की, विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचे डॉक्युमेण्ट दिलेले नाही. ज्या डॉक्युमेण्टची आवश्यकता आहे ते न आल्यामुळे आणि खासकरुन डोमिसाईल सर्टिफिकेट न आल्यामुळे पुढील कार्यवाही राहिलेली आहे. आम्ही डोमिसाईल सर्टिफिकेटची अट काढून टाकण्याचा विचार करीत आहोत. टी.सी. किंवा रेशन कार्ड असेल तर डोमिसाईलची आवश्यकता नसावी, या पध्दतीने अट शिथील करण्याचा विचार करीत आहोत. नसबंदीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला तो आर्थिक बाबीशी निगडित असल्यामुळे त्यावर भाष्य करणे मला योग्य वाटत नाही. प्राप्त परिस्थितीमध्ये या प्रोत्साहानात्मक रकमेमध्ये काही वाढ करता येईल असे वाटत नाही. परंतु भविष्यामध्ये त्याबाबतीत काही विचार करता येईल का ते पाहू.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

.....नंतर श्री. भोगले...

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नेत्रदानाविषयी सन्माननीय मंत्रीमहोदयांनी अतिशय चांगले विवेचन याठिकाणी केले. नेत्रदानाचा संकल्प प्रत्येकाने करावा हे राष्ट्रीय कर्तव्य आहेच. परंतु दुरवस्था कुठे आहे? प्रत्यक्षात जेव्हा नेत्रदान करण्याची एखाद्याची इच्छा असते, त्यानंतर त्यांनी जो संपर्क सामान्य रुग्णालयाशी करावयाचा, त्यावेळी यंत्रणा आवश्यक असते. त्यासाठी जी साधनसामुग्री आवश्यक असते तिची कमतरता भासते. त्याचबरोबर दुसरा भाग असा की, मी एका अंधकल्याण संस्थेचा प्रमुख म्हणून काम करतो. देशातील एकूण अंधांच्या संख्येमध्ये रिव्हर्सिबल ब्लाईंडनेस म्हणजे नेत्रदानाने, नेत्ररोपणाने दृष्टी परत येऊ शकते अशांचे असेसमेंट करुन नेत्रदान झाल्यानंतर किती कमी वेळात नेत्ररोपण होते हा क्रिटिकल फॅक्टर असतो. त्यासाठी प्रत्येक जिल्हा रुग्णालयात पोटेन्शियल रिसिपिएंटची यादी, त्यांचे पत्ते ठेवावयाचे असतात. नेत्रदान घेतल्यानंतर ज्यांना उपयुक्त ठरणार आहे अशा लोकांना तातडीने तेथे आणावे लागते. तेव्हाच शस्त्रक्रिया होते. तेव्हाच नेत्रदानाचा यज्ञ पूर्ण होतो. ही सगळी पुढची यंत्रणा आहे, ती यंत्रणा त्याठिकाणी अपुरी ठरते. त्याकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, यासाठी यंत्रणा आपल्याकडे आहे. हे आणखी कसे स्ट्रेंग्थनिंग होऊ शकते त्याकडे लक्ष दिले जाईल. सभापती महोदय, आपण सभागृहात नव्हता, त्यावेळी मी एक परमिशन विचारली होती....

उपसभापती : मी आपले भाषण ऐकले आहे.

प्रा.फौजिया खान : नेत्रदानासंबंधी आपण ती परमिशन द्यावी हे पुन्हा एकदा सांगते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आरोग्याच्या विषयावर अतिशय गंभीर चर्चा सभागृहात झाली. अतिशय विस्ताराने मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले आहे. मंत्रीमहोदया या एक महिला आहेत, आई आहेत, त्यांच्या बोलण्यातून संवेदना जाणवल्या. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, राज्याच्या वर्षभराच्या औषधांसाठी 147 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 10 कोटी जनता असलेल्या राज्यामध्ये 147 कोटी रुपयांची तरतूद म्हणजे दरडोई 14 ते 15 रुपये वर्षाला उपलब्ध होतात. हे तितकेसे योग्य वाटत नाही. अर्थात यामध्ये रुरल आणि अर्बनचा विषय आहे. म्हणून माझी विनंती आहे की, एवढ्या मोठ्या राज्याच्या आरोग्य विभागातील औषध खरेदीसाठी 147 कोटी रुपयांची तरतूद अपुरी आहे. ही तरतूद वाढविण्यात येणार आहे का? मंत्रीमहोदयांनी या तरतुदीमध्ये वाढ करावी अशी आमची विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी जे सांगितले ते स्टेट बजेटबद्दल सांगितले. एनआरएचएमच्या माध्यमातून काही कमतरता भासणार नाही, अशी प्रचंड बजेटरी तरतूद आहे. त्याची प्रोसीजर सुलभ आहे. ही कमतरता भासणार नाही.

उपसभापती : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

पृ. शी. : मुंबई शहरातील आदिवासी पाड्यांच्या विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

मु. शी. : मुंबई शहरातील आदिवासी पाड्यांच्या विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबई प्रांताचे तत्कालीन प्रांत अधिकारी (गव्हर्नर) यांनी सन १८६१ साली सदरहू प्लॉट भातशेती व भाजीपाला लागवडी करीता देण्यात आल्यापासून अनेक पाडयातील तसेच केल्टीपाडा, दामुपाडा व चाफ्याच्या पाड्यात १३० आदिवासी कुटुंबे रहात असून आपले जन-जीवन जगत आहेत. त्याबाबतचा शेतसारा आदिवासी विविध स्वरुपात सन २००१ पर्यन्त राज्य शासनाला भरत आले असणे. तरी आदिवासी वीज, पाणी, पक्के रस्ते, आरोग्य केंद्रे आदि प्राथमिक नागरी सुविधापासून वंचित राहणे, या शहराच्या मूळ रहिवाशाला त्यांच्या अधिकारांपासून आणि हक्कांपासून वंचित ठेवण्यात येणे, तसेच एसटीआरटीआयने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार सर्व पाडयातील किमान निम्म्याहून अधिक कुटुंबांना सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत पुरेसा अन्न पुरवठा न होणे, लोककल्याणकारी राज्यात दारिद्रय निर्मूलनाच्या कार्यक्रमात आदिवासी समुदायास प्राधान्याने देण्याची नैतिक जबाबदारी पाळण्यास शासनास आलेले अपयश, शैक्षणिक सुविधाच्या बाबतीत ही दयनीय स्थिती असणे, त्यामुळे आदिवासी अशिक्षित असून त्यांच्याकडे स्वत:चे सुरक्षित निवासस्थान ही नसणे, कारण त्यांच्याकडे आवश्यक सरकारी दस्तावेज उपलब्ध नसणे, त्यात दुग्ध कृषी विभागाने सदरहू जमीन ताब्यात घेऊन परस्पर फोर्स-१ हया संरक्षण संस्थेला दिल्याबाबत आदिवासी बेघर होण्याची त्यांच्यावर ओढवलेली परिस्थिती, यामुळे आदिवासीमध्ये शासनाच्या विरोधात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत आदिवासीच्या अधिकार आणि हक्कांसाठी लोकप्रतिनिधीने केलेले आंदोलने व निर्दशने, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तात्काळ कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मुंबई प्रांतातील तत्कालीन प्रांताचे गव्हर्नर यांनी 1861 साली ज्या आदिवासी बांधवांना त्यांच्या जगण्यासाठी आणि त्यांच्या एकंदरीत सुखसोयीसाठी जमिनी दिल्या.

...4...

श्री.भाई जगताप.....

सरकार ज्या गोष्टी करण्यासाठी कटिबध्द आहे, त्यासाठी सरकार तरतूद करते. हे सगळे करीत असताना आदिवासी म्हटल्यानंतर वाडा, मोखाडा किंवा राज्यातील दुर्गम भाग त्वरेने आपल्या नजरेसमोर येतो. परंतु या मुंबईमध्येच हाकेच्या अंतरावर सुध्दा आदिवासी पाडे आहेत. आदिवासी बांधव आहेत आणि या आदिवासी पाड्यांसाठी आपण काय मदत करतो? त्यासाठी तरतूद उपलब्ध असूनही ज्या बेसिक गरजा आहेत, ज्या मुलभूत गरजा आहेत त्यापासून हे आदिवासी बांधव वंचित आहेत.

नंतर 4सी.1...

श्री. भाई जगताप .....

अशा प्रकारे वंचित असताना सुध्दा आज तर या आदिवासींची अशी परिस्थिती आहे की, त्यांच्या अस्तित्वावरच मोठे प्रश्नचिन्ह तयार झालेले आहे. म्हणून या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी या विषयाला न्याय मिळावा असा प्रयत्न केलेला आहे. मला खात्री आहे की, मंत्री महोदय याबाबतीत नक्कीच न्यायिक बाजू घेऊन आदिवासींवरील अन्याय दूर करतील.

महोदय, राज्याच्या जवळपास 10 कोटी जनतेमध्ये 90 लाख ते 1 कोटीपर्यंत आदिवासींची संख्या आहे. त्यांच्यासाठी केंद्र व राज्यशासनाच्या माध्यमातून विविध योजना सुध्दा अस्तित्वात आहेत. शासनाच्या या योजनांबद्दल किंवा शासनाच्या हेतूबद्दल यत्किंचितही शंका नाही पण अमलबजावणीच्या बाबतीत मात्र प्रश्नच उभा असतो. मला आश्चर्य वाटते की, आपल्या राज्याचे एकंदर बजेट समजा 25 हजार कोटीच्या आसपास असेल तर त्यामध्ये 3020 कोटीची तरतूद आदिवासी विभागासाठी केलेली आहे, त्याबद्दल स्वागतच आहे. कारण आपल्याला यासंदर्भात काही निकष व गाईडलाईन्सच आहेत त्यामुळे ते टाळता येत नाही. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यापासून 50 वर्षे झाली, सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. तरी देखील प्रत्येक वर्षाचा विचार केला तरी साधारणपणे 8 ते 10 टक्क्यापर्यंत आदिवासी विभागासाठी तरतूद असतेच. मग हा सर्व पैसा कोठे गेला याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आज आपण आढावा घेण्याचा विचार केला तर मागील पाच वर्षांमध्ये जवळपास 12 ते 13 हजार कोटीची तरतूद या विभागासाठी आपण केली होती पण आदिवासी भागासाठी त्यात कोणतीच कामे दिसत नाहीत. दुर्गम भागातील गोष्ट तर सोडाच पण मुंबईतील आदिवासींबद्दल विचार केला तरी आरे कॉलनीत जे 32 आदिवासी पाडे आहेत, मुंबईच्या बाजूबाजूला बरेच पाडे आहेत. त्यात गोराई, संजय गांधी उद्यान, मुलुंड किंवा कांदिवलीचा पूर्व भाग, मुलुंड आणि ठाणे लगतचा भाग असे शेकडो आदिवासी पाडे आहेत तेथील परिस्थिती देखील विदारक आहे. माझ्याकडे शासनाचा सन 2009-10 चा अहवाल आहे. त्यानुसार या आदिवासी पाड्यांना मुलभूत सुविधा, वीज, पाणी, बालवाड्या, मंदिरे, सौर दिवे तसेच शौचालये अशा सुविधा या तरतुदीतून पुरविण्यासाठी शासन बचनबध्द आहे. परंतु वर सांगितलेल्या एकाही पाड्यावर अशा सुविधा नाही. गोराईतील 60 पाड्यांपैकी फक्त 4 पाड्यांवरच वीज आहे, उर्वरित भागात कोठेही वीज नाही, पाणी नाही, पायवाट नाही, बालवाड्या नाहीत. मग प्रश्न असा तयार होतो की, आतापर्यंतची ही किमान तीन वर्षातील तरतूद तरी कोठे गेली ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

श्री. भाई जगताप....

हे 3000 कोटी रुपये जातात कोठे ? याला कोण जबाबदार आहे ? या अर्धातास चर्चेच्या माध्यमातून अनेक गोष्टी बाहेर येतीलही.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेब व केंद्रीय मंत्री श्री.गुरुदास कामत यांच्या समवेत एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये ज्या विभागाच्या संदर्भात आम्ही चर्चा करणार होतो त्या विभागाचे दोन्ही मंत्री त्या बैठकीमध्ये उपस्थित नव्हते तसेच या बैठकीमध्ये आरेचे कोण अधिकारी हजर होते याची सुध्दा आम्हाला माहिती नव्हती. आम्ही आरेच्या संदर्भात विचार मांडल्यानंतर आरेच्या अधिका-यांनी बैठकीत थातूर मातूर उत्तरे दिली आणि निघून गेले. सभापती महोदय, हे सरकार गोरगरीबांचे, सामान्य माणसांचे, दीन दुबळयांचे, आदिवासींचे आहे आणि त्याच घटकांसाठीची आमची भूमिका उदासिनतेची असेल तर कसे चालेल ? आरेमध्ये एक महिला सीईओ होती त्यांच्या समवेत मी चार बैठका घेतल्या होत्या. त्यांना मी वारंवार विचारले की, आदिवासी विभागासाठी 1.5 कोटी रुपयांची प्रोव्हीजन असतांना हे पैसे कोठे गेले ? आदिवासींसाठी 1.5 कोटी रुपयांची प्रोव्हीजन होती परंतु विजेसाठी एनओसी नसल्यामुळे त्या ठिकाणी वीज मिळाली नाही, पाण्यासाठी प्रोव्हीजन होती परंतु त्यासंदर्भातील एनओसी न मिळाल्यामुळे त्या ठिकाणी पाणी मिळू शकले नाही, त्या ठिकाणी विविध योजनांसाठी पैशांची प्रोव्हीजन करण्यात आली होती परंतु एनओसी न मिळाल्यामुळे त्या योजना तेथे राबविल्या गेल्या नाहीत. या ठिकाणी आम्ही विविध योजनांमधून खर्च करण्याचा प्रयत्न केला, खासदार फंडातून सुध्दा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. मला आश्चर्य वाटते की, आपल्याकडे आदिवांसीच्या उत्थानासाठी पैसे आहेत परंतु नियोजन नसल्यामुळे त्या ठिकाणी पैसे खर्च होऊ शकत नाहीत. माननीय मंत्रीमहोदय श्री. नितीन राऊत हे ज्या समाजातून या ठिकाणापर्यंत आलेले आहेत त्या समाजाचे दु:ख त्यांना चांगल्या प्रकारे माहीत आहे, कारण मी सुध्दा या समाजातूनच आलेलो असून या समाजाचे दु:ख मलाही माहिती आहे.

मी आपल्याला उदाहरण देऊ इच्छितो की, एका पाडया समोर दिव्यांची प्रचंड रोशनाई आहे, त्यांच्या समोर टॉवर आहे, त्यांच्या समोर सेव्हन स्टार हॉटेल्स आहेत परंतु या पाडयावर साधा दिवा सुध्दा नाही अशी स्थिती आहे आणि ही गोष्ट

श्री. भाई जगताप....

आपल्यासाठी फार लाजिरवाणी आहे. केल्टीपाडा, दामुपाडा व चाफ्याच्या पाडयात एसआरपीएफची 125 एकर जागा आहे. या पाडयातील लोक ज्या तलावातून पाणी पीत होते त्यांना तेथून पाणी घेण्यास एसआरपीएफने मज्जाव केलेला आहे. एसआरपीएफच्या मेहरबानीने त्यांना त्या ठिकाणी राहू दिले जात आहे. या आदिवासींना त्या ठिकाणच्या तलावाचे पाणी सुध्दा पिता येत नाही. लग्न कार्य असेल तर एसआरपीएफला विनवणी करुन त्यांच्याकडून वायर टाकून लाईट घ्यावी लागते. मला आपल्या समोर एक गंभीर बाब निदर्शनास आणावयाची आहे ती अशी की, आपल्या मुंबईवर 26/11 रोजी आंतकवाद्यांनी हल्ला केला तेव्हा शासनाने फोर्सवनची स्थापना केली.

यानंतर श्री.भारवि.....

श्री.भाई जगताप...

नुसते ठरविले नाही तर त्या दिशेने पावले उचलली. त्याचे आम्ही स्वागत केले. ते करायलाही पाहिजे. पण त्याच बरोबर आज तेथील परिस्थिती काय आहे, हे देखील लक्षात घेतले पाहिजे. फोर्स-1 ला जागा लागते किती ? येथे काही अदृश्य घटक आहेत. त्यांचा मला येथे उल्लेख करता येत नाही. त्यांनी मोठ्या रकान्यामध्ये बातम्या दिल्या. भाई जगतापचा विरोध. फोर्स-1साठी आम्ही कधीही विरोध केलेला नाही. फोर्स-1 झाले पाहिजे. महाराष्ट्राने पुढाकार घेतला तर फोर्स-1 होईलही. 1861 साली ज्यांची त्या जमिनीवर नोंद आहे, ज्यावेळी ही मुंबई महाराष्ट्रात नव्हती, मुंबई प्रदेशमध्ये असताना जे जमिनीचे मालक आहेत त्या सगळयांना पायदळी तुडवून काही काम आपण करणार असेल तर माझ्या देशाचा कायदा त्यास परवानगी देईल असे मला वाटत नाही. आदिवासींसाठी कायदे आहेत. त्याच्या तपशीलात मी जात नाही. कायद्याचे कलम मी सांगण्याची आवश्यकता नाही. कारण आपल्याकडे सगळी यंत्रणा आहे. आपण सर्वांनी तपासून पाहिले असेल. फोर्स-1साठी जागा ताब्यात घेताना तेथील आदिवासी पाडे उद्ध्वस्त होत असतील तर ते होता कामा नये. हा अतिशय संवेदनशील विषय आहे. म्हणून मी येथे ही चर्चा उपस्थित केली आहे. या तीन पाड्यांमध्ये जवळ जवळ 140 आदिवासी कुटुंबे राहतात. फोर्स-1ला किती जागा पाहिजे हे मला माहित नाही. आमच्या बरोबर झालेल्या बैठकीमध्ये त्यांना 60 एकर जागा पाहिजे असे सांगण्यात आले. प्रत्यक्षात पाहिले तर आरे ची 110 एकर जागा त्यांना हस्तांतरित केलेली आहे. एवढी जागा कशासाठी दिली आहे ? आश्चर्य म्हणजे जागेचे हस्तांतरण करताना महसूल विभागासह कोणत्याही विभागाला विश्वासात न घेता जमीन हस्तांतरित करण्यात आली आहे. आरेच्या सी.इ.ओ.नी सांगितले आहे की, गुगलवर आम्ही नकाशा पाहिला आणि ती जागा अलॉट केली. असे कसे काय करता येईल ? आपल्या ऑफिसच्या बाजूला काय घडते हे आपल्याला कळत नाही आणि गुगलचे नकाशे पहात आहात. त्यावर सर्कल करून सांगत आहात की, ही जागा आम्ही आपल्याला दिली. सर्वसामान्य माणसाला बेघर करून जो खऱ्या अर्थाने या मुंबईचा, या विभागाचा मालक आहे त्याला जर अशा पद्धतीने पायदळी तुडवत असाल तर त्याला माझा विरोध आहे. तिच गोष्ट मी वारंवार माननीय मुख्यमंत्र्यांसमोर आणली. याबाबत तीन बैठका झाल्या. गृह

...2

श्री.भाई जगताप...

खात्या बरोबर बैठक झाली. फोर्स-1ला माझा विरोध आहे अशा प्रकारचे अवडंबर माजविण्यात आले. फोर्स-1ची गरज आहे. त्यासाठी आम्ही पूर्णत: मदत करू. मदत केली. त्यानंतर एक समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीचा मी सदस्य आहे. या आदिवासींचा उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे. आज तेथे वीज नाही. अन्य कोणतीही नागरी सुविधा नाही. त्या जागेवर आदिवासी भाजी लावतात. भाताचे पीक घेतात.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपली अर्धा-तासाची चर्चा आहे. आपण जवळ जवळ 25 मिनिटे बोलत आहात. माझी आपल्याला विनंती आहे की,आपल्या सूचनेमध्ये तीन पाड्यांचा उल्लेख आहे. आपण चर्चेच्या ओघात सर्व मांडत आहात त्याबद्दल माझी काहीही हरकत नाही. परंतु, मला असे वाटते की, अर्ध्या-तासाची वेळ संपत आली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आपली माफी मागतो. त्या तीन पाड्यांवरच मी लक्ष केंद्रीत केले आहे. या विषयाचा उल्लेख करताना या सगळ्या गोष्टी ओघाने आल्या. येथे मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

त्या ठिकाणच्या पाडयात राहणाऱ्या जवळजवळ 147 कुटुंबाच्या अस्तित्वाचा आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना माहिती देऊ इच्छितो की, त्या भागात राहणा-या लोकांचा उदरनिर्वाह फक्त भात शेतीवर तसेच केळी सारख्या फळ बागायतीवर चालतो. शेती व फळबागा हे एकमेव उदरनिर्वाहाचे साधन आहे . मध्यंतरी या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशावरुन बैठक आयोजित करण्यात आली होती त्या बैठकीला श्रीमती अय्यंगार उपस्थित होत्या तसेच जिल्हाधिकारीसुध्दा बैठकीला उपस्थित होते. त्याबद्दल गृह विभागाच्या सचिव श्रीमती अय्यंगार यांना मी मनापासून धन्यवाद देतो त्या बैठकीमध्ये अनेक चांगले निर्णय घेण्यात आले होते .त्या भागात कसत असलेल्या आदिवासींच्या जमिनीचा सर्व्हे करण्यात यावा असे त्या बैठकीत ठरले होते आणि त्याप्रमाणे सव्हे करण्यात आला होता त्यावेळी अनेक स्पेक्युलेशन्स करण्यात आली होती.100- 200 एकर त्यांना जागा द्यावयाची काय अशीही विचारणा त्यावेळी करण्यात आली होती. त्या प्रश्नाला माझे साधे उत्तर असे आहे की, जर त्या आदिवासींकडे दस्तऐवज आहे तर त्यांना ही जमीन द्यावीच लागेल त्यापासून त्यांना वंचित करता येणार नाही . परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही आणि या तीन पाडयापुरते सांगावयाचे झाले तर असे सांगता येईल की, या तीन पाडयाचा सर्व्हे झाला होता या संदर्भात जी समिती नेमण्यात आली होती त्या समितीचा मी देखील सदस्य होतो. आदिवासी कसत असलेली आणि त्यांच्या अधिपत्याखाली असलेली आणि सरकारी दस्तऐवजी असलेली अशी 37 एकर जागा आहे. 10-20 गुंठे कमी जास्त जागा असू शकेल . मी आपल्याला ढोबळमानाने सांगू इच्छितो की ,आदिवासी कसत असलेली आणि त्यांच्या उदरनिर्वाहाची जागा 37 एकर आहे. त्यां लोकांना उदरनिर्वाहापासून वंचित ठेवता येणार नाही. त्याना स्थलांतरित करुन दुसरीकडे जागा दिली तर त्या जमिनीपर्यंत जाण्यासाठी रस्ते वा इतर बेसिक सुविधा पुरविल्या पाहिजेत.त्याचबरोबर त्या ठिकाणी फोर्स वनसाठी जागा देण्यात येणार आहे त्या फोर्स वन मधील नोक-या आदिवासी मुलांना दिल्या पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे त्या बाबतीत लेखी निवेदन देखील गृह विभागाकडे दिलेले आहे. या विषयाच्या अनुषंगाने अनेक विभागाचा सबंध येतो परंतु आजच्या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने आरेच्या विषयापुरते मी एवढेच सांगू इच्छितो की, बेसिक गरजा पुरविण्याच्या दृष्टीने ज्या काही एन.ओ.सी. द्यावयाच्या आहेत त्या देण्यात याव्यात.त्या

2..

गरजा आम्ही डी.पी.डी.सी.च्या निधीतून किंवा आमच्या निधीतून वा अन्य माध्यमातून पुरवू परतु त्यासाठी एन.ओ.सी. मात्र त्वरित देण्यात याव्यात जर त्या दिल्या गेल्या नाही तर काहीही काम करता येणार नाही. त्याचबरोबर त्यांच्या जागेचे स्थलांतर करीत असतांना त्यांच्या राहत्या घराला कोठेही धक्का लागणार नाही ही शासनाची जबादारी आहे. या लोकांना बेघर करता कामा नये. मध्यंतरी या ठिकाणी एस.आर.ए. योजना लागू करुन या तीन पाडयात राहणा-या लोकांना दुसरीकडे हलविण्याचा डाव काही लोकांनी, काही राजकीय लोकांनी केला होता. माझा त्याला विरोध राहील. या विषयामध्येसुध्दा शासनाने लक्ष घातले पाहिजे आणि आदिवासींना झोपडपट्टीधारक समजून तेथून त्यांना दुसरीकडे स्थलांतरित करता कामा नये. त्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या दोन चार प्रश्नाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर द्यावे अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, या अर्धा तास चर्चाच्या अनुषंगाने आपण मला अधिक वेळ बोलण्यासाठी दिला त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र,

---

डॉ.नितीन राऊत (पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री): सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 92 अन्वये सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप यांनी एक संवेदनशील विषय मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सभापती महोदय, जेव्हा जेव्हा आरेवर चर्चा होते तेव्हा असे वाटते की "दिल पुकारे आरे आरे" या ठिकाणी सन्माननीय सदस्य जरी दिल पुकारत नसले तरी आरेची जी अवस्था आहे ती निश्चितच केविलवाणी आहे असे मला त्यांना सांगावेसे वाटते.1948 साली आरे वसाहतीची स्थापना करण्यात आली होती. संपूर्ण मुंबईला स्वच्छ, ताजे आणि दर्जेदार दूध आरेच्या माध्यमातून मिळावे .असा त्या मागचा उद्देश होता .....

नंतर श्री.सरफरे s

डॉ. नितीन राऊत...

आणि त्यासाठी या संपूर्ण वसाहतीची निर्मिती झाली आहे. आज त्या आरे वसाहतीमध्ये अनेक तबेले दिसत असले, म्हशी दिसत असल्या तरी त्यांचे दूध आरे डेअरीला मिळत नाही, आपल्या मुंबईला मिळत नाही. त्याठिकाणी गुरा-ढोरांसाठी चारा निर्माण करण्यासाठी जमीन घेतली आहे. त्या जमिनीचा उपयोग सुध्दा चारा निर्मितीसाठी होत नाही. हे शहर बदलत गेले, शहरातील लोकसंख्या वाढली आणि एक जागतिक दर्जाचे शहर समजायला लागले. आर्थिक राजधानी म्हणून आपण या शहराकडे बघायला लागलो. परंतु दूधाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर मुंबईची दूधाची गरज आपण यामधून पूर्ण करु शकलो नाही. त्यामुळे या सर्व बाबींकडे सुध्दा सर्वांनी लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावेसे वाटते. हे सर्व सांगत असतांना आरे वसाहतीचे असलेले भौगोलिक स्थान लक्षात घेतलेतर आजच्या घटकेला संपूर्ण मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी आरेची वसाहत येते. एक अत्यंत हिरवळीचे,स्वच्छ हवेचे असलेले स्थान अशी तिची आख्यायिका आहे. या मुंबईमध्ये दर रविवारी अनेक लोक त्याठिकाणी पिकनिकला जातात. आणि या हिरव्या रानाचा उपयोग करुन घेतात. परंतु त्याची अशाप्रकारे विल्हेवाट लावण्याच्या पाठिमागे कोण होते? कुणी हे धंदे केले ? याबाबत माझ्याकडे फाईल्स आहेत. त्यामध्ये एक-दोन फाईल्स अशा आहे की, त्याठिकाणी आम्हाला इतकी जागा द्या, तितकी जागा द्या, अमूक गोष्टीसाठी जागा द्या अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे हे दूधाचे खाते आता जागेचे खाते होऊन बसले आहे अशी परिस्थिती आहे.

गेल्या वीस वर्षाच्या कालावधीमध्ये, युतीच्या काळात त्याठिकाणी अनेक उपदव्याप करण्याचा प्रयत्न झाला. आपल्याला आश्चर्य वाटेल की, त्याठिकाणी लोकांनी अडीच लाख रुपयांना झोपडया विकल्या. त्याठिकाणी कचऱ्याचे ढिगारे टाकण्यात आले, त्याचे पैसे वसूल करण्यात आले. त्याकरिता आमच्या काही अधिकाऱ्यांना सुध्दा सस्पेंड करण्यात आले. त्यांची नंतर चौकशी करण्यात आली. आणि म्हणून मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, आरे वसाहतीमधील एक इंच सुध्दा जागा कुणालाही दिली जाणार नाही अशी मी याठिकाणी ग्वाही देतो. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, त्याठिकाणी ज्या पध्दतीने काम चालू आहे. एखाद्या व्यक्तीच्या अंगावरुन वस्त्रे काढावीत आणि तिचे वस्त्रहरण करावे अशाप्रकारे या आरे वसाहतीची वाट लावण्यात आली आहे. त्यामुळे तिची सुरक्षा करावयाची असेल , मुंबईच्या सौंदर्यामध्ये भर घालावयाची असेल, एका हिरव्यागार क्षेत्राचा विकास

डॉ.नितीन राऊत...

करावयाचा असेल तर माझ्या खात्याने त्याबाबत एक प्रस्ताव सादर केला आहे. तो प्रस्ताव असा आहे की, या आरे वसाहतीचे रुपांतर डेअरी टूरिझम मध्ये करावे. अशाप्रकारचे टूरिझमचे कन्सेप्ट ठेवून मुंबई शहरामध्ये असलेला मध्यभाग सुरक्षित करण्याचा विचार सुरु आहे.

सभापती महोदय, याठिकाणी आदिवासी पाडयाबाबत सांगण्यात आले. चाफ्याचा पाडा, केतकी पाडा आणि केतकी पाडा (2) जो दामूपाडा म्हणून ओळखला जातो. त्याठिकाणी 238 कुटुंबे रहातात. 121 घरे असलेले हे ठिकाण आहे. माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी भात शेती व भाजीपाल्याची लागवड करुन ते लोक जीवन जगतात. त्यासाठी ही जमीन देण्यात आली आहे. हा भूखंड राज्य सरकारने त्यांना तात्पुरत्या स्वरुपामध्ये दिला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

शासनाने या आदिवासींना रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न केले. यापूर्वी असे होत होते की, ज्यावेळेला आरे वसाहतीची निर्मिती करण्यात आली. तेव्हा आम्हाला गवत, चारा याची आवश्यकता होती, तसेच काम करण्यासाठी कामगार मिळत नव्हते. अशा वेळी या लोकांना रोजगार मिळावा यासाठी त्यांना तेथे आणले गेले. शासनाने आदिवासींना भात व भाजीपाला तयार करण्यासाठी एकरी 40 रुपये प्रति गुंठा एक रुपया या दराने ती जमीन कसण्यासाठी दिली आणि ती 1980 सालापर्यंत त्यांच्याकडे होती. त्यानंतर 2000 सालापासून त्यांना लिजवर जमीन देण्याचा कार्यक्रम थांबविला असला तरी एका सामाजिक संवेदनेच्या संकल्पनेतून त्यांना न्याय देण्याची भूमिका राज्य शासनाने स्विकारलेली आहे. सभापती महोदय, याठिकाणी माझ्या मित्रांनी सांगितले की, त्या लोकांना ज्या अडचणी येत आहेत, त्यातील एक भाग म्हणजे फोर्स-1 साठी जागा देण्यात आली. हे सत्य आहे की, फोर्स-1 ला तेथे जागा देत असताना, त्या जागेवर हे तीनही पाडे येतात आणि गुगल अर्थ वेबसाईटवर तो नकाशा घेण्यात आला हे जरी खरे असले तरी मालाडच्या नगर भू-मापन अधिकाऱ्यांची मदत घेऊन नगर भू-मापन विभागाच्या सिटी सर्व्हेच्या नकाशानुसार ही जमीन फोर्स्-1 च्या ताब्यात देण्यात आली. याठिकाणी आमच्या मित्रांनी सांगितले की, यासाठी राज्य शासनाचा पैसा आहे, आमदार निधी आहे तसेच महानगरपालिकेच्या नगरसेवकांचा निधी दिला जातो, खासदारांचा निधी दिला जातो. त्यासंदर्भात राज्य शासन किंवा आमचा विभाग त्यांना परवानगी देत नाही, ना-हरकत प्रमाणपत्र देत नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दि.30 मार्च 2010 अन्वये आदिवासी पाडयांना पाणी पुरवठा करण्यासाठी 20 कि.मी.इतकी पाईप लाईन तसेच पंप हाऊस बांधण्यासाठी 1365 चौ.मी.जागा देण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. आरे दुग्ध वसाहतीतील आदिवासी पाडयांना मुलभूत नागरी सुविधा देण्यासाठी म्हणजे शौचालय व रस्ते यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. विद्युत पुरवठा करण्यासाठी सब स्टेशनला भूखंड देण्यात आलेला आहे आणि असे 10 भूखंड बी.एस.ई.एस.या कंपनीला दिले असून तेथील सब स्टेशन्स् . . . .

श्री.भाई जगताप (खाली बसून) : याच्या तारखा सांगाव्यात.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय,यासंबंधात ना-हरकत प्रमाणपत्राबाबत जे पत्रक काढले आहे, ते दि.30 मार्च 2010 रोजीचे आहे.परंतु मी हे देखील सांगू इच्छितो की,1980 च्या आमच्या

. . . .4 एच-1

परिपत्रकानुसार आम्ही त्याठिकाणी अनेक एन.ओ.सी.दिलेल्या आहेत. ज्या-ज्या वेळेला मागणी होते, त्या-त्यावेळेला ती देण्याच्या बाबतीत व्यवस्था केलेली आहे.काही गोष्टी अशा असतात की, यामध्ये दिरंगाई होऊ शकते. आमच्याकडे अनेक मागण्या आलेल्या आहेत आणि खरच वैताग येण्यासारखी बाब आहे की, लहान-लहान गोष्टीसाठी एन.ओ.सी.घेण्यासाठी रांग लागलेली आहे आणि याची परमनंट ॲरेंजमेंट कुठेतरी झाली पाहिजे या मताचा मी आहे. मी आमच्या सन्माननीय सदस्यांबरोबर यासंबंधात निश्चितपणे माझ्या मंत्रालयातील दालनामध्ये चर्चा करण्यासाठी बैठक घेईन आणि यासंबंधातील प्रश्नांची सोडवणूक करावयाची असेल किंवा पर्यायी व्यवस्था शोधावयाची असेल किंवा नागरी सुविधा पुरविण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्रे दिली जात नसतील, तसेच निधी उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित खात्याला विनंती करावयाची असेल तर तसे करण्याची देखील आमच्या विभागाची तयारी आहे आणि त्या अनुषंगाने निश्चितपणे भूमिका स्विकारली जाईल.

सभापती महोदय, याठिकाणी जातीय दाखल्यांच्या बद्दल सुध्दा उल्लेख करण्यात आला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, याठिकाणी जातीय दाखले सुध्दा देण्यात आलेले आहेत आणि ते देत असताना सांगण्यात आले की, ज्यांनी कागदपत्रे जमा केलेली आहेत, त्यांना आम्ही जातीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. परंतु 50 वर्षाची जी अट आहे, प्रमाणपत्र देत असताना तूर्त तरी त्याची आवश्यकता नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. नितीन राऊत ....

परंतु जेव्हा व्हॅलिडेशन केले जाईल त्यावेळी मात्र ते द्यावे लागणार आहे. या चर्चेच्या अनुषंगाने त्या भागामध्ये शिधापत्रिका वितरीत होत नसल्याबद्दलचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, मी याठिकाणी सांगू इच्छितो की, या केल्टी पाडा आणि चाफ्याचा पाडा या भागामध्ये 637 आदिवासी कुटुंबाना शिधापत्रिका वितरित केलेल्या आहेत, ही आकडेवारी कुठे तरी फुगऊन सांगण्यात येत आहे असे आपल्याला वाटेल. सन्माननीय सदस्यांनी यामध्ये लक्ष घालायला सांगितले तर खरे आदिवासी कोण आणि खोटे आदिवासी हे सुध्दा शोधावे लागगणार आहे आणि तशा सूचना सुध्दा आमचा विभाग संबंधित खात्याला दिल्या शिवाय राहणार नाही. सभापती महोदय, केल्टीपाडा नंबर दोन व दामुपाडा याठिकाणी सुध्दा 224 बीपीएल कार्डधारकांना शिधापत्रिका तिवरित करण्यात आलेल्या आहेत. त्याही भागात तीच परिस्थिती आहे. आम्ही म्हणतो खरे आदिवासी कोण आणि खोटे आदिवासी कोण ? त्याचा सुध्दा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल्.

सभापती महोदय, ठक्करबापा योजनेंतर्गतसुध्दा आम्ही काम केलेले आहे. शिक्षणाच्या बाबतीत महानगरपालिकेने सोयी केलेल्या आहेत. काही खासगी संस्थासुध्दा त्या ठिकाणी काम करीत आहेत असे सांगण्यात आलेले आहे. जर असे काही नसेल तर त्या विषयी सुध्दा ज्यावेळी बैठक घेण्यात येईल त्यावेळी निश्चितपणे याचा विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नाहरकत प्रमाणपत्र कधीपासून देणार याच्या तारखा या ठिकाणी विचारल्या आहेत. दिनांक 9-1-1996 पासून वेळोवेळी यामध्ये लक्ष देण्यात आलेले आहे (अडथळा) सभापती महोदय, फाईव्हस्टारचा प्रश्न येत नाही. कारण फाईव्हस्टार आमच्या विभागाच्या कक्षेत येत नाहीत. जे आमच्या विभागाच्या कक्षेत येते त्याविषयी आम्ही निश्चितपणाने काळजी घेतली आहे आणि घेऊ अशा प्रकारची शाश्वती मी या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना देतो आणि माझे वक्तव्य येथेच थांबवितो.

...2..

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे सांगितले आहे ते अंशत: खरे आहे. 2000 साला पासून 40 रुपये पर एकर सरकारनेच घेतलेले नाहीत. आणि असे म्हणता येणार नाही की, आपले सरकार नंतर स्थापन झाले. ते तेथे जुने राहणार आहेत. त्यामुळे त्यांच्या बाबतीत असा उल्लेख करणे की, सरकारने त्यांना खुष होऊन काही तरी दिले, ही वस्तुस्थिती नाही. परंतु ज्या शेत जमिनी कसत आहेत आणि त्याच्या बाबतीत समिती स्थापन होऊन सर्व्हे झालेला आहे. स्थलांतर करण्याच्या बाबतीत 37 एकरच्या आसपासचा जो प्रश्न होता. तो महत्वाचा विषय होता त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, बैठक कोणती झाली यांची माहिती मला नाही परंतु माझ्या दालनात निश्चितपणे मी अधिकृत बैठक बोलावील त्यावेळी बाकीच्या ज्या बाबी आहेत त्यावर निश्चितपणे विचार केला जाईल.

उपसभापती : सदर अर्धा तास चर्चा संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 22 एप्रिल, 2010 रोजी सकाळी 10.15 वाजता पुन: भरेल.

सकाळी 10.15 ते दुपारी 12.15 यावेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 34 मिनिटांनी गुरुवार,दिनांक 22 एप्रिल,2010 रोजीच्या सकाळी 10.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)